
पंचावन्न कोटींचे बळी


गोपाळ गोडसे



पंचावन्न कोटींचे बळी

गोपाळ
गोडसे

अखंड हिंदुस्थानचे मानचित्र
सिंधू नदी



चित्रे : डावीकडे : नारायण आपटे, उत्सर्ग १५.११.४९
उजवीकडे : स्वातंत्र्यवीर सावरकर, आत्मार्पण दिवस २६.२.६६
मानचित्रात : नथुराम गोडसे, उत्सर्ग १५.११.४९

प्रतिवर्षी १५ नोव्हेंबरला इच्छापत्र पुनरुच्चार समारोहपूर्वक केला जातो. सिंधू नदी स्वतंत्र हिंदुस्थानच्या छत्रछायेत स्वच्छंदतेने वाहू लागली म्हणजे अस्थींचे विसर्जन त्या नदीत कर ! तोवर अस्थींचे भावी पिढ्यांना हस्तांतरण करीत रहा.

समारोहात उभे करण्यात येणारे प्रमुख दृष्य

आरक्षींनी मुंबईत घेतलेली चित्रे. १२.५.१९४८



नथूराम गोडसे : उत्सर्ग १५.११.४९



नारायण आपटे : उत्सर्ग १५.११.४९

आरक्षींनी मुंबईत घेतलेली चित्रे. १२.५.१९४८




विष्णु करकरे : (दिवंगत दि. ६.४.१९७३)



मदनलाल पाहवा : मुक्तता १३.१०.६४

आरक्षींनी मुंबईत घेतलेली चित्रे. १२.५.१९४८



स्वातंत्र्यवीर सावरकर : निर्दोष मुक्तता



गोपाळ गोडसे : मुक्तता ३०.११.६५

विषयक्रम

१. फाळणीचे घाव १
२. निर्वासित आणि गांधीजी ८
३. सरदार पटेल आणि पंचावन्न कोटी १५
४. गांधीहत्येचे पूर्वज्ञान आणि उदासीन नेते १७
५. काश्मीर २०
६. घटना आणि अभियुक्त ४३
७. मान्यवर न्यायर्षी ! ६२
८. निवेदन
भाग १ - आरोपपत्राला उत्तर ६३
भाग २ - उपभाग १ - गांधीजींच्या राजनीतीचे क्ष - दर्शन ७८
उपभाग २ - गांधीजींच्या राजनीतीचे क्ष - दर्शन ८९
भाग ३ - गांधीजी आणि स्वराज्य ११०
भाग ४ - ध्येयभंजन १२१
भाग ५ - राष्ट्रविरोधी तुष्टीकरणाचा कळस १२९
भाग ६ - परिशिष्ट १४३
९. श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांना लिहिलेले पत्र १५३
१०. काश्मीर : १९९० १५८

मानचित्रे

१. हिंदुस्थानचे मानचिन्ह २२
२. काश्मीर - पाकिस्तानचे सर्वव्यापी आक्रमण २९
३. युद्धविराम ३९

१. फाळणीचे घाव

गांधीजींची हत्या या विषयाभोवती नुकताच एक आयोग बसला होता. न्यायमूर्ती कपूर यांची नियुक्ती त्या कामासाठी झाली होती. हत्या टळली असती काय किंवा शासकीय कर्मचाऱ्यांनी काही दुर्लक्ष केले काय असे विषय न्यायमूर्तींनी हाताळण्याचे होते. या विषयाच्या ओघात त्या वेळची दिल्लीची स्थिती कशी होती याचा आढावा घेणे आवश्यक होते. तसेच गांधीजींविषयी लोकमत कसे होते, हे बघणेही आवश्यक वाटले. न्या. श्री. कपूर यांनी आपल्या प्रतिवृत्तात या विषयांची चर्चा काही ग्रंथांच्या आधाराने, काही साक्षीदारांच्या सहाय्याने केलेली आहे (कपूर आयोग प्रतिवृत्त भाग १, पृष्ठ १३३)

दिल्लीतील परिस्थिती

"The Stern Reckoning हे न्यायमूर्ती श्री. जी. डी. खोसला यांचे पुस्तक आहे. त्या पुस्तकात त्यांनी हिंदुस्थानची फाळणी, फाळणीपर्यंतच्या घटना, आणि फाळणीचे भयानक परिणाम हे जे प्रकरण लिहिले आहे त्याचा आधार न्यायमूर्ती कपूर यांनी आपल्या प्रतिवृत्तात घेतला आहे. 'लोकांची अदलाबदल स्वतःच्या इच्छेने होत असेल तर ती गोष्ट शक्य आहे.' असे जिनांनी दि. १२ डिसेंबर १९४५ ला डॉन या वृत्तपत्रात प्रसिद्ध केले. त्यांना लोकांच्या मताची चाचपणी करावयाची होती. जे भाग पाकिस्तानात जाणार होते, तेथील हिंदूंना ती सूचना मान्य नव्हती. मात्र मुस्लिम लीगला ही गोष्ट तातडीने हवी होती. कारण त्यात पाकिस्तानच्या विरोधकांना उत्तर मिळणार होते. पंजाब, वायव्य सीमा प्रांत, सिंध, बंगाल येथील हिंदू आपापली शेती, आपापले उद्योग, आपआपले व्यापार की जे त्यांनी पिढ्यानपिढ्या राबून उभे केले होते ते सोडण्यास सिद्ध नव्हते आणि जिनांच्या लहरीला मान तुकवून कुठे भटके किंवा भिकारी म्हणून निर्वासित होणेही त्यांना संमत नव्हते. उत्तर प्रदेश, मुंबई, मद्रास, बिहार, मध्यप्रदेश येथील मुसलमानांनी आपापली घरेदारे सोडून कोठे तरी दुसऱ्या प्रदेशात जाणे पटण्याजोगे नव्हते, तेव्हा ती अडचण दूर करण्यासाठी मुस्लिम लीगला दुसरे उपाय शोधणे भाग होते. (छेदक १२ ए १)

कलकत्त्याच्या नरसंहाराचा तो महान् प्रयोग तितका यशस्वी झाला नाही. तरी त्यायोगे अनेक हिंदूंना भीतीने घरेदारे सोडणे भाग पडले. तो प्रयोग नौखाली आणि टिपेरा यात यशस्वी झाला. तेथील हिंदूंच्या मनात धडकी निर्माण करणे, त्यांची संपत्ती लुटणे, स्त्रियांवर बलात्कार करणे आणि हिंदूंना समुदायाने बाटवून मुसलमान करणे त्यांना शक्य झाले. हा मार्ग लोकांच्या अदलाबदलीच्या दृष्टीने

लीगला अधिक परिणामकारक वाटला. त्याची प्रतिक्रिया बिहारमध्ये झाली होती. तेथील मुसलमानांना सिंधमध्ये जावे लागले होते. पुन्हा एकदा लोकांच्या अदलाबदलीचा प्रश्न पुढे आला. २६ नोव्हेंबर १९४६ ला जिनांनी डॉन वृत्तपत्रात प्रसिध्द केले की, हा प्रश्न तातडीने हातात घेतला पाहिजे. सर्व हिंदुस्थानभर हिंदूंचा याला विरोध प्रकट झाला. परंतु मुस्लिम लीगने त्याला पाठिंबा दिला होता आणि ममदोतच्या नबाबासारख्या पंजाबच्या मुस्लिम नेत्याने या अदलाबदलीचे कार्यवहन करण्याची धमकी दिली होती. (छेदक १२ ए २)

सर इव्हान जेकिन्स तेव्हा पंजाबचे राज्यपाल होते. त्यांनी ममदोतच्या नबाबाच्या या धमकीचा अर्थ म्हणजे हिंदूंना पंजाबमधून छल-बलाने हुसकावून लावणे असा होतो असे म्हटले. त्याला मुस्लिम लीगच्या नेत्यांनी विरोध केला आणि पंजाबमधील बहुसंख्याकांच्या दयेवर हे अल्पसंख्य राहणे किती भयप्रद आहे हे सांगितले. (छेदक १२ ए ३)

सर फिरोजखान नून याने चंगीझखान आणि हलाकुखान यांनी केलेल्या अत्याचारांची पुनरावृत्ती होईल अशी धमकी दिली. तरी ते मुसलमान नव्हते हे ते विसरले होते. जानेवारी १९४७ मध्ये मुसलमानांनी अत्याचारी आंदोलन चालू केले. त्यायोगे पंजाबमधील संयुक्त मत्रिमंडळ संपले. (छेदक १२ ए ४)

पंजाबचे हिंदू नेते आणि विशेषत: मास्टर तारासिंग यांनी कडक भाषा वापरून या अत्याचाराचा निषेध केला असा आरोप केला गेला; पण त्यांनी कडक भाषा वापरली या गोष्टीलाच आधार नव्हता. मुसलमानांना केवळ निमित्त हवे होते. रावळपिंडीसारख्या ठिकाणी हिंदूंची कत्तल झाली. तिचे वर्णन 'रावळपिंडीवरील बलात्कार' असेच केले जाते. आपले जीव वाचविण्यासाठी हिंदूंनी छळामुळे, मनाविरुद्ध मुसलमानी धर्म स्वीकारला. हिंदू आणि शीख स्त्रियांनी प्रचंड प्रमाणावर तेथे जोहार केला. त्यांनी विहिरीत उड्या टाकून आत्महत्या केल्या, त्यातील स्त्री-अर्भकांना त्यापूर्वीच ठार मारले होते. स्वत:ची लज्जा वाचविण्यासाठी त्यांच्याजवळ तेवढाच उपाय होता. (छेदक १२ ए ५)

निर्वासितांची गाड्यातून आवक-जावक चालू झाली त्याचे वर्णन हृदयद्रावक आहे. भीतीने पछाडलेला मानवतेचा लोंढा गाड्यांमधून वाहत येत होता. श्वासोच्छ्वास करण्याइतकीही मोकळीक डब्यामधून नव्हती. छपरावरूनही लोक येत होते. लोकांची अदलाबदल झाली पाहिजे हा पश्चिम पंजाबमधील मुसलमानांनी आग्रह धरला होता. ते काम चालू होते, पण ते इतक्या सुरळीतपणे व्हावे अशी त्यांची इच्छा नव्हती. या हिंदूंना भयानकतेचा, क्रूरतेचा, अमानुषतेचा आणि अवहेलनेचा चटका जाता जाता मिळालाच पाहिजे अशी त्यांची इच्छा

आणि कृती होती. (छेदक १२ ए ९)

कुठल्यातरी स्थानकावर तासन् तास अशी गाडी थांबून असावी, त्या विलंबाला काही कारण असू नये, पाण्याचे नळ तोडले जावेत अन्न मिळू नये; लहान मुले भुकेने नि तहानेने तडफडून मरावीत हे नित्याचे चालले होते. एका अधिकृत माहितीच्या आधारे असेही झाले आहे की, आई-बापांनी आपल्या अर्भकांना आपले मूत्र पाजले, पण ते त्यांच्याजवळ तरी पुढे साठत होते कुठे ? निर्वासितांना वाहून नेणाऱ्या गाड्यांवर हल्ले होत होते. लॉऱ्या आणि ट्रक वाटेत थांबविल्या जात. लहान मुली पळविल्या जात. वयातील मुलींवर बलात्कार होत किंवा पळविल्याही जात आणि इतरांना ठार केले जाई. यातून पुरुष मंडळी कोणी वाचतील त्यांना आपला जीव काय तो वाचला एवढेच काय ते समाधान असे. (छेदक १२ ए १०)

निर्वासितांचा तांडा लोंढ्याप्रमाणे पुढे चालला होता. वृद्ध पुरुष आणि स्त्रिया चालताना गळाठून जात. त्यांना मरणासाठी रस्त्याच्या कडेला तसेच टाकून ते लोंढे पुढे जात. त्यांच्याकडे बघण्यास कोणीही नसे. रस्ते प्रेतांनी भरलेले असत. प्रेते सडलेली असत. त्यातून दुर्गंधी येई. श्वापदे आणि गिधाडे त्यांच्यावर ताव मारीत. असे तांडे म्हणजे एक पराभूत मनाने खचलेली, शोकविव्हल आणि अगतिक मानवाची यात्रा असे (छेदक १२ ए ११)

अल्पसंख्याकांना हुसकावून लावणे हेच जिथे मुस्लिम लीगचे आणि पाकिस्तानच्या कल्पनेला प्रोत्साहन देणाऱ्यांचे हेतुपुरस्सर धोरण होते, तिथे अशा व्यक्तींकडून सहानुभूतीची किंवा सुविधेची अपेक्षा करणे अर्थहीन होते. बहुतेक प्रकरणात सैनिक आणि आरक्षी (पोलिस) यांची यात्रारक्षक पथके (escorts) मुसलमान असत. त्यांच्याकडून निर्वासितांना संरक्षण मिळणे अशक्य होते. निर्वासितांना त्यांचा विश्वास वाटणेही शक्य नव्हते. कारण संरक्षण देण्यापेक्षा या अगतिक लोकांची लुटालूट करण्यात गुंतलेल्या आपल्या धर्मबांधवांच्या कृत्यातच सहभागी होण्याचा त्यांना अनावर मोह होत असे. (छेदक १२ ए १२)

पश्चिम पंजाबातून निर्वासितांना आणणाऱ्या गाड्यांवर अनेक हल्ले होत असत. पण १५ ऑगस्ट १९४७ नंतर होणारे हल्ले अत्यंत क्रूर असत. सप्टेंबर महिन्यात झेलम जिल्ह्यातील पिंडदादखान गावातून निघालेल्या गाड्यांवर तीन ठिकाणी हल्ले झाले होते. दोनशे स्त्रियांना ठार मारले होते किंवा पळविले होते. वाहहून निघालेल्या निर्वासितांच्या गाडीवर वझिराबादजवळ चढाई झाली होती. ती गाडी सरळ लाहोरला आणण्याऐवजी सियालकोटकडे वळवली गेली. हे सप्टेंबरमध्ये घडले. ऑक्टोबरमध्ये सियालकोटहून येणाऱ्या एका गाडीवर

असाच अत्याचारी प्रयोग झाला. पण विशेषत: जानेवारी १९४८ मध्ये बन्नूहून निघालेल्या गाडीवर गुजरात स्थानकावर अत्यंत तीव्र हल्ला झाला. हिंदूंचा भयानक संहार झाला. त्या गाडीवर खुशाव येथेही अत्याचार झाला. सरगोदा आणि लायकपूर या वाटेने ती गाडी सरळ लाहोरला आणण्याऐवजी खुशाव मालकवाल, लालामोसा गुजरात आणि वझिराबाद या दूरच्या मार्गाने लाहोरला आणली गेली. बिहार सैनिक पथक किंवा बिहार रेजिमेंट यात्रा रक्षक म्हणून दिले होते. पण त्यांच्यावर शस्त्रधारी पठाणांनी हल्ला केला, गोळीबार केला. यात्रारक्षक दलाने उलट गोळीबार केला. तो करता करता दारूगोळा संपला. मग तीन सहस्र पठाणांच्या जमावाने सरळ गाडीवर हल्ला केला. पाचशे लोक मारले. प्रवासी बहुतेक बन्नूकडील होते आणि तुलनेने ते सधन होते. ते सर्व लुटले गेले. हे जानेवारी १९४८ मध्ये घडले. (छेदक १२ ए १३)

पाराचिनारच्या हिंदूंवर भोवतालच्या टोळीवाल्यांनी हल्ले केले होते. त्यांची घरे आणि दुकाने गेली होती. म्हणून त्यांना कोहाटला हलविण्याचे ठरले आणि तेथून गाडीने हिंदुस्थानात धाडण्याची योजना केली गेली. ते हलविले जाईपर्यंत त्यांना सुरक्षितता मिळावी म्हणून तंबू उभारून त्या शिबिरांतून चांगल्या संरक्षणाखाली त्यांची व्यवस्था करण्याचे ठरले. (छेदक १२ ए १४)

अशा प्रकारे या हिंदूंना तंबूमध्ये तर ठेवले, पण त्यांना शिधा पुरविला गेला नाही किंवा नियंत्रित भावानेही अन्नधान्य दिले गेले नाही. त्यांची घरेदारे लुटली गेली. बर्फ पडू लागले तेव्हा हिंदुस्थान शासनाने या प्रकरणी लक्ष घातले. वायव्य सीमा प्रातांच्या राज्यपालाने शिबिरे मोडण्याची आज्ञा दिली. पण शिबिरात राहणाऱ्यांनी तेथून हलण्यास नकार दिला आणि अत्यंत प्रतिकूल वायुमानातही त्या तंबूतच वास्तव्य करण्याचे ठरविले. स्वत:च्या घरादारात परतण्यात त्यांना इतकी असुरक्षिता वाटली. पण शिबिरातही दुर्दैव त्याचा पाठलाग करीत होते. २२ जानेवारीला पाराचिनारच्या शिबिरावर टोळीवाल्यांनी हल्ला केला. एकशेतीस हिंदू मारले गेले. पन्नास व्रणित झाले, पन्नास पळविले गेले. त्यानंतर अकराशे निर्वासित पाराचिनारहून कोहाटला धाडले गेले. (छेदक १२ ए १५)

तरुण स्त्रियांना पळवून नेणे आणि त्यांना क्रूरपणे वागविणे हा मानवी इतिहासातील एक अधम अध्याय आहे. स्त्रिया ओढल्या किंवा पळविल्या जात. त्यांच्यावर अतिप्रसंग केला जाई. त्या बलात्काराचे लक्ष्य होत. एका पुरुषाकडून

---

* (पाराचिनार हत्याकांड हा पाकिस्तानच्या उपेक्षेचा परिणाम होता असे हिंदुस्थान टाइम्सने १८/१/१९४८ च्या अंकात म्हटले आहे.)

दुसऱ्या पुरुषाकडे त्या फिरवल्या जात. त्यांच्यावर व्यापार होई. त्या गुरांप्रमाणे विकल्या जात. आणि इतके झाल्यावर कधी कोणी स्त्रिया सोडविल्या गेल्याच तर त्या आपल्याशी झालेल्या वर्तनाचा जो वृत्तान्त सांगत तो, सौम्य भाषेत बोलावयाचे तर, रोमांच उभे करणारा असे. (छेदक १२ ए १६)

बलात्कार, अपहरण, लूटमार, जाळपोळ, हत्या, नरसंहार यांच्या अशा प्रकारच्या वार्ता पूर्व पंजाबच्या लोकांपर्यंत पोहोचल्या तेव्हा याची प्रतिक्रिया उमटली. ती प्रतिक्रिया गौरवास्पद होती असे म्हणता येणार नाही. पण सर्वसामान्य लोकांत सीमेवरील संरक्षण दलावर विश्वास नव्हता. स्थानिक अधिकाऱ्यांवरही त्यांचा विश्वास नव्हता. ज्या लोकांवर हे अत्याचार होत होते त्यांना तर कोणतीही व्यक्ती विश्वासार्ह वाटली नाही. मात्र त्यांना वरिष्ठ नेत्यांवर संरक्षणासाठी विश्वास ठेवावासा वाटला. त्याला अनुसरून पंतप्रधान जवाहरलाल नेहरू आणि सरदार पटेल यांना व्यक्तिगत पत्रे जाऊ लागली. काही पत्रे तर अशा आग्रहाची होती की, माझ्या पत्नीला किंवा माझ्या बंडिलांना किंवा माझ्या अमुक नातेवाईकांना वाचवा हिंदुस्थानच्या प्रधानमंत्र्यावर अस्थिर धोरणाची टीका करणारी, तसेच हिंदूंविषयी सहानुभूती नाही असे आरोप करणारी पत्रे येत होती. तसेच पश्चिम पंजाबमधील हिंदूंच्या प्राणांच्या मोलाने स्वराज्य मिळाल्याची फळे तुम्ही उपभोगीत आहात असा आरोप करणारीही पत्रे होती. ज्या नातेवाइकांचा शोध लागत नव्हता अशांविषयीची पत्रे त्यांना धाडली जात. (छेदक १२ ए १७)

प्रत्येक दिवशी, प्रत्येक आठवड्याला, पश्चिम पंजाबातून हिंदूंचे लोढेंच्या लोंढे हिंदुस्थानच्या सीमेत येऊ लागले. ते आगगाडीने आले, लॉऱ्यांमधून आले, विमानांतून आले, बैलगाड्यांतून आले आणि पायीही आले. होता होता डिसेंबर १९४७ च्या शेवटी ४० लाख लोक हिंदुस्थानात येऊन थडकले. त्यांनी आपापले घरदार मागे सोडले, मौल्यवान वस्तू सोडून दिल्या. त्यातील बहुतेक शोकग्रस्त होते. त्यांची शरीरे विकल होती, व्रणित होती आणि त्यांचे आत्मे भयानकतेच्या धक्क्याने रक्तबंबाळ झाले होते, आणि अशा स्थितीत ते या नव्या घरात आले. निर्वासितांच्या शिबिरांमध्ये यातना होत्या. त्यांच्या भवितव्यात अनिश्चित आशा लटकत होती. पण इतके असूनही त्यांच्या जीवितावरील धोका टळला होता आणि त्यांच्या स्त्रियांना येथे संरक्षण होते. त्यांनी अशी सीमारेषा ओलांडली आणि हिंदुस्थानात प्रवेश केला तर त्यांच्या श्रांत आणि जवळ जवळ नीरव आणि क्लान्त ओठांतून जणू विजयाचा उन्माद व्यक्त करणारे उद्‌गार बाहेर पडले. आपल्याला निवारा मिळाला. आपण संकटमुक्त झालो, या अवभाराच्या (रिलीफच्या) जाणिवेनेच त्यांना रडू कोसळले. त्यांनी आपल्या कंठातून हिंदुस्थानला

मानवंदना दिली, 'जय हिंद' (छेदक १२ ए १८)

सिंधमधील सुलतानकोट येथे मुस्लिम लीगची एक परिषद भरली होती. पाकिस्तानला हातभार लावणाऱ्या लोकांची प्रवृत्ती प्रतिबिंबित होणारे एक गाणे तेथे म्हटले गेले त्याचा भावार्थ असा :

पाकिस्तानमध्ये इस्लामांचे
स्वतंत्र केंद्र निर्माण होऊ दे
पाकिस्तानमध्ये निर्मुस्लिमांचे तोंडही
बघण्याची वेळ आम्हाला न येऊ दे
मुस्लिम राष्ट्राची घरे तेव्हाच उजळतील
की जेव्हा पाकिस्तानांत मूर्तिपूजक काट्यांचे
अस्तित्व असणार नाही
हिंदूंचे कर्तृत्व येऊन जाऊन गुलाम राहाणे
अशा गुलामांना राज्यशासनात भाग
घेण्याचा अधिकार कसा असणार ?
राज्य करण्यात त्यांना कोठेही कधी यश आलेले नाही,
(छेदक १२ ए १९)

जालंदर आणि लुधियाना यांच्यामध्ये, तसेच लुधियाना आणि राजपुरा, यांच्यामध्ये गाड्यांवर (हिंदूंकडून) हल्ले झाले. पतियाळातील शीख लोक हे याला उत्तरदायी होते असे म्हटले गेले. त्या वेळच्या अधिकाऱ्यांनी हे हल्ले थांबावेत असा प्रयत्न केला, पण ते थांबविण्याला स्वत:हून मान्यता देतील अशी शिखांची मन:स्थिती नव्हती, पण हे लक्षात ठेवले पाहिजे की यावेळपर्यंत पश्चिम पाकिस्तानात शीख हे मुस्लिम क्रोधाचे विशेष लक्ष्य होते. आणि शिखांचे जीवित कोठेही सुरक्षित नव्हते. शीख दिसताच त्याला ठार मारले जाई. (छेदक १२ ए २०)

सिंधमध्येही अशाच प्रकारच्या घटना झाल्या. दि. ११ जानेवारी १९४८ ची एक घटना पुरावा २६० म्हणून नोंदलेली आहे. ८५० हिंदू निर्वासितांची एक तुकडी दि. ९ जानेवारी १९४८ ला ओखा बंदरावर उतरली. क्वेट्टा मेलने क्वेट्टयाहून कराचीला जे लोक गेले त्यातील ते लोक होते. त्यांची लूटालूट झाली आणि संहारासारखे नेहमीचे प्रकारही झाले. शिखांसहित सिंधी लोकांचा कसा क्रूर संहार झाला याचेही वर्णन त्या पुराव्यात आहे. त्यांच्या स्त्रियांजवळील दागिने लुटले गेले. नथीसारखे त्यांच्या अंगावरील अलंकारही हिसकावून घेतले गेले. (छेदक १२ ए २१)

दि. १५ जानेवारी १९४७ चे एक प्रपत्र (डॉक्युमेंट) पुरावा २६० चे म्हणून नोंदलेले आहे. ते मुंबई गुप्तचर विभागाचे उपप्रमुख (डेप्युटी इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलिस) यांचेकडून आरक्षी विभागाचे जिल्हा अधीक्षक, विभागाचे डी. आय. जी. यांनी धाडलेले परिपत्रक आहे. 'दिनांक ६ जानेवारी १९४८ ला कराचीला जातीय दंगा झाला. त्यात मुसलमानांनी हिंदू, शीख यांच्यावर अनन्वित अत्याचार केले. त्यातील निर्वासितांची पहिली तुकडी ८५० हिंदूंची आहे, ती काठेवाडमधील ओखा बंदरात पोहोचली आहे, आणखी निर्वासित येणार आहेत, त्या निर्वासितांत सर्व थरांतील लोक आहेत, त्यात महाराष्ट्रीय, पंजाबी, सिंधी, काठेवाडी, मारवाडी आदी सर्व प्रांतांतील लोक आहेत. निर्वासितांना मुस्लिम रक्त हवे आहे, असे त्या परिपत्रकांत म्हटले आहे.' (छेदक १२ ए २२)

न्या. कपूर यांनी घेतलेला दिल्लीतील परिस्थितीचा आढावा आणि त्यासाठी त्यांनी घेतलेले संदर्भ किंवा आधार एकपक्षी आहेत असा आक्षेप कोणी घेण्याची शक्यता आहे. एक सर्वसाधारण विधान अरो असते की, जसा मुसलमानांनी हिंदूंचा संहार केला तसा हिंदूंनीही मुसलमानांचा केला आणि म्हणून त्या क्रूरतेचे दोघेही वाटेकरी आहेत. फाळणीच्या पापावर पांघरूण घालण्यासाठी केलेला तो एक फसवा युक्तिवाद असतो. अशा उभयपक्षी नरसंहारात हिंदुस्थानचे अभंगत्व जसेच्या तसेच राहिले असते तर त्या नरसंहाराची परस्पर वजावट झाली असे मानता आले असते. पण फाळणी पदरात पाडून घेण्यासाठी मुस्लिम लीगने प्रकटपणे नरसंहाराचे आणि अत्याचाराचे सत्र चालू ठेवले होते. जो प्रतिकार झाला तो फाळणी होऊ देणार नाही या उद्देशाने नव्हे, तर उर्वरित हिंदुस्थानात अशा अत्याचारांना पायबंद बसावा म्हणून.

दुसरे, फाळणीच्या प्रक्रियेत लोकसंख्येची अदलाबदल त्या त्या प्रमाणात झाली असती तरीही रक्तपाताचा दोष एकाच पक्षावर लादता आला नसता. पण तसे झाले नाही. आपल्याजवळ संख्याबळ आणि शौर्य असूनही आपले नेते विशिष्ट शिकवणुकीच्या आहारी गेल्याने मुसलमानी आक्रमक धोरणाला ते शरण गेले. आपल्या नेत्यांच्या त्या वर्तनाने, मुस्लिम संक्रमणाचे दिल्लीवर झालेले आघात हीच पार्श्वभूमी गांधीहत्येच्या चौकशीच्या संदर्भात असल्याने न्यायमूर्ती कपूर यांनी विषयाला धरून असलेला भाग गांडला आहे असे मला वाटते.

● ●

२. निर्वासित आणि गांधीजी

गांधी हत्येची कारणे या शीर्षकाखाली कपूर प्रतिवृत्ताच्या भाग १ पृष्ठ २२६वर न्यायमूर्तींनी कारणांची चिकित्सा केली आहे. न्यायमूर्ती म्हणतात —

पंचावन्न कोटी न देण्याचा आपला निर्णय शासनाने फिरविला ते गांधीहत्येचे एक मुख्य कारण होते असे अनेक साक्षीदारांचे आग्रही प्रतिपादन होते. पंचावन्न कोटी पाकिस्तानाला द्यावयाचे नाहीत हा निर्णय मंत्रिमंडळाने ९/१/४८ ला घेतला. १३ जानेवारीला गांधीजींनी उपवास आरंभिला. १४ जानेवारीला मंत्रिमंडळाची बैठक झाली. त्यात ५५ कोटी न देण्याचा निर्णय फिरविला गेला. हा निर्णय अद्वितीय (unique) आहे असे गांधीजींनी त्याचे वर्णन केले. प्यारेलाल यांनी 'महात्मा गांधी, दि लास्ट फेज' या आपल्या पुस्तकाच्या दुसऱ्या खंडात पान ७१९ वर म्हटले आहे, 'या निर्णयामागे मंत्रिमंडळाचा हेतू काय होता ?' महात्मा गांधींनी विचारले. 'अर्थात् माझा उपवास ! (त्यांनीच उत्तर दिले) उपवासाने सर्व दृष्टी बदलली. उपवास केला नसता तर त्यांनी योजनेबाहेर पाऊल टाकले नसते, जेवढे ठरले होते तेवढेच त्यांनी केले असते. त्याव्यतिरिक्त घरगुती विधी म्हणून एक असतो. इंग्लंडमध्ये त्याचा शतकोशतके वापर होत आला आहे. सामान्य विधी जेथे लुळा पडतो तेथे न्यायबुद्धीच्या (equity) साहाय्याने काम होते. (छेदक १२ आय १)

'आपल्या उपवासाचा गुजरात (पंजाब)च्या निर्वासितांच्या गाडीत झालेल्या नरसंहारावर, तसेच कराचीच्या हत्यासत्रावर, विपरीत परिणाम होणार नाही काय ?' असे गांधीजींना विचारल्याचा उल्लेख प्यारेलाल यांच्या त्या पुस्तकाच्या मागच्याच पानावर आहे. ते म्हणाले, 'त्या शक्यतेचा विचार माझ्या मनात आला. पण असा विचार करून आपण सत्यमार्गापासून स्वत:ला विचलित होऊ देत नाही.' (छेदक १२ आय २)

पाकिस्तानला हे प्रदान झाल्यावर लगेच श्री. न. वि. गाडगीळ यांचा महाराष्ट्रात दौरा झाला. 'गांधीजींचे हे वर्तन' येथल्या अनेकांना आवडले नाही, असे ते म्हणाले, ते परत आले तेव्हा ते गांधींना भेटून म्हणाले, गांधीजींचा जीव किरकोळ पंचावन्न कोटींना आम्ही विकत घेतला असे मी लोकांना सांगितले. श्री. गाडगीळ म्हणतात की, हा अमूल्य जीव थोड्याच दिवसांत आम्हाला सोडून जाणार आहे याची मला जाणीवच नव्हती. प्रार्थनास्थळावरील स्फोटकाचा स्फोट हा पंचावन्न कोटींच्या प्रदानाचा प्रतिसाद होता असे त्यांचे मत होते. (छेदक १२ आय ३)

राजाजींनी 'गांधीजींची शिकवण नि तत्त्वज्ञान' हा ग्रंथ लिहिला आहे.

पन्नास कोटी पाकिस्तानला देण्याचा हेका गांधीजींनी धरला त्याचे फळ त्यांना त्यांच्या हत्येत मिळाले असे सरदार वल्लभभाई राजाजींशी बोलताना म्हणाल्याचे त्यात लिहिले आहे.

गांधीजींनी ५५ कोटीसारखी मोठी राशी पाकिस्तानला देण्याचा समादेश दिला; आणि तो केव्हा ? तर पाकिस्तान हिंदुस्थानाविरुद्ध सैनिकी उठावाचे दुष्ट डाव रचीत होते आणि ते कार्यवाहीत आणीत होते त्यावेळी ! म्हणून हिंदूंचा जो क्षोभ झाला, त्यातून त्यांची हत्या झाली असे सरदार पटेलांना वाटले. गांधीविरोधी महाराष्ट्रीय लहान सैनिकी गटाला गांधीजींचा हा देशघाताचा उच्च बिंदू वाटला. तो आता क्षम्य नाही असे त्या गटाला वाटले. आणि त्या गटाने गांधीजींना जगातून नाहीसे करण्याचे ठरविले. कारण आता गांधीहत्येवाचून कोणताच मार्ग त्यांना परिणामकारक वाटला नाही.' (छेदक १२ आय ४)

राजाजींनी पुढे म्हटले आहे की, ही हत्या ५० कोटीसाठी असेल किंवा आणखी कोणत्या फार जुन्या कारणासाठी ती झाली असेल, पण गांधीजींचे मत मात्र असे होते की, हिंदुस्थानने आपला समझोता कार्यवाहीत आणला पाहिजे आणि आपल्या स्वातंत्र्याच्या कारकिर्दीचा आरंभ अनुबंध मोडण्याने करू नये. त्यांच्या मताने हिंदुस्थानाने ५० कोटी दिले नसते तर हिंदुस्थानचे नैतिक बळ नाहीसे झाले असते. एखाद्या हिंदू छरिकेने (रिव्हाल्वरने) मरण्याऐवजी ते हृदय विदीर्ण होऊन मेले असते. ५० कोटी दिल्याने हिंदुस्थानची नैतिक श्रेणी स्थिर राहिली, इतकेच नव्हे तर ती अधिक उंचावली (छेदक १२ आय ५)

पुरुषोत्तमदास त्रिकमदास यांनी आपल्या साक्षीत गांधीहत्येचे कारण दिले ते मुसलमानांशी त्यांची लगट, कलकत्त्याला आणि नोआखालीला त्यांनी केलेले शान्तताप्रस्थापनेचे प्रयोग, ५५ कोटी देण्याचा त्यांचा हट्ट (की जो त्यांनी उपवासाच्या प्रयोगाने कार्यवाहीत आणविला) आणि हिंदुसभेची गांधीजींविषयी धारणा (छेदक १२ आय ७).

पंजाब किंवा वायव्य प्रांतातून हिंदू आणि शीख दिल्लीला, पूर्व पंजाबला किंवा पश्चिम उत्तर प्रदेशात आले. त्यांची धारणा अशी होती की ते आपल्या राष्ट्रभूमीत, मातृभूमीत येत आहेत. पण त्या त्या ठिकाणी त्यांना वागवणूक मात्र आगंतुकासारखी नको असलेल्या अतिथीसारखी मिळत गेली अशी त्यांची भावना झाली. कारण गांधीजींचे मत होते की त्यांनी आपल्या प्रांतात परतावे. छोट्या श्रेणीचे नेते जेव्हा गांधींच्या या मताची री ओढून ध्वनिक्षेपकाप्रमाणे त्याचा प्रसार करू लागले तेव्हा गांधीजींविषयी त्यांचा तिरस्कार अधिक तीव्र होऊ लागला. (छेदक १२ आय ८)

निर्वासितांच्या अशा भावना होत्या. पण सर्वसामान्यपणे हिंदूंना आणि

त्यातल्या त्यात विशेषत्वाने हिंदुसभेच्या घटकांना गांधीजींच्या मुस्लिम तुष्टीकरणाच्या नीतीची चीड असे. त्यांच्या मताने या नीतीमुळेच हिंदुस्थानचे विभाजन झाले आणि गांधीजी हेच त्याचे एकमेव शिल्पकार होत असेही त्यांचे मत होते. गांधीजींनी ज्यासाठी उपवास केला त्या ५५ कोटीच्या प्रदानाचा आणि उपवास सोडण्याराठी लादलेल्या सात अटींचा त्यांनी तीव्र निषेध केला, तो इतका की हिंदुसभेचे एक नेते, श्री. आशुतोष लाहिरी यांनी सात अटींवर हिंदुनेत्यांनी करावयाच्या स्वाक्षरीला स्वच्छ नकार दिला. (छेदक १२ आय ९)

हिंदुसभेने पाठिंबा दिलेले दिल्लीतील निर्वासित फारच क्रुद्ध झाले होते. ते आपला संताप मिरवणुकीने आणि घोषणांनी व्यक्त करीत होते. पण त्यांचा तो तोंडी प्रतिकार होता. पुण्याचे सावरकरवादी महाराष्ट्रीय फारच अस्वस्थ झाले. अगतिक झाले. ते सहनशीलतेच्या पलीकडे गेले. गोपाळ गोडसेने आपल्या साक्षीत सांगितल्याप्रमाणे, गांधीजींना या राजकीय रंगमंचावरून हलविण्यावाचून हिंदूंचे आणि हिंदुत्वाचे रक्षण होणार नाही असे त्यांचे मत होते. आणि हिंसा, अहिंसा या तत्त्वज्ञानात ते गुरफटलेले नसल्याने त्यांनी राजकीय हत्या कार्यवाहीत आणण्याचा निर्णय घेतला. गांधीजींना मारण्याचा त्यांनी कट केला. त्यांचा पहिला प्रयत्न निष्फळ ठरला, पण दुसऱ्या प्रयत्नांत त्यांना यश मिळाले. गोपाळ गोडसेने आपल्या कथनात येथपर्यंत सांगितले आहे की, जरी नथूराम, आपटे आणि त्यांचे साथीदार पकडले गेले असते, तरीही गांधीजींचा जीव वाचला नसता. त्यायोगे त्याने त्यांच्या गटात गांधीविरोधी वातावरणाची किती तीव्र मात्रा होती आणि कटाचा व्याप कोठवर होता हे सूचित केले आहे. (छेदक १३ आय १०).

श्री. जे. एन्. साहनी यांनी सांगितले की, पंजाबातील हिंदुशीख निर्वासितांची गांधीजींवर पूर्ण श्रद्धा होती. इतकेच नव्हे तर ते त्यांची पूजा करीत. पण काही घटनांनी ती श्रद्धा कमी झाली.

१. हिंदुस्थान सोडून जाऊ नका अशी हिंदुस्थान शासनाने मुसलमानांची चालविलेली मनधरणी व जे मुसलमान हिंदुस्थान सोडून गेले त्यांची परत या म्हणून विनवणी, ही नीती योग्य असेल वा अयोग्य असेल. कदाचित् ती योग्य असेल; तरीही ती निर्वासितांना आवडली नाही. कारण मुसलमानांनी जी घरे वा दुकाने सोडली होती ती आपल्या पुनर्वसनाकरिता उपयोगी पडतील असे त्यांना वाटले.

२. पाकिस्तानला ५५ कोटी देण्याच्या मागे गांधीजींचा आग्रह व उपवास होता. त्यामुळे निर्वासित अतिशय संतापले. कारण या ५५ कोटींचा उपयोग काश्मीरच्या संरक्षणात गुंतलेल्या हिंदुस्थानच्या सैनिकांना मारण्याकडे होईल असा त्यांचा दृष्टिकोण होता.

३. हिंदुस्थानातील मुसलमानांचा कल पाकिस्तानास पाठिंबा देण्याचा होता. आणि वस्तुत: आज हिंदुस्थान आहे त्याच भूभागातील मुसलमानांच्या मतांनी पाकिस्तानची निर्मिती झाली. हिंदु-शिखांत आत्मरक्षणाची, आपले अधिकार टिकवून धरण्याची भावना निर्माण झाली. संघटन करण्याचे त्यांच्या मनात आले नि ती चळवळ सर्व भारतभर पसरली. (छेदक १२ आय ११)

याव्यतिरिक्त गांधीजींची प्रार्थनोत्तर प्रवचने हिंदूंना आवडत नसत. मुसलमानांना संरक्षण द्या असा हेका गांधीजी धीरीत; परंतु स्वातंत्र्यासाठी सर्वस्वाचा होम करणाऱ्या हिंदूशिखांविषयी ते सहानुभूती दाखवीत नसत. ते आपल्या घराघरांतून उद्ध्वस्त झाले होते. अवर्णनीय क्रौर्य, बलात्कार, अपहरण, हत्या, लूटमार, जाळपोळ अशा यातनांच्या सत्रातून ते धक्के आणि चटके खात दिल्लीला पोहोचले होते. त्यांना वाटत होते ही आपली मातृभूमी आहे. आपल्याला येथे संरक्षण मिळेल अशी त्यांची मनोमन अपेक्षा होती. त्यांचे येथे पुनर्वसन होईल ही त्यांची आशा होती. परंतु त्यांच्या या सर्व आशांचा चक्काचूर झाला. तुमची मुले, तुमच्या स्त्रिया, तुम्ही, उपाशी राहा, थंडीत उघड्यावर गोठून जा, अशा प्रकारची प्रवचने ऐकण्याची त्यांची सिद्धता नव्हती. इतकेच नव्हे तर ज्यांनी ही दैन्यावस्था त्यांच्या वाट्याला आणली, ज्यांनी पाकिस्तान उभे केले त्या मुसलमानांना हिंदुस्थान शासनाचे संरक्षण मिळावे हे त्यांना असह्य झाले. ह्या भावनांचा हिंदुसभेने विशेषत: त्यातील अतिरेकी घटकांनी, त्यातल्या त्यात दक्षिणेतील म्हणजेच महाराष्ट्रातील घटकांनी पूर्ण लाभ घेतला. (छेदक १२ आय १२)

पश्चिम पाकिस्तानातून आलेल्या हिंदू-शिखांची आणि विशेषत: हिंदुस्थानातील सर्व हिंदूंची, त्यातल्या त्यात हिंदुसभा गोटात ही धारणा होती की काँग्रेसने मुस्लिम अनुनयाचा अवलंब केला त्याचा परिणाम पाकिस्तानातील हिंदूंच्या ससेहोलपटीच्या रूपाने दिसून आला. त्या अनुनयामुळेच पाकिस्तान निर्माण झाले, आणि तेथील हिंदूंना गृहहीन व्हावे लागले. महात्मा गांधीजींच्याच नव्हे, तर लहान लहान काँग्रेस नेत्यांच्या भाषणांतूनही हा अनुनयाचा क्रम चालू राहिला. इतकेच नव्हे तर त्यांनी गांधीजींपेक्षाही वरताण केली (जे. एन्. सहानी साक्ष क्र. ९५ छेदक १२ आय. १३).

मुसलमानांचा छळ चालला आहे अशी गांधीजींची धारणा व्हावी म्हणून त्यांच्या अनुयायांनी गांधीजींची दिशाभूल केली. निर्वासित चैनीत राहात आहेत. त्यांच्याजवळ भरपूर पैसे असून ते सुविधांचा दुरुपयोग करीत आहेत, अशासारख्या खोट्या कल्पना ते गांधीजींना देत राहिले. या अपप्रचाराने निर्वासितांचा संताप झाला. त्यांना या लोकांचा तिटकारा आला. कारण काँग्रेसचे काही कार्यकर्ते

मुसलमानांना संतुष्ट करण्याच्या मागे लागले होते. निर्वासित झालेल्या हिंदूंच्या आवश्यक गरजांकडेही ते दुर्लक्ष करीत होते. (छेदक १२ आय १४).

न्या. श्री. कपूर यांचा अभिप्राय असा आहे की, वरील कारणपंरपरेमुळे निर्वासित गांधीजींच्या जिवावर उठले होते असे वाटेल, पण तशी वस्तुस्थिती नव्हती. गांधीजींनी जे म्हणून कार्य केले त्यासाठी, तसेच त्यांनी हिंदू, शीख आणि इतर यांना संकटात जो हात दिला त्यासाठी त्या लोकांच्या मनात त्यांच्याबद्दल फार आदर होता. फाळणीनंतर निर्वासितांना जी उद्विग्नता आली त्यापेक्षा तो आदर अधिक होता. गांधीजींना काही शारीरिक हानी करावी ह्या विचाराचा त्यांच्या मनात संभव नव्हता असे सहानी यांनी म्हटले आहे. परंतु सावरकरवादी लढाऊ वृत्तीची काही महाराष्ट्रीय मंडळी इतकी संतापली होती की, त्यांच्या पिस्तुलाला ते गांधीजी बळी पडले, की जे महात्मा होते, तत्त्ववेत्ते होते, राजनीतिज्ञ होते आणि 'डाव्या गालाच्या' तत्त्वाचा व्यवहार करण्यावर ज्यांचा विश्वास होता. (छेदक १२ आय १५).

गांधीजींना शारीरिक अपाय करावा असा विचार निर्वासितांच्या मनात असण्याचा संभव नव्हता हा न्यायमूर्ती कपूर यांचा निष्कर्ष वस्तुस्थितीशी सुसंगत वाटत नाही. कपूर प्रतिवृत्तातच नोंदलेल्या काही साक्षींचे कथन असे आहे.

श्री. रंधावा हे १८ क्रमांकाचे साक्षीदार होते. त्यांनी आपल्या साक्षीत सांगितले आहे की, गांधीजींच्या उपवासाच्या काळात गांधीजींविरुद्ध निर्वासित लोक निदर्शने करीत असत. 'मरना है तो मरने दो' अशा घोषणाही ते करीत. (छेदक १२ ई १४).

उपवासाच्या काळात आणि त्या आरापासच्या दिवसांत परिस्थिती फारच तणातणीची होती. सर्वत्र जसा गोंधळच गोंधळ होता. निर्वासित अतिशय चिडलेले होते. निर्वासितांचा घोळक्याच्या घोळका बिर्लाभवनबाहेर जमत असे. 'गांधीको मरने दो' अशा घोषणा तो देत असे. याचे कारण अंशत: गांधीजींनी ५५ कोटी रुपये देण्याचा आग्रह धरला हे होते आणि अंशत: निर्वासितांना साहाय्य देण्याऐवजी मुस्लिम समाजाला ते साहाय्य देत होते. (छेदक १२ ई २५).

श्री. रंधावा हे त्यावेळी दिल्लीचे उपआयुक्त होते. पृष्ठ १६६ वर (छेदक १२ सी २९) न्या. श्री. कपूर यांचा अभिप्राय असा आहे — 'जे निर्वासित येत होते त्यांच्याविषयी पंतप्रधान नेहरू किंवा दुसरे मंत्री यांना सहानुभूती नव्हती किंवा ते त्यांच्या विरुद्ध होते अशा मताशी हा आयोग (कमिशन) सहमत नाही. श्री. जे. एन्. सहानी यांनी साक्ष दिली आहे त्यात नेहरूंची मन:स्थिती प्रतिबिंबित होते. मात्र शरणार्थी तसे मानीत नव्हते आणि गांधीजी जेव्हा आपल्या प्रार्थनोत्तर प्रवचनांत सहानुभूतीचा अभाव असलेली भाषणे देत,

त्यावेळी ते गांधीजींवर क्रुद्ध झाले. कारण गांधीजी म्हणजेच काँग्रेस नि काँग्रेस म्हणजेच गांधीजी अशी त्यांची धारणा होती. तुम्ही आपापल्या घरी परत जा हे गांधीजी सांगत तेव्हा तर ते गांधीजींवर अधिकच चिडत. कोणताही त्याग करायला लागला तरी कोणत्याही परिस्थितीत त्यांची परत जाण्याची सिद्धता नव्हती. आपल्याशी तेथे कसा व्यवहार झालेला आहे याचा त्यांनी अनुभव घेतलेला होता आणि पाकिस्तानी अधिकारी आणि लोक यांच्या हातून त्यांना त्यापेक्षा काही वेगळी वर्तणूक मिळेल हाही संभव त्यांना वाटत नव्हता. मुजाहीद, रझाकार , लीगचे कार्यकर्ते तसेच तेथले अधिकारी हे सर्व या निर्वासितांचे अगत्यपूर्वक स्वागत करतील अशी त्यांना अपेक्षा नव्हती, आणि म्हणून त्यांचा आग्रह असा होता की जरी ते आपल्या भूमीत आले आहेत तसे मुसलमानांनी स्वत:साठी निर्माण केलेल्या भूमीत जावे. ही विचारधारा योग्य की अयोग्य हे ठरविणे प्रस्तुत आयोगाच्या कक्षेत नाही. पण निर्वासितांची ही मनोवृत्ती होती. गांधीजींच्या उपोषणाने ती आणखी भडकली. तीच गोष्ट पाकिस्तानला ५५ कोटी रुपये प्रदान करण्याने आली. हिंदूंच्या मताने ते कृत्यच (५५ कोटींचे प्रदान) एक क्रूर कृत्य होते. कारण ते द्रव्य हिंदुस्थानच्या सैन्याविरुद्ध लढण्यासाठी वापरले जाण्याचा मुसता संभवच नव्हता तर निश्चिती होती. स्वत:चे संरक्षण करण्यास असमर्थ असलेल्या काश्मीरच्या संरक्षणासाठी आपले सैन्य धाडले गेले होते. पाकिस्तानी सैन्याचा काश्मीरची सुरेख भूमी शस्त्रबळाने हस्तगत करण्याचा व्यूह होता. आपल्या सैनिकांच्या शौर्याव्यतिरिक्त त्यांना तेथे कसलाही अडथळा राहणार नव्हता.

प्रामुख्याने या निर्वासितांच्याच भावना न्या. श्री. कपूर यांनी वर्णिल्या आहेत. त्या गांधीजींविरुद्ध होत्या की नव्हत्या हेही वरील अवतरणातच स्वयंसिद्ध आहे.

श्री. ब्रिज कृष्ण चांदीवाला (साक्ष क्र. ११) यांच्या साक्षीचा उल्लेख न्यायमूर्ती कपूर यांनी खंड १ पृष्ठ १४० (छेदक १२ ए ३३) यात केला आहे. डॉ. पाठक — आजचे उपराष्ट्रपती हे श्री. कपूर यांच्या पूर्वी आयोगाचे मुख्य होते. त्यांच्यापुढे साक्ष देताना श्री. चांदीवाला यांनी म्हटले होते की, सप्टेंबर १९४७ मध्ये दिल्लीमध्ये हिंदुमुसलमानांचे दंगे चालू होते आणि दिल्लीत संचारबंदी होती. अनेक लोक मारले गेले. चांदीवाला यांनी महात्मा गांधींना ते वृत्त वेळोवेळी कळविले. कलकत्त्याहून गांधीजींना दिल्लीत बोलावून आणले ते त्यांनीच. त्यांच्या मते गांधीजी जर आले नसते तर दिल्लीच्या रस्त्यारस्त्यावर त्यापेक्षा मोठा संहार झाला असता. त्यांच्या आगमनाने शांतता प्रस्थापित झाली पण पाकिस्तानातून आलेले हिंदु निर्वासित मात्र चिडले होते. एका प्रसंगी गांधीजी किंग्जवे कँपला गेले असताना निर्वासित त्यांच्याजवळ गेले आणि गांधीजींवर

त्यांनी संतापजनक शब्दांचा वर्षाव केला. तो विरोध हळू हळू वाढत गेला आणि गांधीजींना जी पत्रे येऊ लागली ती शिव्याशापांनी नि धमक्यांनी भरलेली येऊ लागली. चांदीवाला ती पत्रे वाचीत असत. चांदीवालांनी एकदा गांधीजींची निर्वासितांशी भेट घडवून आणली. त्या भेटीत निर्वासितांनी गांधीजींच्या तोंडावर अभद्र भाषा सुनावली. आणखी एके दिवशी बिर्ला भवनावर एक प्रचंड मिरवणूक येऊन धडकली. तिची घोषणा होती 'खूनका बदला खूनसे लेंगे.' गांधीजींनी ५५ कोटी रुपये देण्यासाठी जे दडपण आणले त्याला मिरवणूकवाल्यांचा विरोध होता. ती मिरवणूक अडविण्यासाठी बिर्लाभवनावर आरक्षीदलाचा मोठा समूह उभा होता. त्यावेळी पं. नेहरू गांधीजींशी गोष्टी करीत होते. ते त्या वेळी बाहेर आले आणि त्यांनी ती मिरवणूक थोपविली. त्यांनी तसे जर केले नसते तर गांधीजींना मारहाण झाली असती.

पृष्ठ १४१ वर छेदक १२ ए ३४ मध्ये १५ जानेवारी १९४८ च्या टाइम्स ऑफ इंडियामध्ये आलेला १४ जानेवारीचा वृत्तान्त दिलेला आहे. काही लोक बिर्लाभवनाच्या फाटकाच्या बाहेर जमले. 'गांधीको मरने दो' अशा त्यांनी घोषणा केल्या. म. गांधी, पं. नेहरू, सरदार पटेल आणि मौ. आझाद यांची बोलणी चालली होती. पं. नेहरूंनी 'गांधीको मरने दो' हे शब्द ऐकले आणि ते बाहेर आले ते त्या निदर्शकांवर ओरडले 'असे शब्द उच्चारण्यास तुम्ही धजावता तरी कसे ? पहिल्यांदा मला मारा.' नंतर ते निदर्शक निघून गेले.

या वृत्तान्तावरून न्या. कपूर यांचा निष्कर्ष असा की, निर्वासितांनी ज्या घोषणा केल्या असे श्री. चांदीवाला यांनी कथन केले, त्याला टाइम्सच्या वृत्तावरून आधार मिळतो. पण पं. नेहरू जर आले नसते तर गांधीजींना मारहाण झाली असती या चांदीवाला यांच्या विधानाला ते वृत्तपत्र संपुष्टी देत नाही.

काहीही असले तरी निर्वासितांनी जो छळ सहन केला, त्याने झालेल्या यातनांपेक्षाही त्यांचे गांधीजींवर अधिक प्रेम होते हा श्री. कपूर यांचा निष्कर्ष अवास्तव वाटतो. याव्यतिरिक्त, मदनलाल हा असाच एक पोळलेला निर्वासित होता आणि तो तर प्रत्यक्ष या कटात होता. हा बोलका पुरावा निर्वासित अतिरेकी थराला गेले असते किंवा नाही हे दाखवू शकेल.

गांधीहत्येची जी कारणे न्या. कपूर यांनी दिली आहेत ती नथुरामने दिलेल्या कारणांशी मिळती जुळती असल्याचे दिसून येईल. तसेच दिल्लीतील निर्वासितांची नथुरामने पाहिलेली स्थिती न्या. कपूर यांनी वर्णन केलेली आहे त्यापेक्षा वेगळी नाही.

● ●

३. सरदार पटेल आणि पंचावन्न कोटी

सरदार वल्लभभाई यांची कन्या श्रीमती मणिबेन यांची साक्ष कपूर आयोगापुढे झाली. मणिबेन यांची २५ जानेवारी १९४८ ची दैनंदिनी असे दाखविते की दि. १३ जानेवारीला सरदार पटेल हे श्री. मथाई, चेट्टी, पं. नेहरू आणि गांधीजी यांच्याशी ५५ कोटींविषयी बोलले होते. गांधीजींचे डोळे भरलेले होते. त्यांनंतर सरदार पटेल यांच्या मनाला यातना झाल्या. त्यांच्या बोलण्यातून असे आले की, यापुढे मला शासनात राहता येणार नाही. (पृष्ठ १८२)

मदनलालने दिलले वक्तव्य सरदार पटेल यांच्या निदर्शनास आणले गेले होते असे मणिबेन यांनी सांगितले (पृष्ठ १८०). 'स्फोटाच्या प्रकरणी जसजसा तपास लागत गेला तसतसे वृत्त माझ्या वडिलांना कळविले जात असे. त्या प्रकरणी काय करावे किंवा काय करू नये याच्या सूचना माझ्या वडिलांनी दिल्या असल्याचे मला स्मरत नाही. देशाच्या संरक्षणाच्या दृष्टीने एखाद्याला अटक करावी लागत आहे असा निश्चित पुरावा असल्यावाचून माझ्या वडिलांनी कोणासही अटक करण्याची आज्ञा दिलेली नव्हती.' (My father would not order the arrest of anybody, unless he had positive proof that the arrest was for the protection of the country.) (पृष्ठ १७९)

'मला असे निश्चित आठवते की, गांधीहत्येपूर्वी एक पंधरवडा वृत्तपत्राचे एक संपादक, की ज्यांच्या वृत्तपत्राकडून प्रतिभू मागितला होता, ते माझ्या वडिलांना पहाटे पाचला भेटण्यास आले होते. त्यावेळी अंधार असल्याने त्या व्यक्तीला मी ओळखू शकले नाही. पण ती व्यक्ती आपल्या वृत्तपत्राकडून मागितलेल्या प्रतिभूसंबंधी बोलली हे मला आठवते. श्री. मोरारजी देसाई हे आपणाशी अन्यायाने वागतात असेही त्या व्यक्तीचे गाऱ्हाणे होते.' (पृष्ठ १७९)

नथुराम त्या दिवसांत दिल्लीत होता. नाना आपटेही तेथेच होते. त्यांच्या वृत्तपत्राकडून सारख्या प्रतिभूही मागितल्या गेल्या होत्या. श्री. मोरारजींविरुद्ध त्यांचे गाऱ्हाणे तीव्र होते. या सर्व गोष्टी श्रीमती मणिबेन यांच्या साक्षीशी जुळत असल्या तरी त्यांच्यापैकी कोणी सरदार पटेल यांना भेटल्याचे ते प्रस्तुत लेखकाजवळ कधीही बोलले नव्हते. त्यामुळे सरदार पटेल यांना नथुराम किंवा आपटे यांच्यापैकी कोणी भेटले होते की काय ही गोष्ट त्या पहाटेच्या अंधारातील व्यक्तीइतकीच अंधारात राहून गेली आहे.

श्री. राजगोपालचारी यांनी लिहिलेल्या 'Gandhiji's Teachings &

Philosophy' या पुस्तकाचा न्यायमूर्ती कपूर यांनी आपल्या प्रतिवृत्ताच्या पृष्ठ १८५ वर उल्लेख केला आहे. राजाजींनी आपल्या पुस्तकाच्या पृष्ठ २१-२२ वर लिहिले आहे, दि. ३० जानेवारी १९४८ ला गांधीजींची गोडसे यांनी हत्या केली. त्यावेळी सरदार पटेल यांना वाटले की, पाकिस्तान आपल्याविरूद्ध दुष्ट सैनिकी व्यूह रचित असता आणि सैनिकी हालचाली करीत असतानाच गांधीजींनी ही गोठी राशी देण्याचा जो आग्रह धरला त्यामुळे हिंदूंचा गांधीजींवर राग झाला आणि त्यातून गांधीजींना मारण्याचा कट उभा राहिला. त्यावेळी शत्रूला ५५ कोटी सहाय्य करण्याचा आम्ही मूर्खपणा केला तो या गटाला अक्षम्य वाटला आणि गांधीविरोधी महाराष्ट्रीय लढाऊ गटाला असे वाटले की, गांधीजींनी देशाला ज्या हानिकारक गोष्टी केल्या त्यांचा कळस झाला आणि म्हणून त्यांनी या मूढ संताला संपविण्यावे ठरविले. कारण त्यांच्या मते देशाला त्याला बाजूला सारता आले नसते. त्यांचा (गांधीजींचा) प्रभाव एवढा मोठा होता आणि लोक इतक्या मूर्खपणाने गांधीजींना मानीत आणि त्यांचा शब्द झेलीत की, सरदार पटेल यांच्या मताप्रमाणे त्या कट करणाऱ्यांना असे वाटले, की गांधीजींची हत्या करण्यावाचून दुसरा उपाय उरलेला नाही.

पाकिस्तानाला ५५ कोटी रुपये दिल्यामुळे लोकांच्या मनात किती असंतोष पेटला होता याची सरदार पटेल यांना पूर्ण जाणीव असल्याचे मत वरील छेदकात व्यक्त झाले आहे. (पृष्ठ २८५, छेदक) २ई (२)

गांधीहत्येमागे नथुरामची जी कारणे होती तीच तंतोतंत वल्लभभाईंनी राजाजींजवळ लगेच कशी व्यक्त केली या रहस्याचा उलगडा करण्याजोगे काही प्रमाण प्रस्तुत लेखकाजवळ नाही. काही तर्क करता येणे शक्य आहे. पण ते वाचकाला जितके करता येतील तितकेच लेखकाला. त्यापलीकडे नाही.

● ●

४. गांधीहत्येचे पूर्वज्ञान आणि उदासीन नेते

सत्यनारायण प्रसंगी (दि. १२-१२-१९६४ ला) श्री. ग. वि. केतकर यांनी केलेल्या एका विधानाचा फार गवगवा केला गेला. नंतर आयोग (कमिशन) बसविण्याचे निश्चित झाले. न्या. श्री. कपूर यांनी आपल्या प्रतिवृत्तात गांधीहत्या होणार असल्याचे ज्ञान कोणाकोणाला होते याचीही चर्चा केली आहे.

प्राध्यापक श्री. जे. सी. जैन यांना मदनलाल कटासंबंधी काहीतरी बोलला असल्याची साक्ष त्यांनी न्या. श्री. आत्मचरण यांच्या न्यायालयात १९४८ मध्ये दिली होती. कपूर आयोगापुढे साक्ष देताना जैन असे म्हणल्याचे न्या. कपूर यांनी खंड २, पृष्ठ १-७ छेदक २१-२१७ मध्ये म्हटले आहे. 'या साक्षीदाराच्या म्हणण्याप्रमाणे गांधीजींना वाचवावे अशी कोणासही इच्छा नव्हती. ज्या प्रकरणाची चौकशी चालली आहे त्या प्रकरणाच्या दृष्टीने या साक्षीदाराच्या कथनातील हा भाग महत्त्वाचा आहे. त्यांनी सांगितले, 'जे जे म्हणून शक्य होते ते ते मी केले. मुंबई राज्याच्या प्रमुख कार्यभारी (एक्झिक्यूटिव्ह) अधिकाऱ्यांना (मुख्यमंत्र्यांना) मी त्यासंबधी बोललो होतो. श्री. अशोक मेहतांना बोललो. जयप्रकाश नारायण यांनाही बोललो आणि हॅरिस यांनाही, पण यापेक्षा मी अधिक काय करणार ? जे मला शक्य होते ते मी केले. पण यांपैकी कोणीच काही हालचाल केली नाही, हा दोष माझा नव्हता.''

प्रा. जैन हे प्रा. याज्ञिक यांनाही बोलले होते. श्री. याज्ञिक रामनारायण रुईया महाशाळेत एक प्राध्यापक आहेत. त्यांची साक्ष क्र. २९वी आहे. प्रा. जैन यांनी जेव्हा प्रा. याज्ञिक यांना मदनलालच्या बोलण्याविषयी सांगितले तेव्हा याज्ञिक त्यावर विश्वास ठेवीनात. मात्र जैन यांनी शासनाला कळवावे असा उपदेश त्यांनी केला.

छेदक २१-२२९ वर (पान १७९) न्या. कपूर म्हणतात, 'एकूण प्रा. जैन याच व्यक्तीला गांधीजींच्या जीविताला धोका असल्याची माहिती होती असा निष्कर्ष निघतो आणि जैन यांनी ती आपल्या मित्रमंडळीत सांगितली; पण त्यांनी ती विशेष गंभीर किंवा विश्वासार्ह वार्ता असल्याचे मानले नाही; पण या आयोगाचे असे मत आहे की, श्री. जैन यांना आरक्षी अधिकारी श्री. नगरवाला किंवा भरुचा यांच्याकडे जाण्यास काही अडचण होती तर त्यांनी मंत्र्यांना किंवा काँग्रेसच्या नेत्यांना ही वार्ता कळविणे त्यांचे कर्तव्य होते. किंवा

श्री. जैन ह्यांनी चीफ प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट यांना हे कळविण्यास हवे होते - (प्रार्थनास्थळावर स्फोट होण्यापूर्वी श्री. जैन यांनी हे कळविण्यास हवे होते असे श्री. कपूर यांचे तात्पर्य आहे.)

खंड १, पृष्ठ २१० छेदक १५-२७३ (११) मध्ये न्या. श्री. कपूर यांनी दिलेला सारांश असा आहे. 'स्वर्गीय बाळूकाका कानिटकर, तेव्हाच्या शेतकरी कामकरी पक्षाचे कार्यकर्ते श्री. र. के. खाडिलकर, स्वर्गीय केशवराव जेधे (संसद सदस्य) आणि श्री. ग. वि. केतकर अशा पदाधिकारी नसलेल्या व्यक्तींना पुण्याचे वातावरण असे भारलेले आहे हे ठाऊक होते. वृत्तपत्रातील लिखाण, सार्वजनिक व्यासपीठावरील भाषणे, व्यक्तीव्यक्तीतील संभाषणे यातून काँग्रेसचे वरिष्ठ नेते, विशेषत: महात्मा गांधी, श्री. नेहरू, सरदार पटेल आणि मौ. आझाद यांच्या जीविताला धोका असल्याचेही व्यक्त होत असल्याची त्यांना कल्पना होती. या व्यक्तींपैकी श्री. बाळूकाका कानिटकर आणि श्री. भागवत यांनीच काय ते श्री. बी. जी. खेर आणि सरदार पटेल यांनाही कळविले होते. परंतु आरक्षी अधिकारी यांना कळविले नव्हते.' न्या. श्री. कपूर पुढे म्हणतात, ही वार्ता कोणीही गुप्तचर विभागाकडे पडताळून बघण्यास दिली नाही हे आश्चर्यकारक आहे.

श्री. न. वि. गाडगीळ यांची साक्ष क्र. ६ ची आहे. श्री. केशवराव जेधे यांनी गाडगीळांना जे काही सांगितले त्याव्यतिरिक्त पूर्वज्ञान असल्याचे अधिक विवरण श्री. गाडगीळ यांच्या साक्षीत नाही असे न्या. श्री. कपूर यांनी खंड २, पृष्ठ १२९-१३० वर म्हटले आहे. पृष्ठ १३० वर छेदक २१-३५ असा आहे. 'श्री. काका गाडगीळ तेव्हा केंद्रीय शासनात मंत्री होते. ते पुण्याचे एक प्रमुख नागरिक होते. १९६४च्या धनुर्धारी पत्राच्या दिवाळी अंकात जो लेख लिहिला त्यात त्यांनी म्हटले की, पंजाब व बंगालमधील हिंदूंवर फाळणीमुळे जी आपत्ती आली त्यामुळे गांधीजींविरुद्ध लोकमत प्रक्षुब्ध होत होते. पुण्यात गांधीजींविरुद्ध अतिशय कडक भाषा उघडपणे वापरली जात होती. पुण्याच्या वृत्तपत्रांनी गांधीजींवर टीका करून हिंसेचे अप्रत्यक्ष वातावरण निर्माण केले होते. काही तरी भयंकर होणार आहे अशाही वार्ता कानावर येऊन आदळत. श्री. बाळूकाका कानिटकर यांनी श्री. बाळासाहेब खेर यांना एक गुप्त पत्र पाठविल्याचीही वार्ता होती. त्या पत्रात गांधीजींविरुद्ध काहीतरी कारस्थान आहे असे म्हटले होते. सरदार पटेल काही वेळा चिंता व्यक्त करीत; पण त्याची गंभीरपणे दखल घेतली जात नसे. श्री. नेहरू यांनी हिंदू नेत्यांच्या विरुद्ध आगपाखड चालविली होती. गाडगीळ यांनी पुढे असे म्हटले आहे की, हिंदू निर्वासितांच्या मनात अशी भावना होती की, गांधीजी त्यांच्यासाठी काही करीत

नाहीत, पण मुसलमानांना मात्र सहाय्य करतात. कारण गांधीजी प्रत्येक दिवशी आपल्या प्रार्थनेनंतरच्या भाषणात हिंदूंच्या कृत्यावर तेवढी टीका करीत. पुष्कळशा निर्वासितांना याचा वैताग आला होता. ते विमनस्क झाले होते. काही तर अतिशय रागावले होते. ५० कोटी (५५ कोटी) रुपयांचे प्रदान हे त्यांच्या जखमेवर मीठ चोळल्यासारखे होते. निर्वासितांना असे वाटले की, हे प्रदान म्हणजे ज्यांची हत्या झाली आहे, त्याकडे दुर्लक्ष करून जो हत्या करणारा आहे, त्याच्या दुखापतीवर उपचार करण्यासारखे होते. गांधीजी जे बोलत होते आणि नेहरू हिंदूंविषयी जे बोलत होते, त्यागुळे गांधीजींविरूद्ध वातावरण त्या दिवसांत सारखे तापत होते.'

न्या. श्री. कपूर यांनी स्व. श्री. गाडगीळ यांना असलेल्या पूर्वज्ञानाविषयी असे म्हटले आहे की, श्री. जेधे यांचे म्हणणे नेमके काय होते हे पडताळून पहाण्यास हवे होते; पण मदनलालने जी स्वीकारोक्ती दिली होती तिला अनुसरून श्री. गाडगीळ यांनी खोलात जाण्याचा कधीच प्रयत्न केला नाही. त्यांनी आपली उदासीनता थोडी बाजूस ठेवण्यास हवी होती आणि आपली विचक्षण बुद्धी कामी लावण्यास हवी होती. (पृष्ठ १३२)

कोठेतरी ठिणगी निर्माण होण्याइतक्या तीव्रतेला वातावरण पोहोचले होते, याची कल्पना वरिष्ठांपासून असल्याचे पूर्वज्ञान या प्रकरणातून दिसते. कोणत्या ठिकाणी म्हणून त्या संभाव्य ठिणगीचा उद्रेक थांबविणे शक्य झाले असते? म्हणूनच प्रस्तुत लेखकाने आपल्या साक्षीत न्या. कपूर यांना सांगितले की, आम्ही सर्व जरी पकडले गेलो असतो तरीही गांधीजींची हत्या टळणे संभवनीय नव्हते.

● ●

५. काश्मीर

'जे राष्ट्र आपल्या इतिहासाकडे किंवा आपल्या भूगोलाकडे पाठ फिरविते त्याचा विनाश ओढवतो' असे श्री. व्ही. पी. मेनन यांनी आपल्या 'दि स्टोरी ऑफ दि इन्टिग्रेशन ऑफ दि इंडियन स्टेट्स' या पुस्तकात एका छेदकाचे सार काढले आहे. (पृष्ठ ४१३). काश्मीरवर आक्रमण झाले होते. काश्मीरच्या महाराजांनी हिंदुस्थानकडे संरक्षणाची याचना केली होती. हिंदुस्थानात विलीन झाल्याचा लेख त्यांनी दिला होता. हिंदुस्थानच्या शासनाने तो लेख स्वीकारावा असे श्री. मेनन यांनी सुचविले होते. त्यांच्या सूचनेला महत्त्व होते. सरदार वल्लभभाई पटेल त्यावेळी उपपंतप्रधान आणि गृहमंत्री होते. श्री. मेनन वल्लभभाईंचे सचिव होते. संस्थाने विलीन करण्यात त्यांनी अतिशय मोलाचे कार्य केले होते. काश्मीरच्या प्रश्नावरील सूचना हिंदुस्थान शासनाला देताना श्री. मेनन यांच्या मनात विचार होता तो हा की, 'टोळीवाल्यांचे काश्मीरवरील आजचे आक्रमण म्हणजे उरलेल्या हिंदुस्थानच्या अभंगत्वाला भयंकर धोका आहे. महंमद गझनीच्या काळापासून म्हणजे आठव्या शतकापूर्वीपासून वायव्य सीमेपलीकडून हिंदुस्थानवर सारख्या चढाया होत राहिल्या. मोगल सत्तेतील काही काळ याला अपवाद होता. महंमद गझनीने स्वत: सतरा स्वाऱ्या केल्या होत्या आणि पाकिस्तान निर्मितीच्या सहा आठवड्यांच्या आतच त्या वायव्य सीमेकडून आक्रमकांच्या टोळधाडी मोकाट सोडल्या गेल्या होत्या. आज श्रीनगर तर उद्या दिल्ली !' म्हणून मेनन यांचा अभिप्राय होता, 'A nation that forgets its history or its geography does so at its peril.'

हिंदुस्थानचे शीर्षस्थान आहे काश्मीर. चौदाव्या शतकापर्यंत तेथे बौद्ध किंवा इतर हिंदू राजांच्या राजवटी चालल्या. त्यांच्या कार्यकालाचे वर्णन आपणास कल्हणाच्या राजतरंगिणी या संस्कृत पद्यग्रंथात सापडते. डॉ. स्टेन (Sten) यांनी काश्मीरच्या इतिहास लेखनाविषयी म्हटले आहे की, मुस्लिम आक्रमणकालाच्या पूर्वीपासून क्रमाने आणि अविरत इतिहास लेखन हिंदुस्थानच्या कोणत्या भूभागात झाले असेल तर ते काश्मीरमध्ये होय (The Valley of Kashmir by Walter Lawrence, London 1895) कल्हणाचे काम पंडित जोना राजा यांनी पंधराव्या शतकाच्या आरंभाच्या काळापर्यंत चालू ठेवले.

हिंदू कालखंडात राज्य संपादनाबरोबरच उत्तम मंदिरे आणि सुंदर सार्वजनिक बांधकामे उभी राहिली. अनंत नाग, ब्रिज बिहारा, पांडु पट्टण, शंकराचार्य पट्टण, मार्तंड आदि नगरांचे अवशेष आजही दिसतात. त्यावरुन त्या भागात लोकवस्तीही

वाट असली पाहिजे. हिंदू राजाच्या छायेत असलेली हिंदू प्रजा सुखी असली पाहिजे. जे कालवे किंवा पाटबंधारे आहेत त्यांवरून अशा निष्कर्ष निघतो की, नरेशांनी आपल्या संपत्तीचा उपयोग सर्वस्वी मंदिरे बांधण्याकडे केला नाही, तर शेतीच्या विकासाकडेही त्यांचे लक्ष होते.

मुस्लिम आक्रमकांनी काश्मीरला दासता आणली. विकासलेल्या वास्तूंचा विध्वंस झाला. हिंदूंचे भ्रष्टीकरण झाले. १५८७ मध्ये अकबराने काश्मीर मोगल सत्तेखाली आणले. मोगलांनी आपले थंड हवेचे ठिकाण म्हणून जवळजवळ दोनशे वर्षे ते वापरले.


मोगलांची पकड ढिली झाली होती. अफगाणिस्तानच्या अहमदशहा अब्दालीने १७५० या आसपास हिंदुस्थानावर स्वारी केली तेव्हा त्याने काश्मीर आपल्या अधीन घेतले. पुढे जवळजवळ सत्तर वर्षे किंवा नेमके वर्ष १८१९ पर्यंत काश्मीरवर वेगवेगळे पठाण प्रशासक अधिकार चालवीत होते.

मुसलमानांच्या क्रूर राजवटीचे वर्णन इतिहासकारांनी लिहून ठेवले आहे. त्यात इस्लाम कसा वाढत गेला याचा प्रत्यय येतो.

तेराव्या शतकाच्या आरंभी तार्तारांनी काश्मीरच्या राजावर चढाई केली. तेव्हा राजाच्या सेनापतीने स्वातच्या शाहमीर आणि तिबेटच्या रायचंद शाह यांना साहाय्याला बोलाविले. रायचंद शाह बलाढ्य झाला. त्याने सेनापतीलाच मारले आणि त्याच्या मुलीशी म्हणजे कुटाराणी हिच्याशी लग्न केले. राजसत्ता त्यानेच बळकाविली. विभिन्न संबंधामुळे हिंदुधर्मात या रायचंद शहाला जवळीक मिळाली नाही म्हणून त्याने तेव्हा मुसलमानी धर्म स्वीकारला आणि सदरुद्दीन हे नाव घेतले.

सदरुद्दीन गेल्यावर स्वातच्या मीर शहाने काश्मीरवर स्वारी करून ते राज्य मिळविले. काश्मीरचा तो पहिला सुलतान.

परंपरेने १३९४ मध्ये सिकंदर नावाचा सुलतान गादीवर आला, तो मूर्तिद्वेष्टा होता, पण ज्याला धर्म म्हटले जाते त्या इस्लामाची त्याने दाढ केली ती कशी ? हिंदूंना त्याने तीन पर्याय ठेवले. धर्मांतर, देशत्याग किंवा मरण. ज्यांनी धर्मांतर केले नाही किंवा देशत्याग केला नाही असे यज्ञोपवीतधारी हिंदू किंवा पंडित त्याने किती मारले असतील याचा उल्लेख लॉरेन्सने आपल्या पुस्तकात केला आहे. १,२,३ अशा संख्येने गणना करणे शक्य होणार नाही. म्हणून एक मोठे परिमाण केले. शिरच्छेद केल्यानंतर त्या हिंदूंची जानवी एकत्र केली, त्यांचे गठ्ठे केले. त्या गठ्ठ्यांचे वजन सात मण झाले ! एखादा आकडा घेऊन



हिंदुस्थानचे मानचित्र

त्यावर अनेक शून्ये द्यायची आणि तो लांबलचक आकडा आठवत नि सांगत बसावयाचे त्यापेक्षा ही गणनाची पद्धत किती तरी सोपी ! त्या जानव्यांची होळी केली गेली. हिंदुशास्त्राचे विद्याभ्यासाचे पिढ्यापिढ्यांनी जतन केलेले ग्रंथ या सुलतानाने दालसरोवरात बुडविले. विध्वंसन हेच ज्यात धर्मकृत्य मानले अशी ही 'संस्कृती' या प्रकारे वाढली.

पठाणांच्या राजवटीतही असेच किंवा याहीपेक्षा क्रूर सत्र चालू राहिले. आझादखान या पठाण प्रशासकाचा छंद काय ? तर ब्राह्मणांना जोडीजोडीने गवताच्या किंतानाच्या पोत्यात भरावयाचे आणि दाल सरोवरात बुडवून मारावयाचे. जिझिया कर त्याने पुन्हा लादला. मीर हजर या पठाण प्रशासकाने आझादखानाच्या पद्धतीत एक सुधारणा केली. तरटाच्या किंवा गवताच्या पिशवीऐवजी तो कातड्याच्या

पखालीत ब्राह्मणांना बांधून तलावात बुडवीत असे. शियापंथी मुसलमानांवरही त्याने अशाच प्रकारचे अत्याचार केल्याचे इतिहासात आढळते. आता महमदखान हा प्रशासक स्त्रियांवर तुटून पडत असे. आपल्या मुलीबाळी त्यातून वाचाव्यात म्हणून लोक मुलींचे मुंडन करीत आणि सौंदर्य मारण्यासाठी त्यांची नाके कापून टाकीत ! अशा प्रकारच्या भयंकर अत्याचाराचा झंझावात काश्मीर सहन करीत राहिले. जे काही हिंदू टिकले ते काश्मीरवर पुन्हा हिंदू वर्चस्व आले म्हणून.

महाराजा रणजितसिंग या शूर शीख राजाने वर्ष १८१९ मध्ये मुसलमानांच्या तावडीतून पंजाबप्रमाणे काश्मीरही मुक्त केले. वर्ष १८४६ पर्यंत ते शीख राजांच्या किंवा त्यांच्या प्रशासकांच्या स्वाधीन राहिले.

जम्मू हा काश्मीरचा भाग मात्र १७५० नंतरच्या काळात रणजित देव या राजपूत वंशातील डोग्रा राजाकडे होता. १७८० मध्ये रणजित देव मरण पावला. वारसासाठी भांडणे होत राहिली होती, तीन पिढ्या उलटल्या होत्या. रणजित देवाच्या कुळातील तिघेजण गुलाबसिंग, ध्यानसिंग आणि सुचेतसिंग यांनी महाराज रणजितसिंगाकडे सेनाधिकारी म्हणून काम केले होते. त्यांच्या शौर्याचे प्रतिदान म्हणून रणजित सिंगाने वर्ष १८१८ मध्ये गुलाबसिंगला जम्मूचा राजा केले. चिंबळ आणि पूंच या काश्मीरच्या भागावर ध्यानसिंगला राज्याधिकार दिले. तसेच सुचेतसिंगला रामनगर भागाचा राजा केले. ध्यानसिंग आणि सुचेतसिंग नंतर लढाईत मारले गेले होते. गुलाबसिंगकडे सर्व भागाचे अलिखित आधिपत्य आले.

वर्ष १८४६ मध्ये इंग्रज आणि शीख राजे यांच्यातील लढाईचा शेवट झाला होता. त्यात इंग्रजांचा जय झाला होता. त्यांनी शिखांच्या तेव्हाच्या सत्ताधाऱ्याकडून पंजाबच्या मोठ्या भागाची आणि एक कोट रुपयाची खंडणी म्हणून मागणी केली. राजाने व्यास नदी (बियास नदी) ते सिंधु नदी यातील काश्मीरसहित भाग देऊ केला. कारण एक कोट रुपये देणे अशक्य होते. तेव्हाचा गव्हर्नर जनरल हार्डिंज याला ते नको होते. कारण डोंगराळ प्रदेशाच्या संरक्षणाकडे लक्ष पुरविण्यात लाभ नसून हानी आहे असा त्याचा विचार होता.

गुलाबसिंग खंडणी देण्यास पुढे आला. त्याची अट अशी होती की, जम्मू आणि काश्मीर हा भाग स्वतंत्रपणे माझ्याकडे ठेवला पाहिजे. इंग्रजांना ते मान्य झाले. अमृतसर येथे दि. १६ मार्च १८४६ ला तो संधी झाला. अलीकडील काळात जम्मू आणि काश्मीर असे स्वतंत्र संस्थान ब्रिटिशांचे मांडलिक म्हणून निर्माण झाले ते वरीलप्रमाणे.

जम्मू हा भाग काश्मीरच्या दक्षिणेला पडतो, पूर्वेला लडाख आहे, उत्तरेला

बाल्टिस्थान आहे. त्याच्या पलीकडे हुझा आणि नागीर हे भाग आहेत. पश्चिमेला गिलगीट, मुझफराबाद, रैसो पूंच, मीरपूर. क्षेत्रफळ ८४,४७१ चौ. मैल आहे वर्ष १९५१ मधील शिरगणतीत ४३,३७,००० अशी लोकसंख्या होती.

मागे म्हटल्याप्रमाणे चौदाव्या शतकातील मुस्लिम आक्रमणापासून लोकसंख्या मुसलमान होत राहिली. (डेंजर इन काश्मीर-जोसेफ कार्बेल पृ. ११) स्त्रिया पळविणे, बाटवाबाटवी करणे असे अनेक शतके चालू राहिले होते. त्यामुळे हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळतेवेळी तो भूभाग जरी हिंदू राजांच्या हाती राहिला होता, तरी राष्ट्रीयत्व टिकण्यासाठी लागणाऱ्या संस्कृतीचा पाया अस्ताव्यस्त किंवा उद्ध्वस्त झाला होता. १९५१ च्या शिरगणतीप्रमाणे मुसलमानांचे प्रमाण ७७ टक्के होते.

संस्कृतीच्या उद्ध्वस्त पायाची डागडुजी व्हावी, हिंदुधर्म पुन्हा स्थापित व्हावा म्हणून १९ व्या शतकाच्या मध्यात राजाने संस्कृतीकरणाची किंवा शुद्धीकरणाची खटपट केली; पण त्याला बनारसच्या पंडितांनी विरोध केल्याचे कार्बेल यांनी आपल्या पुस्तकात म्हटले आहे. (डेंजर इन काश्मीर-जोसेफ कार्बेल, १९५४, पृ. १५).

श्री. बाळशास्त्री हरदास यांनी लिहिलेल्या डॉ. मुंजे यांच्या चरित्रात भाग १ पृष्ठ ५९ वर तो वृत्तान्त दिला आहे.

अनेक वर्षे आम्ही पठाणी आणि दुसऱ्या परकीय आणि मुसलमानी राजवटीत पिचले गेलो, छळबळाने मुसलमान झालो. आम्हाला पुन्हा हिंदुधर्मात यावयाचे आहे, आपण हिंदुधर्माचे राजे काश्मीरवर राज्य करीत आहात तरी आम्हाला आपल्या हिंदुधर्मात सुखाने नांदावयाची अनुज्ञा असावी. आपण आज्ञा कराल ते प्रायश्चित्त घेऊन आम्ही हिंदू होऊ इच्छितो असे लेखी आवेदनपत्र मुसलमानांच्या प्रमुखांनी राजाकडे दिले. कुटुंबेच्या कुटुंबे हिंदुधर्मात येण्यास उत्सुक होती.

राजाने काशीच्या पंडितांना धर्मनिर्णय विचारला. त्यांनी अनुकूल अभिप्राय दिला नाही. मग त्याने शुद्धिकरणाचा घाट घातला. त्याने घोषित केले की या मूळच्या हिंदू असलेल्या आणि हिंदू होऊ इच्छिणाऱ्या प्रजाजनांना मी एक मोठा यज्ञ करून हिंदू करून घेणार आहे. राजा या नात्याने माझा तो अधिकार आहे.

पण राजपुरोहित तेथे आडवे पडले. त्यांनी राजालाच कात्रीत पकडले. हा अधर्म कराल तर आम्ही जीव देऊ असे त्यांनी त्याला सांगितले. त्यांनी वितस्ता म्हणजे झेलम नदीत एक नाव घातली आणि प्रवाहात उड्या मारल्या.

(वितस्ता हे झेलम नदीचे वेदकालापासून चालत आलेले नाव आहे.)

राजाने त्यांना वर काढले आणि यज्ञ रहित केला. काश्मीरचे ते नागरिक मुसलमान म्हणून वाढले.

श्रुतिस्मृतिपुराणोक्त शब्दाच्या बाहेर कधीच न पडलेल्या त्या तथाकथित विद्वानांचा निर्णय धर्माला आणि राष्ट्रालाही मारक ठरला. येथे श्री. व्ही. पी. मेनन यांचे सुभाषित तितकेच लागू पडते की, आपला इतिहास किंवा भूगोल विसरणारे राष्ट्र नाशाकडे जाते. प्रबोधनकार श्री. ठाकरे यांनी १९२८ मध्ये लिहिलेल्या आपल्या पुस्तकात काही उदाहरणे दिलेली आहेत. अल्लाउद्दिन खिलजीचा सेनापती आणि हिंदूंचा विध्वंस करणारा मलिक काफूर मूळचा राजपूत घराण्यातील होता. अशी अनेक उदाहरणे त्यांनी दिली आहेत. मुसलमानप्रणालीचे संस्कार या भ्रष्ट हिंदू संततीवर घडविले गेले. ते लोक हिंदुप्रेमी राहिले नाहीत, न हिंदू प्रेम, न मुसलमान प्रेम असे राहिले नाहीत किंवा हिंदूवरही प्रेम आणि मुसलमानावरही प्रेम असेही राहिले नाहीत, किंवा आजच्या भाषेत ती बाळे सेक्युलर झाली नाहीत. कुराणोक्त प्रणालीने इस्लामचे वर्धन करण्यासाठी त्यांनी हिंदूच्या कत्तलीपासून स्त्रिया लुटण्यापर्यंत सर्व अस्त्रे वापरली. येथे इस्लाम राष्ट्र व्हावे म्हणून त्यांनी आपल्या तलवारी वापरल्या. धर्मान्तर हे राष्ट्रान्तर ठरले. वस्त्रात बांधलेल्या पोथीच्या धाग्यातील आपले तथाकथित धर्ममार्तंड आपला इतिहास विसरले, भूगोल विसरले; शुद्धीकरणाला विरोध करून त्यांनी भावी विनाशाला वाट करून दिली !

गुलाबसिंग वर्ष १८५७ मध्ये निवर्तला. त्याचा मुलगा हरिसिंग १८८५ पर्यंत गादीवर होता. त्यानंतर प्रतापसिंग १९१५ पर्यंत होता. १९१५ पासून महाराज हरिसिंग गादीवर आला.

हिंदुस्थानच्या आंतरराष्ट्रीय सीमांच्या दृष्टीनेही काश्मीरचे महत्त्व फार आहे. काश्मीरच्या सीमा पूर्वेकडून तिबेटला, ईशान्येकडून चीनच्या लिचियांग भागाला, वायव्येकडून अफगाणिस्तानला चिकटल्या आहेत. वाखान हे अफगाणिस्तानचे दुबेळके गिलगिटच्या उत्तरेस आहे. मिंताका खिंडीवरून जाणाऱ्या गिलगिट खाशगार मार्गाच्या पश्चिमेला रशियाव्याप्त तुर्कस्तान भिडतो.

राजा हिंदू होता. मुसलमानांचे क्रूर आक्रमण मोकाट सुटू नये म्हणून राज्यव्यवस्थेतील आणि सैन्यातील महत्त्वाची स्थाने त्याने हिंदूंच्या हाती ठेवली होती. इस्लाम म्हटल्यावर राजनिष्ठा कशी धुडकावली जाते याची उदाहरणे श्री. व्ही. पी. मेनन यांच्या पुस्तकात आहेत. त्यातील पृष्ठ ३९६ वर दिलेले उदाहरण या ओघात स्थलोचित होईल.

पाकिस्तान निर्मितीनंतर दोन एक महिन्यांनी म्हणजे दि. २२/१०/१९४७ ला पाकिस्तानने टोळीवाल्यांकरवी काश्मीरवर स्वारी केली होती. काश्मीरचेही स्वत:चे सैन्य होते. ते मुझफ्फराबादला केंद्रित होते. ले. कर्नल नारायणसिंग हा त्या वाहिनीचा (बटालियन) प्रमुख होता.

ते सैन्य मुसलमान आणि डोग्रा सैनिकांचे होते. दोघांनाही वेतन अर्थातच काश्मीर शासन देत होते; पण आपण स्वतंत्र राष्ट्र आहोत ही विचारसरणी मुस्लिम नेत्यांनी मुसलमानांना दिली होती आणि अनुयायांनी ती पत्करली होती.

जशी टोळधाड आली तसे त्या वाहिनीतील मुसलमान सैनिक शस्त्रांसहित पळून गेले. ते गेले कोठे ? तर टोळीवाल्यांना जाऊन मिळण्यासाठी. त्यांनी टोळीवाल्यांना ठावठिकाणे सांगितली. त्यांना मार्गदर्शक झाले आणि जाताना त्यांनी वाहिनीप्रमुखाला आणि त्याच्या उपअधिकाऱ्याला (अड्ज्यूटन्ट) ठार मारले होते.

मुस्लिम समाज कोणत्या आक्रमक पवित्र्यात आहे हे लक्षात न घेताच किंवा वेळी हे लोकांपासून लपवून ठेवून आपल्या काँग्रेस नेत्यांनी लोकांना हिंदू-मुस्लिम एकतेच्या गोंधळात बुडवून ठेवले होते. काश्मीरमधील हिंदू सेनाधिकाऱ्यावरही त्या खोट्या प्रचाराचा परिणाम झालेला दिसतो. आक्रमणाला तोंड द्यावयाचे होते, आक्रमण मुसलमानांचे होते. ते धर्माच्या नावाने होते, जिहाद म्हणून होते. अशा स्थितीत काश्मीरच्या महाराजांनी ले. कर्नल नारायणसिंग यांना विचारले होते. 'सेनापती ! तुमच्या वाहिनीत अर्धे सैनिक मुसलमान आहेत. युद्ध हे अशा प्रकारचे आहे. या परिस्थितीत मुसलमान सैनिक तुमच्या आज्ञा पाळतील काय ? त्यांच्या निष्ठेचा तुम्हांला विश्वास वाटतो का ? सेनापतींनी ताडकन् सांगितले, 'महाराज, माझा आणि त्या सैनिकांचा सहवास एक दोन दिवसांचा नव्हे, तर काही वर्षांचा आहे. डोग्रा सैनिक मला विश्वासार्ह वाटत असतील त्यापेक्षा हे मुसलमान सैनिक मला अधिक विश्वासार्ह वाटतात.' आपला तर्क चुकला हे बोलण्याची संधीसुद्धा सेनापती नारायणसिंग यांना ह्या अती स्वामिनिष्ठांनी ठेवली नव्हती.

कधी काळी झालेल्या धर्मांतरावर उपचार न केले गेल्याने ते धर्मांतर राष्ट्रान्तर कसे ठरले याचे हे एक प्रत्यक्ष प्रमाण आहे.

वर्ष १९३०-३२ च्या आसपास शेख अब्दुल्लाच्या नेतृत्वाखाली अखिल जम्मू काश्मीर मुस्लिम कॉन्फरन्सची मुसलमानांना अधिकार मिळवून देण्याची चळवळ चालू झाली. ठरलेल्या तंत्राप्रमाणे अनेक दंगे झाले.

धूर्त शेख अब्दुल्लाने वर्ष १९३९ मध्ये धर्मातीत तत्त्वाचा बुरखा घेतला. त्यायोगे हिंदू राजाविरुद्धच्या या मुसलमानांच्या चळवळीला गांधीजींच्या नेतृत्वाखाली हिंदू काँग्रेसजनांचे पाठबळ मिळाले. शेख अब्दुल्लाला सेक्युलॅरिझमचा पुरस्कर्ता असा मान मिळाला. त्यांनी चालविलेले दंगे आता नॅशनल कॉन्फरन्सच्या नावाने चालू राहिले. शेख अब्दुल्लाने १९४६ मध्ये 'छोडो काश्मीर' ही महाराजाविरुद्ध चळवळ आरंभिली. त्याच्या पूर्ततेसाठीच जणू इकडे गांधीजींनी पूर्वीपासूनच काश्मीरच्या महाराजाने आता राज्य शेख अब्दुल्लाच्या किंवा काश्मीरच्या मुसलमानाच्या स्वाधीन करावे व काशीला जाऊन राहावे असा उपदेश चालविला होता. बरे, याची परिणती काश्मीर सरळ हिंदुस्थानात विलीन होण्यात होणार होती काय ? सेक्युलर शेखला ते नको होते. गांधीजींचाही त्या विभक्त प्रवृत्तीला कसा पुरस्कार होता हे त्या वेळच्या घटनांवरून दिसते.

१ ऑगस्ट १९४७ ला गांधीजी काश्मीरला गेले होते. टाइम्सच्या वार्ताहराने नंतर लिहिले आहे, 'गांधीजींची काश्मीरयात्रा नि त्यांनी केलेली वक्तव्ये याने काश्मीरच्या राजकारणात खळबळ उडविली. काश्मीरचे भवितव्य ठरविणे काश्मिरी जनतेच्या हाती राहील या त्यांच्या विधानाने काश्मीरची स्थिती वायव्य सीमा प्रांतासारखी केली.'

गांधीजींनी आपले मत व्यक्त केले, 'काश्मीरने अमुक राज्याला (हिंदुस्थान किंवा पाकिस्तान) मिळावे असा दबाव आणणे हा माझ्या काश्मीरयात्रेचा हेतू नाही. काश्मिरी जनतेची आम्ही उपेक्षा करीत नाही हे लक्षात आणून देणे असा हेतू आहे. विलीनीकरणाचा प्रश्न प्रजेने सोडविण्याचा आहे. कारण शेवटी सर्वश्रेष्ठ प्रजाच असते.'

वाह येथे ६ ऑगस्ट १९४७ ला गांधीजींनी व्यक्तव्य केले. त्यात त्यांनी दोन देश (हिंदुस्थान व पाकिस्तान), काश्मीरचा महाराज आणि काश्मिरी जनता हे काश्मिरी प्रश्न सोडवितील अशी आशा व्यक्त कली. ते म्हणाले, 'जर त्यांनी एक विचाराने निर्णय घेतला तर त्रास वाचेल. काश्मीर मोठे संस्थान आहे आणि युद्धदृष्ट्या (Strategically) त्याला महत्त्व आहे. शेवटी काश्मिरी प्रामुख्याने मुस्लिम आहेत; पण त्यांच्यात स्थानिक देशभक्ती (local patriotism) भरलेली आहे,' असेही मत गांधीजींनी व्यक्त केले. (Kashmir : A Study in India - Pakistan Relations, Sisir Gupta page 97). काश्मीरच्या मुसलमानपणामुळे त्यांच्या वेगळेपणाला या वक्तव्यात प्रोत्साहन होते तर त्यांच्या स्थानिक देशभक्तीचा म्हणजेच महाराजाविरुद्ध उत्थान करण्याच्या उपक्रमाचा गौरव होता.

काश्मीरमध्ये मुसलमानांचे संख्याधिक्य होते. निधार्मिकतेच्या नावाखाली शेख अब्दुल्लाला काश्मीरचे स्वतंत्र अस्तित्व हवे होते. हिंदूंचे संख्याधिक्य असलेल्या राज्यात समाविष्ट होणे म्हणजे आपले स्वतंत्र राष्ट्रीयत्व नाहीसे करून घेण्यासारखे होते हा त्याच्या आचरणातील गुप्त विभक्तभाव होता.

मे १९४६ मध्ये शेख अब्दुल्ला यास 'छोडो काश्मीर' आंदोलनात नऊ वर्षांची शिक्षा झाली होती; पण सव्वा वर्षानेच म्हणजे २९ सप्टेंबर १९४७ ला त्याची सुटका केली गेली. ती पंडित नेहरूंच्या हस्तक्षेपामुळे झाली असा तर्क कार्बेल यांनी व्यक्त केला आहे. (पृष्ठ ७०)

बंदीगृहातून सुटल्यावर शेख अब्दुल्लाने प्रचार चालविला की, काश्मीरच्या लोकांच्या हाती सत्ता मिळाली पाहिजे.

स्वराज्य आणि फाळणी या प्रक्रियांशी संस्थानाच्या विलीनीकरणाचा प्रश्न बांधलेला होता. काश्मीरचे महाराज हरिसिंग यांची स्थिती अवघड होती. राजा हिंदू तर प्रजा बहुसंख्य मुसलमान. एकेकाळचा तो हिंदुस्थानचा अविभाज्य भाग: पण धर्मान्तरित प्रजेमुळे हिंदुस्थानशी समरस होण्यास विरोधी असणारा. पाकिस्तानात विलीन व्हावे तर जम्मू, लडाख आदि भागातील हिंदूंचा संहार ओढवणार आणि स्वत:लाही निष्कासन पत्करावे लागणार हे स्पष्ट होते. उलट हिंदुस्थानात विलीन होणे म्हणजे मुस्लिम जनतेला राजाविरुद्ध उत्थान करण्यास आमंत्रण देण्यासारखे होते.

सत्तान्तरापूर्वी दोन महिने मेजर जनरल जनकसिंग काश्मीरचे मुख्यमंत्री झाले. त्यांनी महाराजांच्या वतीने हिंदुस्थान आणि पाकिस्तान यांच्याशी, 'यथास्थिति अनुबंध' (Standstill Agreement) केला. हिंदुस्थानने त्यावर विचार करण्यास अवधी घेतला.

त्या अनुबंधाप्रमाणे या दोन्ही राज्यांनी काश्मीरशी व्यापार-व्यवहार चालू ठेवण्याचा होता. पण पाकिस्तानने अडणूक केली. गाड्यांच्या ये-जामध्ये अडथळे आणले. काश्मीरच्या साडेचारशे मैल सीमेतून टोळीवाले आणि सैनिक काश्मीरमध्ये घुसले. लुटालूट चालू केली. संहारसत्र आरंभिले.

श्री. मेहेरचंद महाजन मुख्यमंत्री झाले. नंतर ते हिंदुस्थानच्या सर्वोच्च न्यायालयात मुख्य न्यायमूर्ती झाले.

महाराजांनी दि. १५/१०/१९४७ ला ब्रिटिश पंतप्रधानांना कळविले की पाकिस्तानने यथास्थिति अनुबंध मोडला आहे. गुरुदासपूर, गिलगिट भागात त्याची स्वारीसाठी जमवाजमव होत आहे. पूंच भागात हल्ले चालू झाले आहेत.



पाकिस्तानने काश्मीरवर सर्वव्यापक स्वारी केली

पाकिस्तानास ब्रिटिश पंतप्रधानांनी समज द्यावी अशी त्या पत्रात महाराजांनी विनंती केली होती.

त्या पत्रास उत्तर आले नाही.

दि. १८/१०/१९४७ ला महाराजांनी हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल लॉर्ड माउंटबॅटन आणि पाकिस्तानचे गव्हर्नर जनरल जिना यांना एक निषेधपत्र धाडले.

जिनांचे उत्तर आले. निषेधपत्राची भाषा उर्मट आहे असा त्यात महाराजांवर आरोप होता ! खरेच होते. स्वारी करण्याचा अधिकार पाकिस्तानला होता. त्या स्वाऱ्यामुळे झालेल्या वेदना व्यक्तविण्याचा अधिकार काश्मीर महाराजांना नव्हता.

हम आह भी भरते हैं तो होते हैं बदनाम ।

वे कत्ल भी करते हैं तो चर्चा नहीं होती ।

जिनांनी महाराजांच्या पत्राला उत्तर दिले होते. त्यात त्यांनी पूर्व पंजाबातील अशांत वातावरणाने वाहतुकीच्या मार्गात अडथळे आणले गेले आहेत आणि कोळसा उपलब्ध होत नाही अशी कारणे दिली होती.

पण ३।४ दिवसांतच पाकिस्तानाने काश्मीरवर सर्वव्यापक स्वारी केली. सुट्टीवर सोडलेले पाकिस्तानी सेनाधिकारी आफ्रिडी, यझीरी, मशहद, पठाण इत्यादि नामधारी टोळीवाल्यांच्या पथकांचे नेतृत्व करीत होते.

गढी आणि डोमेल ही ठिकाणे उद्ध्वस्त करीत टोळीवाले मुझफराबादला पोहोचले. तेथे टोळीवाल्यांना ले. कर्नल नारायणसिंग यांच्या वाहिनीतले मुसलमान सैनिक जाऊन मिळाले हे पूर्वी आलेलेच आहे. मुझफराबाद शत्रूच्या हाती पडले.

बारामुल्लाच्या दिशेने आक्रमण जाऊ लागले. मध्यंतरी त्यांनी उरी हे ठिकाण हस्तगत केले. काश्मीर राज्याच्या सेवेत असलेले मुसलमान सैनिक टोळीवाल्यांना मिळण्यासाठी पळून गेले होते. ब्रिगेडियर राजेंद्रसिंह उरी येथे शत्रूशी सामना करीत होते. त्यांच्याजवळ केवळ १५० लोक होते; पण आलक्षणीय शौर्याने त्यांनी युद्ध केले. दोन दिवसपर्यंत ते लढत होते. त्यांच्यासकट सर्व सैनिकांचे तुकडे झाले तेव्हाच उरी शत्रूच्या हाती पडले.

टोळीवाल्यांनी २४ ऑक्टोबरला माहुरा विद्युत केंद्र हस्तगत केले. श्रीनगर त्यावर अवलंबून होते. माहुरा जाताच सर्व श्रीनगर अंधारात बुडाले. २६ ऑक्टोबरला ईद होती. ती ईद श्रीनगरच्या मशिदीत साजरी करण्याची टोळीवाल्यांनी घोषणा

केली.

काश्मीरच्या महाराजांकडून हिंदुस्थान शासनाकडे साहाय्यासाठी निकडीची विनंती आली ती याच दिवशी, म्हणजे २४ ऑक्टोबरला. दि. २५ ला हिंदुस्थान शासनाच्या संरक्षण समितीची बैठक भरली. माउंटबॅटन अध्यक्ष होते.

साहाय्य धाडण्याच्या प्रश्नावर भवती न भवती झाली. अधिकाऱ्यांच्या श्रीनगर ते दिल्ली नि दिल्ली ते श्रीनगर अशा खेपा झाल्या. तांत्रिकदृष्टीने काश्मीर हिंदुस्थानात विलीन झाल्यावरच त्याच्या साहाय्याला जाणे शक्य होते.

शेख अब्दुल्ला यास त्वरित शासन बनविण्यास सांगण्याची माझी इच्छा आहे असे विलीनीकरणाच्या पत्रात महाराजांनी हिंदुस्थान शासनास लिहिले होते. महाराजांचा हा निर्णय स्वयंस्फूर्त होता की सैनिकी साहाय्य धाडण्यासाठी ही अट होती हे कागदोपत्री स्पष्ट नसले तरी अशी अट असली पाहिजे अशी शंका व्यक्त करणारा संदर्भ कॉर्बेल यांच्या Danger in Kashmir या पुस्तकाच्या पृ. ८५ वर आहे. श्री. होरीलाल सक्सेना यांनी तर आपल्या The Iron Curtain in Kashmir' या पुस्तकात पृष्ठ ८ (viii) वर स्पष्टच म्हटले आहे की, हिंदुस्थान शासनाने 'यथास्थिति अनुबंधा'चा तेव्हाच स्वीकार केला जेव्हा नॅशनल कॉन्फरन्सच्या नेत्याला, शेख अब्दुल्ला याला, काश्मीर शासनाने सोडले. शेख अब्दुल्लाला शासन बनविण्यास सांगा ही अट घालूनच सैनिकी साहाय्य देऊ केले गेले या विधानाला पुरावे बघण्याचे कारण पडणार नाही.

काश्मीरचे विलीनीकरण स्वीकारले गेले. त्याप्रमाणे सैन्य धाडण्याचे हिंदुस्थान शासनाने ठरविले. अट मात्र अशी होती की, टोळीवाले हुसकावून लावले गेले म्हणजे लोकमताप्रमाणे काश्मीर कोठेही विलीन होण्यास किंवा आपले भवितव्य ठरविण्यास मोकळे राहील. शेख अब्दुल्लाने त्यावेळी आपले कुटुंबीय इंदूर येथे आपल्या मेहुण्याकडे सुरक्षिततेसाठी ठेवले होते आणि तोही श्रीनगरला नव्हता. (The Iron Curtain in Kashmir ले. होरीलाल सक्सेना, पृष्ठ २५). त्याने तत्कालीन शासन बनविले.

काश्मीरचे भवितव्य जनता ठरवील हे हिंदुस्थानने मान्य केले होते. इथे इतिहासाची आठवण राहिली की विसरली ? तेथे मुसलमान बहुसंख्य म्हणून त्यांना तेवढी मोकळीक असली पाहिजे असा पाया धरला गेला. मुसलमानी आक्रमणामुळे तो मूळचा हिंदू प्रांत अनेक शतके परदास्यात राहिला हा इतिहास नव्हता काय ? आठशे वर्षांपूर्वी तेथे अल्पसंख्याक हिंदु राज्य होते हे विसरायचे काय ? हल्लेखोर काश्मीरबाहेर घालवून देण्यासाठी आमच्या सैनिकांनी बलिदान

करावयाचे आणि मग तेथल्या मुसलमानांना प्रसन्न करण्यासाठी त्यांना सांगायचे की, तुम्ही आता संकटमुक्त झाला आहात; वाटेल तिकडे जा ! तेथल्या अल्पसंख्य हिंदूंचेही भवितव्य त्या मुसलमानांच्या मोटलीला बांधायचे ! मग ही धडपड कशासाठी ? हे सैनिक बळी देण्याचे औदार्य कशासाठी ? या ठिकाणी श्री. व्ही. पी. मेनन यांनी हैदराबाद प्रकरणात वापरलेले एक वाक्य स्थलोचित होईल.

It is axiomatic that no nation can afford to be generous at the cost of its integrity and India had no reason to be afraid of her own shadow. स्वत:ची एकात्मता हरवून उदार होणे कोणाही देशाला परवडत नाही हे गोष्ट स्वयंसिद्ध आहे आणि हिंदुस्थानला तरी आपल्या छायेला भिण्याचे काहीच कारण नव्हते.

आम्ही काश्मीरला स्वयंनिर्णयाची मोकळीक ठेवली याचे समर्थन श्री. व्ही. पी. मेनन यांनी केले आहे ते पृष्ठ ४१३ वर म्हणतात, "काश्मीरच्या प्रश्नावर आम्हाला भूमिविस्ताराची आकांक्षा नव्हती. टोळीवाल्यांनी स्वारी केली नसती तरी हिंदुस्थान शासनाने हस्तक्षेप केला नसता. माऊंटबॅटन इंग्लंडला परतले. त्यांनी तर असेही प्रकटपणे सांगितले होते की, काश्मीरच्या महाराजांनी पाकिस्तानात विलीन होण्याचे ठरविले असते तरी तसे करण्याची त्यांना पूर्णपणे मोकळीक होती असे हिंदुस्थान शासनाच्या वतीने काश्मीरच्या महाराजांना अधिकृतपणे सांगण्यात आले होते."

म्हणजे काश्मीर हिंदुस्थानचा भाग आहे असे म्हणणे भूमिविस्ताराची आकांक्षा धरणे होय, असे मेननसारख्या कर्तृत्ववान राजनीतीज्ञाचे मत ! मग त्यांच्या मते हिंदुस्थानचा भूगोल कोठून चालू होतो की जो आपण विसरू नये असे त्यांचे म्हणणे आहे ? किंवा जो विसरल्याने देशाचा सर्वनाश ओढवतो असा त्यांचा अभिप्राय आहे ? टोळीवाल्यांचा काश्मीरवरील हल्ला म्हणजे महमद गझनीप्रमाणे उद्याच्या दिल्लीवरील स्वारीची ती नांदीच होय असे मेनन म्हणतात. याचाच अर्थ असा होता की, तो हल्ला वेळीच काश्मीरमध्ये घुसून थोपविला पाहिजे तरच हिंदुस्थानच्या अभंगतेचे संरक्षण होईल. मग काश्मीर आपल्याकडे असण्याची इच्छा धरणे ही भूमिविस्ताराची आकांक्षा कशी ठरते ? मला ही संगती लागत नाही. वाचकांना लागत असल्यास बघावी.

आणि हिंदुस्थान शासनाने तरी, काश्मीर पाकिस्तानला मिळाले तरी आमचे काही म्हणणे नाही हे कोणत्या भूमिकेवरून सांगितले ? प्रजा मुसलमान म्हणून ? मग "आम्ही तर द्विराष्ट्रवाद मानला नाही" हे थोतांड कशाला ? मेनन पान

४१२ वर म्हणतात, जिना आणि मुस्लिम लीग यांनी फाळणीपूर्वी काहीही प्रचार केलेला असो, फाळणी मान्य करताना काँग्रेस धुरीणांनी तरी द्विराष्ट्रवाद संमत केला नाही !' म्हणजे फाळणीने मुसलमानांसाठी राष्ट्र निर्माण करून दिले ही गोष्ट किरकोळ म्हणून सोडून द्यायची, किंवा काँग्रेसचा आरंभापासूनचा भूगोल पाकिस्तान वगळून उरलेला हिंदुस्थान एवढा होता हे गृहीत धरायचे आणि मग ही द्विराष्ट्रवादाची कसोटी लावायची ! सरळ प्रश्न असा येईल की, शेख अब्दुल्ला आणि त्याची नॅशनल कॉन्फरन्स हे जर द्विराष्ट्रवादापासून अलिप्त किंवा सेक्युलर तर त्यांना सेक्युलर हिंदुस्थानात पूर्णपणे विलीन होण्याचे वावडे का ? काँग्रेसजनांनी द्विराष्ट्रवाद मानणे न मानणे या बडबडीने काहीही सुसंगत निष्कर्ष कधी काढता आलेला नाही. ते वळवितील तसा अर्थ त्या त्या वेळी गृहीत धरावयाचा !

हिंदुस्थानच्या भूमीवर पाकिस्तान कधीही नव्हते तरीही ते तोडून दिले गेले. यापुढे हिंदुस्थानशी सलग असलेला भूभाग देऊन पाकिस्तानच्या भूमिविस्ताराला वाव देणे परवडणारे नव्हते हा विचार त्या वेळच्या विचारी राज्यकर्त्यांचा नसेल काय ? तेथे मुसलमान आज बहुसंख्य असतील पण ज्या काळात या बहुसंख्याकांचे पूर्वज हिंदुसंस्कृतीतूनच भ्रष्ट झाले तो ८०० वर्षांचा इतिहास विसरणे आणि पाकिस्तानला तो भाग सुखासुखी किंवा धाकदपटशाने घेऊ देणे यात आपला नाश आहे हे त्या वेळच्या वल्लभभाई पटेलसारख्या नेत्यांना अभिप्रेत नसेल काय ?

दि. २६ ऑक्टोबर १९४७ ला काश्मीरला हिंदुस्थानचे सैन्य विमानांनी पोचविण्याचे ठरले. दुसऱ्या दिवशी पहाटे पहाटे जवळ जबळ शंभरावर विमाने उड्डाणाला सिद्ध झाली. सकाळी दहा वाजता विमानाची पहिली तुकडी श्रीनगरच्या विमानतळावर घोंघावू लागली आणि तो विमानतळ, उद्ध्वस्त झालेला नाही हे पाहून विमाने खाली उतरली.

बारमुल्लापर्यंत टोळीवाले आलेच होते. श्रीनगरच्या जवळपासच्या भागातही ते पोहोचले होते. बारमुल्लापासून श्रीनगरात घुसण्याचा मार्ग होता. टोळीवाल्यांच्या संख्येची, शस्त्रास्त्रांची आणि व्यापाची कल्पना आपल्या सैन्यास आलेली नव्हती. लेफ्टनन्ट कर्नल राय बारमुल्लाकडे निघाले. त्यांनी तथाकथित टोळीवाले आधुनिक शस्त्रांनी सज्ज असलेले पाहिले. संख्येनेही ते किती तरी पटीने अधिक होते. म्हणून राय यांनी पट्टनपर्यंत माघार घेतली आणि शत्रूशी सामना केला. राय आणि त्यांचे सैनिक मारले गेले. त्यांचे शौर्य अतुलनीय होते.

नोव्हेंबर ४ ला गिलगिट भागात काश्मीरच्या मुसलमान सैनिकांनी लेफ्टनंट

कर्नल मजीदखान यांच्या आधिपत्याखाली स्वतंत्र राज्य घोषित केले. हिंदूंची कत्तल झाली.

आपल्या सैन्याने एकवटून चढाई केली आणि नोव्हेंबर ८ ला बारमुल्ला सोडविले. चौदा सहस्र वस्तीचे ते गाव, पण गावात येऊन जाऊन हजार लोक राहिले असतील. संपत्ती लुटली गेली होती. स्त्रिया पळविल्या गेल्या होत्या. लोक प्रचंड संख्येने ठार मारले गेले होते. गावातील मुसलमान टोळीवाल्यांना मार्गदर्शन करण्यात, त्यांना साहाय्य करण्यात आणि त्यांचे स्वागत करण्यात गुंतले होते. श्री. मेनन यांनी म्हटले आहे, नादिरशहाने दिल्ली धुतली याची वर्णने आपण वाचतो त्याची आवृत्ती या ठिकाणी टोळीवाल्यांनी घडविली होती; पण मुस्लिम आक्रमणाचे दुसरे तंत्र तरी काय आहे ? त्यांची वाढ कशी झाली ? इतिहासाची पुनरावृत्ती होत असते एवढेच.

राजौरी येथे टोळीवाल्यांनी ११ नोव्हेंबरला क्रूरतेचे दर्शन घडविले. दहा सहस्र हिंदूंची हत्या झाली. तीन सहस्र स्त्रियांनी राजौरीच्या तहसील बिल्डिंगमध्ये अग्निकुंड रचले आणि अग्निप्रवेश करून जोहार केला. (The Iron Curtain in Kashmir होरीलाल सक्सेना). आपले सैन्य राजौरीला पोहोचले तेव्हा त्यांना दिसला तो हाडांचा खच !

मीरपूर येथे २५ नोव्हेंबरला पंधरा हजार हिंदूंना कापले. आपलेच लोक संस्कृतीतून बाहेर गेल्यावर मूळ संस्कृतीवर कसा प्रहार करतात याची ही उदाहरणे आहेत.

आपल्या सैन्याने दि. ११ नोव्हेंबरला उरी स्वाधीन घेतले. समोर उभ्या असलेल्या भयानक क्रूरकर्म्यांशी सामना करताना आपल्या सैनिकांनी किती कठोर मनोधैर्य दाखविले असेल याची कल्पना त्यांनी एकामागून एक शत्रुच्याप्त भाग स्वाधीन घेतले त्यावरून येईल.

इकडे दिल्ली आणि कराची किंवा लाहोर यांच्यात वाग्युद्ध चालू होते. काश्मीरविषयक हालचाली चालू झाल्यानंतर आठवड्याभराने म्हणजे २/११/१९४७ ला पंतप्रधान नेहरू यांनी नभोवाणीवर भाषण केले, 'परिणामांचा सर्व विचार करूनच आम्ही काश्मीर प्रश्नातील प्रत्येक पाऊल उचलले आहे. थंड राहणे याचा अर्थ होता छळबळासाठी जाळपोळ, बलात्कार, नरसंहार अशा प्रयोगांना शरण जाणे. काश्मीरचा तो विश्वासघात ठरला असता. ही काश्मीरमधील आक्रमकांविरुद्ध लढाई आहे, त्या जनतेला लोकप्रिय नेतृत्व आहे. म्हणून एकदा तेथे शांतता प्रस्थापित झाली की, यूनोसारख्या त्रयस्थ मंडळाच्या छत्राखाली लोकमत अजमावले जाईल आणि विलीनीकरण कोठे ते निश्चित होईल.' लोकप्रिय

नेतृत्वाचा संबंध अर्थातच शेख अब्दुल्लाशी होता.

लियाकतअली यांची प्रतिक्रिया लाहोर नभोवाणीवर उमटली. त्यांनी सांगितले, 'गुलाबसिंग आणि इंग्रज यांच्यातील १८४६ मधील अमृतसरचा संधी हाच मुळी कुख्यात आहे. हिंदुस्थानने काश्मीरवर अधिकार सांगणे अवैधच नव्हे, तर अनैतिकही आहे. काश्मीरमधील (महाराजांविरुद्धचा) उठाव काश्मीरमधील लोकांचा आहे; पण बाहेरील लोकांना काश्मीरमधील त्या लोकांविषयी सहानुभूती आहे. एवढ्याच कारणाने आक्रमण आहे, बाहेरून आहे; असा आभास (हिंदुस्थान शासनाकडून) निर्माण केला जात आहे. इतिहास खोटा लिहिला गेला आहे. हिंदुस्थानची तळमळ काश्मीरला वाचविण्याची नव्हे, तर तेथल्या कोसळत्या जुलमी राजसत्तेला वाचविण्याची आहे. तेथील डरपोक महाराजाने हिंदुस्थानशी केलेला विलीनीकरणाचा अनुबंध म्हणजे काश्मीरी जनतेची फसवणूक आहे. हिंदुस्थानने काश्मीरला आक्रमक साहाय्य दिले आहे.'

काश्मीर जर का पाकिस्तानात विलीन झाले असते तर तेथील महाराजांची आणि हिंदूंची पाकिस्तानने काय स्थिती केली असती हे लियाकतअलीच्या एवढ्या वक्तव्यावरूनही स्पष्ट होते.

पुन्हा २१ नोव्हेंबर १९४७ ला नेहरूंनी विधिमंडळात वक्तव्य केले. मागील चार आठवड्यातील घटनांचा आढावा त्यांनी घेतला आणि काश्मीरच्या लोकांना त्यांचे भवितव्य ठरविण्याची संधी मिळेल असे घोषित केले.

दि. २६ नोव्हेंबरला काश्मीर प्रश्नावर दोन देशांत बोलणी झाली. त्याच्यातच फाळणीने उत्पन्न झालेले प्रश्नही बोलले गेले. २७ नोव्हेंबरला ५५ कोटींचा निर्णय झाला तो या धारणेवर की, त्यांचे कार्यवहन म्हणजे प्रत्यक्ष पैसे देणे सर्व प्रश्नांच्या सोडवणुकीवर अवलंबेल.

पण तेवढे वचन हातात पडताच पाकिस्तानने आपले काश्मीरसंबंधीचे धोरण कडक केले. याची सर्वांत अधिक जाणीव सरदार वल्लभभाई पटेल यांना झाली.

हिंदुस्थानने आपला पवित्रा निश्चित केला. पाकिस्तानची झोंडगिरी चालू द्यावयाची नाही असे नेत्यांनी ठरविले. पाकिस्तानला टोळीवाले काढून घेण्यास भाग पाडण्याचे प्रयत्न चालू होते. त्या प्रयत्नांना ५५ कोटीचे मिळालेले वचन आड येत होते.

अशा विपरीत परिस्थितीत हिंदुस्थानला आपला ५५ कोटी रुपये काश्मीरसकट सर्व प्रश्नांची सोडवणूक होईपर्यंत अडवून धरण्याचा निर्णय गांधीजींच्या

उपवासाने फिरवावा लागला. सद्भावाचा कितीही डांगोरा पिटला तरी सद्भावाला प्रत्यक्षात साद मिळाली नाही. पंचावन्न कोटींच्या दानानंतरही काश्मीरचा प्रश्न सोडविण्यास सहकार्य मिळाले नाही. गांधीजींच्या निधनानंतर यूनोच्या सुरक्षा मंडळामध्ये पाकिस्तानचे प्रतिनिधी झाफरुल्लाखान यांनी गांधीजींना गौरवपूर्ण शब्दांत श्रद्धांजली वाहिली खरी, पण ते त्यांचे तात्कालिक उद्गार होते. त्याचा पाकिस्तानच्या काश्मीरविषयक धोरणाशी काहीही संबंध नव्हता. कारण पुढच्याच सत्रात पुन्हा त्या सभेत पाकिस्तानने आपला पूर्वीचाच आग्रह चालू ठेवला होता.

सरदार पटेल यांची भीती पाकिस्तानने आपल्या कृतीने खरी ठरवली होती. गांधीजींच्या हटवादीपणावे दुःख पटेल यांना झाले होते. ते त्यांच्या व्यक्तिगत प्रतिष्ठेच्या किंवा अप्रतिष्ठेच्या कल्पनेमुळे नव्हे. त्यांनी आपल्या निवेदनातच म्हटले होते, 'आर्थिक तडजोड पाकिस्तानला अत्यंत आकर्षक वाटली. ती पाकिस्तानला एक आधार होणार होती, म्हणून आपली आर्थिक स्थिरता नीट ठेवण्याराठी पाकिस्तानने हे वचन मिळविले. त्याबरोबर हिंदुस्थानच्या भावनांना प्रतिसाद देण्याचे मात्र नाकारले.'... 'म्हणून आमच्या सुरक्षिततेवरच गदा आणील किंवा आमची पत नष्ट करील अशा प्रकारचे प्रश्न या पैशाच्या देवाणघेवाणीत बुडवून ठेवणे आम्हाला परवडणार नाही. जे ताणाताणीचे संबंध आहेत ते अधिक तीव्र होऊ नयेत यांची आम्हाला दक्षता घेतली पाहिजे. मी दिनांक बारा डिसेंबर १९४७ ला केलेल्या वक्तव्यात म्हटलेच आहे की, आमच्या सद्भावनेतून उभे केलेले कार्य आता धोक्यात आले आहे. म्हणजेच आमच्या सद्भावनेलाच धोका आहे. सध्या पाकिस्तानने आपल्या सैन्यानिशी आमच्याशी सशस्त्र संघर्ष चालविला आहे. त्याची व्याप्ती अधिक भयानक होईल अशी चिन्हे दिसत आहेत. जर पाकिस्तानला त्याच्या दांडगाईत यश मिळाले तर तडजोडीचा पायाच उखडला जाईल आणि हिंदुस्थानावरील त्यांच्या चढाईच्या पवित्र्याला सुलभता मिळेल.'

पण गांधीजींचा हट्ट पुरवावा लागला. सरदार पटेल हे राष्ट्राची अस्मिता बोलत होते. ती अस्मिता गांधीजींच्या हट्टात बळी गेली. वल्लभभाईंनी अपमान गिळला आणि मुंबईच्या २६ जानेवारी १९४८ च्या सभेत तो बोलून दाखविला. 'चांगुलपणाच्या आणि दातृत्वाच्या वृत्तीने आम्ही हे ५५ कोटीचे प्रदान केले, ते पाकिस्तानच्या अर्थराचिवांनी आणि लंडनच्या अर्थशास्त्रज्ञांनी मान्य केले. हे प्रदान करण्याचे आम्ही ठरविले ते गांधीजींना मानसिक यातनांतून बाहेर काढण्यासाठी.'

या प्रदानानंतर लढाई थांबली काय ? पाकिस्तानची चढाई थांबली काय ?

निर्वासितांचा ओघ थांबला काय ? हिंदूंचा संहार संपुष्टात आला काय ? याचे वृत्त आपणास हिंदुस्थान शासनाच्या वार्ताविवरण मंत्रालयाने १९४९ मध्ये 'काश्मीरचे रक्षण' (Defending Kashmir) या प्रसिद्ध केलेल्या प्रतिवृत्ता वरून कळून येईल. अगदी ओझरत्या दृष्टिक्षेपातही आपणास अतिशय भयानक घटना दिसतात.

काश्मीरच्या उत्तरेकडील भागात आक्रमण बाहेरून आले होते, तर पश्चिम जम्मूमध्ये आक्रमकांना स्थानिक लोकांनी साहाय्य केले. त्यांना सेनासाहित्याचा बाहेरून पुरवठा होई (Defending Kashmir पृष्ठ ३७).

अत्याचारांचे बळी झालेले सहस्रावधी हिंदू निर्वासित (मूळ प्रतिवृत्तात नॉन मुस्लिम म्हटले आहे) आपल्या सैन्याच्या छायेत असाहाय्य अवस्थेत होते तर सीमा रक्षण करणाऱ्या राज्यसेनेच्या तुकड्या टोळीवाल्यांकडून वेढल्या गेल्यामुळे असहाय्य होत्या. त्यांना साहाय्य पोहोचविणे आणि निर्वासित सोडविणे हेच आपल्या सेनेचे पहिले काम झाले. नुसत्या पूंचला चाळीस सहस्र निर्वासित एकत्र झाले होते. (पृष्ठ ३९).

दिनांक २० जानेवारी १९४८ ला ले. जनरल करिअप्पा यांनी पश्चिम फळीचे नेतृत्व घेतले. नौशेरा भागात राहा फेब्रुवारीला मोठी लढाई झाली. शत्रूचे थवेच्या थवे नवनवीन आयुधांसह टोळधाडीसारखे आपल्या सैन्याला वेढण्यासाठी पुन्हा पुन्हा येत होते. मरू घातलेल्या लढाईला जणू खाद्य मिळाले होते. आपल्या सद्भावना आपल्याच सैनिकांवर बंदुकींच्या गोळ्यांतून उलटत होत्या. तीन आवर्तनात मिळून पंधरा सहस्र शत्रुसैनिकांनी नौशेरात लढाई केली होती. आपल्या सैन्याने शौर्याची पराकाष्ठा केली. शत्रूचे दोन सहस्र सैनिक मारले गेले होते, पण त्यासाठी आपले एकोणतीस सैनिक बळी द्यावे लागले आणि नव्वद सैनिक व्रणित झाले (पृ. ४२).

थंडी मंदावू लागल्यावर शत्रूने व्यापलेला भाग सोडविण्याचे अभियान आपल्या सैन्याने हाती घेतले. राजौरी शत्रूच्याच अधीन होते. तरीही तेथे निर्वासित एकत्रित होत होते. आपले सैन्य त्या दिशेने वाटचाल करीत होते. बारा एप्रिल १९४८ ला आपले सैन्य तेथे पोहोचले. टोळीवाले पळून गेले होते.

राजौरीचे निर्वासित आता आपले स्वागत करतील असा मोठा उत्साह आपल्या सैनिकांत वाटत होता; पण तेथे केवळ बाराशे ते पंधराशे निर्वासितांना ते वाचवू शकले. त्या बहुतेक स्त्रिया होत्या. त्यातल्या तीनशे ते पाचशे स्त्रियांना ठार मारण्यासाठी ओळीत बांधून ठेवले होते. हल्लेखोर पळून गेले होते म्हणून त्या स्त्रिया वाचू शकल्या.

उरलेल्या निर्वासितांचे काय झाले होते ? शासकीय प्रतिवृत्तात पान ५७ वर म्हटले आहे की बारमुल्ला येथील अत्याचार फिका पडेल असा संहार तेथे झाला होता. नगरात स्मशानशांतता होती.


पळून जाण्यापूर्वी हल्लेखोरांनी हिंदू (म्हणजेच प्रतिवृत्तातील शब्द नॉन मुस्लिम) लोकांची सरसकट कत्तल केली. घरांचे अस्ताव्यस्त ढीग, ठिकठिकाणी गाडलेली असंख्य प्रेते, सडत असलेली उघडी प्रेते, त्यांची दुर्गंधी याने तेथे काय घडले याची कल्पना आपल्या सैन्याला आली. जिवंत माणसांवर शस्त्रास्त्रांचे वार होते. ते खुरडत येऊन निवारा शोधीत होते.

दीडशे चौरस फूट आणि पंधरा फूट खोलीचे तीन खड्डे प्रेतांनी भरले होते. ती प्रेते गाडून टाकण्याइतका वेळ शत्रूला मिळाला नव्हता. आपल्या सैनिकांना प्रत्यही नवीन नवीन प्रेते आढळत. एके ठिकाणी फुटलेल्या रंगी बेरंगी बांगड्यांचा खच पडलेला होता. स्त्रियांच्या चपला विखुरल्या होत्या. भुईवर रक्ताचे शिंपण होते. कोठे कोठे अर्धवट पुरलेल्या मुलांचे हात भुईतून आकाशाकडे निर्देश करीत होते.

गावातील अर्धीअधिक घरे जाळली होती किंवा टिकाव फावड्याने पाडली होती. राजौरीवर हा दुसरा बलात्कार होता. टोळीवाल्यांनी जेव्हा राजौरी प्रथम स्वाधीन घेतले (म्हणजे नोव्हेंबरच्या प्रारंभी) तेव्हा त्यांनी क्रूरतेचे जे दर्शन घडविले त्याचे वर्णन मागे आलेच आहे.

गांधीजींनी दि. ५/११/१९४७ ला अहिंसक युद्धाचे एक स्वप्नचित्र रेखाटले होते. त्याची या ठिकाणी आठवण होते. एका पृच्छकाने गांधीजींना विचारले होते, 'काश्मीरवरील स्वारीचा प्रतिकार अहिंसेने कसा करावयाचा ? गांधीजींनी सांगितले —

'आक्रमितांच्या रक्षणासाठी सैनिकी साहाय्य द्यावयाचे नाही. संघराज्याने अहिंसक साहाय्य पुरवायचे, आणि तेही भरपूर. असे साहाय्य मिळो अथवा न मिळो· आक्रमितांनी मात्र प्रचंड संख्येने आक्रमकांच्या किंवा विनयनबद्ध (शिस्तबद्ध) सैन्याच्या आघातांचाही प्रतिरोध करावयाचा नाही (म्हणजे वार अंगावर झेलत राहावयाचे). आक्रमितांनी आपापल्या नियत ठिकाणी (पोस्ट ऑफ ड्यूटी) क्रोधरहित आणि द्वेषरहित अन्तःकरणाने आक्रमकांच्या शस्त्रांना बळी जावयाचे. शस्त्र वापरावयाचे नाही. साध्या मुठीनेही प्रतिप्रहार करावयाचा नाही. असा हा अहिंसामय प्रतिकार म्हणजे भूतलावर इतिहासाला आजवर ज्ञात नसलेले शौर्याचे नेत्रदीपक दर्शन ठरेल ! मग काश्मीर पवित्र भूमी होईल. त्या पवित्रतेचा सुगंध हिंदुस्थानातच काय, पण अवघ्या जगात दरवळेल'.



असंख्य बळी घेऊन युद्धाने दि. ३१–१२–४८ च्या मध्यरात्री स्वल्पविराम घेतला.

(My Non-violence, page 339)

हे नुसते स्वप्नचित्र आहे आणि त्याचे कार्यवहन करण्यास आपण निष्प्रभ (इंपोटंट) असल्याचेही गांधीजींनी म्हटले आहे. हे चित्र कोणास रम्य, गोंडस वाटणारे असेल तर वाटो; मानवतेच्या दृष्टीने यासारखे क्रूर चित्र जगात क्वचितच पाहण्यास मिळेल. बारमुल्ला काय किंवा राजौरी काय, तेथील प्रतिकार हा अहिंसकच झालेला होता आणि त्याने सहस्रावधी प्राणांची हिंसा झाली होती आणि त्या अहिंसक प्रतिकाराचे बीभत्स प्रेत आपले सैनिक पाहात होते. त्या प्रेतांच्या दुर्गंधीने का भूमीला पवित्रता येणार होती ?

पंचावन्न कोटीचे हे प्रदान करावयास न लावण्यानेच वास्तविक अहिंसेचे काही मर्यादेने पालन होणार होते; पण ते न करता गांधीजी एकीकडे अहिंसक युद्धाची चित्रे वर्णू लागले तर दुसरीकडे पंचावन्न कोटींच्या प्रदानासाठी उपवास करू लागले. आक्रमकांना अत्याचार करण्यास अधिक अवसान देणारे असे हे गांधीजींचे उपचार त्यांच्या अहिंसेच्या तत्त्वाशी विसंगत ठरले.

राजौरी हातातून गेले याचा प्रतिशोध म्हणून हल्लेखोरांनी १६ एप्रिलला सहा सहस्त्रांच्या संख्येने झांगरवर स्वारी केली. त्यांना आपल्या सैन्याने पिटाळून लावले होते. २३ मे या दिवशी टिथवाल, मे २७ ला अरुसा, जून २८ ला पोरकांटो अशी चढाई आपले सैनिक करीत होते नि हे करता करता बळी पडत होते. वेगवेगळ्या आघाड्यांवर अशीच स्थिती होती.

दि. १४ ऑगस्ट १९४८ ला स्कार्डू या ठिकाणावर पाकिस्तानी सैन्याने मोहोळ उठविल्यासारखा हल्ला केला. आपले सैन्य लढत राहिले, पण त्याना साहाय्य मिळण्याचीही आशा नव्हती आणि विजय मिळण्याचीही नव्हती. शत्रूच्या प्रचंड संख्येखाली ते दबले गेले. पाकिस्तानी सैन्याला विजय मिळाला. त्यांच्या मुख्य स्थानी त्यांनी विजयाचा संदेश धाडला तो कोणता ? "सर्व शिखांना गोळ्या घातल्या. सर्व स्त्रियांवर बलात्कार केला !" "All Sikhs shot. All women raped.)" (Defending Kashmir पृष्ठ ७२).

बलात्काराचे कृत्य आपल्याकडे कोणी केले तर आपण त्याला हीन लेखतो, आणि बलात्कान्यालाही ती गोष्ट अभिमानाने सांगण्यासारखी वाटत नाही. तो लज्जितच असतो; पण काश्मीरमध्ये म्हणजेच हिंदुस्थानविरुद्ध 'धर्मयुद्ध' उभे केलेल्या मुसलमानांना त्यांच्या धर्माप्रमाणे स्त्रियांशी बळाने केलेला संभोग गौरवास्पद वाटला ! इतका की, विजयात काय काय लूट मिळाली, काय काय शौर्य गाजविले यात त्या 'धर्मकृत्याचाही' उल्लेख त्यांनी आपल्या संदेशात केला ! कुराणाचे संशोधन हा या पुस्तकाचा विषय नाही, पण अशा अपकृत्याला मुसलमानांनी

धर्मकृत्य मानले. या विधानाने कदाचित् आपलेच लोक बिचकतील. त्यांच्या सम्यक् संदर्भासाठी प्रमाण असावे, म्हणून त्यांनी कुराणाचा चौथा भाग (सुरा) बघावा.

वैषयिक संबंध कोणाशी विहित आहेत, कोणाशी निषिद्ध आहेत, ही नितितत्त्वे सांगण्याच्या ओघात त्या 'अन् निसा' (स्त्रिया किंवा स्त्रीविषयक) भागात एक युद्धनीतितत्त्व सांगितले आहे. आयत २४ मधील तो आशय आहे :-

'और विवाहित स्त्रियाँ भी तुमपर हराम हैं जो किसीके निकाह में हो सिवाय उनके जो ('लौंडी' के रूपमें) तुम्हारे कब्जे में हों !

श्री. अबू सलीम मुहम्मद अबदुल हअी यांनी कुराणाचे केलेले हे भाषांतर अधिकृत आहे. मक्तबा अलहसनात, रामपूर (उत्तर प्रदेश) यांनी ते प्रसिद्ध केले आहे. अरबी, उर्दू (फारशी लिपी) आणि नागरी लिपीत हिंदी अशी प्रत्येक पानाची रचना आहे. वरील उद्धरण पान २५२ वर आहे.

म्हणजे युद्धात तुमच्या हाती पडलेल्या स्त्रिया विवाहित आहेत की अविवाहित याचा विचार करण्याचे तुम्हाला (इस्लामियांना) कारण नाही. कारण जे पुरुष युद्धात पकडले जातात त्यांचा त्यांच्या स्त्रियांशी संबंध तुटतो असा 'इस्लामी कानून' आहे.

उद्धृत ग्रंथाच्या पृष्ठ १२४३ वर 'लौंडी' याचे विवरण दिले आहे.

'लौंडीसे अभिप्रेत वे स्त्रियाँ हैं जो इस्लामी युद्ध में पकडकर आयें और राज्यकी ओर से लोगों में बाँट दी जायें ।' पुढे म्हटले आहे 'युद्ध में जो स्त्रियाँ कैद होकर आयेंगी उनके बारे में इस्लामी कानून यह है कि पहले उन्हे राज्य के हवाले कर दिया जायेगा । राज्य को यह अधिकार प्राप्त है कि ... उन्हे सैनिकों में बाँट दे । इस प्रकार जो स्त्री जिस व्यक्ति के हिस्से में आयेगी केवल वही उससे संभोग कर सकता है... ।'

'रेडियन्स' या दिल्लीच्या इंग्रजी साप्ताहिकात कुराणावर चर्चा येते. फेब्रुवारी १९७० मधील अंकात वरील विषयाची चर्चा आली आहे तीही सम्यक् संदर्भासाठी बघावी.

स्त्रियांना कस्पटाप्रमाणे समजून त्यांना अशा प्रकारे वापरणे ही प्रथा एकेकाळी होती, पण ती मानव धर्मालाच बाधक असल्याने अनुसरणीय नाही, असा अभिप्राय कोणी व्यक्त करतो काय ? उद्धृत ग्रंथाच्या पृष्ठ १२४३ वरील मल्लीनाथी पहा.

'लडाओ में कैद होकर आनेवाली स्त्रियाँ राज्य के लिये एक समस्या होती है जिसे हर समझदार व्यक्ति भली भाँति समझ सकता है । इस्लामने इस समस्याका समाधान बिलकुल स्वाभाविक रूपमें किया है ।

वरील ग्रंथाचे तिसरे संस्करण जानेवारी १९७० चे आहे.

विसाव्या शतकात, वीस-बावीस वर्षांपूर्वी अवलंबिलेल्या या धर्मयुद्धांतील 'सर्व स्त्रियांवर बलात्कार केला' या विजयपताकेला 'बिलकुल स्वाभाविक रूपाचा' स्तंभ आहे !

असो. शत्रूने काय करावे यापेक्षा आपण काय करावे हा तेव्हाचा प्रश्न होता. आपले कामी आलेले सैनिक, अपहृत आणि बलात्कारित स्त्रिया आणि मारले गेलेले नागरिक निर्विवाद त्या पंचावन्न कोटींचे बळी होते.

नुसत्या पंचावन्न कोटींनी लढाई लढली जात नाही किंवा युद्धात अशा कितीतरी पंचावन्न कोटींचा व्यय सारखा होत राहतो ही वस्तुस्थिती त्या त्या परिस्थितीवर अवलंबते. त्या वेळच्या परिस्थितीत ती पंचावन्न कोटींची राशी पाकिस्तानला किती उपयोगी पडली हे सरदार पटेलांच्या वक्तव्यावरून दिसून आलेच आहे. आपल्याजवळ कितीतरी कोटी आहेत, त्या पंचावन्न कोटींचे काय दुःख करायचे असला पडखाऊ विचार त्या वेळी आपल्या देशाने केला नव्हता. आपल्याजवळ कितीतरी फॉकर विमाने आहेत, एक विमान पाकिस्तानने बळाने पळवून नेले आणि जाळले त्याचे काय दुःख करायचे, त्याचा काय राग धरायचा असा विचार जे राष्ट्र करील त्या राष्ट्राचा कधी स्वाभिमानाशी संबंध राहणार नाही. असे राष्ट्र दुसऱ्याकडून गोगलगाईप्रमाणे पायदळी तुडविले जाण्याच्याच योग्यतेचे राहील. म्हणूनच आपण विमान पळविल्याच्या आणि जाळल्याच्या घटनेविषयीचा राग निदान उच्चारीत तरी आहोत. म्हणून तेव्हा सारे राष्ट्र पंचावन्न कोटींच्या प्रदानाने प्रक्षुब्ध झाले होते.

सप्टेंबर तेराला आणि चौदाला मराठा नि जाट तुकड्यांनी बोटकुलमगंजकडे मोर्चा वळविला. पण आपल्या उद्दिष्टांच्या तीस यार्ड अंतरावर ते आहेत. तोच त्यांच्यावर अग्निवर्षाव झाला. एक कंपनीच्या कंपनी नाहीशी झाली.

युद्धबंदी व्हावी असे प्रयत्न अनेक दिवस चालू होते; पण प्रत्यक्ष युद्धबंदीचे कार्यवहन ३१/१२/१९४८ च्या मध्यरात्री झाले. अशा प्रकारे सद्भावनेच्या पोटी पंचावन्न कोटी रुपये देण्याचा निर्णय झाल्यानंतर जवळ जवळ एक वर्षभर आपल्या सैन्याच्या वाट्याला काही आले असेल तर ती अग्निवर्षावाची भेट !

● ●

६. घटना आणि अभियुक्त

स्फोट

दिल्ली हिंदुस्थानची राजधानी ! नव्या दिल्लीला बिर्लाभवन आहे. तेथल्या हिरवळीवर त्या दिवसांत गांधीजी प्रार्थना सभा घेत असत.

दि. २० जानेवारी १९४८ ला संध्याकाळी त्या भवनाच्या तटाच्या भिंतीलगत स्फोट झाला. तो स्फोट गनकॉटनच्या विटेचा होता. स्फोटाने भिंतीला भगदाड पडले.

दिल्ली आणि सभोवार त्या दिवसात रणधुमाळीने धुंद होते. लोकांच्या भावना प्रक्षोभाने भारलेल्या होत्या. काही महिन्यांपूर्वीच हिंदुस्थानचे विभाजन झाले होते. त्याचा तो परिणाम होता. स्थान हा भूमिवाचक शब्द आहे. पाकिस्थान (पर्शियनमध्ये पवित्रस्थान) नावाचे स्वतंत्र इस्लामी राष्ट्र निर्माण करण्यासाठी हिंदुस्थानचा काही भूभाग कोरून काढला होता. उर्वरीत हिंदुस्थानही त्याच वेळी ब्रिटिश वर्चस्वातून मुक्त झाला होता. तो भारत नावाने ओळखला जाऊ लागला.

हिंदुस्थानची राष्ट्रीय काँग्रेस (इंडियन नॅशनल काँग्रेस) राजकारणात अग्रेसर होती. त्या संस्थेच्या तत्कालीन नेत्यांना हिंदुमुस्लिम एकतेचा आणि धर्मनिरपेक्षतेचा गंड होता. त्याच्या अंगीकृत तत्वांना तिलांजली देऊन त्यांनी हिंदुभूमीवर मुस्लिम धर्माधिष्ठित राष्ट्र निर्माण होण्यास मान्यता दिली. तो त्या नेत्यांचाही पराभव होता, आणि त्यांच्या तत्त्वांचाही ! पण ते नेते दांभिक होते. ते दंभात निर्ढावलेले होते. म्हणून त्यांनी बळाने तत्त्वे हिंदूंवर लादली. आपला पराभव झाकला जावा म्हणून, हिंदू हे राष्ट्र आहे या वस्तुस्थितीला त्यांनी सदा विरोध केला. हिंदू ही एक जाति मात्र आहे एवढेच त्यांनी मानले. स्वत:च्याच मनाच्या पद्धतीने त्यांनी त्यांचे धर्मनिरपेक्षत्व उर्वरित हिंदुस्थानावर लादले.

वस्तुत: इंडिया ही संज्ञा हिंदुस्थान या संज्ञेचे ब्रिटिशांनी अवलंबिलेले विकृत रूप आहे. भारत हेही प्राचीन नाव आहे. आणि विभाजनपूर्व पूर्ण हिंदुस्थान असा अर्थ त्या संज्ञेत समाहित आहे; पण नेत्यांना हिंदूंचे अधिपत्य दर्शविणारे नाव देशाला देणे टाळायचे होते. त्यांना वाटले त्या योगे मुस्लिमांच्या भावना दुखावतील. अशा प्रकारे धर्मनिरपेक्षता याचा व्यवहारातील अर्थ मुस्लिम तुष्टीकरण असा राहिला.

फाळणीच्या वेदनांचे पुच्छ धरून सामूहिक हत्याकांड, अत्याचार आणि

प्रचंड प्रमाणावर निष्कासन चालत राहिले. त्या दिवसांचा तो नित्यक्रम होता !

गांधीजी महात्मा या विशेषणाने समाजात ओळखले जात. महात्मा अर्थात महान आत्मा. एक आदराची उपाधी. तेव्हाच्या राजकारणात गांधीजींचा प्रमुख वाटा होता.

विभाजनाचे घाव अंगावर झेललेले हिंदू आणि अशा पीडित हिंदूंशी भ्रातृभाव ठेवणारे आणि सहानुभूती असणारे हिंदू गांधीजींवर चिडलेले होते. म्हणून संभाव्य आघातापासून गांधीजींचे संरक्षण व्हावे म्हणून शासनाने बिर्ला भवनावर आरक्षी वाढविले होते.

२० जानेवारीचा स्फोट गांधींच्या दिशेने नव्हता. गांधीजींच्या व्यासपीठापासून तो जवळजवळ दीडशे फूट दूर होता; पण गांधीजींना समाप्त करण्याच्या षड्यंत्रांचा तो स्फोट एक भाग होता हे आरक्षींनी नंतर शोधून काढले.

मदनलाल पहावा हा तरुण त्या ठिकाणी त्या दिवशी पकडला गेला. तो विभाजनाने आहत झालेल्या हिंदूंपैकी एक होता. मदनलालचे आणखी साथीदार होते. त्यांचे उद्दिष्ट तेव्हा तडीस गेले नाही आणि ते पळून गेले असे आरक्षींना समजले. साथीदारांना पकडण्यासाठी आरक्षींनी हिंदुस्थाभर जाळे टाकले. स्फोटामुळे आणि या माहितीमुळे अधिक सावध होऊन शासनाने बिर्ला भवनावरील आरक्षी दल वाढविले आणि संरक्षण अधिक सतर्क केले.

परिसमाप्ती

पुढील दहा दिवसांत इतर साथीदारांना धरण्यात आरक्षींना काहीही यश आले नाही. आणि एकाएकी ३० जानेवारी १९४८ च्या संध्याकाळी ५ वाजता गांधीजी प्रार्थना सभेसाठी चालले असताना नथुराम गोडसे याने अगदी जवळून गोळ्या झाडल्या. त्या आघाताचा शारीरिक सहज परिणाम असेल कदाचित, गांधीजी अः अशा अती अस्पष्ट स्वरासरशी धराशयी झाले. ते तत्काळ अचेत अवस्थेत गेले आणि वीस एक मिनिटांत त्यांचे प्राणोत्क्रमण झाले.

गोळ्या झाडताच नथुरामने आपला छरिकाधारी हात वर केला आणि त्याने आरक्षींना पाचारण केले. आरक्षींनी त्याला पकडले. दि. २० जानेवारीस झालेल्या स्फोटाचे संबंधात आरक्षी ज्यांच्या शोधात होते त्यातला नथुराम हा एक होता.

आरक्षींचा शोध मुख्यतः मुंबई, दिल्ली आणि ग्वाल्हेरवर केंद्रित झाला होता.

लाल किल्ला

अभियोग चालविण्यासाठी एक विशेष न्यायालय शासनाने निर्माण केले. श्री आत्मचरण आग्रवाल, आय. सी. एस. यांची न्यायमूर्ती म्हणून नेमणूक झाली.

संस्मरणीय लाल किल्ल्यात हे न्यायालय होते. त्या ठिकाणी हा तिसरा अभियोग चालणार होता. पहिला अभियोग बहादूरशहा जफर आणि इतर आरोपींवरील होता. वर्ष १८५७ मध्ये ब्रिटिशांविरुद्ध ते स्वातंत्र्य युद्ध लढले म्हणून त्या अभियुक्तांवरील अभियोग चालला. दुसरा अभियोग वर्ष १९४५ मधील होता. दुसऱ्या महायुद्धात ब्रिटिशांविरुद्ध सैनिकी उत्थान केले म्हणून नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या आधिपत्याखालील स्वतंत्र हिंदुस्थान सेनेच्या (इंडियन नॅशनल आर्मीच्या) अधिकाऱ्यांविरुद्ध तो अभियोग होता. गांधीहत्याकांडाचा हा तिसरा अभियोग आता चालणार होता.

लाल किल्ल्याच्या तटातील ओऱ्यांचे परिवर्तन कक्ष-बंदीगृहात केले गेले होते. गांधी हत्याकांडातील आरोपी तेथे ठेवले होते.

बारा अभियुक्तांवर वेगवेगळे आरोप लावले गेले. बारापैकी तीन अप्राप्य होते. दि. २७ मे १९४८ ला आणि त्यानंतर न्यायालयापुढे आणलेले आरोपी याप्रमाणे होते —

१)	नथुराम विनायक गोडसे	वय ३७ पुणे
२)	नारायण दत्तात्रय आपटे	३४ पुणे
३)	विष्णु रामकृष्ण करकरे	३७ अंबिकानगर (अहमदनगर)
४)	मदनलाल काश्मीरीलाल पहावा	२० मुंबई (मूळचा जिल्हा मॉंटगोमरी-पाकिस्तान)
५)	शंकर किस्तैय्या	२० सोलापूर
६)	गोपाळ विनयाक गोडसे	२७ पुणे
७)	दिगंबर रामचंद्र बडगे	४० पुणे
८)	विनायक दामोदर सावरकर	६६ मुंबई
९)	दत्तात्रय सदाशिव परचुरे	४७ ग्वाल्हेर

तीन भूमिगत आरोपी होते - गंगाधर दंडवते, गंगाधर जाधव, सूर्यदेव शर्मा. हे सर्व ग्वाल्हेरचे होते.

अभियुक्त

आरोपी क्रमांक ७, दिगंबर बडगे क्षमेचा साक्षीदार झाला. स्वातंत्र्यवीर सावरकर यांना त्यामुळे क्रमांक ७ मिळाला. एक ज्वलंत क्रांतिकारी म्हणून

सावरकर यांना देदीप्यमान, नि:स्वार्थ पार्श्वभूमी होती. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यप्राप्तीचा इतिहास सावरकरांच्या नामोल्लेखावाचून अपुरा राहील. आपल्या कोवळ्या वयातच त्यांनी स्वातंत्र्यप्राप्तीच्या आंदोलनात उडी घेतली होती. स्वातंत्र्य मिळविणे हे एक पवित्र कर्तव्य आहे हे त्यांचे ब्रीद होते. हिंदुस्थानवर असलेले ब्रिटिशांचे वर्चस्व हे अन्याय्य बंधन आहे आणि आणि हिंदुस्थानच्या मानेवरील ते जोखड फेकून देण्यासाठी यथासाध्य साधन वापरणे हे न्याय्यच आहे ही त्यांची शिकवण होती. इटलीच्या स्वातंत्र्यसंग्रामाचा उद्‌गाता जोसेफ मॅझिनी यांच्या तत्त्वज्ञानाने सावरकरांनी हिंदू तरुणांची हिंदुस्थानची स्वातंत्र्यलालसा प्रज्वलित केली.

वर्ष १८५७ मध्ये घडलेल्या संघर्षास ब्रिटिशांनी बंड असे नाव दिले होते. सावरकरांनी प्रथमच त्या संज्ञेचे खंडन करून ते एक स्वातंत्र्ययुद्ध होते हे सप्रमाण घोषित केले आणि पुस्तकरूपाने प्रचारित केले.

सावरकरांवर तेव्हा ब्रिटिशांनी राजद्रोहाचा अभियोग भरला होता. त्यांना दोन जन्मठेपींची शिक्षा दिली गेली. त्या शिक्षा एकामागून एक भोगण्याच्या होत्या ! वर्ष १९१० मध्ये त्यांना त्या शिक्षा झाल्या होत्या. त्यांच्यावरील सर्व बंधनांतून ते वर्ष १९३७ मध्ये मुक्त झाले. तोपर्यंत गांधींच्या नेतृत्वाखालील काँग्रेसने मुस्लिम तुष्टीकरणनीतीची फार मोठी वाटचाल करून ठेवली होती.

सावरकरांना लोकांनी स्वातंत्र्यवीर ही उपाधी दिली होती. बंधनातून बाहेर पडताच ते राजकारणात शिरले आणि त्यांनी हिंदू महासभेचे नेतृत्व केले. हिंदू महासभा ही हिंदूसाठी न्याय्य मान आणि स्थान मिळवून स्वातंत्र्य संपादन करण्याचे व्रत घेतलेली राजकीय संस्था होती.

'हिंदुस्थानच्या विभाजनावाचून स्वातंत्र्य मिळाले पाहिजे हा सावरकरांनी आग्रह धरला आणि फाळणी टाळण्याचा उपाय म्हणून मुस्लिम तुष्टीकरण नीतीपासून दूर राहण्याचा लोकांना परामर्श दिला. हिंदूंना सैन्यात जाण्याचा त्यांनी उपदेश केला. सैन्य ब्रिटिशांच्या आधिपत्याखाली असले तरीही, सैन्यात जाण्यानेच शस्त्रे हाताळण्याची दुर्मिळ संधी प्राप्त झालेली होती. शस्त्रांचा वापर वेळ येताच स्वातंत्र्य संपादनासाठी करण्याची त्यांनी तरुणांना मंत्रणा दिली.

नेताजी सुभाषचंद्र बोस यांना सावरकरांची क्रांतिकारक बैठक स्फूर्तिप्रद झाली. ब्रिटिशांचे वर्चस्व नष्ट करण्यासाठी नेताजींनी काय योजना करावी या विषयी नेताजी आणि सावरकर यांच्या बैठकी झाल्या होत्या, याचे फारच थोड्या लोकांना ज्ञान आहे. रासबिहारी बोस हे सावरकरांचे एक सहकारी तेव्हा परदेशात होते. त्यांच्याशी सावरकरांचा पत्रव्यवहार असे हेही फार थोडे लोक जाणतात.

प्रत्यक्ष फाळणी होण्याच्या कितीतरी वर्षे आधी सावरकरांनी लोकांना चेतावणी दिली होती की, हिंदुस्थानातील अग्रेसर पक्ष म्हणजे काँग्रेस लोकांना फसवील, आणि मुस्लिमांच्या तुष्टीकरणासाठी हिंदुस्थानचे विभाजन करील. त्यांनी असेही सांगितले होते की, नंतर ही काँग्रेस उर्वरित हिंदुस्थानच्या मुस्लिमांचे तुष्टीकरण करीत राहील, आणि त्या योगे हिंदूंचे न्याय्य अधिकार मारले जातील.

या दोन विरुद्ध विचारप्रवाहांचा सारखा संघर्ष होत राहिला. गांधी आणि काँग्रेस यांनी 'अत्याचारी प्रवृत्तीचे' म्हणून क्रांतिकारकांची निर्भर्त्सना चालू ठेवली. क्रांतिकारकांच्या हौतात्म्यात असलेल्या उच्चतम त्यागभावनेचा गौरव करण्यास आणि त्याशी कृतज्ञ राहण्यास सावरकरांनी लोकांना शिकविले. वर वर पाहता क्रांतिकार्ये ही शस्त्रयुक्त आणि रक्तयुक्त असली तरीही ती गौरवार्ह आहेत, हे त्यांनी सांगितले. परिणामत: काँग्रेस शासनाने निर्देशिलेल्या अभियोजकांना सावरकरांना या अभियोगात गोवणे सोपे झाले. सावरकरांच्या नीतितत्त्वाला हीनपणे विकृती आणणे आणि तेच भांडवल करणे अभियोजकांना शक्य झाले. सावरकर ज्या तत्त्वासाठी झगडत होते त्या तत्त्वांचे तर्कशुद्धतेने खंडन करणे हा मार्ग त्यांना अडचणीचा होता.

या अभियोगातील अन्य अभियुक्त हिंदुस्थानच्या विभाजनाचे कठोर विरोधक होतेच, पण त्याव्यतिरिक्त विभाजन लोकांच्या गळी उतरविण्यासाठी जे छद्मी तर्कशास्त्र काँग्रेसच्या नेत्यांनी एकसत्ताकपणे अवलंबिले होते त्याचेही ते विरोधक होते. सर्व अभियुक्त उघड उघड सावरकरांचे म्हणजे त्यांच्या तत्त्वज्ञानाचे अनुयायी होते. त्यांनी ही वस्तुस्थिती अभियोगातही कधी नाकारली नाही. दुसऱ्या पक्षी अभियुक्त आपले अनुयायी असल्याचे सावरकरांनी नाकारले नाही.

त्यामुळे अभियोजकांनी एखाद्या अस्पष्ट काल्पनिक आणि निकृष्ट ऐकीव पुराव्याच्या आधाराने एक कथा रचली आणि प्रतिपादन केले की, सावरकरांच्या आशीर्वादाने गांधीवध घडला.

विभाजन घडविल्याने लक्षावधी लोकांच्या उद्ध्वस्ततेला आणि हत्येला उत्तरदायी असणारे नेते लोकविरोधी अपराधासाठी आरोपींच्या पिंजऱ्यात असायला हवे होते; पण ते होते सत्तेवर ! त्यांनी सावरकरांसारख्या उज्ज्वल लोकभक्ताला आरोपीच्या पिंजऱ्यात बसविलेले होते. हा फार मोठा दैवदुर्विलास होता.

आरोपी क्रमांक २, नारायण आपटे बी. एस्सी.बी. टी. होते. ते अतिशय लोकप्रिय अध्यापक होते. त्यांनी निजी (व्यक्तिगत) शिक्षणवर्गही चालविलेले होते. पुण्यापासून सत्तर मैलांवर अहमदनगर हे जिल्ह्याचे ठिकाण आहे. तेथे आरोपी क्रमांक ३ करकरे राहत. आपटे यांचे वास्तव्यही तेथेच होते. ते दोघे

जवळ आले ते एका आत्मीयतेच्या घटकामुळे. तो साधारण घटक होता, हिंदू संघटन ! आपटे यांनी तरुणांना शस्त्र-शिक्षण मिळावे म्हणून रायफल क्लब काढला होता.

नंतरच्या काळात म्हणजे वर्ष १९४४ मध्ये आपटे आणि नथुराम यांनी संयुक्तपणे 'हिंदुराष्ट्र' हे मराठी दैनिक पुण्याहून काढण्यास प्रारंभ केला. हिंदू संघटनांचा प्रचार आणि प्रसार हे या वृत्तपत्राचे उद्दिष्ट होते.

दि. ३१ जानेवारी १९४८ ला हिंदुराष्ट्राचा शेवटचा अंक निघाला. त्या अंकात वृत्त होते, 'गांधीजींची हत्या झाली. हत्या करणाराचे नाव नथुराम गोडसे आहे. तो हिंदुराष्ट्र दैनिकाचा संपादक आहे.'

आपटे आणि नथुराम गोडसे यांनी पाच-सहा वर्षे हिंदुमहासभेच्या ध्वजाखाली एकत्र काम केले.

आपटे दि. २० जानेवारी आणि ३० जानेवारी या दोन्ही दिवशी बिर्लाभवनाच्या घटनास्थळी उपस्थित होते. अभियोजकांनी आपटे यांचे वर्णन षडयंत्रामागील बुद्धी (ब्रेन) असे केले. नथुराम गोडसे आणि नारायण आपटे यांनी देशाची एकात्मता हे ध्येय आपल्या प्राणापेक्षाही प्रिय मानले होते. त्या ध्येयासाठी त्यांचे मरण हातात हात घालून खांद्याशी खांदा भिडवून नियतीने नेमले होते, आणि तेही 'वंदे मातरम्' हा मंत्र मुखावर ठेवीत !

आपटे देखणे होते. त्यांचा विवाह झालेला होता. त्यांना एक मुलगाही होता. तो बारा वर्षांचा होऊन वारला. म्हणजे आपटे यांच्या फाशीनंतर काही वर्षांनी.

विष्णू करकरे यांचे अंबिकानगर (अहमदनगर) येथे एक निवासालय आणि भोजनालय होते. ते स्वत: अतिशय कर्तव्यदक्ष कार्यकर्ते होते. नोआखाली भाग तेव्हा हिंदूंची संहारशाळा झाली होती. आता तो भाग बांगला देशात (पूर्वीच्या पूर्व पाकिस्तानात) आहे. त्यावेळी करकरे यांनी दहा युवकांचे पथक नोआखालीला नेले. हिंदूंना संघटित करून संघटित प्रतिकाराची भावना त्यांच्यात एकवटणे हे त्यांनी कार्य केले. हिंदुमहासभेच्या छत्राखाली त्यांनी नोआखालीतील हिंदूसाठी अनेक आश्रय-शिबिरे उघडली. हे कार्य त्यांनी वर्ष १९४६-४७ मध्ये केले. या प्रकरणात जानेवारी २० ते ३० ला करकरे घटनास्थळी उपस्थित होते. करकरे विवाहित होते. त्यांना अपत्य नव्हते.

गनकॉटन विटेचा स्फोट केलेला मदनलाल एक निर्वासित होता. त्याचा क्रमांक चार होता. सार्वत्रिक हत्याकांड, लुटालूट, जाळपोळ हे प्रकार त्याने समक्ष पाहिले होते. आपापले घरदार सोडण्यास भाग पाडलेला मानव मैलोमैल

लांब आणि दाट जथ्याने विभाजित हिंदुस्थानकडे निघाला होता.

आपल्या अमानुष फरपटीचे वर्णन मदनलालने न्यायालयात दिलेल्या आपल्या निवेदनात केलेले आहे. मदनलाल अविवाहित होता.

आरोपी क्र. ५ शंकर किस्तैया अविवाहित होता. तो क्षमेचा साक्षीदार दिगंबर बडगेचा सेवक होता. तो दिल्लीला दिनांक २० ला उपस्थित होता.

गोपाळ गोडसे (लेखक) हा नथुरामचा सख्खा भाऊ. आरोपीच्या मालिकेत त्याचा क्रमांक सहावा होता. त्याने हिंदुस्थानच्या सेनासाहित्यालयात सेवा केली. दुसऱ्या जागतिक महायुद्धात तो परदेशात गेला होता.

परत आल्यावर त्याची पुण्याजवळील खडकी येथे नेमणूक झाली होती. तो दि. २० जानेवारी १९४८ ला घटनास्थळावर उपस्थित असल्याने त्याच्यावर षडयंत्राचा एक घटक हा आरोप होता. तो विवाहित होता. त्याला दोन मुली होत्या.

दिगंबर बडगे हिंदू संघटक होता. तो शस्त्राचा व्यापार करीत असे. हिंदू ज्या ज्या ठिकाणी अल्पसंख्य असतील तेथे तेथे ते शस्त्रसज्ज असावेत आणि प्रतिकाराची त्यांच्यात भावना असावी ही त्याची मनोभूमिका होती. मदनलालने स्फोट केलेली गनकॉटनची वीट बडगेने पुरविली होती असे अभियोजकांचे प्रतिपादन होते. बडगेकडून आणखी काही दारूगोळा मिळाला होता. जानेवारी २० ला तो घटनास्थळावर उपस्थित होता.

दत्तात्रय सदाशिव परचुरे आरोपी क्र. ८ होते. ते डॉक्टर होते. ते एक कार्यक्षम हिंदू संघटक होते. मुस्लिमांची आक्रमणे त्यांनी प्रत्याक्रमणाने परतविली होती. त्यांच्यावर आरोप असा की, नथुरामने त्यांच्याकडून छरिका मिळविली. डॉ. परचुरे यांच्याकडून आरक्षींनी बळाने स्वीकारोक्ती घेतली. उच्च न्यायालयाने ती स्वीकारोक्ती अग्राह्य ठरविली.

श्रवण

अभियुक्तांनी आपल्या बचावासाठी विधिज्ञ दिले होते. तरीही आरोपांची उत्तरे आरोपींनी स्वत:च न्यायाधीशांना द्यायची होती. त्यांनी तशी उत्तरे दिली. ती देण्यापूर्वी त्यांनी आपापली निवेदने न्यायालयाला प्रस्तुत केली.

नथुरामने आपले लेखी निवेदन दिले. त्या निवेदनात, विशेषत: त्यातील दुसऱ्या अध्यायापासून पुढे, त्याने गांधींना मारण्याच्या आपल्या कारणांचा विस्तार दिला आहे. शासनाजवळ वृत्तपत्र-स्वातंत्र्याचा गळा घोटण्याचे सामर्थ्य होते. त्या उन्मत्त शक्तीचा वापर करून त्याने त्या निवेदनाच्या आंशिक किंवा पूर्ण

पुनर्मुद्रणावर प्रतिबंध घातला.

या गळचेपीमागे शासनाचा जो हेतू होता तो स्पष्ट होता. नथुरामने आपल्या निवेदनात जे कथन केले होते त्यामुळे गांधीजींच्या राजकीय वर्तनावर प्रकाश पडत होता. शासनाला ते नको होते. हत्याकाऱ्याविरुद्ध प्रचलित केले गेलेले घृणेचे, कलुषिततेचे वातावरण शासनाला तरोच राहू द्यायचे होते. सत्यस्थितीचे कथन दाबून टाकायचे होते. शासनाला कदाचित् असे वाटत होते की, सत्याचा गळा घोटल्यानेच सत्यवादी गांधींना योग्य श्रद्धांजली होईल.

शासनाच्या या गळाघोटू कृत्याला त्या दिवसांत आव्हान देणार कोण ? त्याला कोणी आव्हान दिले नाही, आणि निवेदन बंदीतच राहिले. शेवटी तो विधीच निष्प्रभ झाला आणि जवळ जवळ तीस वर्षांनी हे निवेदन (मूळ इंग्रजीत) लोकांसमोर पोहचत आहे, ते May It Please Your Honour या पुस्तकाच्या माध्यमाने.

नथुरामने स्वत:चे बचावाचे भाषण स्वत:च करण्याचा निर्णय घेतला.

त्याने आपले भाषण केले. त्यात त्याने हत्येसाठी असलेल्या आरोपसिद्धीला प्रतिरोध केला नाही. त्याच्या विधानांचा यथातथ्य सारांश प्रकाशित करण्यास वृत्तपत्रांना मोकळीक नव्हती.

निर्णयपत्र

अभियोजकांनी १४९ साक्षीदार आणले होते. दि. ३० डिसेंबर १९४८ ला श्रवण संपले. निर्णय राखून ठेवला गेला. तो दि. १० फेब्रुवारी १९४९ ला न्यायाधीशांनी प्रकट केला.

स्वातंत्र्यवीर सावरकर यांना मुक्त केले गेले. दिगंबर बडगे याला त्याने आपल्या सहाभियुक्तांविरुद्ध साक्ष दिली म्हणून मुक्त केले. विष्णु करकरे, मदनलाल पाहवा, गोपाळ गोडसे, शंकर किस्तैय्या आणि डॉ. परचुरे यांना जन्मठेप सुनावली गेली. त्यासह त्यांना आणखीही शिक्षा भोगण्याच्या होत्या.

नथुराम गोडसे आणि नारायण आपटे यांना मृत्युदंड सुनावला गेला.

निर्णय सुनावला गेला मात्र आणि सर्व न्यायालय दंडितांच्या घोषणांनी दुमदुमून उठले —

'अखंड भारत अमर रहे ! वंदे मातरम् ! स्वातंत्र्यलक्ष्मी की जय !

विशेष विधीचे स्वरूप

एरव्ही लोकसत्ताक समजल्या जाणाऱ्या शासनात गांधीजींना एक विशेष स्थान होते. म्हणून 'बॉंबे पब्लिक सेक्युरिटी मेजर्स ॲक्ट' हा विशेष विधी दिल्लीला लावला गेला. त्याचा परिणाम पूर्वीपासून म्हणजे घटना घडल्या दिवसापासून दिला गेला. त्या विधीप्रमाणे विशेष न्यायालय स्थापन केले गेले आणि अभियोगासाठी तोच विधी लावला गेला.

या विधीप्रमाणे नागरिकाला एरव्हीच्या विधीप्रमाणे न्यायात समानता मिळते ती नाकारली गेली. आणि त्यासारख्या आणखी असणाऱ्या अधिकारांनाही अभियुक्त वंचित राहिले. हिंदुस्थानचे सर्वोच्च न्यायालय तोपर्यंत स्थापन झाले नव्हते. पुढे सर्वोच्च न्यायालयाने हा विधी अवैध ठरविला. पण त्या अवैधतेला पूर्वीपासून परिणाम दिला गेला नाही. म्हणून या अभियोगातील दंडितांना त्याचा लाभ मिळाला नाही.

न्यायालयाने दिलेला मृत्युदंड एरव्हीच्या विधीप्रमाणे उच्च न्यायालयाने संमोदित करावा लागतो; पण या विशेष विधीची विशेषता अशी होती की मृत्युदंड उच्च न्यायालयाने संमोदित करण्याची आवश्यकता नव्हती. पुनरावेदन करण्यासाठी कालावधी पंधरा दिवसांचाच होता. सर्वसाधारण विधीप्रमाणे तो कालावधी साठ ते नव्वद दिवसांचा असतो.

पुनरावेदने

सर्व सात दंडितांनी आपापली पुनरावेदने बंदिगृहाच्या अधिकाऱ्यांच्या माध्यमातून पंजाब उच्च न्यायालयाकडे धाडली. पूर्वी पंजाब उच्च न्यायालय लाहोरला बसत होते. लाहोर हे रामाचा मुलगा लव याने बसविल्याची कथा आहे. लाहोर हे मूळचे लवपूर; पण तेच लाहोर, ते लवपूर, एका विचित्र, विपरीत आणि अनिष्ट योगाने आज पाकिस्तानचा भूभाग बनून गेले होते ! उच्च न्यायालयही 'निर्वासित' झाले होते.

विभाजित हिंदुस्थानात सिमला येथे त्यान आपले तात्पुरते वास्तव्य ठेवले होते.

नथुरामनेही पुनरावेदन केले; पण ते षडयंत्राच्या आरोपसिद्धीविरुद्ध, आणि दुसऱ्या आरोपसिद्धीविरुद्ध.

मृत्युदंडाविरुद्ध त्याने पुनरावेदन केले नाही. स्वत:च आपले म्हणणे मांडण्याची त्याने अनुज्ञा मागितली. ती दिली गेली. तो वेळपर्यंत या अभियोगातील सर्व

दंडितांना दिल्लीच्या लाल किल्ल्यातील विशेष बंदिगृहातून अंबाला बंदिगृहात स्थलांतरित केले होते.

अन्य दंडितांसाठी त्यांचे त्यांचे विधिज्ञ पुनरावेदनाचे अभिभाषण करणार होते.

सर्वस्वी भंडारी, अच्छरुराम आणि खोसला यांचे न्यायपीठ उच्च न्यायालयात स्थापन झाले होते. त्या न्यायपीठाने या अभियोगाची पुनरावेदने मे आणि जून १९४९ मध्ये ऐकली.

आपला निर्णय त्यांनी २१ जून १९४९ या दिवशी घोषित केला.

शंकर किस्तैय्या आणि डॉ. परचुरे यांना निर्दोष घोषित करून उच्च न्यायालयाने त्यांची मुक्तता केली.

विष्णु करकरे, मदनलाल पाहवा आणि गोपाळ गोडसे यांच्या शिक्षा स्थिर राहिल्या.

नारायण आपटे यांचा मृत्युदंडही न्यायपीठाने स्थिर ठेवला. नथुरामचा मृत्युदंड आपोआपच स्थिर झाला.

नथुरामचे व्यक्तिमत्व

नथुरामच्या वर्तनाने आणि क्षमतेने उच्च न्यायालय प्रभावित झाले होते हे स्पष्ट दिसते. निर्णयपत्रात न्यायालयाने त्या गुणांचा विशेषत्वाने उल्लेख केला आहे.

न्यायमूर्ती अच्छरुराम म्हणतात — 'वरिष्ठ न्यायासनाकडे पुनरावेदने (अपील्स) करणाऱ्यांपैकी नथुराम वि. गोडसे याने त्यांच्या दोषसिद्धीला (कन्व्हिक्शनला) आव्हान दिले नाही. दि. ३० जानेवारी १९४८ ला म. गांधींच्या झालेल्या हत्येसाठी त्याच्यावर भारतीय दंडविधान धारा ३०२ प्रमाणे आरोप सिद्ध झाला होता. त्या दोषसिद्धीसाठी त्याला फाशीची शिक्षा सुनावली. त्याविरुद्धही त्याने पुनरावेदन केले नाही. त्याने आपले पुनरावेदन आणि आपले युक्तिवाद त्याच्यावर जे दुसरे आरोप सिद्ध झाले होते, त्याभोवतीच मर्यादित ठेवले. त्याने स्वत:च आपले अधिवक्तव्य या न्यायासनापुढे मांडले. त्यात त्याने वस्तुस्थितीच्या घटकांचे (फॅक्टसचे) जे विवेचन केले त्यात त्याची आलक्षणीय क्षमता प्रत्ययास आली. कोणाही विधिज्ञाला भूषणावह ठरेल अशा पद्धतीने त्याने आपले अधिवक्तव्य केले हे मला मानलेच पाहिजे.'

नथुरामच्या विचारक्षमतेविषयी ते न्यायमूर्ती म्हणतात, 'नथुराम शालान्त परीक्षा उत्तीर्ण होऊ शकला नाही, तरीही त्याचे वाचन प्रचंड आहे. इंग्रजी भाषेचे त्याचे ज्ञान चांगले आहे. विचार स्वच्छपणे मांडणे, विचारांत गोंधळ न करणे यातील त्याची क्षमता तर मनात भरण्यासारखी होती हे त्याने आपले अभिवक्तव्य मांडतांना आम्हाला दाखविले.'

आपल्या अभिभाषणाच्या ओघात नथुरामने असे एक विधान केले होते की, २० जानेवारी १९४८ ला मी बिर्ला भवनात उपस्थित नव्हतो. न्यायमूर्तींनी हे विधान स्वीकारले नाही. आपल्या अस्वीकाराच्या पुष्टीसाठी त्यांनी नथुरामच्या दृढ मनोबलाचे निरीक्षण केले होते त्याचाच आधार घेतला. श्री. अच्छरुराम यांनी लिहिले आहे, 'ही पुनरावेदने आमच्यापुढे पाच आठवड्यांवर चालली. तेवढ्या अवधीत विशेषत: जे आठ नऊ दिवस नथुराम स्वत: वक्तव्य करीत होता त्या अवधीत आम्ही त्याला चांगलेच पारखले आहे. अशा कर्तृत्वाचा मनुष्य असला (मागे राहाण्याचा) विचारही मनात बागवील अशी कल्पना करता येत नाही.'

निर्दोष

न्यायमूर्ती खोसला यांनी सेवानिवृत्तीनंतर त्या काळात न्यायालयाचे जे दृश्य त्यांच्या डोळ्यासमोर दिसले होते, त्याचे शब्दचित्र रेखाटले आहे. ते म्हणतात, 'नथुरामने आपल्या बचावासाठी आमच्यासमोर जे ओघवते वक्तव्य केले ते या पुनरावेदनातील सर्वश्रेष्ठ आकर्षण होते. कित्येक तास तो बोलत होता. त्यातील पूर्वार्धात त्याने या प्रकरणातील घटनांची चर्चा केली, आणि उत्तरार्धात त्याने गांधीजींना मारण्यात त्याचा हेतू काय होता याचे निवेदन दिले.

'नथुरामचे वक्तव्य हीच प्रेक्षकवर्गाला एक आकर्षक गोष्ट होती. पूर्ण भरलेले न्यायालय इतके भावनावश झालेले होते की त्यांचे उसासे आणि हुंदके ऐकू येत, आणि त्यांचे डबडबलेले डोळे आणि ओघळणारे अश्रू दिसत असत. सर्व न्यायालयातील त्या प्रेक्षकांना न्यायदानाचे काम करण्यास सांगितले असते तर नथुराम निर्दोष आहे असाच निर्णय त्यांनी प्रचंड बहुमताने दिला असता, यात मला तिळमात्र संशय नाही.'

लाल किल्ल्यातील विशेष न्यायालयात न्यायमूर्ती श्री. आत्मचरण यांचेसमोर आपले अभिभाषण करताना नथुरामने त्याच क्षमतेचा प्रत्यय दिला होता.

अनुपलब्ध अभियुक्त

डॉ. परचुरे यांच्या दांडित्यावर किंवा मुक्ततेवर अनुपलब्ध अभियुक्तांचे भवितव्य अवलंबून होते. डॉ. परचुरे मुक्त झाले तेव्हा ते तीन अभियुक्त ग्वाल्हेरच्या एका न्यायाधीशापुढे उपस्थित झाले. त्यांना सोडून देण्यात आले.

'आणीबाणी तेव्हाची

उच्च न्यायालयात नथुरामने केलेल्या अभिभाषणाच्या संबंधातही वृत्तपत्रांची गळचेपी केली गेली होती. नथुरामचे अभिभाषण भावपूर्ण होते. ते रोमांचकारी होते. अशा पार्श्वभूमीवर असा योग क्वचितच असतो. स्वाभाविकपणेच वृत्तपत्रांना या भाषणात रुची होती. वृत्तपत्रांच्या प्रतिनिधींनी त्याचे भाषण लघुलिपीत शब्दश: उतरविले, पण न्यायमूर्तींची पाठ वळते न वळते तोच आरक्षीनी वृत्तपत्रप्रतिनिधींवर झडप घातली आणि त्यांच्या वह्या हिसकावून घेतल्या. आरक्षी तेवढ्यावरच थांबले नाहीत. त्यांनी त्या वह्यांच्या चिंध्या केल्या. त्यांनी वृत्तपत्र-प्रतिनिधींना धमकावले की, नथुरामच्या वक्तव्याचा सत्यस्थितीदर्शक अभिप्राय तुम्ही मुद्रित केलात तर तुम्हाला कठोर परिणाम भोगावा लागेल ! आरक्षींच्या माध्यमातून आलेल्या शासनाच्या धमकीपुढे वाकणे वृत्तपत्रांना भाग पडले म्हणून वृत्तपत्रांनी असंबद्ध आणि विकृत वृत्त त्या दिवसांत छापले.

काही वृत्तपत्रांनी या घटनेचा अन्वयार्थ लिहिला. फाशीची शिक्षा कार्यवाहीत आल्यानंतर त्यांनी तो अभिप्राय लिहिला. त्या वृत्तपत्रांकडून प्रतिभू मागितले गेले आणि त्यांचा छळही केला गेला. सत्याविषयी प्रेम असणे दूरच, शासनाला सत्याचा तिटकारा होता. शासन स्वत:ला गांधीवादी म्हणवीत होते. त्यामुळे हा विरोध ठळकपणे डोळ्यात भरत असे.

फाशीचे कार्यवहन

नथुराम गोडसे आणि नारायण आपटे यांना सुनावलेल्या फाशीचे कार्यवहन अंबाला बंदीगृहांत मंगळवार दिनांक १५ नोव्हेंबर १९४९ या दिवशी सकाळी ८ वाजता केले गेले. त्यावेळपर्यंत गांधीवधाची घटना घडून साडेएकवीस महिने लोटले होते. त्या दोघांच्या फाशीच्या वेळच्या त्यांच्या वागणुकीविषयी अनेक वेगवेगळी वर्णने केली गेली आहेत. त्यातील काही वर्णने फार विपर्यस्त आहेत. प्रस्तुत लेखक आणि त्याचे सहदंडित करकरे आणि मदनलाल हे नथुराम आणि नारायण यांच्या फाशी पूर्वीच्या वीस मिनिटेपर्यंत त्यांच्या जवळ उपस्थित होते. नथुराम आणि आपटे निश्चल होते, स्थिर होते. शांत होते. त्यांच्या बोलण्याचालण्यातही नेहमीपेक्षा काही वेगळेपण नव्हते. हे स्थैर्य टिकविण्यासाठी

त्यांना काही विशेष प्रयत्न करावे लागत आहेत असेही दिसत नव्हते. त्यांच्या मुद्राही शांत होत्या. ते बोलत होते, गप्पा मारीत होते, सहज विनोदही करीत होते. ते आम्हा सहदंडितांशी बोलत होते. आपापसात बोलत होते, आणि बंदिगृहाच्याही कर्मचाऱ्यांशी आणि अधिकाऱ्यांशी बोलत होते.

आम्ही सहदंडित आणि फाशीवाले यांनी चहा घेतला, कॉफी घेतली.

बंदिगृहाच्या एका आरक्षीने चहा-कॉफीचा ट्रे आणला होता. बंदिगृहाचे अधीक्षक श्री. अर्जुनदास जवळच उभे होते. नथुरामने त्यांच्याकडे पाहिले आणि स्मित केले.

अर्जुनदास यांची त्या स्मिताचे स्मिताने उत्तर देण्यासारखी मनस्थिती नव्हती. या फाशीवाल्यांना काही मिनिटांनी ते ठार मारणार होते. आपल्यावर हा घोर प्रसंग आहे असे त्यांना वाटत होते. अधीक्षक अर्जुनदास यांची या दोन दंडितांशी मित्रता झाली होती. ते त्यांच्या कोठीपाशी बसून तासनूतास बोलत असत. घटनांमागील राजनैतिक दृष्टिकोणाची त्यांना जाण होती.

या दोघा दंडितांची राष्ट्रीय एकात्मतेची भावना ते ओळखत होते. अन्यथा महाराष्ट्रापासून सहस्राधिक मैल दूर असलेला पंजाब फाडला जात होता याचे या महाराष्ट्रातील माणसांना का दुःख झाले ? जे लोक उद्ध्वस्त झाले त्याविषयी या मंडळींना सहानुभूती का वाटली ? त्यांनी स्वत: आगीत उडी का घेतली ? असा अर्जुनदास विचार करीत असत.

हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याच्या प्रसवावस्थेपासूनच अधीक्षकांनी रक्तपात पाहिला होता. स्वातंत्र्य रक्ताच्या थेंबावाचून मिळाले असे वेळोवेळी बरळणाऱ्या दांभिकांची ते निर्भर्त्सना करीत असत. पंजाबचा हा रक्तस्राव कोणाच्या नावे लिहायचा असे त्यांना वाटे.

आणि ते अधीक्षक त्या रक्तस्रावात या तरुणांच्या फाशीने भर घालणार होते. तेही निर्विकारपणे !

नथुरामच्या स्मिताने काहीसे अन्यमनस्क होऊन अधीक्षकांनी उसासा टाकला. त्या उच्छ्वासामागे त्यांनी आपले अश्रूच जणू लपविले असे आम्हास दिसले. ते नथुरामच्या स्मिताला प्रतिस्मित कसे देणार ?

तरीही अधीक्षकांना वाटले, या फाशी जाणाऱ्या युवकाची ही शेवटची अपेक्षा असेल ! त्याला प्रसन्न तरी करू या ! आणि त्यांनी बळे बळे आपल्या ओठावर स्मित आणले, आणि प्रश्नार्थाने नथुरामकडे बघितले.

नथुराम म्हणाला, 'महोदय ! आपल्याला आठवते ? मी म्हटले होते

ना एकदा आपल्याला की मला फाशीची भीती नाही ! पण दोराला लोंबकळण्यापूर्वी कॉफी पाहिजे बरं का मला ! आज तो पेला हा माझ्या पुढ्यात आहे ! धन्यवाद महाशय ! आभार !'

अर्जुनदासांना हुंदका आला नाही इतकेच ! मग नथुरामने डॉक्टरांकडे पाहिले आणि म्हटले, ''डॉक्टर छाबडा, तुमचे पुस्तक मी उपअधीक्षक त्रिलोकसिंग यांचेकडे ठेवले आहे. माझी स्वाक्षरीही पुस्तकावर आहे. आणखी स्वाक्षऱ्या तर नको आहेत ना काही ?'

आदल्या दिवशी आपल्या मामांशी नथुराम ज्या सहजतेने बोलत होता त्याच सहजतेने तो डॉक्टरांशी बोलला. तो म्हणाला होता, 'मामा, तुमचे एक सहस्र रुपये परत देण्याची मी व्यवस्था केली आहे.'

नारायण आपटे यांनी आपला प्रबंध योग्य अधिकाऱ्यांकडे धाडण्याचे अक्षीक्षकांना स्मरण दिले. 'प्रशासन व्यवस्था' या विषयावर आपटे यांनी शेवटच्या दहा दिवसात एक प्रबंध लिहिला होता.

अधीक्षकांनी तो शासनाकडे धाडला होता; पण शासनाने अद्यापर्यंत तो आपटे यांच्या पत्नीकडे किंवा त्यांच्या भावांकडे धाडलेला नाही.

जिल्हाधिकारी श्री. नरोत्तम सहगल यांनी या दोन प्रवाशांजवळ अज्ञाताला जाण्याचे पारपत्र आहे का आणि असल्यास ते अधिकृत आहे का, ते तपासून पाहिले.

त्या दोघांच्या जीवनापलीकडील प्रवासाला प्रारंभ झाला. त्यांनी आपल्या हातात भगवद्गीता, अखंड हिंदुस्थानचे मानचित्र आणि भगवा ध्वज ठेवला होता.

फाशी कोठीच्या मागील अंगास फाशीचा फलाट होता. एका वेळी तिघांना फाशी देता येईल अशी तेथील तुळईवर व्यवस्था होती.

थंडीच्या त्या दिवसांत सकाळचे पडलेले कोवळे ऊन नाना आपटे यांना आल्हाददायक वाटले. फार दिवसांनी त्यांना ते सुख मिळत होते.

'पंडित, काय छान ऊन पडले आहे !' ते म्हणाले. नथुरामला ते प्रसंगी पंडित म्हणत.

नथुराम म्हणाला, 'तुला असे ऊन फार दिवसांनी अनुभवायला मिळत आहे. अरे, सिमल्याला तर नेहमीच ऊन असे असते म्हणेनास !

'फारच प्रसन्न वाटते आहे ! स्वर्गीय !

'या स्वर्गीय क्षणी आपल्या मातृभूमीने आपल्यावर केलेला हा प्रेमाचा वर्षाव !'

फळ्यांवर पोहोचताच त्या दोघांनी मातृभूमीचे स्तवन केले-

नमस्ते सदा वत्सले मातृभूमे
त्वया हिंदूभूमे सुखं वर्धितोऽहम् ।
महामंगले पुण्यभूमे त्वदर्थे
पतत्वेष कायो नमस्ते नमस्ते ।

त्या दोघांचे हात पाठीवर बांधले होते. वधकाने दोराचा फास गळ्यात अडकविला आणि लोंबणारा दोर त्यांच्या खांद्यावर ठेवला आणि प्रत्येकाचे पायाचे अंगठे दोरीने एकत्र बांधले.

सभोवार सर्व शांत होते. नथुराम आणि नारायण यांनी जयघोष उच्चारले. शंभर फुटाच्या त्रिज्येत त्यांचा प्रतिध्वनी उगटला-

अखंड भारत अमर रहे । वंदे मातरम् ।

ध्वनी प्रतिध्वनी विरून गेले.
अधीक्षकांनी वधकाला खूण केली. वधकाने खटका ओढला.
फळ्यांचा सेतु मोडला

गुरूत्वाकर्षणामुळे भूमीकडे खेचल्या गेलेल्या त्या दोघांना निसर्गाने आलिंगन दिले आणि त्यांच्या अज्ञाताच्या प्रवासपूर्तीसाठी त्यांना आपल्या अदृश्य रथात बसवून नेले !

ही सर्व रक्तलांछित प्रक्रिया दोराच्या एका झटक्याने होऊन गेली. मात्र रक्ताचा एकही थेंब न सांडता !

नथुरामचा मृत्यू तत्काल झाला. नारायण आपटे यांचे गुडघे एकदा हनुवटीकडे ओढले गेले. अचेतावस्थेत ते दोन मिनिटे हालत होते. मग सर्व काही स्तब्ध झाले.

उपअधीक्षक श्री. रामनाथ शर्मा यांनी अंत्यसंस्कार केला.

त्या दोघांनी शेवटी आपल्या हातात धरलेल्या वस्तु प्रस्तुत लेखकाजवळ देण्यात आल्या.

दहन बंदिगृहाच्या आवारातच झाले. नथुरामने केलेले मृत्युपत्र दुसऱ्या दिवशी बंधू दत्तात्रय यांना देण्यात आले. पुस्तकाच्या शेवटी त्याचा आशय

दिला आहे.

आजन्म कारावासी

या अभियोगात जन्मठेप झालेल्या तिघाही दंडितांना शासनाने असाधारण क्रूरतेने आणि प्रतिशोधबुद्धीने वागविले. विशेषत: त्यांच्या सुटकेच्या संबंधात तर शासनाने त्या वर्तनाची परिसीमा केली ! 'आजन्म निष्कासन' 'ट्रान्सपोर्टेशन ऑफ लाइफ' या शब्दप्रयोगामागे शासन लपून राहिले. त्यांचे निष्कासन केले असते तर त्यांना मुक्त आयुष्य भोगता आले असते; पण शासनाने त्यांचे निष्कासन केले नाही ते शासनाच्या सोयीसाठी. दंडितांनी काही तशी विनंती केली नव्हती. आणि दुसऱ्यापक्षी शासनाचा या आणखी तीन जीवांवर दुष्ट डोळा होता. त्यांना बंदीगृहात सडवत मारायचे आणि तो क्रूरतेचा आनंद लुटायचा हा शासनाचा हेतू होता.

सश्रम कारावासाची शिक्षा झालेल्या दंडिताला शिक्षेत काही सूट मिळत असते. दंडिताने केलेले काम आणि त्याचे बंदिगृहातील वर्तन याशी संबंधित सुटीचे कोष्टक असते.

आजन्म दंडित हा सश्रम कारावासी दंडित असतो. जी सूट मिळते त्या सुटीइतकी त्याची शिक्षा परिणामी घटते. कारण सुटीचे गणन शिक्षेच्या अंतिम तिथीकडून होते.

प्रस्तुत लेखकाने नियमांना आवश्यक असलेल्या सर्व गोष्टींची पूर्ती तर केलीच पण त्याव्यतिरिक्त त्याने, देशाला जेव्हा जेव्हा रक्तदानासाठी आवाहन केले गेले होते त्या त्या वेळी रक्तदानही केले. शासन प्रत्येक रक्तदानासाठी दहा दिवसाची सूट देते. शासनाने लेखकाच्या नोंदपत्रकावर सूट नोंदविली. मात्र त्याचा लाभ त्याला कैव्हाच दिला नाही !

भारतीय सुरक्षा अधिकोषाचा म्हणजे रिझर्व बँकेचा एखादा अधिकृत विकर्ष किंवा ड्राफ्ट सचिवालयाने झिडकारावा तशातला तो प्रकार होता. शासनाला लेखकाकडून त्याची मृत्युतिथी हवी होती, कारण मग त्या तिथीवर आधारून ते सुटीचे गणन करणार होते.

लेखकाच्या सुटकेच्या विचाराची अनेक स्थगितीकरणे झाली, समिती बसायची, ती ठराविक अवधी द्यायची आणि शासन सुटकेचा विचार त्या अवधीपलिकडे ढकलून द्यायचे !

शासनाधिष्ठित व्यक्तींची एक वृढ श्रद्धा असली पाहिजे. या अभियोगातील आजन्म कारावासी अखंड हिंदुस्थानवादी होते. त्यांच्याशी असली क्षुद्र फसवेगिरी

केल्याने अनायासे अहिंसक मृत्यू पदरात पडतील आणि अहिंसाव्रताची त्यायोगे सेवा होईल असे त्या शासकीय सज्जनांना वाटत असावे ! हे राज्य गांधीवादी ! आपण गांधीजींचे उपासक, तेव्हा अशा अहिंसक मृत्यूचा नैवेद्य आपल्या गुरूच्या आत्म्याला अर्पण करून त्याची कृपा मिळवावी, अशी त्यांची धारणा असावी. अन्यथा बंदिगृहाच्या नियमात कोठेही न बसणाऱ्या पद्धतीने रक्तदानासाठी बंद्याला आवाहन करणे, रक्तदान केल्यावर सूट नोंदविणे आणि मग गांधीवधातील दंडितांचे पदरात पडलले रक्त आणि नोंदविलेली सूट यांचा क्षुद्र मनाने अपहार करणे असल्या गलिच्छ फसवणुकीची संगती लागत नाही.

हे राज्याधिष्ठित लोक वंचक आहेत, चारशेवीस आहेत, पण ते शक्तिमान आहेत, त्यांनी आपल्याला आपल्या दुबळेपणाचा लाभ घेऊन हातोहात फसविले आहे. हे प्रस्तुत लेखकाच्या लक्षात आले. म्हणूनच त्याने त्यानंतर फसवणूक करणाऱ्या शासनाची सूट घेण्याचे नाकारले आणि रक्तदान केले. देशाच्या आवाहनाला लेखक सदैव तत्पर होता. त्याला राष्ट्राविषयी आदर होता. मात्र या चोरांच्या विषयी मात्र त्याच्या मनात आदर नव्हता. या चोरांच्या आश्वासनाला मूल्यच उरले नव्हते. अशा राजकीय वंचकांनी खरे वागा असा उपदेश दुसऱ्यांना तेवढा करावा पण सर्वसामान्यपणे आढळणारा खरेपणा त्यांच्यात नसावा, ही वस्तुस्थिती लेखकाने अनुभवली. अशा वंचक प्रतिष्ठितांपैकी काहीजण जेव्हा राजघाटावर जातात, गांधींच्या समाधीवर फुले वाहतात आणि सत्यअहिंसेच्या शपथेचा पुनरुच्चार करतात तेव्हा लेखकाला वाटते की लोकांना बुद्दू बनविण्याला हिंदुस्थानात चिरकालपर्यंत वाव आहे !

प्रस्तुत लेखकाने त्याच्या सुटकेच्या प्रश्नावर एकापाठोपाठ करून बावीस याचिका सर्वोच्च न्यायालयाला धाडल्या. शासनाधिष्ठित व्यक्तींची लाचलुचपत आणि अप्रामाणिकपणा त्याला सिद्ध करता आला नाही. आपल्याला न आवडणाऱ्या दंडितांच्या जीवितावर अधिकार सांगून त्यांना मृत्यू येईपर्यंत सडवत ठेवायची नीती शासनाने अवलंबिली होती.

लेखकाचे शेवटचे आवेदन सर्वोच्च न्यायालयापुढे विचारार्थ होते. लेखकाने आपले म्हणणे मांडले. शासनाला सर्वोच्च न्यायालयाने कारणे दाखवा असा आदेश दिला. मध्यंतरी १३ ऑक्टोबर १९६४ला लेखक आणि त्यांचे सहदंडित यांना मुक्त करण्यात आले. त्या सर्वांचा सूट धरून सव्वीस वर्षांवर कालावधी झाला होता. त्या आधी थोडेच दिवस पंडित जवाहरलाल नेहरू निवर्तले होते.

सर्वोच्च न्यायालयाने लेखकाला अनुकूल असे निर्णयपत्र दिले नाही. तरीपण सर्वोच्च न्यायालयाचे अस्तित्व नसते तर मात्र शासनाने त्याला आणि त्याच्या सहदंडितांना सोडण्याचा कधी विचारच केला नसता.

मुक्त जीवन

श्री. विष्णुपंत करकरे आणि लेखक त्यांच्या मित्रांनी आयोजित केलेल्या एका स्वागतसमारंभात उपस्थित राहिले. दोघांची सतरा वर्षांनी सुटका झाली म्हणून आनंद व्यक्त करण्याचा तो समारंभ होता. शासनाला त्या आनंदाचाही राग आला. स्थानबद्धतेच्या विधीने त्या दोघांना त्यांच्या सुटकेच्या चाळीस दिवसांच्या आतच बंदिगृहात डांबण्यात आले.

त्यांच्यावर कोणत्या अपराधाचा आरोप नव्हता. स्थानबद्ध करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या हेतूचे उत्खनन करण्याची उच्च न्यायालयाची अधिकारकक्षा नव्हती. हा नवीन छळ एक वर्षाहून अधिक काळ शासनाने चालू ठेवला.

त्या सुटकेनंतर प्रस्तुत लेखक लेखनाकडे वळला. या घटनेवरील त्याचे पहिले पुस्तक मराठीतून निघाले. त्याचे नाव आहे, 'गांधीहत्या आणि मी.'

त्या पुस्तकात जे विषय आहेत त्यात शासनाचा क्षुद्रपणा आणि खोटेपणा स्पष्ट केला गेला आहे. म्हणून त्या कारणासाठी पण प्रत्यक्षातच भलतेच कारण दाखवून शासनाने त्यावेळी पुस्तकच बंदिगृहात टाकले.

उच्च न्यायालयाने पुस्तकावरील बंधन उठविले आणि शासनाने आवेदकाला (लेखकाला) तीन सहस्र रुपये न्यायालयीन व्ययापोटी द्यावेत असा आदेश दिला.

त्यानंतर पुस्तकाच्या आणखी आवृत्त्या निघाल्या आणि दुसऱ्या भाषांतही भाषांतरे प्रकाशित झाली. प्रस्तुत लेखकाने आणखीही काही पुस्तके लिहिली आहेत. मराठी आणि अन्य देशी भाषांत नथुरामचे वक्तव्य त्याने आधीच प्रकाशित केले आहे.

वितस्ता प्रकाशन ही संस्था लेखक चालवितो. वितस्ता हे झेलम नदीचे वेदकालापासून चालत आलेले नाव आहे हे काश्मीर प्रकरणात लिहिले आहेच. लेखकाचे वास्तव्य पुणे येथे आहे.

श्री. विष्णुपंत करकरे यांनी अहमदनगरला त्यांचा निवासालयाचा व्यवसाय पुन्हा चालू केला. त्यांचे दि. ६/४/१९७४ ला हृदय विकाराने देहावसान झाले. त्यांच्या पत्नी श्रीमती सरस्वतीबाई सध्या तो व्यवसाय बघतात.

श्री. मदनलाल पाहवा यांनी सुटल्यानंतर विवाह केला. ते मुंबईत काही गिरण्यांसाठी साहित्याचा व्यवसाय करतात.

स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी मुंबई येथे २६ फेब्रुवारी १९६६ ला आत्मार्पण

केले.

त्यांनी ब्रिटिश राजवटीतही कठोर यातना आणि बंदिवास भोगले आणि स्वराज्य प्राप्तीनंतर त्या त्या वेळच्या काँग्रेस शासनाकडूनही तशाच विपदा भोगल्या. त्यांचा अपराध काय तर ते हिंदूंसाठी न्याय्य अधिकाराचा आग्रह धरीत असत आणि हिंदुस्थानच्या विभाजनाला त्यांनी कठोर विरोध केला होता !

अधिकृतता

नथुराम यांचे वक्तव्य या पुढे प्रारंभ होत आहे. महात्मा गांधी हत्याकांड या नावाने पंजाब उच्च न्यायालयाच्या श्रवणासाठी ग्रंथ मुद्रित झाले. पुनरावेदने क्रमांक ६६ ते ७२, वर्ष १९४९, ग्रंथ दुसरा यात मूळ वक्तव्य बघण्यास मिळेल. राष्ट्रीय अभिलेखागार (National Archieves) नवी दिल्ली येथे कागदपत्रे पुढील वर्षापासून (१९७९ पासून) बघण्यास उपलब्ध होतील. (आता उपलब्ध आहेत.)

● ●

७. मान्यवर न्यायर्षी !

दिल्लीच्या लाल किल्ल्यातील ते विशेष न्यायाधीशांचे न्यायालय होते. गांधीहत्या अभियोगाला न्यायालयीन संज्ञा होती 'राजा विरुद्ध नथुराम विनायक गोडसे आणि इतर'. अभियोजकांनी आपला पुरावा पूर्ण केला होता.

विशेष न्यायमूर्ती श्री. आत्मचरण आपल्या आसनावर येऊन बसले. न्यायालय नीरव झाले. अभियुक्त आपल्या नियुक्त कठड्यात क्रमाने बसले होते. दोन्ही पक्षांचे विधिज्ञ उपस्थित होते. वृत्तपत्रप्रतिनिधी आपल्या लेखण्या सरसावून होते. त्यांचे कुतूहल शीगेला पोहचले होते. न्यायालय पूर्ण भरले होते. प्रवेशपत्रकानेच लोकांना न्यायालयात प्रवेश होता.

अभियुक्तांचे म्हणणे त्या दिवशी न्यायमूर्ती ऐकणार होते. तो दिवस होता ८ नोव्हेंबर १९४८.

न्यायमूर्तींनी आपराधिक परिन्याय संहिता धारा (म्हणजे क्रिमिनल प्रोसीजर कोड धारा) ३४२ प्रमाणे अभियुक्तांची तपासणी करण्यास प्रारंभ केला. त्यांनी उचार केला 'अभियुक्त क्रमांक एक; नथुराम विनायक गोडसे; वय ३७; संपादक, हिंदूराष्ट्र, पुणे.' अभियुक्त क्रमांक एक हे शब्द ऐकताच नथुराम उभा राहिला.

न्यायमूर्तींनी सांगितले, 'तुझ्या विरुद्धचा अभियोजकांनी पुढे आणलेला सर्व पुरावा तू ऐकला आहेस. तुला त्याविषयी काय म्हणायचे आहे ?

'न्यायर्षी ! मला आपले लेखी निवेदन प्रस्तुत करण्याचे आहे.' नथुरामने उत्तर दिले.

'ठीक आहे. वाच तुझे निवेदन.' न्यायमूर्तींनी आदेश दिला.

यावेळी मुख्य अभियोजक श्री. दप्तरी हे आक्षेप घेण्यासाठीं उभे राहिले. ते म्हणाले, 'महोदय, या अभियोगाशी संलग्न असलेले निवेदनच तेवढे अभियुक्ताला करू द्यावे. अन्यथा त्याचे निवेदन वाचण्यास त्याला अनुज्ञा देऊ नये.'

न्यायमूर्तींनी तो आक्षेप फेटाळला. आपले लेखी निवेदन वाचण्यासाठी नथुराम ध्वनिक्षेपकासमोर प्रस्तुत झाला. नीरवतेने न्यायालयात जणू पोकळी निर्माण झाली होती. भिंतीतून उमटणाऱ्या प्रतिध्वनींनी ती पोकळी भरून काढीत नथुरामचे पहिले शब्द न्यायालयात घुमले —

'मान्यवर न्यायर्षी !' (May It Please Your Honour !

● ●

८. निवेदन

भाग १

आरोपपत्राला उत्तर

मी नथुराम विनायक गोडसे, वर निर्देशिलेल्या अभियोगातील आरोपी क्रमांक एक, नम्रपणे खालील निवेदन देत आहे.

५) माझ्यावर जे वेगवेगळे आरोप केले गेले आहेत त्यांसंबंधी विवेचन प्रस्तुत करण्यापूर्वी मला नम्रपणे असे सांगावयाचे आहे की ज्या पद्धतीने आरोप मांडले गेले आहेत ती पद्धत विधिविसंगत आहे. आरोपात असंबद्धता आली आहे. वीस जानेवारी १९४८ ची घटना आणि तीस जानेवारी १९४८ ची घटना यांचे वेगवेगळे अभियोग मांडले जाण्यास हवे होते. ते दोन्ही अभियोग एकत्र केले गेल्याने येथवर चाललेला अभियोग सदोष ठरतो.

२) वर उद्धृत केलेल्या माझ्या विधानाला बाध न आणता, माझ्यावर केलेल्या आरोपांविषयी मला निम्न निवेदन द्यायचे आहे.

३) अभियुक्तांविरुद्ध जे आरोपपत्र सिद्ध केले आहे त्यात अनेक आरोप आहेत. आरोपींने व्यक्तिशः किंवा दुसऱ्याच्या संगनमताने अपराध केल्याचे आरोप केले आहेत. भारतीय दंडसंहितेप्रमाणे (म्हणजे इंडियन पीनल कोडप्रमाणे) आणि दुसऱ्या विधीप्रमाणे दंडच ठरावेत असे ते आरोप आहेत.

४) दि. २० जानेवारी आणि ३० जानेवारी १९४८ या दिवशी घडलेल्या घटना एकाच कटाची साखळी आहे, आणि त्याचे पर्यवसान गांधीवधात झाले असे अभियोजकांचे म्हणणे आहे, हे आरोपपत्रावरून स्पष्ट होते. म्हणून मी प्रथमच हे स्पष्ट करतो की २० जानेवारी १९४८ पर्यंत घडलेल्या घटना स्वतंत्र आहेत, आणि त्यानंतर घडलेल्या घटना तसेच ३० जानेवारीची घटना यांचा पहिल्या घटनांशी काही संबंध नाही.

५) आरोपातील पहिला आणि महत्त्वाचा आरोप आहे की गांधीजींचा वध करण्यासाठी आरोपींनी षड्यंत्र केले. म्हणून त्याविषयीचे विवेचन मी प्रथम करतो. आरोपपत्रात दर्शविलेला कोणताही अपराध करण्यासाठी कोणताही कट आरोपींनी केलेला नाही, असे मला म्हणावयाचे आहे. मला हेही स्पष्ट करावयाचे आहे की यांपैकी कोणतेही अपराध करण्यासाठी मी कोणाशी संगनमत केलेले नाही.

६) अभियोजकांनी या संबंधात पुढे आणलेला पुरावा षड्यंत्र किंवा तो

आरोप सिद्ध करू शकत नाही असे मी म्हणतो.

षड्यंत्राच्या आरोपाविषयी येऊन जाऊन बोलतो तो दिगंबर रामचंद्र बडगे, साक्षी क्रमांक ५७. हा साक्षीदार पूर्णतया अविश्वासार्ह आहे. माझे विधिज्ञ बडगेच्या कथनाची छाननी करताना ही वस्तुस्थिती न्यायमूर्तींना दाखवतील.

७) आरोपींनी शस्त्रे आणि दारूगोळा अनुज्ञापत्राविना एकत्र केला आणि त्याची वाहतूक केली, या २० जानेवारी १९४८ च्या संबंधाच्या आरोपाचा मी इन्कार करतो. मी गन्‌कॉटनच्या विटा, हस्तध्वम (हॅन्डग्रेनेड) डिटोनेटर, वाती, पिस्तुले किंवा छरिका आणि काडतुसे यांची ने-आणही केली नाही किंवा यांपैकी कोणत्याच वस्तू माझ्याजवळ नव्हत्या. वीस जानेवारीला किंवा त्यापूर्वी किंवा त्या जवळपास मी अशा अवैध वाहतुकीसाठी कोणास साहाय्यही केलेले नाही. म्हणून भारतीय स्फोटकवस्तूंच्या विधीचे (Indian explosive substance Actचे) मी कोठेही उल्लंघन केलेले नाही. अर्थात् त्या विधीच्या अनुषंगाने शिक्षेलाही मी पात्र ठरत नाही.

८) या आरोपाचा प्रमुख साक्षीदार दिगंबर बडगे आहे; पण वर छेदक ६ मध्ये सांगितल्याप्रमाणे तो पूर्णपणे अविश्वासार्ह आहे. मी या बडगेला ओळखतो; पण तो माझ्याकडे क्वचितच येत असे. मीही त्याच्याकडे गेल्या कित्येक वर्षांत गेलेलो नाही. दिनांक १० जानेवारी १९४८ ला आरोपी क्रमांक दोन नारायण आपटे बडगेला 'हिंदुराष्ट्र' वृत्तपत्राच्या कार्यालयात घेऊन आला असे बडगेने सांगितले आहे ते त्याचे विधान पूर्णतया खोटे आहे. बडगेने तेथे मला पाहिले, या त्याच्या विधानाचा मी इन्कार करतो. माझ्या समक्ष आपटे आणि बडगे यांच्यात गनकॉटन स्लॅब, हस्तध्वम इत्यादीविषयी काही बोलणे झाले आणि त्या वस्तू मुंबईत त्याने नेऊन देण्याच्या आहेत या त्याच्या विधानांचा मी इन्कार करतो. 'आपटे यांनी मला खोलीबाहेर बोलाविले आणि आपटे मला म्हणाले की बडगे हस्तध्वम इत्यादि देणार आहे; आपले काम झाले आहे,' ही बडगेची विधाने पूर्ण खोटी आहेत. ही कथा बडगेनेच रचली आहे कारण त्याला मला आणि इतरांना कट या व्याख्येत गोवण्याचे आहे. माझे असेही निवेदन आहे की, दिनांक १४ जानेवारी १९४८ ला मी बडगेला दादरला भेटलेलो नाही. त्याला मी पाहिलेही नाही. एकट्यानेही नाही किंवा आणखी कोणासमवेतही नाही. बडगे त्या दिवशी मुंबईला जाणार होता हेही मला ठाऊक नव्हते.

९) आरोप क्रमांक २ यातील छेदक ब (१) आणि ब (२) या संदर्भात मला म्हणावयाचे आहे की, दिनांक २० जानेवारी १९४८ या दिवशी माझ्याजवळ काही शस्त्रे किंवा दारूगोळा होता याचा मी इन्कार करतो. त्या देवघेवीत

मी संगनमत केले हा आरोपही मला मान्य नाही.

या आरोपाचा आधार एकमात्र बडगे काय तो आहे. बडगेने आपल्या रक्षणासाठी आणि क्षमा मिळविण्यासाठी हे असत्य विधान केले आहे.

१०) आरोप क्रमांक ३ मध्ये ए (१) ए (२) बी (१) आणि बी (२) या छेदकात केल्या गेलेल्या संगनमत या आरोपाचाही मी स्वीकार करीत नाही.

११) आरोप क्रमांक ४ छेदक २ मधील असा आहे की, मी दि. २० जानेवारी १९४८ ला बिर्लाभवनात मदनलाल पाहवा याला गनकॉटन वीट उडविण्यात स्वत: साहाय्य केले आणि आणखी आरोपींच्या संगनमताने साहाय्य केले. हा आरोप सिद्ध होण्यास पुरावा नाही असे माझे म्हणणे आहे आणि जो काही पुरावा असेल, तो माझा संबंध त्या घटनेशी आणू शकत नाही.

१२) आरोपपत्रात आरोप क्र. ५ मध्ये म्हटले आहे की, महात्मा गांधींना ठार मारण्याच्या प्रयत्नात मी मदनलालशी संगनमत केले. माझे असे प्रतिपादन आहे की, मदनलालशी किंवा आणखी कोणा व्यक्तीशी माझा त्याविषयी कसलाच संबंध नव्हता. ह्या आरोपाच्या पुष्टीसाठी कोणताच पुरावा आलेला नाही.

१३) आरोपपत्रातील सहा क्रमांकाच्या छेदक १ आणि २ यात म्हटले आहे की, नारायण दत्तात्रय आपटे यांच्या साहाय्याने मी अननुज्ञितपणे छरिका आणली. मी आपटे यांच्या साहाय्याने पिस्तुल आणलेले नाही, तसेच डॉ. दत्तात्रय सदाशिव परचुरे आणि नारायण दत्तात्रय आपटे यांनी पिस्तुल मिळविले किंवा त्यांनी मला त्या कामात साहाय्य केले किंवा त्यांनी एकमेकास साहाय्य केले या आरोपाचा मी इन्कार करतो. माझे म्हणणे आणखी असे आहे की, अभियोजकांनी या संबंधात पुढे आणलेला पुरावा विश्वासार्ह नाही. या माझ्या विधानांना बाध न आणता माझे प्रतिपादन असे आहे की, समजा या आरोपातील छेदक ए (१) आणि ए (२) प्रमाणे माझा व्यवहार झाला असेल तर या न्यायालयाला त्याची चिकित्सा करण्याचा अधिकार पोहोचत नाही. माझ्याचपुरता संबंध लावायचा झाला तर हा आरोप या क्रमाकांच्या छेदक ब (१) मध्ये सामावेल. वेगळेपणे नाही.

१४) छेदक ब (१) आणि ब (२) मध्ये उद्धृत केलेले आरोप आहेत की, माझ्याजवळ ६०६८२४ या क्रमांकाची स्वयंचलित छारिका (ऑटोमॅटिक पिस्तुल) होती आणि छरे (काडतुसे) होते. मी त्या आरोपाचा स्वीकार करतो; पण नारायण आपटे किंवा विष्णू रामकृष्ण करकरे यांचा त्या छारिकेशी काहीही संबंध नव्हता.

१५) आरोपपत्रातील सातव्या क्रमांकाच्या आरोपाकडे वळण्यापूर्वी, मी दिल्लीला का आणि कस। आलो हे येथे सांगणे अस्थानी होणार नाही. गांधीजींच्या विचारप्रणालीशी विरोधी असलेल्या विचारप्रणालीचा किंवा त्या वादाचा मी पाठपुरावा केला हे मी कधी लपविलेले नाही. गांधीजी पुरस्कारीत आत्यंतिक अहिंसेचे पाठ परिणामी हिंदू जातीचा शक्तिक्षय करतील आणि त्यायोगे ही जाती; दुसऱ्या जातींची, त्यातल्या त्यात मुसलमानांची अतिक्रमणे किंवा आक्रमणे प्रतिरोधण्यास असमर्थ होईल ही माझी दृढ धारणा होती. या अरिष्टाच्या प्रतिरोधासाठी मी सार्वजनिक आयुष्याच्या क्षेत्रात प्रवेश करण्याचे ठरविले आणि सम विचारांच्या लोकांचा एक गट उभा केला. आपटे आणि मी त्यात अग्रत्व घेतले आणि प्रचाराचे एक अंग म्हणून 'दैनिक अग्रणी' वृत्तपत्र चालू केले. माझा किंवा माझ्या गटाचा गांधीय अहिंसापाठांना तितका विरोध नव्हता, जितका तो आपल्या मतप्रचारासाठी गांधीजींनी हिंदू जाती आणि तिचे हितसंबंध यांना विनाशकारी असा गुरिल्लिम अनुनय नेहमी दाखविला आणि वागविला त्याला होता, हे मला सांगितले पाहिजे. मी माझा दृष्टिकोन पुढे विस्ताराने मांडला आहे. त्यात हिंदू जातीला सोसाव्या लागलेल्या अनेक फरपटींना गांधीजी कसे उत्तरदायी होते हे नेमके स्थापित करणारी किती तरी उदाहरणे मी दिली आहेत.

१६) गांधीजींच्या मतांवर आणि स्वत:चे उद्दिष्ट साध्य करण्याच्या हेतूने त्यांनी अवलंबिलेल्या उपवासासारख्या प्रकारावर मी माझ्या 'अग्रणी' किंवा 'हिंदुराष्ट्र' या पत्रातून प्रखर टीका करी. गांधीजींनी त्या उद्दिष्टाने प्रार्थना सभा घेण्याची पद्धती आरंभिल्यावर आपटे आणि मी यांनी विरोधदर्शक शांत निदर्शने करण्याचा निश्चय केला. पाचगणी, पुणे, मुंबई आणि दिल्ली येथे आम्ही अशी शांत निदर्शने केली होती. दोन विचारप्रणालीत महदंतर होते. मुसलमानांना एका मागोमाग कृपावर्तने (कन्सेशन्स) दिली जाऊ लागली, त्याला गांधीजींची आणि काँग्रेसची सूचना तरी असे किंवा तिकडे त्यांची हेतूपुरस्सर डोळेझाक तरी असे. गांधीजी काँग्रेसचे नेतृत्व करीत होते. परिणामी १५ ऑगस्ट १९४७ ला देशाची छकले झाली. दोन विचारधारांतील अंतर वाढतच राहिले. या विधेयांचे विस्तृत विवरण मी पुढे दिले आहे. गांधीजी प्राणांतिक उपोषण करणार असल्याचे मला १३ जानेवारी १९४८ ला समजले. हिंदुस्थानच्या संघराज्यात हिंदुमुस्लिम एकतेचे वचन गांधीजींना हवे आहे असे कारण त्या उपवासासाठी दिले गेले; पण हिंदु-मुंसलमानांची तथाकथित एकता हेच कारण उपवासासाठी नव्हते. हिंदुस्थान शासनाने पाकिस्तानला ५५ कोटी रुपये देण्याचे ठामपणे नाकारले होते. ते द्रव्य पाकिस्तानला देण्यास शासनाला भाग पाडावे हा उपवासामागील खरा हेतू होता. ही गोष्ट मला आणि आणखी पुष्कळजणांना सहज उमजू शकली. त्याला उत्तर म्हणून आपटे यांनी गांधीजींच्या प्रार्थनासभेवर उग्र पण शांत

निदर्शने करण्याचा तोच जुना मार्ग सुचविला. मी अर्धवट मनाने होकार दिला, कारण त्यातील निष्फळता मला उघड उघड दिसत होती; पण तरीही मी स्वत: त्यात सहभागी होण्याचेही मान्य केले, कारण माझ्या मनात आणखी कोणता बेत तोवर नव्हता. १४ जानेवारी १९४८ ला आपटे आणि मी मुंबईस जाण्यामागील कारण हे होते.

१७) दिनांक १५ जानेवारी १९४८ ला आपटे आणि मी दादर येथील हिंदुसभा कार्यालयात सहज गेलो होतो. बडगे तेथे अचानक दिसला. आपटे यांना पहिल्यावर बडगेने त्यांना ते मुंबईला कशासाठी आले म्हणून विचारले. आपटे यांनी कारण सांगितले. त्यावर बडगेने स्वत: होऊन मीही दिल्लीला येतो; आणि निदर्शनात भाग घेतो, अशी सिद्धता दर्शविली; पण 'तुमची जर काही आडकाठी नसेल तर' असेही तो म्हणला. आम्हाला घोषणांसाठी आणि निदर्शक म्हणून लोक हवे होते. म्हणून त्याच्या इच्छेचा आम्ही स्वीकार केला. आम्ही केव्हा निघणार आहोत ते त्याला आम्ही बोललो. त्यावर बडगेने आपटे यांना सांगितले की, प्रवीणचंद सेठियाकडे त्याला काही साहित्य पोहोचविण्याचे आहे ते तो एकदोन दिवसांत पोहचवेल, आणि मग तो आम्हाला दि. १७ जानेवारी १९४८ ला भेटेल.

१८) दिनांक १५ जानेवारी १९४८ नंतर बडगेला मी दि. १७ जानेवारी १९४८ ला सकाळी दादर येथील हिंदुसभा कार्यालयात भेटलो.

१९) बडगेची काही विधाने आहेत 'आम्ही बडगेला घेऊन दीक्षित महाराजांकडे गेलो आणि त्यांना भेटलो. तेथे आपटेने बडगेला सांगितले की, 'गांधीजी, नेहरू आणि सुऱ्हावर्दी यांना समाप्त करावयाचे आहे, ते कार्य सावरकरांनी आमच्यावर सोपविले आहे.' ही विधाने बडगेच्या मेंदूतून प्रसवलेली आहेत. ती बनावट आहेत. आपटे किंवा मी बडगेशी किंवा आणखी कोणाशी असे कधी बोललो नाही.

मला वीर सावरकरांनी मार्गदर्शन केले आणि त्यांचे सहकार्य नसते तर माझी कृती झाली नसती हे अभियोजकांचे म्हणणे मी ठामपणे अमान्य करतो. त्यांच्या म्हणण्यात खोटेपणा आहे. या सत्यविहीन आणि न्यायविहीन आरोपाला माझा तीव्रतम आक्षेप आहे. माझ्या प्रज्ञेचा आणि तोलनबुद्धीचा तो अपमान आहे असे मी समजतो. मी कोणाच्या तरी हातचे साधन आहे असे दाखविण्याचा अभियोजकांचा प्रयत्न वस्तुस्थितीशी विरोधी आहे. खरोखर, त्यात सत्याचा विपर्यास आहे.

२०) माझा भाऊ गोपाळ गोडसे याने पिस्तूल मिळविण्याचे काम पत्करले

आहे, त्याला भेटण्यासाठी मला पुण्याला जाण्याचे आहे, कारण त्याला आपल्या बरोबर दिल्लीला नेण्याचे आहे, ही बडगेची विधानेसुद्धा खोटी आहेत. दिनांक १५ जानेवारीला बडगे भेटला तेव्हा जे बोलणे झाले ते छेदक १७ मध्ये दिले आहे. त्याव्यतिरिक्त त्याचे आणि माझे कोणत्याच विषयावर बोलणे झाले नाही. दिनांक १६ जानेवारीला बडगे मला पुण्याला भेटला हे त्याने केलेले विधानही खोटे आहे.

२१) आपटे आणि मी यांनी गांधीजींसमोर त्यांच्या प्रार्थना सभेत शक्य तितक्या लवकर उग्र; पण शांततामय निदर्शने करण्याचा बेत केला होता. आणि तेवढ्याचसाठी आम्ही दोघे दिल्लीला जाणार होतो, हे मी वर सांगितलेच आहे. या नियोजित निदर्शनात सहभागी होण्याची बडगेने स्वत: होऊन सिद्धता दाखविली हे मी छेदक १७ मध्ये सांगितले आहे. निदर्शने परिणामकारक करण्यासाठी आमच्यासह आम्हाला स्वयंसेवक नेण्याची तत्काळ आवश्यकता होती. निदर्शनाच्या आणि स्वयंसेवकांच्या व्यवस्थेसाठी आम्ही दिल्लीला निघण्यापूर्वी पैसे गोळा करण्याचे काम हाती घेतले.

२२) दिनांक १७ जानेवारी १९४८ ला आम्ही सावरकरांना भेटलो या बडगेच्या विधानाचा मी निश्चितपणे इन्कार करतो. सावरकर यांनी 'यशस्वी होऊन या असा आम्हाला आशीर्वाद दिला' याही विधानाचा मी तसाच इन्कार करतो. बडगेशी आमचे काही या संदर्भात संभाषण झाले याचा, तसेच 'तात्यारावांनी असे भविष्य केले आहे की गांधीजींची शंभर वर्षे भरली, आता आपले काम निश्चित होणार यात काही संशय नाही,' हे मी किंवा आपटे यांनी शब्द उच्चारले या बडगेच्या कथनाचाही मी इन्कार करतो. बडगेला आम्ही १५ जानेवारी १९४८ ला दादर हिंदुसभा कार्यालयात भेटलो, त्यानंतर आपटे आणि मी आमच्या मुद्रणालयाच्या कामासाठी हिंडत राहिलो.

२३) आपटे आणि मी १७ जानेवारी १९४८ ला विमानाने दिल्लीला आलो आणि मरीना हॉटेलमध्ये उतरलो. दिनांक २० जानेवारी १९४८ ला बडगे मरीना हॉटेलवर आला आणि माझ्या उपस्थितीत आपटेंना त्याने सांगितले की तो स्वत: आणि त्याचा सेवक शंकर किस्तैया दिल्लीला आले आहेत. त्या संध्याकाळी आपटेबरोबर ते प्रार्थना सभेच्या ठिकाणी जातील आणि निदर्शने करण्याचे ठरले आहे त्या प्रार्थनेचे आणि स्थळाचे निरीक्षण करतील. सकाळी बडगे आला तेव्हा मी तीव्र डोकेदुखीमुळे अंथरुणावर पडलेला होतो. मला बरे नसल्याने मी प्रार्थनास्थळावर येणार नाही, असे मी बडगेला सांगितले. आपटे, गोपाळ गोडसे, करकरे, मदनलाल, बडगे आणि त्याचा सेवक शंकर किस्तैया हे सर्व मरीना हॉटेलमध्ये जमले, शंकर आणि बडगे तेथे जेवले,

गोपाळ गोडसे रिव्हॉल्वर नीट करीत होता. आपटे, करकरे, मदनलाल आणि बडगे स्नानघरात गेले आणि तेथे गनकॉटन विटांना आणि हस्तध्वमना डिटोनेटर, वाती किंवा प्रायमर जोडू लागले, तेव्हा शंकर आणि बडगे खोलीच्या दाराच्या दोन्ही अंगांना उभे राहिले, ही बडगेची सर्व विधाने खोटी आहेत. 'बडगे, हा आपला शेवटचाच प्रयत्न आहे. काम झालेच पाहिजे. सर्व योजना नीटपणे होत आहेत ना, तिकडे लक्ष दे.' असे शब्द बडगेने माझ्या तोंडी घातले आहेत ते सर्व खोटे आहे. बडगेला मी त्या दिवशी किंवा आणखी केव्हा हे किंवा असे शब्द बोललो हे विधान मी स्वीकारीत नाही. वर सांगितल्याप्रमाणे, सकाळी बडगे माझ्या खोलीवर आला आणि संध्याकाळी तो प्रार्थना सभेला जाणार असल्याचे बोलला. याव्यतिरिक्त बडगेने वर्णन केलेली कोणतीच बैठक त्या खोलीवर झाली नाही. माझ्या माहितीप्रमाणे गोपाळ तर दिल्लीतही नव्हता. खोलीत कोणीही गनकॉटन विटेला किंवा हस्तध्वमला डिटोनेटर, वाती, प्रायमर इत्यादि बसवीत नव्हते. वास्तविकता अशी आहे की, अशा प्रकारचे दारूगोळ्याचे साहित्य किंवा शस्त्रे ही आपटे किंवा मी या कोणाजवळच नव्हती. आपापसातील शस्त्रवाटपाचे किंवा खोटी नावे धारण केल्याचे बडगेने केलेले विस्तृत वर्णन पूर्णतया खोटे आहे. या विधानाची असत्यता पटविण्यासाठी पुराव्याची छाननी करण्याचे मला कारण नाही. कारण माझे विधिज्ञ आपल्या अभिभाषणाच्या वेळी ती करतीलच.

२४) वर सांगितल्याप्रमाणे डोकेदुखीमुळे मी अस्वस्थ होतो. आणि म्हणून मी प्रार्थनास्थळी गेलोसुद्धा नाही. संध्याकाळी ६ वाजण्याच्या जवळपास आपटे मरीना हॉटेलमध्ये परतले आणि त्यांनी मला सांगितले की, प्रार्थनाराभेचे आवार ते बघून आले आहेत. आणि एक-दोन दिवसांत त्यांनी निदर्शनाची व्यवस्था करणे जमेल. त्यानंतर तासाभराने गांधीजींच्या प्रार्थनासभेत स्फोट झाल्याने काहीसे चिंतामय वातावरण झाले आहे आणि कोण्या निर्वासिताला अटक केली गेली आहे असे आम्ही ऐकले. आपटेंना असे वाटले की या घटकेला दिल्ली सोडणे बरे, म्हणून आम्ही दिल्लीहून निघून गेलो. दिनांक २० जानेवारीला मी हिंदुमहासभा भवनात बडगेला भेटलो ही गोष्ट खरी नाही. मी दिनांक २० जानेवारीला बिर्लाभवनात होतो असे अनेक साक्षीदारांनी सांगितले आहे; पण मला हे ठसवायचे आहे की, असे सांगण्यात त्या साथीदारांची मोठी गल्लत झाली आहे. मी आणि आणखी कोणीतरी यांच्यात ते गोंधळलेले आहेत. यांपैकी काही साक्षीदारांनी मला ओळखसत्रात (आयडेंटिफिकेशन परेड) ओळखले तेही अविश्वासार्ह आहे. कारण मी बिर्लाभवनात त्या दिवशी नव्हतोच मुळी ! मला आरक्षींनी तुगलगरोड आरक्षी ठाण्यावर ठेवले तेव्हा त्यांनी अनेक साक्षीदारांना मला दाखविले होते. म्हणून ओळखसत्रात त्या साक्षीदारांनी मला ओळखले

ज्या आरक्षी अधिकाऱ्यांनी याचा इन्कार करणाऱ्या साक्षी दिल्या ते खोटे बोलले आहेत. मुंबईला पहिले ओळखसत्र झाले. त्याच वेळी त्या दिल्लीच्या साक्षीदारांविषयी मी प्रतिवाद नोंदविला आहे.

२५) आता निदर्शनासंबंधी परिस्थिती बदलली होती. मी पुन्हा आपटे यांना निदर्शनाविषयी सहमती दिली होती, तीच मुळी मनाविरुद्ध. नव्या परिस्थितीत मुंबई-पुण्याहून कार्यतत्पर आणि सहमतीचे स्वयंसेवक आणणे असंभवनीय होते. आमचे द्रव्य संपले होते आणि नव्याने स्वयंसेवकासाठी मुंबई-दिल्ली दोन्ही प्रवासाचा व्यय करणे आम्हाला शक्य नव्हते. म्हणून आम्ही ग्वाल्हेरला डॉ. परचुरे यांची भेट घेण्याचे ठरविले. त्यांच्याजवळ हिंदुराष्ट्रसेनेचे स्वंयसेवक होते. ग्वाल्हेरहून दिल्लीला निदर्शक नेणे काहीसे काटकसरीचे होते. म्हणून दि. २७ जानेवारी १९४८ ला आम्ही विमानाने दिल्लीला पोहचल्यावर, रात्री ग्वाल्हेरला निघालो. ती गाडी दुसऱ्या दिवशी पहाटे पहाटे ग्वाल्हेरला पोहचली. अंधार होता म्हणून आम्ही ग्वाल्हेरच्या स्थानकाजवळ धर्मशाळेत थांबलो आणि सकाळी आम्ही डॉ. परचुरे यांना त्यांच्या घरी भेटलो. ते त्यांच्या चिकित्सालयात जाण्याच्या गडबडीत होते. त्यांनी दुपारी भेटण्यास बोलाविले. आम्ही त्यांना संध्याकाळी ४ ला भेटलो. त्यांची काही आम्हाला साहाय्य करण्याची इच्छा नव्हती असे दिसले. कारण त्यांचे स्वयंसेवक स्थानिक कार्यात गुंतलेले होते. मी निराश झालो. आपट्यांना मी मुंबईस जाण्यास सांगितले. तेथे स्वयंसेवक गोळा कर ! मी दिल्लीला जातो. निर्वासितात मी स्वयंसेवक बघतो, असे मी त्यांना म्हणालो. आपटे आणि मी रिव्हॉल्वर आणण्यासाठी ग्वाल्हेरला गेलो या आरोपाचा मी निश्चितपणे अस्वीकार करतो; कारण अशी शस्त्रे गुप्तपणे विक्रीला असत. हतबल होऊन मी दिल्लीला पोहोचलो. मी दिल्लीच्या निर्वासित शिबिरात गेलो. त्या छावण्यातून हिंडता हिंडता माझ्या मनात एक निश्चित आणि अंतिम विचार ठरला. योगायोगाने मला एक निर्वासित भेटला. तो शस्त्रांची देवाणघेवाण करी. मला त्याने एक पिस्तुल दाखविले. मला मोह झाला. मी ते त्याच्याकडून विकत घेतले. मी नंतर ज्यातून गोळ्या झाडल्या ते तेच पिस्तुल. दिल्ली स्थानकावर पोहोचल्यावर दिनांक २९ जानेवारीची रात्र मी विचारात घालविली. हिंदूंची आणखी दुर्दशा आणि सध्याची कोंडी यांना परिसमाप्ती देण्याचा माझ्या निश्चित विचारावरच मी पुन्हा पुन्हा विचार करीत राहिलो. आता मी वीर सावरकरांशी माझे राजनैतिक आणि अन्य संबंधाविषयी म्हणणे सांगणार आहे. अभियोजकांनी त्याचे फार अवडंबर माजविले आहे.

२६) एका भक्तिपरायण ब्राह्मण कुटुंबात माझा जन्म झाल्यामुळे उपजतच मी हिंदुधर्म, हिंदू इतिहास आणि हिंदू सभ्यता यांचा आदर करू लागलो.

हिंदुत्वाचा मला विलक्षण अभिमान वाटे. तथापि, जसा मी वाढू लागलो तसा कोणा राजकीय अथवा धार्मिक वादाच्या (इझमच्या) रूढिबद्ध पकडीत न सापडता स्वतंत्र विचार करण्याची माझी प्रवृत्ती बनत गेली. म्हणूनच मी अस्पृश्यता निवारणासाठी आणि केवळ जन्मावर आधारित अशा जातिभेदाच्या निर्मूलनाच्या कार्यासाठी झटलो. मी जात्युच्छेदक आंदोलनात प्रकटपणे भाग घेतला आणि सर्व हिंदू धार्मिक आणि सामाजिक अधिकारांसाठी समान वागविले गेले पाहिजेत आणि त्यांची उच्चनीचता ते विशिष्ट जातीत किंवा व्यवसायवर्गात यदृच्छेने जन्माला आले म्हणून त्यावर नव्हे तर त्यांच्या गुणावगुणावर समजली गेली पाहिजे, या विचारपद्धतीचा मी आग्रह धरला. जात्युच्छेदनात्मक संघटित सहभोजनात मी प्रकटपणे भाग घेत असे. अशा सहभोजनात सहस्रावधी हिंदु—ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, चांभार आणि भंगी– जाति-नियमांचे उच्चाटन करून एकमेकांच्या सान्निध्यात जेवत असत.

२७) दादाभाई नौरोजी, विवेकानंद, गोखले, टिळक यांचे साहित्य मी वाचले आहे; त्याचबरोबर भारताचा प्राचीन आणि अर्वाचीन इतिहास आणि इंग्लंड, फ्रान्स, अमेरिका, रशिया अशांसारख्या प्रमुख देशांचा इतिहास मी वाचला आहे. इतकेच नव्हे तर समाजवाद आणि साम्यवाद याच्या प्रचलित तत्त्वांचाही मी बऱ्यापैकी अभ्यास केला आहे; पण त्या सर्वांपेक्षा, मी वीर सावरकर आणि गांधीजी यांची वक्तव्ये आणि लेख यांचा फार जवळून अभ्यास केला आहे. कारण माझ्या मताने; कोणत्याही एकाकी घटकापेक्षा या दोन विचारप्रणालींनी प्राय: गेली ५० वर्षे आजच्या हिंदुस्थानचे विचार आणि आचार यांना आकार देण्यासाठी अधिक प्रमाणात हातभार लावला आहे.

२८) हे सर्व वाचन आणि चिंतन याने माझी अशी धारणा झाली की, एक देशप्रेमी या नात्याने, फार काय, एक मानवतावादी या नात्याने हिंदुत्व आणि हिंदुराष्ट्र यांची सेवा करणे हे माझे सर्वांपेक्षा श्रेष्ठ असे आद्य कर्तव्य होते. कारण, प्राय: तीस कोटी हिंदूंचे स्वातंत्र्य आणि त्यांच्या न्याय्य अधिकारांचे रक्षण म्हणजे मनुष्यजातीच्या जनसंख्येच्या एक-पंचमांशाचे स्वातंत्र्य आणि स्थैर्य, असा अर्थ होतो हे खरे नव्हे काय ? या माझ्या मनोविश्वासामुळे स्वभावत:च मी नव्या हिंदुसंघटन तत्त्वज्ञानाकडे आणि कार्यक्रमाकडे ओढला गेलो; तेच तत्त्वज्ञान आणि तोच कार्यक्रम हिंदुस्थानचे, माझ्या मातृभूमीचे, राष्ट्रीय स्वातंत्र्य संपादन करील आणि टिकवील आणि तिला (मातृभूमीला) मानवजातीची खरीखुरी सेवा करण्यास समर्थ करील असा माझा विश्वास बनला.

२९) राष्ट्रीय स्वयंसेवक संघामध्ये अनेक वर्षे काम केल्यावर मी हिंदुसभेला मिळालो आणि सभेच्या अखिल हिंदुध्वजाखाली एक सैनिक म्हणून स्वयंप्रेरणेने

उभा राहिलो. त्या कालातच वीर सावरकरांची हिंदुसभेच्या अध्यक्षपदावर निवड झाली. (वर्ष १९३७ लेखक) त्यांच्या सर्वंकष नेतृत्वाने आणि प्रभंजनी प्रचाराने हिंदुसंघटन कार्याला पूर्वी कधीच नसलेली विद्युद्गती आणि व्यापकता येऊ लागली. सावरकर म्हणजे आपला अद्वितीय नेता, सावरकर म्हणजे हिंदुहिताचा क्षमतम, कळकळीचा अधिवक्ता असे लक्षलक्ष हिंदुसंघटक मानू लागले. त्यातलाच मी एक होतो. महासभेचे कार्य नेटाने चालविण्यासाठी मी मनोभावे श्रम ओतले. माझा आणि वीर सावरकरांचा व्यक्तिश: संबंध त्यातून आला.

३०) आपटे माझ्या हिंदुसंघटन कार्यातील मित्र आणि सहकारी होता. हिंदुसंघटन कार्याला वाहिलेले एक दैनिक वृत्तपत्र आम्ही दोघांनी काढण्याचे ठरविले. अनेक हिंदुसंघटक नेत्यांना आम्ही भेटलो. त्यांची सहानुभूती मिळविली; आर्थिक साहाय्य मिळविले. मग वीर सावरकरांना ते हिंदुसभेचे अध्यक्ष या नात्याने आम्ही भेटलो. आमच्या प्रकल्पासाठी त्यांनी सदिच्छा दिल्या, पंधरा सहस्र रुपये दिले. आवश्यक भांडवलातील तो त्यांचा वाटा. संस्था उभारा, ती मर्यादित करा, नोंदवून घ्या, हे लवकर करा, आणि ही राशी भागात परिवर्तित करा अशी त्यांची अट होती.

३१) आणि आम्ही मराठी दैनिक वृत्तपत्र 'दैनिक अग्रणी' चालूही केले ! काही काळाने ती संस्था मर्यादित म्हणून नोंदविली, पंजीकृत केली. वीर सावरकरांनी दिलेली राशी, तसेच आणखी लोकांनी दिलेली राशी, पाचशे रुपयांचा एक भाग याप्रमाणे भागात रूपांतरित केली. संचालक आणि दाते यांच्यात शेठ गुलाबचंद (श्रीमान शेठ वालचंद हिराचंद यांचे एक बंधू), भोरचे एक भूतपूर्व मंत्री श्री. शिंगरे, एक श्रेष्ठ चित्रपट निर्माते कोल्हापूरचे चित्रगुरू (फिल्म मॅग्नेट) श्री. भालजी पेंढारकर आणि इतर काही, अशी प्रतिष्ठित आणि अग्रगण्य मंडळी होती. आपटे आणि मी संस्थेचे प्रबंध-संचालक (मॅनेजिंग डायरेक्टर) होतो. मी संपादक होतो. वृत्तपत्राच्या धोरणाला मी उत्तरदायी होतो. अनेक वर्षे आम्ही वृत्तपत्र चालविले. त्यात सांविधानिक काटेकोरपणा पाळला. स्थूलत: हिंदुसंघटनाच्या धोरणाचा आम्ही यात पुरस्कार केला.

३२) सावरकर सदनाच्या तळमाळ्याचे माजघर ते हिंदुसंघटन कार्यालय आमच्या दैनिकाचे पत्रप्रतिनिधी म्हणून आपटे आणि मी तेथे जात होतो. श्री. ग. वि. दामले वीर सावरकरांचे कार्यवाह होते. श्री. अप्पा कासार सावरकरांचे शरीररक्षक होते. हिंदुस्थानचे हिंदुसंघटन कार्यालय त्या दोघांचे स्वाधीन होते. वीर सावरकरांची वृत्तपत्रासाठी वक्तव्ये, त्यांचे दौरे, त्यांच्या गाठीभेठी इत्यादीची वृत्ते प्रसिद्धिण्याचा श्री. ग. वि. दामले यांना अधिकार असे. सर्वसामान्य वृत्तपत्रवक्तव्ये आणि विशेषत्वाने अध्यक्षांचे दौरे, उल्लेखनीय भेटी इत्यादींची माहिती श्री. भिडे

यांच्याकडून मिळवण्यासाठी आम्ही त्या कार्यालयात जात होतो. श्री. अ. स. भिडे 'फ्री हिंदुस्थान' या इंग्रजी साप्ताहिकाचे संपादन करीत. तेही त्या तळमाळ्याच्या एका पाखीत भाडेकरू म्हणून सहपरिवार राहात असत. सर्वश्री भिडे, दामले, कासार आणि हिंदुसभेचे आणखी कार्यकर्ते एकमेकांचे मित्र होते. ते हिंदुसंघटन कार्यालयात जमत. त्या मंडळींच्या गाठीभेटी घेणे हा आपटे आणि मी यांचा तेथे जाण्याचा आणखी एक उद्देश असे. कार्यालयात जावे, त्या सर्वांना भेटावे, गप्पागोष्टी कराव्यात, हा आमच्या मुंबईच्या खेपेतील क्रम असे. कधी आम्ही त्यांच्याशी हिंदुसंघटन कार्याविषयी बोलत असू, कधी त्यातले कोणी आमच्या वृत्तपत्राला विज्ञापने देण्याची खटपट करीत.

३३) अशी होती कारणे. सावरकर सदनातील आमच्या ह्या खेपा सामान्यत: तळमाळ्यावर असलेल्या हिंदुसंघटन कार्यालयापर्यंतच मर्यादित राहात हे विशेषत्वाने लक्षात घ्यावे. वीर सावरकर पहिल्या माळ्यावर राहात. त्यांना आम्ही कधीतरीच भेटत होतो आणि तेही आधी वेळ ठरवून.

३४) तीन एक वर्षे झाली असतील. वीर सावरकरांची प्रकृती ढासळली. तेव्हापासून ते प्राय: अंथरुणावरच असत. त्यांनी आपली सार्वजनिक कामे निलंबित (सस्पेंड) केली होती. ते सार्वजनिक जीवनातून निवृत्त झाल्यासारखेच होते. त्यांच्या स्वयंसिद्ध नेतृत्वाचा आणि सर्वंकष प्रभावाचा लाभ न मिळाल्याने हिंदुसभा दुबळी झाली. डॉक्टर मुखर्जी हिंदुसभेचे अध्यक्ष झाल्यावर तर ती काँग्रेसची दासी बनली. भीषण हिंदुद्रोही कृत्ये चालू होती. एका अंगाने मुस्लिम लीगकडून. त्यांना प्रतिषेध करण्याचे सामर्थ्य हिंदुसभेजवळ राहिले नाही. परिणाम असा झाला की, महासभेच्या कक्षेतून सांविधानिक पद्धतीने हिंदुसंघटन कार्य समर्थपणे चालविले जाईल ही माझी आशा मावळली. मी दूर सरू लागलो. हिंदुसंघटक तरुणांची एक फळी उभी करावी, तिला एक संघर्षसंहिता द्यावी आणि काँग्रेस आणि मुस्लिम लीग यांची अपकृत्ये त्या तरुण फळीकरवी हाणून पाडावीत असा मी संकल्प सोडला. महासभेच्या प्रमुख पण जीर्ण नेत्यांचा विचार मी त्यासाठी घेतला नाही.

३५) गांधीजींच्या कारस्थानांना आतून आणि लीगच्या कारस्थानांना बाहेरून धक्के देण्याचा आमचा संघर्षक्रम होता. वीर सावरकर आणि हिंदुसभेचे इतर वयोवृद्ध नेते यांच्याकडून त्याला मार्गदर्शन मिळेल, निदान नुसती प्रशस्ती मिळेल असे वाटत होते; पण तसा भरवसा यापुढे धरण्यात अर्थ नाही असे मला आणि माझ्या विचारांच्या तरुणांच्या प्रत्ययाला येणारी उदाहरणे घडली. माझे डोळे उघडले. दोन ठळक उदाहरणेच केवळ देत आहे. १९४६ मध्ये किंवा त्या काळाच्या आसपास सुऱ्हावर्दीच्या शासनाच्या आधिपत्याखाली हिंदूंवर नौखाली

मध्ये जे अनन्वित अत्याचार केले गेले, त्याने आमचे रक्त खवळले. गांधीजी जेव्हा त्याच सुऱ्हावर्दीची पाठराखणी करण्यास पुढे सरसावले आणि आपल्या प्रार्थनासभातून सुद्धा त्याला शहीद साहेब (!) (मार्टिर सोल) म्हणून संबोधू लागले. तेव्हा आमच्या लज्जेला आणि उद्वेगाला सीमा राहिली नाही. इतकेच नव्हे तर दिल्लीला गेल्यावर गांधीजी आपल्या प्रार्थनासभा भंगी वसाहतीतील एका हिंदू मंदिरात भरवू लागले आणि त्यांनी तेथील हिंदू पुजाऱ्यांच्या विरोधाला न जुमानता, आपल्या प्रार्थनेचा एक भाग म्हणून कुराणातील परिच्छेद वाचण्याचा हेका धरला. अर्थात मुस्लिम विरोधाच्या समोर एखाद्या मशिदीत गीता पठन करण्यास ते धजले नाहीत. त्यांनी तसे केले असते तर मुसलमानांची प्रतिक्रिया किती भीषण झाली असती याची त्यांना जाणीव होती. परंतु सहनशील हिंदूंच्या भावना तुडविणे त्यांना सोपे, शक्य होते. हा समज खोटा पाडण्यासाठी हिंदूसुद्धा त्यांच्या सन्मानाचा अपमान झाला तर असहनशील होऊ शकतो असे गांधीजींनाच पटविण्याचे मी ठरविले.

३६) दिल्लीला गांधीजींच्या सभेत निदर्शनाचे सत्र चालू करावे आणि अशा प्रार्थना भरविणे त्यांना अशक्य करून टाकावे असे आपटे आणि मी यांनी ठरविले. आपटेंनी निर्वासितांची एक मोठी तुकडी घेतली आणि दिल्लीत मिरवणूक काढली. गांधीजी आणि त्यांचे शहीद सुऱ्हावर्दी यांचा त्यात धिक्कार केला. भंगी वसाहतीतील गांधीजींच्या प्रार्थनासभेत ती मिरवणूक घुसली. असला हा तुंबळ विरोध अंगावर येताना पाहताच गांधीजी चोरटेपणाने शलाकांनी सुरक्षित दाराआड जाऊन लपले. तरी तेव्हा काही शक्तिप्रयोग करावा असे आमच्या मनातही नव्हते.

३७) सावरकरांनी या निदर्शनाचे प्रतिवृत्त वाचले. त्यांनी आमच्या या हालचालीचे कौतुक केले नाही. उलट त्यांनी मला एकट्याला बोलावून घेतले, असल्या अराजकपूर्ण नीतीसाठी त्यांनी मला दोष दिला. तरी आमची निदर्शने शांततामय होती. ते म्हणाले,

> 'तुमच्या पक्षाच्या सभा काँग्रेसचे लोक धुमाकूळ घालून उधळतात तेव्हा मी त्याचा निषेध करतो. हिंदुसंघटकांनी तसे वर्तन केले तर त्याचाही मला निषेधच केला पाहिजे. गांधीजी आपल्या प्रार्थनासभातून हिंदुविरोधी शिक्षण देत असतील तर तुम्ही तुमच्या सभा घ्या आणि त्यांचा निषेध करा. आपआपसात तरी वेगवेगळ्या पक्षांनी आपला प्रचार संविधानाच्या कक्षेतूनच केला पाहिजे.

३८) हिंदुस्थानची फाळणी होण्याचे नुकतेच ठरले होते आणि हा दुसरा लक्षवेधी प्रसंग घडला. तथाकथित हिंदुस्थानच्या राज्यावर म्हणजेच फाडून

काढलेल्या उर्वरित भागावर काँग्रेसच सत्तारूढ होणार हे निश्चित होते. त्या शासनाशी हिंदुसभेचा व्यवहार कसा असावा हे कळून घेण्याची हिंदुसभेच्या एका गटाला जिज्ञासा होती. वीर सावरकर आणि दुसरे उच्चपदस्थ हिंदुसभा नेते यांनी तत्काळ ठामपणे सांगितले की, स्वतंत्र झालेल्या हिंदुस्थानचे शासन कोणा पक्षाचे शासन आहे अशी धारणा यापुढे ठेवू नये. ते हिंदुस्थानचे राष्ट्रीय शासन म्हणून स्वागतिले जावे. पाकिस्ताननिर्मितीमुळे हिंदुसभेच्या गटाला कितीही तिडीक असाली तरी सर्व श्रम वेचणे हे त्यांचे आता ब्रीद पाहिजे. नवजात स्वातंत्र्य तरच सुरक्षित राहील. हिंदुस्थानच्या राज्याला धक्का पोहचण्याने नागरी युद्ध जुंपेल. त्यायोगे सर्व हिंदुस्थानचे पाकिस्तान करण्याचे मुसलमानी पापी गुप्त कारस्थान आकार घेईल.

३९) माझे मित्र आणि मी यांचे समाधान झाले नाही. आम्हाला मनातल्या मनात वाटले, आता वीर सावरकरांच्या नेतृत्वाला शेवटचा निरोप द्यावा. आपल्या पुढच्या धोरणात आणि कार्यक्रमात त्यांचा विचार घेण्याच्या भानगडीत पडू नये. आपल्या पुढील बेताचा त्यांना मागमूसही कळू देऊ नये.

४०) पाठोपाठ पंजाबात आणि हिंदुस्थानच्या अन्य भागात जात्यंधतेचा भयानक उद्रेक झाला. बिहार, कलकत्ता, पंजाब आणि इतर ठिकाणी हिंदूंनी मुस्लिम शक्तीला थोपविण्याचे धैर्य दाखविले तर त्या हिंदूंनाच काँग्रेस शासनाने छळण्यास, त्यांच्यावर खटले भरण्यास आणि गोळीबार करण्यास प्रारंभ केला. आमची अंतिम भीती खरी ठरू पहात होती. सर्व पंजाबात मुसलमानांनी आगीचा हलकल्लोळ केला होता. हिंदुरक्ताच्या नद्या वाहत होत्या. त्यावेळी १५ ऑगस्ट १९४७ हा दिवस दीपावलींनी आणि उत्साहाने साजरा केला गेला हे पाहणे आम्हास किती विषादपूर्ण आणि अशोभनीय वाटले असेल ! माझ्या विचारप्रणालीच्या हिंदुसभेच्या लोकांनी त्या उद्दीपोत्सवांचा आणि काँग्रेस शासनाचा बहिष्कार करण्याचे आणि मुसलमानांच्या अत्याचारांना प्रतिबंध घालण्यासाठी लढाऊ कार्यक्रम हाती घेण्याचे ठरविले.

४१) दिनांक ९ आणि १० ऑगस्ट १९४७ या दिवशी किंवा त्या दिवसाच्या जवळपास हिंदुसभेच्या कार्यकारिणीची बैठक आणि अखिल भारतीय हिंदू संमेलन दिल्लीला भरले होते. वीर सावरकर अध्यक्ष होते. हिंदुसभेला, तसेच वीर सावरकर, डॉक्टर मुखर्जी, श्री. ल. ब. भोपटकर यांसारखे हिंदुसभेचे धुरीण यांना आमच्या मतप्रणालीत आणावे आणि एक संग्रामकारी प्रस्ताव संमत करून घ्यावा असे आपटे आणि मी, आणि आमच्या गटाचे लोक यांच्या मनात होते. जाता जाता एक शेवटचा प्रयत्न करून पाहावा एवढाच हेतू होता. आम्ही दोन सूचना मांडल्या होत्या. नवीन निर्माण झालेल्या विभाजित हिंदुस्थानचे शासन काँग्रेस

चालविणार होती, त्या शासनावर बहिष्कार टाकावा आणि हैद्राबादविरुद्ध एक कृती समिती नेमावी. महासभेच्या कार्यकारिणीने या सूचना मानल्या नाहीत. फाडलेल्या हिंदुस्थानचे शासन म्हणजे भंगलेल्या शापित फाळणीत आपला वाटा आहे हे स्वीकारण्यासारखेच होते, असे माझे मत होते. याउलट महासभा समितीने एक प्रस्ताव केला, तो अवांछनीय होता. दि. १५ ऑगस्ट १९४७ ला लोकांना घराघरांवर भगवा ध्वज लावण्यास त्या ठरावाने सांगितले होते. वीर सावरकरांनी त्यापुढची पायरी गाठली आणि चक्रांकित तिरंगी राष्ट्रध्वज म्हणून मानावा असे त्यांनी आग्रहाने प्रतिपादिले. आम्ही या वर्तनाशी आपली उघड उघड असहमती प्रकट केली.

४२)इतकेच काय, पण दि. १५ ऑगस्टला वीर सावरकरांनी आपल्या घरावर भगव्या ध्वजासह हा नवीन चक्रांकित ध्वज लावला. असे करण्यात त्यांनी बहुसंख्य हिंदुत्ववाद्यांचे मत झुगारून दिले. त्यात आणखी भर पडली. डॉक्टर मुखर्जींनी सावरकरांना परस्थ दूरध्वनीने विचारले होते, मी हिंदुस्थानच्या संघराज्याच्या मंत्रिमंडळात स्थान स्वीकारावे काय ? सावरकरांनी ठामपणे होकार दिला. कोणता का निवडून आलेला पक्ष शासन चालवीना, सर्व राष्ट्रभक्तांनी त्यात सहभागी झाले पाहिजे; हिंदुत्ववाद्यांना विचारले तर त्यांनीही पद स्वीकारून सहकार्य दिले पाहिजे असे मत दिले. राष्ट्रीय मंत्रिमंडळाच्या घडणीत डॉ. मुखर्जींसारख्या हिंदुसभा नेत्याला पाचारण करण्यात काँग्रेसवादी मंत्र्यांनी जो समन्वय दाखविला त्यासाठी सावरकरांनी त्या मंत्र्यांचे अभिनंदनही केले होते. श्री. ल. ब. भोपटकरांनीही डॉ.मुखर्जींना पाठिंबा दिला.

४३) काँग्रेसचे काही अग्रणी आणि प्रांतशासनाचे काही काँग्रेसवादी मंत्री यांनी सावरकरांशी संपर्क साधल्याचे त्यावेळी उघड झाले होते. वीर सावरकरांनी आधीच प्रचारिलेल्या नव्या धोरणाला अनुसरून नव्या राज्ययंत्रणेच्या बळकटीसाठी संयुक्त फळी उभारण्याच्या दृष्टीने एक पक्षी काँग्रेसचे अग्रणी आणि दुसऱ्या पक्षी सावरकर यांच्यात तातडीचा पत्रव्यवहार होत होता. असा तो संपर्क होता. राष्ट्रभक्तांच्या संयुक्त घडणीला विरोध करण्याचे मला काहीच कारण नव्हते. मात्र काँग्रेस शासन शेळपटासारखे गांधीजींच्या दबावाखाली होते. उपवासाची धमकी देणे असल्या साध्या करणीने गांधीजी आपल्या हिंदुत्वाविरोधी लहरी काँग्रेस शासनाच्या माथी मारीत. कोणतीही संयुक्त फळी गांधीजींच्या सर्वसत्ताधीशत्वाची तळी उचलणारे एक वेगळे साधनच होणार होते हे मला दिसत होते. त्यायोगे परिणामी हिंदुत्वाचा विश्वासघातच होणार होता.

४४) वीर सावरकरांचे हे प्रत्येक पाऊल मला मुळीच आवडले नाही. आपटे आणि मी, तसेच हिंदुसंघटनावादी काही तरुण यांनी महासभेला आणि

तिच्या श्रेष्ठ नेत्यांना दूर ठेवून स्वतंत्रपणे एक झुंजार कार्यक्रम आखण्याचे ठरविले. या कार्यक्रमाच्या कार्यान्वयासाठी सावरकरांसह कोणालाच विश्वासात घ्यायचे नाही असे आम्ही ठरविले.

४५) मी माझ्या 'अग्रणी' किंवा 'हिंदुराष्ट्र' या दैनिकातून हिंदुसभेच्या धोरणावर आणि वरिष्ठ नेत्यांवर टीका करू लागलो. तरुण हिंदुसंघटकांनी आमच्या कृतिशील कार्यक्रमाचा अंगीकार करावा असे उघड आवाहनही मी त्यांना केले.

४६) माझा स्वतंत्र कार्यक्रम कार्यान्वित करण्याच्या हेतूने मी प्रथम दोन उद्दिष्टे निश्चित केली. गांधीजी आपल्या हेकट, आपत्तिकारक प्रार्थना सभातून हिंदुद्रोही प्रचार करीत. गांधीजींविरुद्ध शांत पण तीव्र निदर्शने करणे, त्यांच्या सभातून गडबड-गोंधळ निर्माण करणे आणि त्या निदर्शनात्मक आक्षेपातून हिंदू अवस्थेची तीव्र मात्रा त्यांच्या दृष्टोत्पत्तीस आणणे हे एक उद्दिष्ट होते. मुसलमान हैद्राबाद संस्थानातील हिंदूंवर अनन्वित अत्याचार करीत होते, तेथील हिंदू जनतेला संरक्षण मिळावे म्हणून त्या संस्थानाच्या सीमाभागात संस्थानाविरुद्ध एक आंदोलन चालू ठेवावे हे दुसरे उद्दिष्ट होते. अशी कार्ये गुप्तपणे आणि एकसत्ताक नेतृत्वाखालीच होऊ शकतात म्हणून आमच्या कार्यक्रमावर विश्वास असणाऱ्या आणि शंकाकुशंका न काढता आज्ञापालन करणाऱ्या व्यक्तींनाच त्यात समाविष्ट करण्याचा आमचा निश्चय होता.

४७) शासनाच्या विद्वान अभिवक्त्यांनी उद्घाटन भाषण केले. मी वीर सावरकरांचा केवळ एक हस्तकमात्र आहे असे त्यांनी मला चित्रित केले. तसे चित्रण झाले नसते तर माझ्या या वक्तव्यात मी वरील पसारा मांडला नसता. त्यांचे हे चित्रण म्हणजे माझ्या मूल्यमापनाच्या आणि कृतीच्या स्वयंभूपणाचा हेतुपुरस्सर अपमान होता. माझ्याविषयी काही अपसमजात्मक धारणा झाली असल्यास तिचे निर्मूलन व्हावे म्हणून वरील घटना मला सांगाव्या लागल्या. माझ्या हालचालींचे पर्यवसान गांधीजींवर गोळ्या झाडण्यात झाले. वीर सावरकरांना माझ्या हालचालीचे ज्ञान होते हे म्हणणे खोटे आहे हे मी पुन्हा पुन्हा निक्षून सांगतो. गांधी, नेहरू, सुऱ्हावर्दी यांना संपविण्याची आज्ञा आम्हाला सावरकरांनी दिली आहे असे आपटे माझ्यासमक्ष बडगेला म्हणल्याचे क्षमेचा साक्षीदार बडगे यांच्याकडून वदविले गेले आहे. ते विधान पूर्णतः खोटे आहे. आम्ही या कटाच्या संदर्भात सावरकरांचे शेवटचे दर्शन घेण्यासाठी बडगेला त्यांच्या घरी नेले हे विधानही खरे नाही. 'यशस्वी होऊन या' असे सावरकर म्हटल्याचे बडगेचे विधानही खरे नाही. गांधीजींची शंभरी भरली आणि आपल्याला यश मिळालेच पाहिजे असे माझ्यासमक्ष आपटे किंवा मी स्वतः बडगे यालाही बोललो नाही. अशी आशीर्वादाची लालसा धरण्याइतपत मी अंधश्रद्धही नव्हतो किंवा असल्या भविष्यकथनावर विश्वास ठेवण्याइतपत पोरकटही नव्हतो.

निवेदन भाग २

गांधीजींच्या राजनीतीचे क्ष-दर्शन

उपभाग २

४८) दिनांक ३० जानेवारी १९४८ च्या घटनेला पार्श्वभूमी केवळ राजकीय आणि राजकीयच होती. ती काहीशा विस्ताराने सांगणे मला उचित वाटेल. हिंदू, मुसलमान किंवा इतर यांच्या धर्मग्रंथांचा गांधीजी आदर करीत, किंवा गीता, कुराण आणि बायबलमधील श्लोक ते आपल्या प्रार्थनेत म्हणत, हे गांधीजींविरूद्ध माझे मन संतप्त होण्याचे कारण नव्हते. धर्ममतांचा तौलनिक अभ्यास करणे मी काही आक्षेपार्ह मानीत नाही. मी तर तो एक गुण समजतो.

४९) उत्तरेतील वायव्य अतिसीमाप्रदेशापासून दक्षिणेतील कन्याकुमारी पर्यंतचा आणि कराची आणि आसाम यांना सामावणारा भूभाग तो विभाजनपूर्व हिंदुस्थान. त्या भूमीला मी सदा मातृभूमी म्हणून मानीत आलो आहे. या विस्तीर्ण प्रदेशात विभिन्न पंथीय समाज राहतात. आपापली ध्येये आणि आपापल्या श्रद्धा सांभाळण्याचा त्यांना पूर्ण आणि समान अधिकार पाहिजे, तसे स्वातंत्र्य पाहिजे, असे मी मानतो. या भूमीवर हिंदुसमाज संख्येने सर्वाधिक आहे. अन्यत्र, म्हणजे या भूमीबाहेर, स्वत:ची म्हणून सांगावी अशी भूमी त्याला नाही. या कारणाने पुरातन कालापासून ही हिंदुस्थानची भूमी या हिंदुसमाजाला मातृभूमी आहे, पुण्यभूमी आहे. या देशाला नावरूप आणले ते हिंदूंनी, वैभव दिले ते हिंदूंनी, सभ्यता आणली ती हिंदूंनी, कला वाढविली ती हिंदूंनी, ज्ञानभांडार उघडले ते हिंदूंनी, शास्त्र निर्मिले ते हिंदूंनी, तत्त्वज्ञान ओतले ते हिंदूंनी, वेदान्त वाचला तो हिंदूंनी. हिंदू सोडले तर खालोखाल संख्येच्या दृष्टीने मुसलमान समाज गण्य आहे. साधारणपणे दहाव्या शतकापासून मुसलमानांनी हिंदुस्थान पोखरण्यास आरंभ केला. हिंदुस्थानच्या मोठ्या भागावर मुस्लिम राज्य निर्माण करण्यात त्यांना हळूहळू यश आले.

५०) ब्रिटिशांच्या वर्चस्वापूर्वी हिंदू आणि मुसलमान यांना शतकानुशतकांच्या अनुभवातून एक गोष्ट कळली होती. मुसलमान हे हिंदूंचे किंवा हिंदुस्थानचे स्वामी म्हणून टिकू शकत नाहीत, तर हिंदूंना मुसलमानांचे निष्कासन करणे जमणार नाही. आपल्याला येथेच राहणे आहे ही दोघांनीही खूणगाठ बांधली. मराठ्यांच्या उद्‌भवामुळे, राजपुतांच्या प्रत्याघातामुळे आणि शिखांच्या उत्थानामुळे हिंदुस्थानावरील मुसलमानी सत्तेला घोर क्षय लागला होता. काही मुसलमान

राजे आपल्या पुनर्वर्चस्वाची स्वप्ने बघत होते खरे; पण ती स्वप्ने वांझोटी होती. जागरूक जनता हे जाणत होती. या उलट ब्रिटिश लोक हिंदू आणि मुसलमान यांच्यापेक्षा युद्धक्षेत्रात आणि चाणक्यनीतीत श्रेष्ठ ठरले होते. राज्यशासनाच्या नवीन पद्धती त्यांनी अवलंबिल्या. जीवित आणि वित्त यांच्या संरक्षणाचा पत्करा घेतला. त्यात पक्षपात ठेवला नाही. अनिवार्यतेने त्यांचे वर्चस्व हिंदू आणि मुसलमान या दोघांनाही स्वीकारावे लागले. हिंदू आणि मुसलमान यांच्यात शत्रुत्व होते ते ब्रिटिशांच्या प्रवेशापूर्वीपासून; पण ब्रिटिशांनी त्या शत्रुत्वभावाचा हीनप्रकारे लाभ घेतला. स्वत:चे राज्य स्थिर ठेवण्यासाठी त्यांनी पूर्वीच्या विद्वेषात भर घातली. हिंदुस्थानची राष्ट्रसभा म्हणजे इंडियन नॅशनल काँग्रेस. हिंदुस्थानच्या नागरिकांसाठी राज्य मिळविणे हे तिचे ध्येय होते. त्यासाठीच ती जन्मली होती. पूर्ण राष्ट्रीयत्व हा तिचा प्रारंभापासून आदर्श होता. लोकशासनाच्या तत्त्वाला अनुसरून सर्वांना समान अधिकार उपभोगता यावेत या धारणेवर ते राष्ट्रीयत्व उभे होते. परकी सत्ता झुगारून देण्याचे व त्या ठिकाणी लोकशासकीय सत्ता स्थापण्याचे आणि जनतेचेच अधिकार निर्माण करण्याचे हे काँग्रेसचे ध्येय माझ्या सार्वजनिक जीवनाच्या आरंभापासून मला फार आवडले.

५१) देशाच्या सार्वजनिक व्यवहारातून किंवा निवडणुकीतून किंवा संसदेतील अथवा संसदेबाहेरील कार्यातून किंवा मंत्रिमंडळाच्या गठनातून किंवा निर्गठनातून जातिनिष्ठ भावना सर्वथा दूर ठेवाव्यात असे मी माझ्या लेखनातून आणि भाषणातून सदा प्रचारीत असे. धर्मवर्चस्वविरहित सेक्युलर राज्याचा मी नित्य पुरस्कर्ता राहिलो. त्यातच सूज्ञता आहे असे माझे मत आहे. (बिलासपूर अधिवेशनात हिंदुसभेने संमत केलेले ठराव येथे वाचून दाखविले गेले. पृ. १५१ पाहा) हे धर्मनिरपेक्ष राज्यव्यवस्थेचे तत्त्व काँग्रेसच्या प्रभावाने हिंदू समाजात संथपणे दृढमूल होत राहिले. मात्र मुसलमान-समाज म्हणून प्रथम प्रथम या तत्त्वाशी फटकून राहिले. मग फोडा आणि राज्य करा या ब्रिटिशांच्या दुष्ट धोरणाला अनुसरून ब्रिटिशांनी मुसलमानांच्या हिंदूंवर राज्य करण्याच्या आकांक्षांना प्रोत्साहित केले. त्या वेळचे राजप्रतिनिधी लॉर्ड मिंटो यांनी १९०६ मध्ये विभक्त मतदार संघाचा पाया घातला. त्यातच ब्रिटिशांच्या या नीतीची पहिली पाउले दिसतात. अल्पसंख्याकांना संरक्षण हवे असे निमित्त करून ब्रिटिशांनी ही विभक्त मतदार पद्धतीची मागणी मानली. काँग्रेस पक्षाने विरोध दर्शविला तो केवळ मौखिक; पण पायरीपायरीने ती भेदनीतीचा पाठपुरावाच करीत राहिली. होता होता वर्ष १९३४ मध्ये, न स्वीकार न धिक्कार या घातक सूत्राने काँग्रेसने भेदनीतीच्या अपकृत्याला सम्मती दिली.

५२) देशाच्या विच्छेदनाची मागणी अशा प्रकारे उद्भवली आणि प्रखर

झाली. प्रथम क्षुल्लक वाटणाऱ्या या पुटकुळीचे पाकिस्तानसारख्या गळवात पर्यवसान झाले. ब्रिटिशांना घालविण्यासाठी हिंदुस्थानातील सर्व थरातील लोकांची एक फळी उभी करावी हा वास्तविक या प्रमादामागील हेतू होता. काळाच्या ओघात भेदभाव विसरून जातील अशी मला आशा होती.

५३) मतदार संघ संयुक्त असावेत असे तत्त्व मी प्रचारीत असे; पण मुसलमानांनी विभक्त मतदार संघाचा हेका धरला होता म्हणून स्वत:चे मत क्षणभर दूर ठेवून मी तात्पुरता उपचार म्हणून विभक्त मतदार संघाच्या उद्‌भवाशी सहमत झालो. मात्र काटेकोरपणे लोकसंख्येच्या प्रमाणातच कोणाही जातिसमूहाला प्रतिनिधित्व असावे असा माझा आग्रही वाद होता. या माझ्या विचारधारेत मी सदा संगती सांभाळली आहे.

५४) एक अंगाने ब्रिटिश सत्ताधाऱ्यांच्या प्रेरणेने आणि दुसऱ्या अंगाने गांधीजींच्या आधिपत्याखालील काँग्रेसच्या प्रोत्साहनाने मुस्लिम लीगने जातिमूलक बैठकीवरून आपल्या मागण्या फुगविण्याचा सपाटा चालविला. मुस्लिम समाजाने सतत मुस्लिम लीगला पाठबळ पुरविले. मुस्लिम जनसाधारणाच्या अडाणीपणावर आणि द्वेषांधतेवर मुस्लिम लीगने आपले सामर्थ्य उभे केले, हे एका पाठोपाठ एक होणाऱ्या निवडणुकीत दिसून आले. आपल्या विभक्तपणाचा सदा वाढत्या मात्रेने अवलंब करण्यास लीगला त्यायोगे उत्तेजन मिळत गेले.

५५) विभक्त मतदारसंघांना काँग्रेसचा तत्त्वत: विरोध होता हे मी म्हटलेच आहे; पण काँग्रेसने व्यवहारात प्रथम १९१६ च्या लखनौच्या उभयपत्राने-कराराने आणि त्यानंतरच्या संविधान संशोधनाच्या प्रत्येक वेळी मुस्लिम लीगच्या अवास्तव मागण्या मान्य केल्या. राष्ट्रियत्वाच्या आणि लोकशासनत्वाच्या काँग्रेसमध्ये दिसलेल्या या अभावामुळे निर्माण झालेल्या आपत्ती पुढे महाग पडल्या हे परिणामी दिसले.

५६) वर्ष १९२० नंतर म्हणजे लोकमान्यांच्या मृत्यूनंतर गांधीजींचे काँग्रेसवरील वर्चस्व प्रथम वाढत गेले आणि मग गांधींजी सर्वश्रेष्ठ झाले. लोकजागृतीसाठी त्यांच्या चळवळी लोकविलक्षण होत्या. सत्य आणि अहिंसा या घोषणा ते लोकांपुढे ठेवीत. त्या घोषणांनी त्यांच्या चळवळींना ते पाठबळ देत. कोणताही सुजाण किंवा सुबुद्ध माणूस या घोषणांना आक्षेप घेणार नाही. वस्तुत: या घोषणात नवीन किंवा मूलभूत असे काही नाही. कोणत्याही सांविधानिक चळवळीत ती तत्त्वे अनुस्यूत असतात. अखिल मानवजाती या उच्च तत्त्वाचा आपल्या दैनंदिन व्यवहारात कटाक्षाने अवलंब करील ही कल्पनाच स्वप्नवत् आहे. स्वबांधवांचे आणि देशाचे प्रेम, तसेच स्वाभिमान, कर्तव्य, या गोष्टी आपल्याला अहिंसेचा सदान्‌कदा परित्याग करायला लावतात आणि सामर्थ्याचा वापर करावयास भाग पाडतात ही वस्तुस्थिती आहे. आक्रमकांचा सशस्त्र प्रतिरोध करणे हे अन्याय्य

किंवा अविचारप्रद आहे हे मला कधीच पटणार नाही. अशा शत्रूशी वेळी शंस्त्रानिशी सामना देणे, शक्य तर त्यावर मात करणे हेच मी धर्मकर्तव्य आणि नीतिकर्तव्य समजेन. श्रीरामचंद्राने रावणाशी तुंबळ युद्ध केले, त्याला ठार मारले आणि सीतेला सोडविले. श्रीकृष्णाने कंसाला मारले आणि त्यायोगे कंसाच्या दुष्टाचाराला पूर्णविराम दिला. महाभारतात अर्जुनाला आपले मित्र, बंधुजन इतकेच काय पण गुरूवर भीष्माशीही लढावे लागले, त्यांना ठार मारावे लागले. कारण ते लोक आक्रमकाच्या पक्षाचे होते. राम, कृष्ण आणि अर्जुन यांना हिंसाचाराचे अपराधी म्हणून अपमानित करणे म्हणजे मानवी प्रवृत्तीच्या उद्रेकांच्या अज्ञानाचे प्रदर्शन करणे होय हे माझे निश्चित मत आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी वीरतापूर्वक संग्राम केला. त्यांनीच प्रथम मुस्लिम पिसाटपणाला अटकाव केला आणि मग त्या पिसाटपणाचा विध्वंस झाला. शिवाजीने अफझलखानाला मारले तेच योग्य होते, नाही तर अफझलखानाने शिवाजीला मारले असते. शिवाजी, राणा प्रताप आणि गुरु गोविंदसिंग यांना कुमार्गी (misguided) देशभक्त म्हणून हिणविण्यात गांधीजींनी स्वत:चे अहंकारी थोतांड विवस्त्र करून दाखविले आहे.

५७) या वीरवरांनी आपल्या काळात देशावरील आक्रमण थोपविले, परकीयांच्या क्रूर छळातून स्वबांधवांना वाचविले आणि झोटिंगांच्या हातून स्वत:ची भूमी मुक्त केली. याउलट गांधीजींच्या अहिंसा प्रणालीचा परिणाम पाहा ! तीस वर्षांहून अधिक काळ गांधीजींनी निर्विरोध नेतृत्व केले. त्या अवधीत मंदिरांच्या उच्छेदनाचे प्रकार अधिक झाले. छळबळाने आणि फरावाफरवीने बाटवाबाटवी अधिक झाली. स्त्रियांवरील बलात्कारांची संख्या अधिक झाली आणि शेवटी देशाचा एक तृतीयांश भाग आम्ही गमावला. शिवाजी, राणा प्रताप आणि गुरु गोविंदसिंग यांचे कर्तृत्व कुठे आणि या महात्म्याचे कर्तृत्व कुठे ? त्यांच्यापुढे यांना उंचीच नाही; पण एखाद्या सूरदासाला स्पष्ट आकलन होणारी ही वस्तुस्थिती गांधीजींच्या चेल्यांना दिसत नाही हे किती विलक्षण आहे ! त्या थोर पुरुषांची गांधीजींनी निंदा केली ! काय म्हणावे ! अगदी सौम्य भाषेत बोलायचे तरी ते निंदावचन अघोरी एवढे तरी म्हणावेच लागेल.

५८) ब्रिटिश साम्राज्यवादाच्या छत्राखाली एक शासनयंत्रणा अस्तित्वात आली. मुस्लिमांच्या हिंसाचाराच्या धारेपुढे त्या यंत्रणेने शरणागती पत्करली. हिंदुस्थानचे विच्छेदन मान्य केले. तीच म्याड शासनयंत्रणा आता केवळ स्वार्थ साधण्यासाठी गांधीजींच्या मृत्यूचे ढोलके शत शत सुरांनी बडवीत आहे ! पण इतिहास या यंत्रणेला योग्य स्थानीच बसवील. दिसायला विसंगत दिसेल, पण गांधीजी हे हिंसाकारी शांतिमूर्ती होते. सत्य आणि अहिंसा या तत्त्वांच्या आड राहून त्यांनी देशावर कल्पनातीत आपत्ती आणल्या. या उलट राणा

प्रताप, शिवाजी आणि गुरु गोविंदसिंग यांची देशबांधव आपल्या हृदयात सतत पूजा बांधतील. त्याचे कारण, त्यांनी या देशबांधवांसाठी स्वत्व आणले, स्वाधीनता आणली.

५९) पुढे विवरण दिलेच आहे. गांधींजीच्या राजकीय चळवळी, सोईच्या दृष्टीने तीन खंडांत विभागता येतील. ते इंग्लंडमधून १९१४ च्या आसपास हिंदुस्थानात आले. जवळ जवळ लागलीच त्यांनी देशाच्या सार्वजनिक क्षेत्रात झेप घेतली. गांधीजीच्या आगमनानंतर थोड्याच काळात दुर्दैवाने सर फिरोजशहा मेहता आणि गांधीजी ज्यांना गुरू मानीत ते श्री. गोपाळ कृष्ण गोखले मरण पावले.

अहमदाबादला साबरमतीच्या काठी गांधीजींनी आश्रम उघडला आणि आपल्या कार्याचा मुहूर्त केला. सत्य आणि अहिंसा ही त्यांनी घोषतत्त्वे केली. आपण उद्घोषिलेल्या तत्त्वांविरुद्ध आपण वारंवार वर्तन केल्याचे त्यांनी स्वत:च मान्य केले; पण जेथे मुस्लिमांचे तुष्टीकरण करण्याचा प्रश्न असे तेथे तसे विरोधी वर्तन करण्यास ते पुढे आले नाहीत. आपल्या व्यवहारांना बंधन म्हणून किंवा आदर्श म्हणून सत्य आणि अहिंसा ही सर्वोच्च तत्त्वे आहेत; पण त्यांचा व्यवहार दैनंदिन जीवनात करावयाचा असतो, पोकळीत नव्हे. स्वत:च्या उद्घोषित आणि स्तोम माजविलेल्या तत्त्वांचे ढळढळीत उल्लंघन केल्याचे अपराधी गांधीजी होते हे मी दाखविणारच आहे.

६०) वर म्हटल्याप्रमाणे, गांधीजींचे राजकीय जीवन तीन खंडांत विभागता येईल.

(१) वर्ष १९१५ ते वर्ष १९३९-४० हा कालखंड.

(२) १९३९-४० ते ३ जून १९४७, म्हणजे महात्म्याच्या आधिपत्याखालील काँग्रेसने जिनांपुढे नतमस्तक होऊन पाकिस्तान निर्मिती स्वीकारली तेथपर्यंतचा कालखंड.

(३) फाळणीचा दिवस ते गांधीजींचे आमरण उपोषण, की ज्याचे पर्यवसान पाकिस्तानला पंचावन्न कोटी रुपये प्रदान करण्यात झाले आणि ज्या दानानंतर थोड्याच दिवसांत गांधीजींचा मृत्यू झाला तेथपर्यंतचा कालखंड.

६१) गांधीजी वर्ष १९१४ च्या शेवटी शेवटी हिंदुस्थानात नित्याच्या वास्तव्यासाठी परतले, ते दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांच्या धीरोदात्त नेतृत्वाचे तेजोवलय स्वत:भोवती घेऊनच. तेथे ते संघर्षाच्या अग्रभागी होते. तेथे गोऱ्या लोकांच्या क्रूर वर्तनाने हिंदुस्थानचा राष्ट्रीय स्वाभिमान चिरडला जात होता. नागरिकत्वाचे अधिकार आम्हाला दिले जात नव्हते. ब्रिटिश छळवाद्यांविरुद्ध

उभ्या केलेल्या संघर्षात गांधीजी पुढे होते. हिंदू, मुसलमान, पारशी सर्वजण गांधीजींचा आदर करीत. दक्षिण आफ्रिकेतल्या भारतीयांचे ते नेते होते असे विश्वभर मानले गेले. राहणीतील साधेपणा, अंगीकृत कार्यातील स्वार्थरहित निष्ठा, त्यागवृत्ती आणि आफ्रिकेच्या शासकांच्या वर्णद्वेषाविरुद्ध झगडण्याची त्यांची तत्परता यामुळे भारतीयांची प्रतिष्ठा उंचावली. त्यामुळे हिंदुस्थानात ते सर्वांना प्रिय झाले.

६२) स्वातंत्र्यासाठी झगडणाऱ्या जनतेच्या साहाय्याला हिंदुस्थानात ते परतले तेव्हा सर्व समाजसमूहांच्या अविरोध आदराला आणि विश्वासाला आपण पात्र ठरू असे त्यांना वाटले ते योग्यच कारण होते. आफ्रिकेत तसे झाले होते; पण ही आशा फलद्रूप होत नाही हे त्यांना लवकरच दिसले. हिंदुस्थान म्हणजे दक्षिण आफ्रिका नव्हती. भारतीयांना नाकारलेले प्राथमिक अधिकार मिळावेत एवढेच मर्यादित भारतीयांचे जेथे मागणे होते, तेथे सर्वांनाच ते तीव्र दुखणे होते. बोअर आणि ब्रिटिश या दोघांनीही भारतीयांना पायपुसण्यासारखे वागविले होते. आपल्या साधारण शत्रूविरुद्ध हिंदू, मुसलमान, पारशी एकजूट करून उभे राहिले होते. दक्षिण आफ्रिकेच्या शासनाशी त्यांचे आणखी काही भांडण नव्हते. आपल्या घरचा म्हणजे हिंदुस्थानातील प्रश्न मात्र भिन्न होता. आम्हाला उपनिवेशी राज्य हवे होते, स्वराज्य हवे होते, स्वातंत्र्य हवे होते. या भूमीत परकीय सत्ता खोलवर रुजली होती. ती अबाधित ठेवण्याचा त्यांचा निश्चय होता. त्यासाठी भेदनीती आणि दुसरे उपाय ही त्यांची साधने होती. भेदनीतीने हिंदु-मुसलमानातील वैमनस्य अधिकच चिघळविले होते. आम्हाला तहान लागली होती ती परकीय सत्ता उखडून टाकण्याची. दक्षिण आफ्रिकेत प्रत्ययास न आलेला नवीनच प्रश्न गांधीजींसमोर अशा प्रकारे प्रथमच उभा होता. दक्षिण आफ्रिकेत गांधीजींचा मार्ग खरोखरीच सुकर होता. तेथील सर्व समूहांच्या हितसंबंधात अभिन्नता होती, एकरूपता होती. प्रत्येक भारतीय गांधीजींचा अनुचर झाला होता; पण हिंदुस्थानात, जातिव्यवस्थेवर आधारित मतदान, विभक्त मतदार संघ इत्यादी अपवर्तनांनी देशातील मतैक्य आधीच पोखरले गेले होते. आणखीही अपवर्तनांचा उद्भव होत राहिला होता. ब्रिटिश सत्ताधारी निर्ढावलेल्या मनाने जातिमूलक तुष्टीकरणात मग्न होते. त्यांना न्यायविचारांचा निर्बंध नव्हता. त्यामुळे आफ्रिकेत मिळाले ते हिंदू आणि मुसलमान यांचे अविरोध नेतृत्व येथे मिळविणे गांधीजींना अतिशय अवघड होते. आपापसातच विद्वेष असणाऱ्या एखाद्या सैन्याचे सेनापतिपद पत्करावे लागावे याचा त्यांच्या प्रामाणिक मनोधारणेशी मेळ बसणे शक्य नव्हते.

६३) गांधीजी हिंदुस्थानात आल्यावर पाच वर्षेपर्यंत तरी तेथील राजकारणात एकमेव नेतृत्व मिळण्यास त्यांना फारसा वाव नव्हता. दादाभाई नौरोजी, सर

फिरोजशहा मेहता, लोकमान्य टिळक आणि श्री. गो. कृ. गोखले, तसेच काही नेते तो वेळपर्यंत जीवमान होते. गांधीजींना लोकप्रियता होती, मान होता, तरीही वरील विभूतींच्या तुलनेत ते वयाने आणि अनुभवाने कनिष्ठ होते. आपल्या देशाच्या दुर्दैवाने पाच वर्षातच त्या श्रेष्ठ नेत्यांचा अंत झाला. लोकमान्य १९२० च्या ऑगस्टमध्ये निवर्तले आणि गांधीजी सरळ नेतृत्वाच्या उच्चासनावर चढले.

६४) आपल्या मेदनीतीने परकीय सत्ताधारी, मुसलमानात असलेली देशभक्ती चाळवीत होते. तेव्हा स्वातंत्र्याच्या संघर्षासाठी समवेदना आणि देशावर श्रद्धा निर्माण केल्यावाचून आपल्याला नेतेपण करण्यास अवसर नाही हे गांधीजींच्या लक्षात आले. म्हणून हिंदु-मुस्लिम ऐक्य ही त्यांनी आपल्या राजनीतीची बैठक ठरविली. ब्रिटिशांच्या अपवर्तनी नीतीवर उतारा म्हणून गांधीजींनी मुसलमानांना अवाच्या सवा आणि आत्मघातक उदार आश्वासने दिली. तसे करण्यात हिंदुस्थानच्या लोकसत्ताक तत्त्वावरील स्वातंत्र्य संपादनाच्या प्रणालीशी सुसंगतता सांभाळली गेली असती तर काही बायगे नव्हते; पण गांधीजींना त्याचा पूर्ण विसर पडला. त्याचे जे परिणाम झाले ते आता आपण जाणतोच.

६५) हिंदुस्थानच्याच संचयातून ब्रिटिश लोक मुसलमानांना सतत विशेष लाभ देत राहिले आणि भिन्न समाजांना विभक्त ठेवीत राहिले. वर्ष १९१९ पासून गांधीजी स्वत:कडे मुसलमानांचे विश्वस्तपद खेचून घेण्यास इतके अधीर आणि उतावीळ झाले की ते एका पाठोपाठ एक तर्कविसंगत, न्यायविसंगत अभिवचने मुसलमानांना देऊ लागले. त्यांनी कोरे चलनपत्र (Blank Cheque) मुसलमानांना दिले, की ज्यावर आपल्या मागण्या मुसलमानांनी भराव्यात आणि चलनपत्र वटवावे ! खिलाफत आंदोलनाचा गांधीजींनी पाठपुरावा केला आणि त्या धोरणाला काँग्रेसचा पूर्ण पाठिंबा मिळवण्यात यश मिळविले. एक वेळ अशी आलीसे वाटले की गांधीजी यशस्वी होत आहेत. हिंदुस्थानातील प्रमुख मुस्लिम नेते गांधीजींचे अनुयायी बनले. वर्ष १९२० मध्ये जिनांना राजकीय अस्तित्वच जणू नव्हते. अलीबंधू मुसलमानांचे नेते बनले. या घटनांचे गांधीजींनी स्वागत केले. कारण मुसलमानांचे नेतृत्व आपणाकडे येत असल्याची पावले त्यात त्यांना दिसली. अलीबंधूंच्या पुढारीपणाचे गांधीजींनी डिंडिम वाजविले. त्यांची लघळ स्तुती (flattery) करून त्यांना आकाशाला भिडवले आणि मुसलमानांना अनंत न्यायविसगंत सुविधा देऊ केल्या; पण त्यांना हवे होते ते घडले का ? नाही. मुसलमानांनी खिलाफत समिती ही एक स्वतंत्र राजकीय, धार्मिक संस्था म्हणून चालविली आणि काँग्रेसपासून तिचे अस्तित्व अलग ठेवले. राष्ट्रीय एकात्मतेच्या प्रयत्नात गांधीजींनी आपले हृदय ओतले होते. त्यासाठी ते अफाट द्यूत खेळले होते; पण थोड्याच दिवसांत मोपल्यांचे थैमान झाले. मुसलमानांना या एकतेच्या

भावनेत किंचितही आत्मीयता नव्हती हे त्यामुळे दिसून आले. अशा थैमानात हिंदूंचा प्रचंड संहार होतो, छळबळाने भ्रष्टीकरण होते, स्त्रियांवर बलात्कार होतो, लुटालूट होते. मोपल्यांच्या थैमानात तसेच झाले ! सकृत्दर्शनी ब्रिटिशविरोधी असणाऱ्या या उत्थानाचे ब्रिटिशांनी काही महिन्यातच कंबरडे मोडले. इंग्रजांनी गांधीजींना हिंदु-मुस्लिम एकतेच्या आनंदसागरात पोहायला सोडले.

खिलाफत आंदोलन कोलमडले. गांधीजी त्याने घसरले. ब्रिटिश साम्राज्यवाद अधिक मातला. मुसलमान द्वेषांध झाले. ती द्वेषांधता हिंदूंवर उतत राहिली. गांधीजींनी ब्रिटिशांच्या खलनीतीची उपेक्षा केली. त्यांना हिंदू-मुस्लिम एकतेच्या वेडाने आणखीच पछाडले. त्या मृगजलामागे ते धावू लागले. वर्ष १९१९ च्या विधीने विभक्त मतदारसंघाची कक्षा वाढली. विधिमंडळात जातवारीने प्रतिनिधित्व दिले गेले. नगर शासनातही ते दिले गेले एवढेच नव्हे तर मंत्रिमंडळातही त्याचा प्रादुर्भाव झाला. जातीच्या आधारावर शासकीय सेवा दिल्या जाऊ लागल्या. ब्रिटिश धन्याकडून मुसलमानांना उंच स्थाने मिळू लागली. त्यांच्या गुणवत्तेचा कस तेथे नव्हता. मुसलमान स्वातंत्र्यसंग्रामापासून अलिप्त राहिले याचाच जणू तो परिपोष होता. ते मुसलमान आहेत एवढीच गुणवत्ता पाहिली जात होती. अल्पसंख्याकांना आडोसा या नावाखाली ब्रिटिशांनी पुरविलेले मुसलमानांचे चोचले हिंदुस्थानच्या राजकारणात सर्वदूर पसरले. मुस्लिम मनाच्या या सर्वव्यापक ललचाउपणापुढे गांधीजींची अर्थशून्य घोषवचने थिटी पडत होती; पण गांधीजींनी त्यापासून बोध घेतला काय ? ते थांबले काय ? नाही ! हिंदू आणि मुसलमान या दोन्ही समूहांचे आपण साधारण नेते ठरू शकू या आशेत ते वावरत राहिले. जितके म्हणून ते खड्डयात आले तितक्या आवेशाने ते मुस्लिम तुष्टीकरणासाठी वारेमाप सुविधा देण्याच्या उसळ्या घेत राहिले. स्थिती बिघडतच चालली. शासनाच्या भेदनीतीची सर्व आघाड्यांवर सरशी झाल्याचे वर्ष १९२५ पर्यंतच सर्वांना कळून चुकले; पण द्यूताचे व्यसन असलेल्या माणसाप्रमाणे गांधीजी आपली बोली चढवीत राहिले. सिंधच्या विभक्तीकरणाला त्यांनी मान्यता दिली. वायव्य सीमाप्रांत वेगळा घडविण्यास मान्यता दिली. मुस्लिमलीगच्या लोकसत्ताक प्रणालीविरुद्ध असलेल्या मागण्या एकमागोमाग मान्य केल्या जाऊ लागल्या. आशा ही की, राष्ट्रीय संग्रामात मुसलमान सहयोग देतील ! पण ती आशा फोल ठरली. या वेळपर्यंत अल्लीबंधूंचा भाव घसरला होता. जिनांनी पुन्हा राजकारणात प्रवेश केला होता. त्यांना चांगलेच महत्त्व ब्रिटिश आणि गांधीजी या दोन्ही ठिकाणी मिळत होते. ब्रिटिश शासन आणि काँग्रेस यांनी दिलेल्या सर्व सुविधा जिनांनी घेतल्या त्या हात सारखा पुढे ठेवून. मुंबई प्रांतातून सिंधचे विभक्तीकरण आणि वायव्य सीमाप्रांताची निर्मिती, यानंतर मंडलपटल (राउंड टेबल) परिषद भरली, त्यात प्रामुख्याने अल्पसंख्याकांचा प्रश्न पुढे आला. संघराज्यातूनच

आम्ही फुटू असे जिनांनी धमकावले. म्हणून गांधीजींनी इंग्लंडचे श्रमिक पक्षाचे प्रधानमंत्री मॅक्डोनल्ड यांना विभक्त जातिविधेयकावर (कम्युनल अवॉर्डवर) आपला निर्णय देण्यास विनविले. जिना आले पण देशात दुहीची बीजे पेरली गेली. वर्ष १९३५ च्या सुधारणात जातिमूलक तत्त्व खोलवर रुजले. प्रत्येक स्थित्यंतराचा जिना अधिकात अधिक लाभ घेत होते. भारतीय राष्ट्रीय एकता प्रस्थापित करण्याचा पाया जे हिंदुस्थानचे संघराज्य त्याच पायाचा वस्तुतः पराजय झाला. जिनांचे काय दुखत होते ! काँग्रेसने त्या जातिमूलक विधेयकाला पाठिंबा दिला. 'पाठिंबाही नाही, विरोधही नाही' असला आत्मघातकी फसवा शब्दप्रयोग त्यासाठी काँग्रेसने वापरला. त्याचा अर्थच काँग्रेसने प्रत्यक्षात त्या विधेयकाला मान्यता दिली. वर्ष १९३९ ते ४४ च्या महायुद्धाच्या वेळी जिनाने उघडपणे स्वार्थी तटस्थतेची भूमिका घेतली. मुसलमानांच्या मागण्या मान्य करण्याचे ब्रिटिशांकडून आश्वासन घेतले. वर्ष १९४० च्या एप्रिलमध्ये, म्हणजे युद्धास तोंड लागून सहा महिने होत आहेत त्याच्या आतच, जिनांनी द्विराष्ट्रवादावर आधारित पाकिस्तानच्या मागणीचा उद्घोष केला. हिंदू आणि मुसलमान हिंदुस्थानातील कोणत्याही भागात गोठ्या संख्येने राहत होते हे जिना पूर्णपणे विसरले. एखाद्या ठिकाणी हिंदू बहुसंख्य असतील, कोण्या ठिकाणी मुसलमान बहुसंख्य असतील किंवा स्थिती उलटसुलट असेल; पण जिथे हिंदू किंवा मुसलमान संख्येने नगण्य असतील असा कोणताही भाग नव्हता आणि हिंदुस्थानच्या कशाही विभाजनाने अल्पसंख्याकांचा प्रश्न पूर्वीप्रमाणेच राहणार होता.

६६) पाकिस्तानची कल्पना ब्रिटिशांना आवडली. त्यायोगे हिंदू आणि मुसलमान आपापसात झगडत राहिले आणि युद्धकाळात एरव्ही शासनाची कैची झाली असती ती झाली नाही. युद्धप्रयत्नात मुसलमानांनी अडथळे आणले नाहीत. काँग्रेस कधी अलिप्त राही तर कधी विरोध करी. दुसऱ्या टोकाला, आपल्या तरुणांना युद्धशिक्षणाची ही उत्तम संधी आहे, आपल्या राष्ट्राला त्याची आवश्यकता आहे, त्या शिक्षणापासून ब्रिटिशांनी आपल्याला हेतुपूर्वक दूर ठेवले होते, याची हिंदुसभेला जाणीव होती. या युद्धामुळे भूसेना, सागरसेना यांची दारे आम्हासाठी उघडली गेली होती. हिंदूंचे सैनिकीकरण करा असा आदेश महासभेने देशवासीयांना दिला. त्याचा परिणाम म्हणून स्थूलतः पंधरा लाख तरुणांना युद्धशास्त्राचा अभ्यास मिळाला. त्यांना अद्ययावत युद्धतंत्राच्या यांत्रिक प्रशिक्षणात प्रावीण्य मिळविले. ठिकठिकाणची काँग्रेसची शासने आज महासभेच्या दूरदृष्टीची फळे उपभोगीत आहेत. काश्मीरमध्ये ते आज वापरीत असलेल्या सैन्याच्या तुकड्या आणि हैद्राबादच्या स्वायत्ततेसाठी त्यांनी वापरलेल्या सेना महासभेच्या अशा दूरदर्शी प्रयत्नावाचून हाताशी उभ्या राहिल्या नसत्या. वर्ष १९४२ मध्ये काँग्रेसने स्वराज्य मिळविण्याच्या नावाने 'भारत सोडा' हे आंदोलन

चालू केले. प्रांतोप्रांती काँग्रेसजनांनी शस्त्राचाराचा उन्माद केला. उत्तर बिहारमध्ये काँग्रेसच्या असहकारवाद्याकडून जाळले न गेलेले किंवा उद्धध्वस्त न केले गेलेले एखादेही संयान स्थानक (रेल्वे स्टेशन) उरले नव्हते; पण काँग्रेसच्या अशा विरोधाला न जुमानता ब्रिटिशांकडून एप्रिल १९४५ मध्ये जर्मनीचा, तर ऑगस्ट १९४५ मध्ये जपानचा पराभव झाला. अणुध्वमूने जपानचा विरोध कोलमडला. काँग्रेसच्या अडथळ्यांची क्षिती न बाळगता ब्रिटिशांनी जपानवर आणि जर्मनीवर विजय मिळविला वर्ष १९४२ चा भारत सोडा हा लढा पूर्णतया असफल झाला. ब्रिटिशांची सरशी झाली. काँग्रेसनेत्यांनी त्यांच्याशी मिळते घेण्याचे ठरविले. 'कोणत्याही मूल्याने' शांतता हवी आणि 'कोणत्याही मूल्याने' काँग्रेस सत्तारूढ हवी, या शब्दात त्या पाठोपाठच्या वर्षात काँग्रेसने अवलंबिलेल्या नीतीचे वर्णन यथातथ्यपणे करता येईल. काँग्रेसने ब्रिटिशांशी हातमिळवणी केली. काँग्रेसला ब्रिटिशांनी गादीवर बसविले. प्रतिफल म्हणून जिनांच्या सशस्त्र उत्पातापुढे काँग्रेस वाकली. त्याला एक तृतीयांश लचका तोडून दिला. त्या भूभागाचे केवळ जातिवर्चस्वावर आधारित, धर्माधिष्ठित राज्य बनले. या उपक्रमात वीस लक्ष लोकांना धुळीला मिळविले. काँग्रेस धर्मवर्चस्वविरहित राज्याचा पुरस्कार करते असे नेहरू आता मोठ्यामोठ्याने बडबडतात. नुकतेच गेल्या वर्षी आपण एका जातीय आणि धर्माधिष्ठित राज्यनिर्मितीला अनुमती दिलीत असे त्यांना स्मरण कोणी दिले तर ते त्याच्यावर दात-ओठ खाऊन तुटून पडतात; धर्मवर्चस्वविरहित राज्याचा त्यांचा अंगीकार म्हणजे बरबटलेले हात पांढऱ्या झब्ब्यात झाकण्यातला प्रकार आहे. (His vociferous adherence to a secular state is nothing but a case of 'My lady protests too much').

६७) ब्रिटिशांनी काँग्रेसला वाटाघाटी करण्यास राजमंदिरात बोलाविले; पण त्यापूर्वी, काँग्रेसने ब्रिटिशांना शरणागती दिली. भारत छोडो आंदोलनाचा आम्ही परित्याग करतो, जपानविरुद्ध लढण्याला साहाय्याचे अभिवचन देतो, उपभूप (Viceroy) लॉर्ड वेव्हेल याला भारतशासनाचे प्रमुख म्हणून मान्यता देतो; असे काँग्रेसने वचन दिले.

६८) भारतभंजनाच्या वेदना आणि गांधीजींची हत्या ही शोकान्तिका या घटनांच्या पार्श्वभूमीचे सार या खंडात मांडले आहे. पहिली घटना काय किंवा दुसरी काय, कोणत्याच घटनेचे अभिलेखन करणे किंवा स्मरण करणे मला थोडाही आनंद देत नाही; पण भारतीय जनता आणि सर्व जग यांना गेल्या तीस वर्षांचा इतिहास ठाऊक व्हावयास हवा. या काळात ब्रिटिशांच्या साम्राज्यवादी नीतीने हिंदुस्थान विदीर्ण झाला. या काळात गांधीजींच्या जातीय ऐक्यविषयक ब्रुटित नीतीच्या अवलंबाने हिंदु मुस्लिम एकता साधली तर नाहीच; पण त्या

एकतेचा पायाच हादरला गेला, पाच कोटी भारतीय मुसलमान आता आमचे देशबांधव राहिले नाहीत. पश्चिम पाकिस्तानातील अमुस्लिम अल्पसंख्या एकतर अत्यंत क्रूर हत्यासत्राने किंवा त्यांच्या शतकोशतकीच्या स्थानावरून त्यांच्यावर बळाने लादलेल्या स्थानांतराने संपुष्टात आणली आहे. पूर्व पाकिस्तानातही तेच सत्र भयंकरपणे चालू आहे. एक कोटी दहा लक्ष लोकांचे घरदार उखडले गेले आहे. त्यात मुसलमानांची संख्या थोडी थोडकी नाही. चाळीस लक्ष आहे. अशा भीषण हलकल्लोळानंतरही गांधीजींनी तोच लांगूलचालनी तुष्टीकरणाचा पाठपुरावा केला हे मी जेव्हा बघितले तेव्हा माझे रक्त सळसळले. त्यांचे अस्तित्व सहन करणे मला केवळ अशक्य झाले. व्यक्तिश: गांधीजींविरुद्ध कठोर शब्द मला वापरायचे नाहीत; पण त्याच वेळी, गांधीजींची नीती आणि पद्धती यांच्या मुळाशीच माझा असलेला तीव्र संताप मला लपवायवाही नाही. ब्रिटिशांना सदा आपल्या भेदनीतीने जे घडवावयाचे होते तेच खरोखर स्वत: कार्यवाहीत आणण्यात गांधीजींनी यश संपादन केले ! त्यांनी ब्रिटिशांना भारतभंजनात साहाय्य केले आणि ब्रिटिशांचे आधिपत्य अद्याप संपले आहे की नाही याचीही शंकाच आहे.

● ●

निवेदन भाग २

गांधीजींच्या राजनीतीचे क्ष-दर्शन

उपभाग २

६९) बत्तीस वर्षांची साठलेली उत्तेजना आणि त्यात गांधीजींचा शेवटचा मुस्लीम तुष्टीकरणाचा उपवास याने गांधीजींचे अस्तित्वच आता त्वरित मिटवावे या विचाराकडे मी ओढला गेलो. ते हिंदुस्थानात परतल्यावर त्यांची आत्मन्यायीन प्रवृत्ती (subjective mentality) वाढीस लागली. या प्रवृत्तीमुळे काय बरोबर आणि काय चूक याचा न्यायविचार करणारे केवळ ते न्यायाधीश असावेत. देशाला त्यांचे नेतृत्व हवे असेल तर देशाने त्यांचे अनपयशत्व (infallibility) मान्य करावे. ते देशाने स्वीकारले नाही तर त्यांनी काँग्रेसच्या बाहेर राहावे, आपल्या मार्गाने जावे. अशा अहंकारी प्रवृत्तीत त्वयार्धम् मयार्धम् होणे नसावे, एक तर काँग्रेसला आपली प्रतिष्ठा गांधीजींच्या प्रतिष्ठेच्या पायाशी ठेवावी लागावी आणि त्यांच्या चमत्कारिकतेपुढे, विक्षिप्ततेपुढे, विचारशास्त्रापुढे आणि अप्रगत दृष्टीपुढे नाचण्यात समाधान मानावे लागावे, नाहीतर काँग्रेसला त्यांच्यावाचून वाटचाल करावी लागावी. कोण्या व्यक्तीविषयीच्या किंवा काही घटनेविषयीच्या वादात तेच एकमेव न्यायपती असावेत. सत्याग्रहासारख्या आंदोलनात केवळ स्वत:चे बुद्धिवर्चस्व त्यांनी गाजवावे. त्या आंदोलनाचे तंत्र आणखी कोणाला ठाऊक नसावे, आंदोलन केव्हा आरंभावे आणि केव्हा थांबवावे हे केवळ त्यांनीच जाणावे, आंदोलन यशस्वी होवो किंवा अयशस्वी, त्यातून भयंकर आपत्ती उभ्या राहोत किंवा राजनैतिक प्रतिगती येवो, त्यायोगे या महात्म्याच्या अनपयशत्वाला बाध न यावा, सत्याग्रही केव्हाच अपेशी नसतो हे त्यांचे सूत्र स्वत:च्या अनपयशत्वाच्या डिंडोऱ्यासाठी असावे, सत्याग्रही कोण हेही त्यांच्या व्यतिरिक्त आणखी कोणास ठाऊक नसावे, अशा प्रकारे गांधीजी स्वत:च स्वत:च्या वादग्रस्त प्रकरणात विधिज्ञ आणि न्यायपती असत. मात्र त्यांच्या बालिश वर्तनांना आणि हेक्यांना, दुराग्रहांना एक जोड होती. जीवनात महाकठोर साधेपणा, अश्रान्त श्रम, उत्तुंग चारित्र्य यांनी गांधीजींना प्रभावी आणि परारोध (irresistible) केले. अनेकांना गांधीजींच्या पद्धती तर्कहीन वाटत, त्यांना काँग्रेसमधून बाहेर तरी पडावे लागे किंवा स्वत:ची स्वतंत्र बुद्धी गांधीजींच्या पायाशी गुंडाळून ठेवावी लागे. गांधीजी त्या बुद्धीचा वापर कसाही करोत अशा प्रकारे उत्तरदायित्वहीन स्थान गांधीजींचे होते. त्यामुळे प्रत्यादामागून प्रमाद, अपयशापाठोपाठ अपयश, आणि उत्पातावर उत्पात देशावर आणण्याचे ते अपराधी झाले. त्यांच्या तेहतीस

वर्षांच्या राजकीय आधिपत्याच्या काळात त्यांच्या नावावर पूर्णपणे मांडावे असे एकही यश नाही. त्यांच्या बत्तीस वर्षाच्या निर्विरोध नेतृत्वाच्या काळात त्यांनी ज्या चुका केल्या त्यांचा पाढा मी विस्ताराने वाचीत आहे.

७०) गांधीजींनी दिलेली घोषवाक्ये आणि त्यांचा त्यांनी केलेला अवलंब यांच्या परिणामाने ज्या दारुण आपत्ती आल्या त्या आता आपणासमोर ठाऊक आहेत. त्यांचे विवरण मी थोडक्यात देत आहे. त्यातील काही घटना या अशा आहेत.

(ए) खिलाफत

पहिल्या महायुद्धामुळे तुर्कस्थानचे आफ्रिकेतील आणि मध्यपूर्वेतील पुष्कळसे सार्वभौमत्व नाहिसे झाले होते. युरोपमधील भूभागावरील सर्व आधिपत्यही त्याने गमावले होते. वर्ष १९१४च्या आसपास युरोपमधील एक लहानशी भूभागाची पट्टी अशी त्यांची राहिली. तुर्कस्थानच्या तरुण दलाने (यंग टर्क्स) सुलतानाला राज्यत्याग करावयास लावले. सुलतान संपला, तेव्हा खिलाफतही संपली. (खिलाफत म्हणजे खलिफाच्या तंत्राने चालणारी राज्यसत्ता. खलिफा म्हणजे मुसलमान धर्मपीठाचा मुख्य). हिंदुस्थानातल्या मुसलमानांचे खिलाफतीविषयीचे प्रेम प्रखर होते. सुलतान आणि खिलाफत यांची स्थानच्युती ब्रिटिशांमुळे झाली असा त्यांचा ग्रह झाला. म्हणून त्यांनी खिलाफतीच्या पुनरुज्जीवनासाठी हिंदुस्थानात आंदोलन उभारले. गांधीजींनी एक विकृत धारणा करून घेतली. स्वत:ला एक संधी आली आहे, असे त्यांना वाटले. हिंदूंचे नेते आपण आहोतच, या वेळी खिलाफतीला आपण पाठबळ दिले तर मुसलमानांचेही आपण पुढारी होऊ; अशा प्रकारे हिंदू-मुस्लिम एकता साधली की ब्रिटिशांना आपल्याला स्वराज्य द्यायलाच लागेल असा त्यांचा दृष्टिकोन होता; पण त्यात गांधीजी पुन्हा घसरले. त्यांनी काँग्रेसला खिलाफत चळवळीशी एकरूप होण्यास ओढून नेले. त्यायोगे राजकीय चळवळीत त्यांनी जातीय तत्त्व घुसू दिले. त्या वर्तनाने देशभर घनघोर संकट आल्याचे दिसून आले आहे. काही काळ खिलाफत पुन्हा जीव धरीत आहे असे वाटले. खिलाफतीला सहकार्य न देणारे मुसलमान कालबाह्य ठरले. अलीबंधु या चळवळीचे अग्रणी होते. ते मुसलमानांच्या लोकप्रियतेच्या लाटांवर तरंगू लागले. जिना एकाकी पडले. काही वर्षे त्यांना प्रतिष्ठाच नव्हती; पण खिलाफत चळवळ अयशस्वी झाली. ब्रिटिश सत्ताधाऱ्यांना चळवळीचा धक्का जाणवला नाही. दमन-नीती आणि मॉंटेग्यु-चेम्सफर्ड सुधारणा यांच्या वापराने ते थोड्याच वर्षात या आंदोलनाच्या फेऱ्यातून बाहेर आले. मुसलमानांनी खिलाफत चळवळ काँग्रेसपासून नेहमीच अलिप्त ठेवली. ते काँग्रेसशी एकरूप कधी झालेच नाहीत. मात्र काँग्रेसचे सहकार्य त्यांनी घेतले. जसा पराभव वाट्याला आला

तसे मुसलमान अपेक्षाभंगामुळे चिडले. त्यांनी तो क्षोभ हिंदूंवर उतरविला. हिंदुस्थानातल्या वेगवेगळ्या भागात अगणित दंगे झाले. त्याचे बळी सर्वत्र हिंदूच झाले. महात्म्याचे हिंदू-मुस्लिम ऐक्य मृगजळ ठरले.

(बी) मोपल्यांचा उत्पात

मलबार, पंजाब, आणि वायव्य सीमाप्रांत येथे हिंदूंवर पुन्हा पुन्हा अत्याचार होत राहिले. मोपल्यांचा उत्पात ज्याला म्हणतात तो म्हणजे हिंदू धर्म, हिंदूंचे सन्मान, हिंदूंचे जीवित आणि हिंदूंची मत्ता यांच्यावर प्रदीर्घ काळ चाललेला केन्द्रित अत्याचार होता. शेकडो हिंदू बळाने बाटवून मुसलमान केले गेले. स्त्रियांवर बलात्कार झाले. आपल्या जातीय वर्तनाने महात्म्याने हिंदुस्थानवर हे संकट आणले; पण तो मूग गिळून बसला. अत्याचारांविरुद्ध निषेधाचा एक शब्दही तो बोलला नाही. अत्याचाराची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून काही उपाययोजना करण्याची काँग्रेसलाही त्याने मोकळीक दिली नाही. मलबारात झालेले बाटवाबाटवीचे असंख्य प्रकार झाले नसल्याचे सांगण्यापर्यंत त्याची पायरी गेली. आपल्या 'यंग इंडिया' वृत्तपत्रात तर त्याने प्रसिद्ध केले की, बळाच्या बाटवाबाटवीचे एकच उदाहरण घडले. गांधीजींच्या मुसलमान मित्रांनीच त्यांना सुनावले, 'गांधीजी, तुमचे विधान चुकीचे आहे. बळाने झालेली भ्रष्टीकरणे फार आहेत.' गांधीजींनी आपले त्रुटित विधान सुधारले नाही. ते इतके वाहवले की, पीडीतांसाठी नव्हे तर मोपल्यांसाठीच त्यांनी निधी उभारला ! पण हिंदु-मुस्लिम एकतेची भूमी अद्याप क्षितिजापाशीही दिसत नव्हती.

(सी) अफगाणच्या अमीराशी संधान

खिलाफत चळवळ पडली; पण त्या भावना जागृत ठेवण्यासाठी काही तरी केले पाहिजे असे अलिबंधूंनी ठरविले. खिलाफतीचा शत्रू तो इस्लामचा शत्रू हे त्यांचे घोषवाक्य होते. म्हणून त्यांचे म्हणणे होते की, ब्रिटिश लोक प्रामुख्याने खिलाफतीच्या पाडावाला आणि तुर्कस्थानच्या पदच्युतीला कारणीभूत होते, तेव्हा सच्चा मुसलमान आपला धर्म म्हणून, कर्तव्य म्हणून ब्रिटिशांचे वैरी असला पाहिजे. या उद्देशाने त्याने अफगाणिस्थानच्या अमीराला हिंदुस्थानावर चाल करून येण्यास आमंत्रण देण्याचा गुप्त घाट घातला. त्याला त्या कामी सर्व सहाय्य देण्याचे अभिवचन दिले. या कारस्थानामागे फार मोठा इतिहास आहे. त्या कारस्थानातला आपला वाटा अलिबंधूंनी कधी नाकारला नाही. मात्र गांधीजींनी हिंदू-मुस्लिम एकीच्या नावाने अलिबंधूंना सर्व परीने सहाय्य करून आपले कुटिल वर्तन चालू ठेवले. त्यांनी अलिबंधूंवर प्रकटपणे प्रीतिवर्षाव केला. खिलाफतीच्या पुनरुज्जीवनासाठी त्यांनी सर्व सहयोग आश्वासिला. हिंदुस्थानावर स्वारी करण्यास अलीबंधूंनी अमीराला दिलेल्या आमंत्रणाविषयी

सुद्धा गांधीजींनी प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष दुजोरा दिला हे संशयातीतपणे सिद्ध झाले आहे. दिवंगत श्री. शास्त्री अलाहाबादच्या 'लीडर'चे संपादक श्री. सी. वाय. चिंतामणी, आणि गांधीजींचे आजीवन मित्र रेव्हरंड सी. एफ. अँन्ड्रयूज यांनी गांधीजींना स्वच्छ शब्दांत सांगितले होते, 'अफगाणच्या अमीराला हिंदुस्थानवर स्वारी करण्यास आमंत्रण देण्यास अलिबंधूंनी केलेल्या षड्यंत्राला तुमचा निश्चित पाठिंबा आहे, असा तुमच्या भाषणातून आणि लेखनातून सरळ निष्कर्ष निघतो.' मुसलमानांना प्रसन्न करण्याच्या नादात गांधीजींना आपल्या मातृभूमीचा विसर पडला आणि आपल्या मातृभूमीवर परकीय राष्ट्राच्या स्वारीने षड्यंत्राला हातभार लावण्यात ते वाटेकरी झाले. हे त्यांच्या लिखाणातील खालील उदाहरणावरून स्पष्ट व्हावे. त्या स्वारीला या महात्म्याने ज्या शब्दात आधार दिला ते शब्द असे;

'अफवा आहेत की, अलीबंधूना अटक करण्यात येणार आहे. मला समजत नाही, का ? आणि मग मी का मोकळा असावे ? मी जे करणार नाही ते कोणतेच कृत्य त्यांनी केले नाही. (त्यांनी जे केले ते मीही केले आहे.) त्यांनी अमीराला शब्द धाडला असेल तर मीही शब्द धाडीन की, तू जर स्वारी करून आलास तर माझ्या हाती शक्ती आहे तोवर कोणीही भारतवासी तुला हाकून लावण्यास शासनाला सहाय्य करणार नाही.'

ब्रिटिशांच्या जागल्यांनी (vigilence) ते षड्यंत्र मोडून काढले. अलीबंधूंचा मनोरा जिरला. हिंदू-मुस्लिम ऐक्य पूर्वीइतकेच दूर राहिले.

(डी) १. आर्यसमाजावर प्रहार

एरव्ही कोणतेही कारण नव्हते; केवळ अघळपघळ मुस्लिम प्रेम व्यक्त करावे म्हणून गांधीजींनी वर्ष १९२४ मध्ये अगदी अशिष्टपणे आर्यसमाजावर आघात केला. कृतींच्या आणि अकृतींच्या त्यांच्या तथाकथित प्रमादांची, पापांची गांधीजींनी प्रकटपणे निंदा केली. तो आघातच संगतिहीन होता, आगंतुक होता. तो गांधीजींना अशोभनीय होता; पण त्यायोगे मुसलमानांना संतोष होणार होता. ते गांधीजींच्या जिव्हाळ्याचे कार्य होते. आर्यसमाजाने गांधीजींच्या या आघाताचा प्रखर शब्दांत पण शिष्टसंमत भाषेत प्रतिरोध केला. त्याने काही काळ गांधीजी थंड झाले पण गांधीजींच्या वाढत्या राजकीय बळाने आर्यसमाज दुबळा झाला. स्वामी दयानंदांचा अनुयायी हा राजकारणात गांधीय काँग्रेसी असूच शकणार नाही. त्या दोन विचारधारा सर्वस्वी भिन्न आहेत; पण सत्ता आणि नेतेपंद यांची लालसा यामुळे आर्यसमाजी दुटप्पी वागतात. एकीकडे ते स्वत:ला गांधीय काँग्रेसी म्हणवितात आणि त्याच वेळी दुसरीकडे आर्यसमाजी म्हणवितात. परिणाम काय झाला पाहा. चार वर्षांपूर्वी सिंध शासनाने 'सत्यार्थप्रकाश' या आर्यसमाजाच्या

धर्मग्रंथावर बंदी घातली. आर्यसमाजीयांनी समाज म्हणून त्या अन्यायापुढे नमते घेतले म्हणून हिंदूंच्या सामाजिक आणि धार्मिक जीवनावर आर्यसमाजाचा मंदावत असलेला प्रभाव आणखी क्षीण झाला. आर्यसमाजाचे घटक तसे व्यक्तिश: राष्ट्रवादी होते आणि आहेतही. दोनच नावे सांगायची तर दिवंगत लाला लजपतराय आणि स्वामी श्रद्धानंद यांची सांगता येतील. ते एकनिष्ठ आर्यसमाजी होते; पण त्यांच्या मृत्यूपर्यंत ते काँग्रेसच्या प्रमुख ओळीत गणले जात. गांधीजींना अंधळेपणाने होला हो करण्यास ते अनुकूल नसत. त्याच्या मुस्लिम तुष्टिकरणाच्या धोरणाला या नेत्यांचा तीव्र प्रतिरोध असे. त्या विषयांवर त्यांनी गांधीजींशी उघडपणे वाद मांडला; पण ते महापुरुष आता नाहीत. आर्यसमाजी पूर्वी ज्या विचारधारेचे होते त्याच विचारधारेचे ते आज बहुतेक आहेत हे आपण जाणतो; पण त्यांना विपर्यस्त ज्ञान दिले गेले. त्या समाजातील स्वार्थसाधू गटाने त्यांना त्रुटित मार्गदर्शन केले. त्यामुळे आर्यसमाज हेच जे एके काळी बळ होते ते बळ निष्प्रभ झाले, संपले.

(डी) २. गांधीजींनी आर्यसमाजावर केलेल्या प्रहाराने त्यांची मुस्लिम समाजातील लोकप्रियता काही सुधारली नाही. एका मुसलमानाला थोड्याच महिन्यात स्वामी श्रद्धानंदांची हत्या करण्यास उत्तेजन तेवढे मिळाले ! आर्यसमाज प्रतिगामी असल्याचा गांधीजींचा आरोप मूलत:च खोटा आहे. तो प्रतिगामी असणे दूरच, हिंदूंत सामाजिक सुधारणा घडवून आणण्यात समाज अग्रेसर आहे हे सर्व जाणतात. अस्पृश्यता नाहीशी करण्यासाठी आर्यसमाज गेली शंभर वर्षे झटत आला आहे, म्हणजे गांधीजींचा जन्मही व्हायचा होता तेव्हापासून ! विधवा विवाहाला समाजाने मान्यता आणली. जन्मजात जातीपद्धतीला समाज निषिद्ध समजतो. अखिल हिंदूंनाच नव्हे तर आर्यसमाजाची तत्त्वे अनुसरणाऱ्या सर्वांना एकतेने बांधण्याची आर्यसमाजाची शिकवण आहे. गांधीजींची समाजाविरुद्धची भाषा काही काळ पूर्ण थंडावली होती; पण गांधीजींच्या पुढारीपणाच्या वलयाने लोक त्यांचा आर्यसमाजावरील पायाहीन आघात विसरले. त्याने समाजही खालावला. आर्यसमाजाचे संस्थापक स्वामी दयानंद सरस्वती यांच्याजवळ हिंसा-अहिंसा हे थोतांड नव्हते. त्यांच्या शिकवणीत सामर्थ्याचा वापर वर्जित नव्हता. सर्वसामान्यपणे आवश्यक तेव्हा ती शक्ती वापरण्यास त्यांची मोकळीक होती. गांधीजी सर्व प्रसंगी अहिंसेचा आग्रह धरीत तर स्वामी दयानंदांनी त्याचे कधी स्तोम माजविले नव्हते. त्यामुळे काँग्रेसमध्ये राहावे की नाही अशी द्विधा स्थिती आर्यसमाजी नेत्यांची झाली असणार; पण स्वामीजी दिवंगत झाले होते. गांधीजींचा ग्रह राजकीय आकाशात उंचीचा होता.

(इ) सिंधचे विभक्तीकरण

वर्ष १९२८ च्या जवळपास जिनांचे महत्त्व फारच वाढले होते. गांधीजींनी त्यांच्या अनेक अहितकर आणि अयोग्य मागण्या या वेळेपर्यंत मान्य केल्या होत्या. त्याला त्यांनी मूल्य मोजले होते. हिंदुस्थानच्या लोकशासनप्रणालीचे, हिंदुस्थानच्या राष्ट्रीयत्वाचे आणि हिंदूंच्या न्यायोचित अधिकारांचे. मुंबई प्रांतातून सिंधच्या विभक्तीकरणाला गांधीजींनी हात दिला. त्यायागे त्यांनी सिंधमधील हिंदूंना जातिविद्वेषी लांडग्यांच्या स्वाधीन केले. सिंधमधील कराची, सक्कर, शिकारपूर आणि आणखीही ठिकाणी अनेक दंगे झाले. त्यात केवळ हिंदूंचीच हानी झाली. हिंदु-मुस्लिम एकता क्षितिजाच्याही पलीकडे गेली.

(एफ) मुस्लिम लीगचा काँग्रेसला रामराम

जसा पराजय येई तसे गांधीजी आपल्या हिंदु-मुस्लिम एकतेच्या पद्धतीचे आणखीच प्रयोग करीत. द्यूतमत्त मनुष्य आपली प्रचंड मत्ता घालवितो. मग तो संतुलन हरवतो. त्यात आपली बोली वाढवीत सुटतो, तसे गांधीजींचे झाले. देशमुक्तीच्या प्रयत्नात जिनांनी सहभागी व्हावे म्हणून गांधीजी जिनांशी बोली चढवीत राहिले; पण वर्षांच्या ओघात मुसलमानांची काँग्रेसशी विभिन्नता वाढतच गेली होती, आणि वर्ष १९२८ नंतर लीगने काँग्रेसशी आपले नाते ठेवण्यास नकार दिला. वर्ष १९२९ मध्ये काँग्रेस लाहोर अधिवेशनात स्वातंत्र्याचा ठराव संमत केला. त्यावेळी लक्षणीय दिसली ती मुसलमानांची अनुपस्थिती. त्यांचे वेगळेपण उठून दिसले. हिंदू-मुस्लिम एकतेची आशा आता कोणी उराशी बाळगत नव्हते; पण गांधीजी हेकेखोरपणे आशावादी राहिले. मुस्लिम जातिद्वेषास ते आणखी शरण जाऊ लागले.

(जी) मंडल पटल परिषद (राउंड टेबल कॉन्फरन्स) आणि जातितत्व निर्णय

खऱ्या अर्थाने व्यापक स्वरूपात अंशाअंशाने सांविधानिक सुधारणांची हिंदुस्थानची मागणी फार तीव्र आहे, हे हिंदुस्थानातील आणि इंग्लंडमधील ब्रिटिश सत्ताधारी ओळखून चुकले होते. भेदनीतीने त्यांनी जातिवैमनस्य उभे ठेवले होते खरे,तरीही परिस्थितीच अशी निर्माण होत होती की, आता हिंदुस्थानात ब्रिटिश शासन अबाधित आणि नित्य राहाणार नाही हे त्या परिस्थितीच्या अवलोकनाने त्यांना समजले होते. म्हणून वर्ष १९३० च्या आरंभी एक मंडल परिषद घ्यावी असे त्यांनी १९२९ मध्ये ठरविले आणि तसे घोषितही केले. रॅम्से मॅक्डोनल्ड प्रधानमंत्री होते. श्रमिक शासन अधिकारारूढ होते; पण त्यांची मंडल पटल परिषद योजना फार विलंबाने झाली. घोषणा झाली होती तिची

उपेक्षा करून महिन्याभराने काँग्रेसच्या लाहोर अधिवेशनात स्वातंत्र्याचा ठराव संमत झाला होता. काँग्रेसने मंडलपटल परिषदेवर बहिष्कार घालण्याचे ठरविले. त्याच्या स्थानी मिठाचा सत्याग्रह आरंभिला गेला. त्याने उत्साहाचे प्रचंड भरते आले. जवळ जवळ सत्तर सहस्र लोकांनी मिठावरील निर्बंधाचा भंग केला आणि कारावास पत्करला. पहिल्या परिषदेच्या बहिष्काराचा काँग्रेसला लवकर पश्चात्ताप झाला. कराचीच्या १९३१ च्या अधिवेशनात असे ठरले की परिषदेच्या दुसऱ्या सत्रासाठी गांधीजींना प्रतिनिधी म्हणून धाडावयाचे. परिषदेतील वाटाघाटी फिसकटल्या होत्या. त्या रात्रीची दैनिकी वाचणाऱ्या कोणालाही दिसेल की त्या अपयशाचे प्रमुख वाटेकरी गांधीजी होते. त्या मंडल पटल परिषदेचा कोणताही प्रस्ताव राष्ट्रीयत्व किंवा लोकशासन पद्धती यांच्याशी मिळत नव्हता. गांधीजींनी कोठपर्यंत जावे ? रॅम्से मॅकडोनल्ड यांची त्यांनी जातियत्व निर्णयावर आधारित सुधारणा देण्याची याचना केली ! त्याने गेल्या चोवीस वर्षांत हिंदुस्थानचे राजकारण दूषित केले, विभक्तपणाची प्रवृत्ती वाढीस लावली, जातिविद्वेषी शक्तींना बळ आणले ! भावी काळात हिंदुस्थानातील विधिमंडळातील जातिमूलक निवडणुकी आणि जातिमूलक मतदारसंघ यांच्या प्रादुर्भावाला हे महात्मा प्रत्यक्षतः उत्तरदायी झाले ते वरीलप्रमाणे. जातितत्त्व निर्णय मॅकडोनल्ड यांनी दिला. तेव्हा गांधीजींनी त्याचा प्रतिरोध करण्यास नकार दिला. आणि लोकसभेतील काँग्रेस सदस्यांना, त्याला होकारही देऊ नका आणि विरोधही करू नका असा आदेश दिला त्यात आश्चर्य ते काय ? गेल्या पंधरा वर्षांपासून गांधीजींनी ज्यासाठी एवढा आटापिटा केला होता त्या जातीय एकतेवर त्यांनीच कुऱ्हाड घातली ! म्हणून वर्ष १९३५ च्या भारतीय विधीत केन्द्र शासन आणि राज्य शासन यांच्या व्यवस्थेत अल्पसंख्याकांना संरक्षण या आवरणाखाली जातीय मतदानाला,जातीय मतदारसंघांना आणि विशेषतः मुसलमानांना विशेष प्रतिनिधित्व देण्याला वैध उपबंध (प्रोव्हिजन) ठेवला गेला यातही आश्चर्य नव्हते. जातीय तत्त्वावर निवडून आलेल्यांची विचारधाराच जातीय असणार आणि जातीयता व राष्ट्रीयत्व यातील दरी बुजविण्याची त्यांना तळमळ नसणार हे सहजच आहे. राजकीय आणि आर्थिक धोरणावर आधारित विधिमंडळाची घडी निर्माण होणे केवळ अशक्य होते. हिंदू आणि मुसलमान हे परस्परविरोधी गटात विभागले गेले. ते एकमेकांचे शत्रुपक्ष म्हणून काम करू लागले. विभक्तवादाला त्याने अधिक गती मिळू लागली. बहुधा प्रत्येक ठिकाणी जातिद्वेषी उठावात मुसलमानांच्या अत्याचाराचे हिंदू बळी होत राहिले. हिंदू-मुसलमान एकतेची शक्यता थोतांड आहे, विफल आहे, भंगडपणा आहे, याचा लोकांना प्रत्यय आला; पण गांधीजी आपल्या मृगजळाच्या सूताची आवर्तने करीत राहिले. (या ठिकाणी नथुरामने पंडित मदनमोहन मालवीय यांनी जातितत्त्व निर्णयाच्या विरोधासाठी केलेले भाषण वाचून दाखविले.)

(अेच) सत्ताग्रहण आणि धांदरटपणाने सत्तात्याग

वर्ष १९३५ च्या भारतविधीला अनुसरून दिनांक १ एप्रिल १९३७ ला प्रांतिक स्वायत्ततेचा उद्भव झाला. विशेष संरक्षण, विशेष अधिकार, ब्रिटिश प्रकल्पांच्या हितसंबंधाचे रक्षण आणि ठिकठिकाणी सेवेत असलेल्या ब्रिटिशांची त्या त्या ठिकाणी स्थिरता अशा उपबंधांनी तो विधी ओतप्रोत होता; म्हणून काँग्रसने प्रथम प्रथम सत्ताग्रहण करणे निषिद्ध मानले; पण प्रत्येक प्रांतात मंत्रिमंडळ अस्तित्वात आलेले त्यांनी पाहिले आणि त्यात निदान पाच राज्यांत तरी ती मंडळे व्यवस्थित काम करीत होती हेही त्यांना दिसले. दुसऱ्या सहा प्रातांत मंत्रिमंडळे अल्पमतात होती; पण आपल्या राष्ट्रोन्नतीच्या कामात ती प्रगती करीत होती. आपण जर बहिष्काराचे धोरण चालू ठेवले तर आपण उपेक्षेने मारले जाऊ ह्या भयाने काँग्रेसने जुलै १९३७ मध्ये सत्ताग्रहण करण्याचे ठरविले. हे करताना काँग्रेसने एक मोठी चूक केली. मुस्लिम लीगचे सभासद त्यांनी मंत्रिमंडळातून वगळले, काँग्रेसी म्हणविणाऱ्या मुसलमानांचाच मंत्रिमंडळात समावेश केला गेला. जातिनिरपेक्षतेच्या धोरणाच्या दृष्टीने आणि जातिविषयक विशेष प्रतिनिधित्व नसावे या हेतूने खरे म्हणजे काँग्रेसचे वर्तन योग्य ठरले असते; पण त्यांनी एकदा जातीय मतदार संघाची घडण स्वीकारली होती. जातीवर अवलंबित मतदानाला मान्यता दिली होती. विभक्तपणाच्या अनुषंगाने येणाऱ्या आणखी गोष्टीही स्वीकारल्या होत्या, त्या दृष्टीने, मुस्लिम मतदारसघातून निवडून आलेल्या मुसलमानांना बहिष्कृत धरणे अन्याय्य होते. लीगच्या इच्छुकांनाच अल्पसंख्य मुस्लिम समाजाचे प्रत्येक प्रातांत प्रतिनिधित्व मिळाले होते. जे मुसलमान राष्ट्रीय मुसलमान म्हणून मंत्री झाले ते वास्तविक मुस्लिम समाजाचे प्रतिनिधी नव्हते. अर्थात मुस्लिम लीग ज्या अर्थाने मुसलमानांचे प्रतिनिधित्व करीत होती त्या अर्थाने आणि त्या तुलनेने आता, मुस्लिम लीगच्या सदस्यांना मंत्रीपद नाकारणे म्हणजे स्वत:च्याच तत्त्वांचा अवमान करून घेण्यासारखे होते. दुसऱ्या पक्षी, मुसलमान काँग्रेसच्या छत्राखाली येण्यास उत्सुक नव्हते. मुसलमानांना सहानुभूती, पक्षपाती आधार देण्यास प्रांताचे राज्यपाल नेहमीच सिद्ध असत; पण काँग्रेसने मुस्लिम लीगच्या सदस्यांना मंत्रिमंडळात स्थान दिले नाही याचा जिनांना तांत्रिक लाभ मिळाला. त्याचा त्यांनी पुरेपूर उपयोग करुन घेतला. वर्ष १९३९ मध्ये काँग्रेसने सत्तास्थान सोडले ते धांदरटपणाने. त्याने काँग्रेस मुस्लिम लीग आणि ब्रिटिश साम्राज्यवादी यांच्या हातचे खेळणे बनली; वर्ष १९३५ च्या भारतीय विधीच्या ९३ व्या धारेला अनुसरून काँग्रेस अधिकारावर होती. त्या प्रांताचे शासन राज्यपालांनी स्वत:कडे घेतले. उरलेल्या प्रांतात मुस्लिम लीगची मंत्रिमंडळे मात्र सत्तेवर राहिली. ब्रिटिशांच्या नीतीला अनुसरून तत्कालीन राज्यपालांचा कल निश्चितपणे मस्लिम पक्षपाती होता. हिंदुस्थानवर

जातिविद्वेषाचे राज्य चालले ते एका अंगाने मुस्लिम लीगच्या मंत्रिमंडळाकडून आणि दुसऱ्या अंगाने मुस्लिम हितैषी राज्यपालाकडून ! हिंदु-मुस्लिम एकता हे स्वप्नच राहिले. ते त्याव्यतिरिक्त आणखी काही नव्हतेच म्हणा ! तरीही गांधीजींना त्याचे काय ! हिंदू आणि मुसलमान यांचे नेतेपद आपणाकडे ठेवणे हा त्यांचा हेतू ! सत्तात्यागाने काँग्रेसने पुन्हा लोकशासन आणि राष्ट्रीयत्व यांचा बळी दिला. महात्म्याच्या हेकेखोरपणाच्या वेदीवर हिंदूंचे धार्मिक, सामाजिक राजकीय, आर्थिक मूलभूत न्याय्य अधिकार चिरडले गेले.

(आय) महायुद्धाच्या परिस्थितीचा लीगने उचललेला लाभ

पाच प्रांतांत मुस्लिम लीगची मंत्रिमंडळे आणि उरलेल्या सहा प्रांतांत मुस्लिम हितैषी राज्यपालांचे शासन अशा अनुकूल परिस्थितीने प्रोत्साहित होऊन जिनांनी आपल्या हालचालींना गती दिली. काँग्रेसने या ना त्या प्रकाराने युद्ध प्रयत्नांना विरोध केला. जिना आणि लीग यांनी आपले धोरण स्पष्ट ठेवले होते. ते तटस्थ राहिले आणि त्यांनी शासनाला अडसर घातला नाही; पण पुढच्याच वर्षी लीगच्या लाहोर येथील अधिवेशनात त्यांनी अटीच्या स्वरूपाचा ठराव केला. युद्धकार्यात आमचे सहकार्य हवे असेल तर हिंदुस्थानचे विभाजन झाले पाहिजे. लाहोरच्या या ठरावानंतर थोड्या महिन्यांतच लॉर्ड लिनलिथगो यांनी मुसलमानांच्या फुटीरपणाच्या धोरणाला पूर्ण पाठिंबा दिला. त्यांनी शासकीय भूमिका स्पष्ट करणारी एक विज्ञप्ती काढली. त्यात हिंदुस्थानातील सर्व राजकीय प्रवाहातील घटकांच्या अनुमतीवाचून हिंदुस्थानच्या संविधानात परिवर्तन होणार नाही असे आश्वासन मुसलमानांना दिले. उपनृपाने (व्हाइसरॉयने) दिलेल्या या आश्वासनाने हिंदुस्थानच्या राजकीय प्रगतीत खीळ घालणारा अडवणुकीचा अधिकार मुस्लिम लीग आणि जिना यांना प्राप्त झाला. त्या दिवसापासून फुटीरपणाची प्रक्रिया एकवटलेल्या सामर्थ्याने होऊ लागली. मुस्लिम लीगने मुसलमानांच्या सेनाप्रवेशाला प्रतिबंध केलेला नव्हता. भूदल, नौदल, नभदल यात मुसलमान प्रचंड संख्येने प्रवेश करीत होते. आपले सैन्यातील प्रमाण फार घटत असल्याचा ओरडा पंजाबच्या मुसलमानांनी केला होता. आज काश्मीरमध्ये होत आहे त्याप्रमाणे. तेव्हा भावी ईप्सित साध्य करण्याच्या हेतूने मुस्लिम लीगने शासनाला सहा वर्षे चाललेल्या त्या जागतिक युद्धात अडथळा आणला नाही. (नथुरामने येथे दिवंगत सर शिकंदर हयातखान यांचे कैरो येथे गेल्या महायुद्धाच्या कालात सैनिकांपुढे झालेले भाषण वाचून दाखविले.) हिंदुस्थानच्या संविधानात त्यांच्या अनुमतीवाचून काही परिवर्तन केले जाऊ नये हे त्यांना हवे होते. पाकिस्तानला मान्यता मिळाल्यावाचून त्यांची अनुमती मिळणार नव्हती. वर्ष १९४० च्या ऑगस्टमध्ये लॉर्ड लिनलिथगो यांनी तशा प्रकारचे आश्वासन त्यांना दिले होते.

(जे) क्रिप्सने मांडलेल्या विभाजन योजनेला मान्यता

युद्धाला पाठिंबा द्यावा की विरोध करावा, की तटस्थ राहावे याविषयी काँग्रेसचे मतच बनत नव्हते. या सर्व धोरणांचा उद्घोष काँग्रेसने आलटून पालटून केला होता. तो कधी भाषणातून असे, कधी प्रस्तावातून असे, कधी तो वृत्तपत्रीय प्रचाराने तर कधी अन्य मार्गांनी असे. स्वत:चे निश्चित स्थिर मत काँग्रेसला नसल्याचे आणि येऊन जाऊन काँग्रेसचा विरोध मौखिक असल्याचे शासनाने हेरले. १९४२ पर्यंत तरी युद्ध निर्वेधपणे, अविरोधपणे चालू होते. युद्धाला आवश्यक ते मनुष्यबळ, द्रव्यबळ आणि साहित्य शासनाला मिळत गेले. शासनाने मागितलेले ऋण पूर्णांशाने उभे राहात गेले. वर्ष १९४२ मध्ये क्रिप्स मंडळ आले. निरर्थक आश्वासनाचे एक पोकळ गाठोडे त्याने लोकांना आणि काँग्रेसला देऊ केले; पण त्या गाठोड्याला विभाजनाच्या स्वच्छ संकेताची भरीव पार्श्वभूमी मात्र होती. क्रिप्स शिष्ट मंडळ पडले हे स्वाभाविकच होते; पण मंडळाच्या आश्वासनांना विरोध दर्शविता दर्शविताच काँग्रेसने देशभंजनाच्या तत्त्वाला मान्यता दिली ! एकीकडे लोकशासनात्मकता आणि राष्ट्रीयता यांचा उद्घोष आणि दुसरीकडे विभाजनाला मान्यता असा हा दुटप्पी व्यवहार होता. एप्रिल १९४२ ला काँग्रेस कार्यकारिणीची बैठक अलाहाबादला भरली होती. तेथे फाळणीच्या तत्त्वाला प्रचंड बहुमताने विरोध झाला होता. अल्पमतात होते सी. राजगोपालाचारी - आजचे महाप्रशासक गव्हर्नर जनरल - आणि आणखी पाच-सहा जण. तथाकथित राष्ट्रीय मुसलमान मौलाना आझाद हे काँग्रेसचे तेव्हा अध्यक्ष होते. थोड्या महिन्यांनी त्यांनी निर्णय दिला की त्यापूर्वी भरलेल्या कार्यकारिणीने केलेल्या ठरावावर या फाळणीविरोधी ठरावाचा परिणाम होणार नाही ! या कार्यकारिणीने अल्पांशाने का होईना फाळणी तत्त्वत: मानली होती. काँग्रेस विकर्तव्यमूढ होऊन गेली. मुस्लिम पक्षपाती राज्यपाल आणि मुस्लिम मंत्रिमंडळे यांच्या साहाय्याने शासन आपला कारभार निर्वेधपणे सांभाळीत होते. राजामहाराजांनी युद्धकार्याशी सहयोग दिला. श्रमिकांनी युद्धापासून अलिप्त राहण्याचे नाकारले. धनिकवर्गाने शब्दाने काँग्रेसला पाठबळ दिले. कृतीने शासनाला हवे ते चढ्या भावात पुरविण्याचा क्रम ठेवला. आपल्या पक्षाघातातून, अर्धांगातून बाहेर येण्यास काँग्रेसला वावच राहिला नाही. त्यांनी सत्तात्याग केला होता. त्या नाममात्र विरोधाला उपेक्षून शासन राज्यशकट हाकीत होते.

(के) काँग्रेसचा 'भारत सोडा' उपक्रम आणि लीगचा 'फाळणी करा आणि भारत सोडा' उपक्रम

अगतिक झाल्याने केवळ निराशेच्या आवेगाने गांधीजींनी 'भारत सोडा' हा उपक्रम आखला. काँग्रेसने ती चाल संमोदित केली. परकीय सत्ताधाऱ्यांविरूद्ध

तो सर्वात व्यापक उठाव व्हावयाचा होता. 'करा अथवा मरा' असा आदेश गांधीजींनी लोकांना दिला. त्याबरोबर नेत्यांना शासनाने तत्काळ बंदीत टाकले. हिंसाचाराची काही कृत्ये काँग्रेसजनांनी काही आठवडे चालू ठेवली; पण तीन महिन्यांच्या आत शासनाने आपल्या दमनशक्तीने त्या आंदोलनाचा गळा दाबला. आंदोलन लवकरच कोलमडले. 'भारत सोडा' आंदोलन शमले होते तरी ते मागे घेतले असे न म्हणता काँग्रेसच्या वृत्तपत्रांनी आणि बाहेर असलेल्या काँग्रेसजनांनी आमच्या नेत्यांना सोडा असला केविलवाणा याचनाक्रम ठेवला या उपक्रमांचे फलित ते एवढेच. गांधीजींनी तर सुटकेसाठी झेपेल तेवढा उपवास करण्याचा मार्गही अवलंबिला होता; पण पुरी दोन वर्षे म्हणजे जर्मनीचा पूर्ण पाडाव होईपर्यंत नेत्यांना बंदिगृहात राहावे लागले. शासन सर्व अंगांनी विजयी झाले होते. जिनांनी 'भारत सोडा' चळवळीला उघड उघड विरोध केला. त्यांच्या मताने हे आंदोलन मुस्लिमहितविरोधी होते. त्यांनी एक प्रतिरोधी घोषणा दिली, 'हिंदुस्थानचे विभाजन करा आणि भारत सोडा !' गांधीजींची हिंदु-मुस्लिम एकता येथपर्यंत येऊन थडकली.

(एल) हिंदी विरुद्ध हिंदुस्तानी

गांधीजींच्या मुस्लिमपक्षपाती धोरणाचे दर्शन हिंदुस्थानच्या राष्ट्रभाषेच्या प्रश्नावरील त्यांच्या विपर्यस्त विचारसरणीने जेवढे स्पष्ट होते तेवढे आणखी कशाने होत नाही. शास्त्रशुद्धतेच्या सर्व कसोट्यांवरूनही हिंदीची राष्ट्रभाषा होण्याची सर्वप्रथम योग्यता आहे. हिंदुस्थानातील प्रारंभीप्रारंभीच्या आपल्या राजकीय कालखंडात गांधीजींनी हिंदीला चांगलाच उठाव दिला; पण मुसलमानांना हिंदीचे प्रेम नाही हे त्यांना समजताच त्यांनी पवित्रा बदलला. ते 'हिंदुस्तानी' नावाच्या भाषेचे जनक म्हणून पुढे सरसावले. 'हिंदुस्तानी' अशी कोणतीच भाषा नाही हे सर्वजण जाणतात. त्या तथाकथित भाषेला ना व्याकरण, ना शब्दसंग्रह. ती केवळ एक बोली आहे. ती बोलतात पण लिहीत नाहीत. हिंदी आणि उर्दू यांच्या संकरातील ते एक अनौरस पोर आहे. महात्म्याच्या महात्म्यानेही ती लोकप्रिय होऊ शकली नाही; पण मुसलमानांचे प्रेम संपादणे एवढेच ब्रीद असलेल्या गांधीजींनी आग्रह धरला की, हिंदुस्थानी हीच हिंदुस्थानची राष्ट्रभाषा व्हावी. त्यांच्या श्रद्धान्ध भक्तांनी अर्थातच डोळे बांधून त्यांना पाठिंबा दिला आणि ती अनौरस भाषा वापरली जाऊ लागली. बादशहा राम आणि बेगम सीता असले शब्दप्रयोग केले जाऊ लागले; पण जिनांना मिस्टर जिनाच्या ठिकाणी श्रीयुत जिना, किंवा आझाद वा मौलाना आझादच्या ठिकाणी पंडित आझाद म्हणायचे धाडस या महात्म्याला झाले नाही. हिंदुमुस्लिम एकतेच्या शोधाची गांधीजींची वाहतूक एकदिक् (वन वे) होती, उभयदिक् नव्हती. हिंदीच्या

भाषारौंदर्याशी, लिपीशुद्धतेशी, केवळ मुसलमानांना प्रसन्न करण्यासाठी त्यांना व्यभिचार करावयाचा होता; पण हिंदुस्थानातील सर्वसामान्य नागरिकांव्यतिरिक्त काँग्रेसजनांनीसुद्धा हा अनाचार गिळण्यास नकार दिला. गांधीजींचा हिंदुस्तानीचा अट्टहास चालूच राहिला; पण हिंदुसमाज अधिक शक्तिशाली ठरला. आपल्या संस्कृतीशी आणि मातृभाषेशी त्यांची एकनिष्ठा प्रखर दिसली. महात्म्याच्या लहरीपुढे नमण्यास त्यांनी नकार दिला. परिणामी गांधीजी हिंदी परिषदेत वरचढ ठरू शकले नाहीत. त्यांना त्यागपत्र द्यावे लागले; पण गांधीजींचा घातक प्रभाव रेंगाळत आहे म्हणून राष्ट्रभाषा हिंदी ठरवावी की हिंदुस्तानी या प्रश्नावर काँग्रेसजनात अद्याप संभ्रम दिसून येतो. देशाच्या ऐंशी टक्के लोकांची भाषा हीच राष्ट्रभाषा असली पाहिजे. हा साधा व्यवहार अगदी सर्वसामान्य बुद्धीच्याही लक्षात आला पाहिजे; पण गांधीजींच्या हिंदुस्तानीच्या हट्टात त्यांच्या मुस्लिम पक्षपाताचे अगदी मूढपणाचे दर्शन घडले. हिंदी भाषेचे आणि देवनागरी लिपीचे चाहते, पुरस्कर्ते, लाखालाखांनी आहेत ते सुदैव आहे. उत्तर प्रदेशाने हिंदी हीच राज्यभाषा म्हणून अंगीकारली. शासनाने नियुक्त केलेल्या समितीने, संविधानाचे प्रारूप शुद्ध हिंदीत भाषांतरित केले आहे. आता विधिमंडळातील काँग्रेस पक्ष लोकमानसाला मान देतो आणि हिंदीचा पाठपुरावा करतो, की महात्म्यावरील निष्ठेच्या आपल्या खुळाला कवटाळतो आणि एखादी परकी, अभारतीय भाषा हिंदुस्थानसारख्या महान देशावर लादतो ते ठरावयाचे आहे. प्रत्यक्षात हिंदुस्तानी हे उर्दूलाच दिलेले नाव आहे, पण हिंदीला सरळसरळ डावलून उर्दूची घटस्थापना करण्याचे धाडस गांधीजींना झाले नाही, म्हणून हिंदुस्तानीच्या ताडपत्रीखालून उर्दूचा शिरकाव करण्याचा तो प्रयत्न ! कोणाही हिंदुराष्ट्रवाद्याने उर्दू प्रतिबंधित केली नाही; पण हिंदुस्थानीच्या पदराखालून उर्दू घुसडवून देणे हा लेखापलाप आहे, फ्रॉड आहे आणि दण्डय अपराधाइतके ते दोषास्पद आहे. गांधीजींनी ते करण्याची धडपड केली. शालेय अभ्यासक्रमातून आणि शिक्षण संस्थांतून हिंदुस्तानीच्या नावाने एखादी अनस्तित्वातली भाषा सरकवून देणे, आणि ते का, तर मुसलमान प्रसन्न होतात म्हणून हा गांधीजींनी केलेला आत्यंतिक जातिविद्वेषवाद होय. हा सर्व आटापिटा का, तर हिंदुमुस्लिम एकता साधण्यासाठी !

(एम्) वंदेमातरम् गाऊ नका !

गांधीजींच्या मुस्लिमप्रेमाच्या कढात आणि मुसलमानांचे नेतृत्व करण्यास मिळावे या त्यांच्या हव्यासात हिंदूंच्या भावभावनांचा अवमान होत होता, त्याची आणि सत्य आणि न्याय याची त्यांना चाड नव्हती. असे वर्तन करणे हीच माहात्मिक उदारतेची खूण होती. काही मुसलमान वंदेमातरम् या सर्वमान्य राष्ट्रगीताचा तिटकारा करीत. हेच त्यांचे कृत्य मुळात निंद्य होते; पण त्या विरोधाचा मान

करुन जेथे शक्य झाले तेथे गांधीजींनी वंदेमातरम् म्हणणे त्वरित थांबविले. एक शतकभर हे पद्य बंगाली बंधूंना अतिशय स्फूर्तिप्रद ठरले आहे. त्या गाण्याने ते लोक आपल्या देशासाठी एकत्वाने उभे ठाकले आहेत. वर्ष १९०५ मधील वंगभंग विरोधाच्या आंदोलनात या गीताला विशेष महत्त्व आले. त्याला प्रचंड लोकप्रियता मिळाली. असंख्य सभांतून त्या गीताच्या तालात बंगाली तरुणांनी राष्ट्रभक्तीची प्रतिज्ञा घेतली. आपले जीवित तरुणांनी मातृभूमीला अर्पण केले. ब्रिटिश राज्यकर्त्यांना या गीतातील सरळ अर्थ उमगला नाही. त्याचा अर्थ आहे हे मातृभूमी तुला वंदन असो; पण अर्थ न उमगल्याने चाळीस वर्षांपूर्वी शासनाने वंदेमातरम् गीताला बंदी केली होती. त्यामुळे उलट त्या गीताची लोकप्रियता सर्व देशभर फैलावली. काँग्रेसच्या आणि दुसऱ्या सर्व राष्ट्रीय मेळाव्यात ते गीत म्हटले जाऊ लागले; पण एखाद्या मुसलमानाने त्या गीताच्या गायनास विरोध करताच गांधीजींनी त्या गाण्यामागील राष्ट्रभावना धुत्कारली ! हे गीत राष्ट्रगीत म्हणून म्हटले जाऊ नये असा आपला हेका त्यांनी काँग्रेसच्या गळी उतरविला. वंदेमातरमच्या ठिकाणी रवींद्रनाथ टागोरांचे जनगणमन हे गीत राष्ट्रगीत म्हणून माना असे आम्हाला आज सांगितले जाते. वंदेमातरम् या जागतिक प्रसिद्धी पावलेल्या स्वातंत्र्यगीतावरील या निर्लज्ज दडपणापेक्षा अधिक हीन आणि दमनीय घटना कोणती असू शकेल काय ? आणि तेही केवळ एखादा अडाणी जातिद्वेषी त्या गीताचा तिटकारा करतो म्हणून ! त्या अडाण्याला ज्ञान देणे आणि त्याचा त्या गीताविषयीचा दूषित ग्रह घालविणे हा त्यावर खरा उपाय होता; पण आपल्या असीम लोकप्रियतेच्या तीस वर्षांच्या कालखंडात गांधीजींना जे आचरण्याचे कधी धैर्य झाले नाही असे ते धोरण ठरले असते ! हिंदुमुस्लिम एकतेची त्यांची कल्पना होती शरणागती, लांगूलचालन आणि मुसलमान जे जे मागतील त्याचे दान ! ती स्वप्निल एकता कधी आलीही नाही आणि येण्याची शक्यताही नव्हती.

(अेन्) शिवबावनीवर बंदी

शिवबावनी ही एक बावन कडव्यांची सुंदर काव्यधारा आहे. शिवाजीचा महान प्रभाव आणि शिवाजीने हिंदूंचे, हिंदुधर्माचे केलेले कल्याण याचे सुंदर चित्रण त्या काव्यात आहे. भूषण या हिंदी कवीने ते केले आहे. गांधीजींनी या काव्याच्या सार्वजनिक अवलोकनाला किंवा गायनाला प्रतिबंध केला. त्या कवितेतील एकाचे सार आहे, शिवाजी झाले नसते तर सर्व हिंदुस्थान इस्लाममय झाला असता —

काशीजीकी कला जाती ।
मथुरा मशीद होती ।

शिवाजी न होते तो सुन्नत होती सबकी ।

त्या सुंदर साहित्यसरितेतून लक्ष लक्ष समकालीन लोकांना उत्साह मिळे, इतिहासाचा अभिमान वाटे. गांधीजींना ते काहीच नव्हते ! ही तर हिंदुमुस्लिम एकता होती !

(ओ) सुऱ्हावर्दीवर पांघरूण

लॉर्ड वेव्हेल यांनी पंडित नेहरूंना प्रांतिक शासन यंत्रणा स्थापित करण्यासाठी पाचारण केले. लीगने त्यात सहभागी होण्यास नकार दिला. पंडित नेहरूंनी स्थापित केलेल्या कोणत्याही शासन यंत्रणेविरुद्ध प्रत्यक्ष निषेध कृती करण्यासाठी लीगने समिती उभी केली. दिनांक १५ ऑगस्ट १९४६ ला म्हणजे पंडित नेहरूंनी सत्ता ग्रहण करण्यापूर्वी दोन तीन आठवडे कलकत्त्याला हिंदूंचे प्रचंड हत्यासत्र चालू झाले. ते तीन दिवस अप्रतिहत चालू राहिले. कलकत्त्याच्या 'स्टेट्समन' या वृत्तपत्राने त्या दिवसांची भीषणता रेखाटली आहे. जे शासन नागरिकांच्या अशा हत्यांना मोकळीक देते ते शासन उखडून टाकले पाहिजे असे त्या वृत्तापत्राचे म्हणणे होते. सुऱ्हावर्दीचे शासन अपदस्थ केले पाहिजे असाही निर्देश होता; पण समाजवादी म्हणविणाऱ्या राज्यपालाने भारतविधीच्या धारा ९३ प्रमाणे स्वत:कडे राज्ययंत्रणा घेण्यास नकार दिला आणि गांधीजी कलकत्त्याला गेले. हत्याकांड प्रसविणाऱ्या त्या व्यक्तीशी त्यांनी विचित्र मैत्रीचा सौदा केला ! खरे म्हणजे त्यांनी सुऱ्हावर्दीसाठी आणि मुस्लिम लीगसाठी मध्यस्थी केली. त्या हिंदूंच्या हत्याकांडाच्या तीन दिवसांत प्राणहानी आणि वित्तहानी टाळण्यासाठी आरक्षी दलाने काहीच उपाययोजना किंवा हालचाल केली नाही. प्रत्यक्ष विधीच्या सावलीतच हाहा:कार मातला होता; पण गांधीजींना त्याचे काय ? त्यांच्या दृष्टीने सुऱ्हावर्दी प्रशंसनीय मूर्ती होती. त्यापासून गांधीजींना परावृत्त करणे कोणाला शक्य नव्हते. सुऱ्हावर्दीला त्यांनी प्रकटपणे हुतात्मा-शहीद-म्हणून संबोधिले, दोन महिन्यातच नवाखाली आणि टिप्पेरा भागात मुसलमानांनी हिंदूंचे क्रूर हत्यासत्र चालविले ते आश्चर्य यात काय ? तीस सहस्र हिंदू स्त्रियांना बळाने मुसलमान केले. आर्य समाजाचे हे प्रतिवृत्त आहे. व्रणित किंवा ठार केलेल्या हिंदूंची संख्या तीन लाख होती. कोट्यवधी रुपयांची मत्ता लुटली गेली, जाळली गेली ! मग गांधीजींनी एकाकी नवाखालीचा दौरा ठरविला. ते जेथे जेथे गेले तेथे तेथे सुऱ्हावर्दीने त्यांना संरक्षण दिले हे सर्वज्ञात आहेच. त्या संरक्षणाच्या छायेतही गांधीजी नवाखाली जिल्ह्यात जाण्यास धजले नाहीत. सुऱ्हावर्दी मुख्यमंत्री असतानाच हा सर्व हलकल्लोळ, ही संपत्तीची लुटालूट, नासधूस झाली होती. अशा समाजद्रोही आणि जातिविद्वेषी विषाने बरबटलेल्या आग्या वेताळाला गांधीजींनी पदवी दिली 'शहीद' !

(पी) हिंदू आणि मुसलमान संस्थानिकांशी वर्तन

गांधीजींच्या अनुयायांनी जयपूर, भावनगर आणि राजकोट या संस्थानांच्या राजांची यशस्वीपणे मानखंडना केली. त्यांनी काश्मीर राज्यात तेथील हिंदू राजाविरुद्ध झालेल्या विद्रोहालाही उत्साहाने प्रोत्साहन दिले. मुस्लिम संस्थानिकांशी गांधीजींनी ते वर्तन केले त्याशी वरील वर्तन सर्वस्वी विरोधी होते. चार वर्षांपूर्वी ग्वाल्हेरमध्ये विक्रम शकाचा दोन सहस्रावा सोहळा आयोजित केला होता. मुसलमानांच्या कुटिल कारस्थानामुळे ग्वाल्हेरच्या महाराजांना तो सोहळा रहित करावा लागला. मुसलमानांचे आंदोलन केवळ जातिविद्वेषी होते. महाराजा मोठा निःपक्ष, उदार आहे. तो दूरदृष्टीचा आहे, पुरोगामी आहे. ग्वाल्हेरला नुकताच दंगा झाला, त्यात मुसलमानांची काही प्राणहाणी झाली म्हणून महात्माजींनी महाराजावर कठोर आगपाखड केली. ती आगपाखड सर्वस्वी अनुचित होती.

(क्यू) गांधीजींचा यथाशक्ती उपवास

गांधीजींनी १९४३ मध्ये झेपेल तेवढा उपवास आरंभिला होता. राजकीय चर्चेसाठी कोणाला त्यांची गाठभेट घेऊ दिली जात नसे. जवळचे आप्तच काय ते त्यांच्या समाचाराला म्हणून जाऊ शकत. श्री. सी. राजगोपालाचारी गांधीजींच्या गोतावळ्यात चोरून घुसले. तेथे पाकिस्तानला मान्यता देण्याचा कट शिजविला गेला. जिनांशी त्यासंबंधी वाटाघाटी करण्यास गांधीजींनी राजाजींना अनुज्ञा दिली. पुढे १९४४ च्या उत्तरार्धात गांधीजींनी तीन आठवडेपर्यंत जिनांशी त्या विषयावर चर्चा केली आणि ज्याला पाकिस्तान म्हणतात तेच जवळ जवळ सर्व जिनांना देऊ केले. गांधीजी प्रत्येक दिवशी जिनांकडे जात. त्यांची ते स्तुती करीत, त्यांची मनधरणी करीत, तोंडपूजेपणा करीत. पौंडभर मांस म्हणजे पौंडभर मांस आणि तेही हृदयाचे या शायलॉकच्या आग्रहाप्रमाणे जिनांनी आपल्या पाकिस्तानच्या मागणीचा हेका सोडला नाही. हिंदु-मुस्लिम एकता विरोधी दिशेने वाटचाल करीत होती.

(आर) देसाईलियाकत संधिपत्र

वर्ष १९४५ मध्ये भुलाभाई देसाई आणि लियाकत अलीखान यांचे घातक संधिपत्र पुढे आले. त्याने काँग्रेस ही राष्ट्रीय लोकशासनात्मक संस्था म्हणून मरण पावली. त्या संधिपत्राने काँग्रेसच्या शवपेटीवर आणखी एक, शेवटचाच म्हणा ना, खिळा ठोकला. दिल्लीच्या केन्द्रीय विधानसभेचे काँग्रेस पक्षाचे नेते भुलाभाई देसाई होते. मुस्लिम लीगचे नेते लियाकत अली होते. त्यांनी संधिपत्र केले. हिंदुस्थानच्या राजकारणाच्या प्रगतीची युद्धाच्या आरंभापासून झालेली कोंडी आणखीच आकुंचित होत होती. तिच्यातून मार्ग काढण्यासाठी ब्रिटिशांना विनवून

एक परिषद बोलवावी असा संधिपत्राचा आशय होता. काँग्रेसपक्षातील कोणाशी किंवा कोणा महत्त्वाच्या मंडळींशी चर्चा न करताच भुलाभाईंनी हा उद्योग केला होता असे म्हटले जाते. कारण काँग्रेसचे बहुतेक नेते १९४२ च्या 'भारत सोडा' ठरावापासून अटकेतच होते. त्या परिषदेसाठी देसाईंनी मुसलमानांना काँग्रेसच्या बरोबरीने प्रतिनिधित्व देऊ केले. या मूलभूत बैठकीवरच उपनृपाला परिषद बोलावण्याची विनंती होती. लॉर्ड वेव्हेल तेव्हा उपनृप होते. निवेदन मिळताच ते तडक लंडनला गेले. श्रमिक शासनाची त्यांनी संमती घेतली आणि ते परत आले. परिषदेची अधिकृत घोषणा झाली. सर्व देशाला धक्का बसला. जसा राष्ट्रीयत्वाचा तसाच लोकशासन पद्धतीचाही त्यात द्रोह होता, विश्वासघात होता. तो द्रोह करण्यात काँग्रेसचे अंग होते. लोकशासनपद्धतीच्या पाठीत सुरा मारला गेला होता. न्यायाचे, समानतेचे एकूण एक तत्त्व धुडकावले गेले होते. काँग्रेसच्या सदस्यांनी या देशहितघातक संधिपत्राला झटपट मान्यता देऊन टाकली. मग एक गुपित उघड झाले. त्या संधिपत्राला महात्म्याचा आशीर्वाद होता ! त्यांची पूर्वसंमती घेऊनच ते केले होते ! भारतात पंचवीस प्रतिशत असणाऱ्या समाजाला पन्नास प्रतिशत समजून प्रतिनिधित्वाचा लाभ मिळाला तर जे पंचाहत्तर प्रतिशत होते त्यांचे पन्नास टक्क्यावर खचीकरण केले गेले ! आणि याला काँग्रेसने पूर्ण मान्यता दिली होती ! परिषदेसाठी उपनृपाने आणखी अटी घातल्या होत्या त्या वेगळ्याच.

(१) काँग्रेस आणि दुसरे राजकीय पक्ष यांनी जपानविरोधी युद्धाला ब्रिटिशांना जय मिळेपर्यंत विनाअट पाठिंबा दिला पाहिजे.

(२) काँग्रेस आणि मुस्लिम लीग यांचे प्रत्येकी पाच प्रतिनिधी आणि त्याव्यतिरिक्त मागासलेले वर्ग आणि शीख आणि दुसऱ्या अल्पसंख्य जाती यांचे एक मिश्र शासन घडविले जाईल.

(३) 'भारत सोडा' आंदोलन विनाअट मागे घेतले पाहिजे आणि मग त्या आंदोलनाच्या संबंधात अटकेत ठेवलेले काँग्रेसचे नेते बंधमुक्त होतील.

(४) प्रशासनीय सुधारणांची परिमिती १९३५ च्या भारत विधीच्या कक्षेतील राहील.

(५) नवीन घडणीत महाप्रशासक आणि उपनृप यांचे सांविधानिक स्थान पूर्वीचेच राहील. म्हणजेच तो नवीन घडणीच्या शासनाचाही प्रमुख राहील.

(६) युद्ध संपल्यानंतर घटना परिषदेच्या यंत्रणेतून संपूर्ण स्वराज्याचा प्रश्न निर्णित होईल.

(७) वरील अटींना काँग्रेस आणि लीग यांची पूर्ण मान्यता मिळेल तर उपनृप शासनयंत्रणा घडवील आणि भारतीयांना कार्यभार वाटप करील.

तीन वर्षांपूर्वीच नेत्यांनी संपूर्ण स्वराज्यासाठी 'भारत सोडा' आंदोलन

उभारले होते, ते आंदोलन गतिमान करण्यासाठी त्यांनी लोकांना 'करा अथवा मरा' या आदेशाने उत्तेजित केले होते. त्याच नेत्यांनी आज उपनृपाच्या आधिपत्याखाली, त्याने लादलेल्या अटींना मान्यता देऊन, सत्तास्थाने ग्रहण करण्यासाठी गुपचूप शरणागती पत्करली ! भारत सोडा आंदोलन पडले होते ही वस्तुस्थिती होती. काँग्रेसजवळ पर्यायी कार्यक्रम नव्हता. काँग्रेसला आवडते किंवा नाही याची क्षिती न बाळगता परिस्थिती सारखी पालटत होती. काँग्रेसच्या अध:पतनात जिंकली होती जिनाने ! मुसलमानांना पन्नास टक्के प्रतिनिधित्व मिळण्याचा त्यांचा अधिकार प्रस्थापित झाला होता ! पुढील वाटचालीसाठी त्यांचा तो मोठा लाभ होता. परिषद अयशस्वी झाली. तरीही परिषदेतून द्विराष्ट्रवाद आणि पाकिस्तानची मागणी या गोष्टी पुढे रेटण्यास आणखी वाव मिळाला. हिंदु-मुस्लिम एकता लटकतच राहिली.

(अेस) अंतस्थ मंडळाची योजना (कॅबिनेट मिशन प्लॅन)

वर्ष १९४६च्या आरंभी तथाकथित अंतस्थ मंडळ-कॅबिनेट मिशन हिंदुस्थानात येऊन थडकले. भारताचे राज्य कार्यवाह-सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर इंडिया-लॉर्ड लॉरेन्स, युद्धमंत्री ॲलेक्झांडर आणि सर स्टाफोर्ड क्रिप्स या त्रयीचे ते मंडळ होते. प्रधानमंत्री ॲटली यांनी पार्लमेंटमध्ये भाषण केले आणि मंडळाच्या हेतूची कल्पना दिली. हिंदुस्थानला स्वातंत्र्यदान करण्याचा ब्रिटिशांचा निश्चय ॲटली यांनी उत्तम वक्तृत्वाने प्रकट केला होता. अट एकच होती. हिंदुस्थानच्या घटकांनी एक साधारण योजनेशी सहमत व्हावे. त्या साधारण योजनेला अनुमती मिळविणे हाच त्या अंत:स्थ मंडळाच्या कार्याचा मध्यबिंदू होता. मंडळ अयशस्वी झाले. वास्तविक काँग्रेसचे प्रामाणिक मत हिंदुस्थान अविभाजित राहावा असे होते; पण आपले मत स्पष्टपणे मांडण्याचा तिच्यात अभाव होता. त्या मताला स्थिरता नव्हती. उलटपक्षी, जिनांनी भारताचे विभाजन मागितले आणि त्या मागणीवर तो दृढ होता. अशा परस्परविरोधी मागण्यात एकमत प्रस्थापित करून घेणे त्या मंडळाला अशक्य झाले. दोन्ही पक्षांशी आणखी बोलणी केल्यावर दिनांक १५ मे १९४६ ला त्या मंडळाने आपला तोडगा प्रकट केला. फाळणीची कल्पना मंडळाने फेटाळली. ती फेटाळताना दहा सुसंगत कारणे त्यांनी दिली; पण अविभाज्य हिंदुस्थानचा पुरस्कार करता करताच मंडळाने आपल्या योजनेत मागच्या दाराने पाकिस्तान घुसडवून दिले. स्वतंत्र हिंदुस्थानची राज्यघटना निर्माण करण्यासाठी ब्रिटिश शासनाने अनुमती द्यावी म्हणून त्या मंडळाने सहा अटी घातल्या त्या त्यांच्या योजनेच्या पंधराव्या परिच्छेदात आहेत. या सहा अटीतील प्रत्येक अट हिंदुस्थानच्या अभंगतेला खिंडार पाडणारी होती; किंवा संपूर्ण स्वराज्य या कल्पनेलाही ती अडसर होती. अगदी विधिमंडळ निवडणुकीतून

निर्माण झाले असले तरीही काँग्रेस पक्ष 'भारत सोडा' आंदोलनाच्या पराभवाने हताश झाला होता. आपली राष्ट्रीयतेवरील एकनिष्ठा काँग्रेसने काही शब्दजालाची गुंफण करून अभासित केली आणि मंडळाचे म्हणणे मान्य केले आणि त्यायोगे पाकिस्तानच्या निर्मितीला शरणागतीच दिली. त्यामुळे अडवळणाने का होईना, हिंदुस्थानचे विच्छेदन करण्यास त्यांनी वाट मोकळी करून दिली. काँग्रेसने योजना तर मान्य केली पण शासन उभे करण्यास नकार दिला. सारांशाने काँग्रेसला शासन निर्माण करण्यास पाचारण केले तेव्हा जिनाने ब्रिटिशांवर विश्वासघाताचा आरोप केला आणि त्याने मुस्लिम लीगची प्रत्यक्ष विरोधी कृतिसमिती उभी केली. बंगाल, पंजाब, बिहार, मुंबई आणि आणखी काही ठिकाणी रक्तपात, अत्याचार, जाळपोळ, बलात्कार, यांचे थैमान झाले ! इतिहासातही त्याला तुलना मिळणार नाही. हिंदु हेच मुख्यत: या अत्याचाराचे बळी होते. काँग्रेसने डोळे विस्फारले; पण ती षंढासारखी बघत बसली. तिने हिंदूंना कोणतेही संरक्षण दिले नाही. भारत विधी १९३५ प्रमाणे महाप्रशासकाची सत्ता अशी असते की, त्याने शांतताभंग झालेल्या किंवा होणाऱ्या हिंदुस्थानच्या कोणत्याही भागातील शासनयंत्रणेत हस्तक्षेप करून अधिकार स्वत:कडे घेऊन शांतता प्रस्थापित करण्याची असते; पण महाप्रशासक आपले कर्तव्य न करता स्वस्थ राहिला. काही लाख लोक मारले गेले. अनेक सहस्र मुले आणि स्त्रिया पळविल्या गेल्या. काहींचा अद्याप ठावठिकाणा नाही. सहस्रावधी स्त्रियांवर बलात्कार झाला. कोटीकोटी रुपये मत्तेची लूट झाली व नासधूस झाली. हिंदु-मुस्लिम एकतेच्या स्वप्नापासून महात्मा पूर्वीइतकाच दूर होता.

(टी) काँग्रेस जिनाला शरण

पुढच्याच वर्षी काँग्रेस जिनांच्या अंकुशापुढे नमली आणि तिने पाकिस्तान मान्य केले. नंतरच्या घटना कशा घडत गेल्या हे लोकांना चांगलेच ठाउक आहे. वरील वर्णनात सर्वदूर जो धागा आहे तो आहे गांधीजींचे सदा वाढत जाणारे अवास्तव मुस्लिम प्रेम. उद्ध्वस्त हिंदूंच्या सहानुभूतीसाठी, सांत्वनासाठी, त्यांच्या अवमारासाठी (रिलीफसाठी) गांधीजींनी एक शब्दही उच्चारला नाही. मानवता बघण्याचा त्यांना एकच नेत्र होता. त्यांना मुस्लिम मानवता तेवढी दिसत असे. त्यांच्या दृष्टीने हिंदू कःपदार्थ होते. गांधीजींच्या साधूपणाने आणि अशा वर्तनाने मला तर स्तिमित केले होते.

(यू) पाकिस्तानावर संदिग्ध भाष्य

आपल्या एका लेखात गांधीजींनी पाकिस्तान या कल्पनेला कडाडून विरोध दाखविला; पण तो केवळ दिखाऊ होता. कारण त्याच लेखात त्यांनी स्पष्टपणे म्हटले, मुसलमानांना कोणत्याही मूल्यात पाकिस्तान हवेच असेल तर ते मिळविण्यास

त्यांना कोणी अडचण आणू शकेल ? या भाष्याचा अर्थ केवळ महात्माच जाणू शकेल ! हा पाकिस्तानचा पुरस्कार होता, की पाकिस्तानची घोषणा होती ? का पाकिस्तानच्या मागणीचा प्रतिषेध होता ?

(व्ही) काश्मीरच्या महाराजांना दुरुपदेश

काश्मीरविषयी गांधीजींनी पुन्हा पुन्हा प्रतिपादन केले. राज्याचा कार्यभार शेख अब्दुल्लावर सोपवावा आणि काश्मीरच्या महाराजांनी सरळ काशीला जाऊन निवृत्तीचे जीवन घालवावे. कारण काय, तर काश्मीरची जनता मुख्यत: मुसलमान आहे ! हैद्राबादसंबंधीच्या गांधीजींच्या व्यवहाराशी वरील दुरुपदेशाची किती विसंगती आहे पाहा ! हैद्राबादची जनता प्रामुख्याने हिंदू आहे. निजामाला गांधीजींनी कधी सांगितले नाही, की निजामा, तू आता मक्केला जा कसा ! अल्लाचे नाव घेत राहा तिथे !

(डब्लू) माउंटबॅटनने हिंदुस्थानचे विभाजन केले

१५ ऑगस्ट १९४६ पासून मुस्लिम लीगच्या अशासकीय सेनांनी जमेल तेथे हिंदूंची लूटमार, ससेहोलपट, हत्यासत्र चालू ठेवले. उपनृप वेव्हेल खरोखरीच त्या प्रकारांनी अस्वस्थ होऊन गेला होता; पण हा अत्याचार थांबविण्यासाठी त्याने भारतविधी १९३५ प्रमाणे आपले अधिकार वापरले नाहीत. बंगालपासून करावीपर्यंत हिंदूंचे रक्तच रक्त वाहिले. दक्षिणेत कोठे कोठे सौम्य प्रतिक्रिया झाली. सप्टेंबर २, वर्ष १९४६ पासून दोन घटकांचे संकरशासन तथाकथित राष्ट्रीय शासन म्हणून चालले होते.त्या घटकांचे एकमेकांशी सूत नव्हते. मुस्लिम लीगचे प्रतिनिधी काँग्रेसच्या ५०% होते. संयुक्त शासन चालणे अशक्य व्हावे म्हणून त्यांनी आपल्या हातातील सर्व शक्ती वापरली. संयुक्त शासनाला सुरुंग लावावा म्हणून लीगच्या प्रतिनिधींनी पराकाष्ठा केली. आपल्याच संयुक्त शासनाचे ते जसजसे अधिक द्रोही होत तरातसे गांधीजी त्यांच्यावर अधिक प्रेम ओतीत राहिले. लॉर्ड वेव्हेल या दोन विरोधी गटात तडजोड घडवू शकले नाहीत. म्हणून त्यांना त्यागपत्र द्यावे लागले. त्यांचा सद्विवेक काहीतरी जागा होता म्हणून फाळणीस त्यांचे मन घेईना ! फाळणी अनावश्यक आणि अप्रस्तुत किंवा अव्यवहार्य असल्याचे त्याने स्पष्टच म्हटले होते. त्याच्या निवृत्तीनंतर लॉर्ड माउंटबॅटनची नेमणूक झाली. किंग लॉग मागोमाग किंग स्टॉर्क ! माउंटबॅटन सर्वस्वी सैनिकी मनुष्य ! आग्नेय आशियाच्या फळीचा हा महासेनापती. साहस आणि सततोद्योग हे याचे वैशिष्ट्य. करायचे अथवा मरायचे अशा जणू सैनिकी प्रतिज्ञेने तो हिंदुस्थानात आला आणि त्याने केले - म्हणजे हिंदुस्थानचे विभाजन केले. मनुष्यहत्येकडे तो तसा अधिक निर्विकारतेने बघे. त्यांच्याच पायाखाली रक्तपात चालला होता. हिंदूंची हत्या होत होती. त्यामुळे आपले तेवढेच प्रतिस्पर्धी

घटले असेच बहुधा त्याला वाटे. शत्रुसंहार जितका अधिक, तितके यशाचे माप अधिक ! आपल्या उद्दिष्टांच्या दिशेने त्याने धीमेपणे वाटचाल केली आणि त्याचे पर्यवसान अपेक्षेप्रमाणेच झाले. जून १९४८ ही सत्तांतराची वास्तविक ठरलेली वेळ; पण आधीच कितीतरी काळ हिंदूंच्या घाऊक हत्याकांडांचा पुरेपूर परिणाम झाला. राष्ट्रीयत्वाची आणि लोकसत्ताक पद्धतीची बढाई मारणाऱ्या काँग्रेसने जिनाच्या संगिनीपुढे पूर्णपणे मान टाकली आणि गुप्तपणे अक्षरश: पाकिस्तान मान्य केले. हिंदूस्थान फाडला गेला. दिनांक १५ ऑगस्ट १९४७ पासून हिंदुस्थानचाच एक तृतीयांश भाग आम्हाला परदेश झाला ! हिंदुस्थानला ज्ञात असलेल्या उपनृपात किंवा महाप्रशासकात सर्वात श्रेष्ठ कोण तर लॉर्ड माऊंटबॅटन अशी स्तुती काँग्रेसची वर्तुळे करू लागली. दिनांक ३० जून १९४८ च्या चांगले दहा महिने आधी त्याने तुकडे केलेल्या हिंदुस्थानाला स्वायत्त श्रेणी दिली ! आपल्या तीस वर्षांच्या अबाधित आधिपत्याने गांधीजींनी मिळवले ते हे ! काँग्रेस ज्याला स्वराज्य म्हणते ते हे ! अशा प्रचंड हत्यासत्राकडे अधिकृतपणे डोळेझाक झाल्याचे जगाच्या इतिहासात उदाहरण झाले नाही ! परिणामी जे प्राप्त झाले ते 'स्वराज्य' किंवा 'शांततामय सत्तांतर' अशाही उल्लेखाचे उदाहरण जगात नाही ! हिंदुस्थानात १९४६, ४७ आणि ४८ मध्ये जे झाले ते जर शांततामय म्हणायचे असेल तर शांततविहीन किंवा हिंसात्मक यांची व्याख्या काय करावी बरे ? हिंदु-मुस्लिम एकतेचा बुडबुडा शेवटी फुटला ! सर्वांपासून अलिप्त राहण्यासाठी म्हणून केवळ ज्ञातिप्रधान, जातिविद्वेषी राष्ट्र फुटून निघाले ! अखंड भारताच्या तोंडावरच तो फटकारा होता ! नेहरू आणि चौकडी यांच्या संगनमताने ते राष्ट्र निर्माण झाले ! त्यालाच ते स्वराज्य म्हणतात ! त्यागाने मिळालेले स्वराज्य म्हणतात ! कुणाचा त्याग ?

(अेक्स) गांधीजी आणि गोवध

गांधीजी गोरक्षणाची कळकळ मोठ्या हिरीरीने प्रकट करीत; पण गोरक्षणासाठी त्यांनी काही केले नाही. उलट एका प्रार्थनाप्रवचनात त्यांनी गोवधबंदीच्या मागणीला आपण पाठिंबा देण्यास असमर्थ असल्याचे सांगितले. त्यांच्या त्या भाषणातील हा उतारा पहा-

आज राजेंद्रबाबूंनी मला सांगितले की, गोवध बंदीचा विधी संमत केला जावा अशा आग्रहाची पन्नास सहस्र पत्रे आणि तीस सहस्र तारा त्यांना आल्या आहेत. मी या विषयावर मागेही बोललो आहे. ही पत्रे, तारा कशासाठी ? त्यांचा काहीही उपयोग नाही ! गोवध बंदीचा विधी आणि हिंदुस्थानात ? ते शक्य नाही ! गोवध करू नये असे स्वत: होऊन ज्याला वाटत नाही त्याच्यावर मी माझी गोवध बंदीची इच्छा लादू ? हिंदुस्थान हा काही केवळ

हिंदूंचा नव्हे, केवळ मुसलमानांचा नव्हे, केवळ ख्रिश्चनांचा नव्हे ! सर्वजण इथे राहतात ! आता हिंदुस्थान हिंदूंचाच झाला आहे हा वाद सर्वस्वी चुकीचा आहे ! जे जे येथे राहतात त्यांची ही भूमी आहे. एक सनातनी वैष्णव मला ठाऊक आहे, तो आपल्या मुलाला गोमांसाचे सार देत असे !

(वाय) तिरंगी ध्वजाचे उद्घाटन

गांधीजींचा मान राखण्यासाठी काँग्रेसने चरखा असलेला तिरंगी ध्वज राष्ट्रध्वज म्हणून अंगीकारला. त्या ध्वजाची असंख्य वेळा मानवंदना झाली आहे. काँग्रेसच्या प्रत्येक मेळाव्याला त्याचे ध्वजारोपण होई. अधिवेशनातून तर त्या पताका शतकांनी लावल्या जात. त्या प्रभात फेऱ्याच नसत की, ज्यांच्यासह ध्वज नेला जात नाही. काँग्रेसचे काही विजय खरे तर काही काल्पनिक असत; पण त्या प्रसंगी सार्वजनिक वास्तू, टिकाणे, राहण्याची घरे ध्वजाने सजविली जात. शिवाजीच्या भगव्या झेंड्याने हिंदुस्थानला मुसलमानी परकी जोखडातून मुक्त केले होते. शिवाजीच्या त्या हिंदू ध्वजाला कोणा हिंदूने महत्त्व दिले तर त्याची ती कृती 'जातीय' वर्गात मोडली जाई. गांधीजींच्या तिरंगी ध्वजाचे तसे नव्हते. त्या ध्वजाने कोण्या हिंदू स्त्रीला अत्याचारातून वाचविले नव्हते. की भ्रष्टीकरणापासून एखादे देऊळ संरक्षिले नव्हते. दिवंगत भाई परमानंदामोवती काँग्रेराजनांनी एकदा घेराव घातला होता. तो का तर त्यांनी तिरंगी ध्वजाला वंदना दिली नाही ! विश्वविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी हा ध्वज विश्वविद्यालयाच्या वास्तूवर फडकवून आपली राष्ट्रभक्ती व्यक्त केली होती. मुंबईच्या एका महापौराची राजमान्यता गेली असे ऐकिवात आहे. कारण काय तर त्यांच्या पत्नीने महापालिकेच्या वास्तूवर हा ध्वज लावला होता ! या त्यांच्या अंगीकृत राष्ट्रध्वजाची उंच प्रतिष्ठा काँग्रेसजनांनी ठेवली होती. गांधीजी त्या दिवसात म्हणजे १९४६ च्या संहारानंतर नवाखाली आणि टिप्पेरा भागात हिंडत होते. त्यांच्या तात्पुरत्या झोपडीवर तो ध्वज लावलेला असे. एकदा एक मुसलमान आला, त्याला तो ध्वज सहन झाला नाही. त्याने आक्षेप घेतला. झाले, गांधीजींनी आदेश दिला, ध्वज गुंडाळून ठेवा ! लक्ष लक्ष काँग्रेसजनांच्या श्रद्धा त्या ध्वजाच्या सन्मानात एकवटल्या होत्या ! त्या श्रद्धा एका क्षणात कःपदार्थ केल्या गेल्या ! हेतू असा की त्या भावना तुडविल्याने एखादा दुराग्रही मुसलमान प्रसन्न व्हावा ! आणि इतक्या आत्मावहेलनेनंतरही या महान् कॅथालिक महात्म्याची हिंदू-मुस्लिम एकता कधीही जवळ आली नाही !

● ●

निवेदन भाग ३

गांधीजी आणि स्वराज्य

७१. पुष्कळ लोकांची एक विकृत धारणा आहे : गांधीजींचा हिंदुस्थानात उद्‌भव झाला वर्ष १९१४-१९१५ मध्ये; हिंदुस्थानात स्वराज्याचे आंदोलन चालू झाले ते तेव्हापासून; आणि त्या आंदोलनाची परिसमाप्ती झाली १५ ऑगस्ट १९४७ ला. म्हणजेच राष्ट्रपित्याच्या नेतृत्वाखाली हिंदुस्थानला स्वराज्य मिळाले त्या दिवशी. या धारणेपेक्षा विपर्यस्त, खोडसाळ, असत्य धारणा पुऱ्या सहस्र वर्षांच्या इतिहासात कोणा धूर्ताने करून दिली नसेल आणि भोळ्या जनतेने त्यावर विश्वास ठेवला नसेल. गांधीजींच्या मार्गदर्शनाने स्वराज्य मिळविणे तर दूरच, त्यांच्या धोरणाने हिंदुस्थान विदीर्ण झाला, त्याला सहस्र घाव झाले, त्या घावांतून रक्तस्राव होत राहिला. स्वराज्याची तळमळ हिंदुस्थानात सदा जागी होती. ती कधीही दबू शकली नाही. मराठी साम्राज्य शेवटी १८१८ मध्ये संपुष्टात आले. ब्रिटिशांना वाटले, आता स्वातंत्र्याचे वारे काही काळ पडले आहे; पण उत्तरेत शिखांची सत्ता ब्रिटिशांच्या आधिपत्याला आव्हान देत राहिली होती. १८४८ मध्ये शिखांचा पंजाबातील गुजरात येथे पराभव झाला; पण त्या वेळेपासून १८५७ च्या उत्थानाची गर्भधारणा होत होती. सत्तावनचे उत्थान अगदी अचानक झाले. त्याला विलक्षण वेग होता. त्याची व्याप्ती मोठी होती. ब्रिटिश आपल्या पायातच लडखडू लागतील इतके भय त्याने निर्माण केले होते. आपण हिंदुस्थान सोडून जाणेच हितावह ठरेल असेही त्यांच्या अनेकदा मनात आले. १८५७ चे स्वातंत्र्यसमर या वीर सावरकरांच्या ग्रंथातील पानापानावर हिंदुस्थानच्या जनतेने ब्रिटिशांना उखडून टाकण्याच्या त्या प्रयत्नाचा इतिहास चित्रित केला आहे; पण ब्रिटिश सावरले. ते स्थिर झाले. तोच ब्रिटिशांच्या सत्तेला नव्याने आव्हान देण्यासाठी हिंदुस्थानच्या राष्ट्रसभेची - इंडियन नॅशनल काँग्रेसची - स्थापना झाली. १८८५ पासून स्वातंत्र्याची मागणी प्रथम प्रथम सांविधानिक मार्गाने केली जाई. मग सैनिकी मार्गाने. त्या मार्गाचे पर्यवसान झाले सशस्त्र प्रतिकारात. खुदिराम बोस यांच्या १९०६ मधील ध्वमाघाताने त्याची नांदी झाली.

७२. १९१४-१५ मध्ये गांधीजींचे हिंदुस्थानात आगमन झाले, त्यापूर्वी जवळजवळ सात आठ वर्षे क्रांतिकारी आंदोलन देशाच्या पुष्कळ मोठ्या भागात पसरले होते. स्वातंत्र्याची चळवळ कधीच मेली नव्हती. फिनिक्स पक्ष्याच्या कथेप्रमाणे आपल्या राखेतूनच पुन्हा तिचे उत्थान होई. गांधीजी आणि त्यांच्या

सत्य, अहिंसा या मनोलहरी यांच्या शिरकावामुळे क्रांतिकारक आंदोलनाला जणू ग्रहण लागले; पण देशाचे सुदैव होते. लोकमान्यांच्या मृत्यूनंतर गांधीजींचे नेतृत्व झाले. त्यांच्या कालखंडाला समांतर ही क्रांतिकारी चळवळही चालत राहिली. देशगौरव सुभाषचंद्र बोस, तसेच महाराष्ट्र, पंजाब, बंगाल यांतील क्रांतिकारकांना धन्यवाद असोत.

७३. काँग्रेसमधील मवाळ म्हटल्या जाणाऱ्या गटाच्या सांविधानिक मार्गानेही स्वराज्याच्या दिशेने काही प्रगती झालेली लक्षात घ्यावी लागेल. ब्रिटिशांना वर्ष १८९२ मध्ये त्या वेळच्या विधिमंडळात वाढ करणे भाग पडले होते. मग १९०९ मध्ये मोर्लेमिन्टो सुधारणा आल्या. लोकसभेच्या कामकाजात लोकनियुक्त प्रतिनिधींना आपल्या वाचेने आणि मताने भाग घेण्याचा अधिकार तेव्हा प्रथमच मिळाला. मग बारा वर्षांनी, म्हणजे पहिले महायुद्ध संपल्यावर मॉन्टेग्यु चेम्स्फर्ड यांच्या सुधारणांनी काही मर्यादेपर्यंत प्रांतिक स्वायतत्ता दिली गेली. लोकनियुक्त प्रतिनिधींची संख्या वाढविली गेली आणि केंद्रात आणि प्रांतात स्थिर स्वरूपाची अशासकीय-नॉन ऑफिशियल - बहुसंख्या केली गेली. वर्ष १९३५ मध्ये संपूर्ण प्रांतिक स्वायतत्ता मिळाली. केंद्रातही अधिकार अधिक मिळाले. परराष्ट्रीय नीतिव्यवस्था, सेनाव्यवस्था आणि काही मर्यादेतील अर्थव्यवस्था हे त्या अधिकाराला अपवाद होते. विधिमंडळाविषयी गांधीजींना रुची नव्हती. ते त्यांना वेश्यागार म्हणत. त्यावर बहिष्कार घाला अशा ते आग्रह धरीत. १९३५ पर्यंत थोड्या प्रमाणात तरी सांविधानिक प्रगती हाती आली होती. १९३५ चा विधी हा तसा फारच सदोष होता. ब्रिटिशांच्या हितसंबंधांना त्याने ठेवलेले संरक्षण आणि जातितत्त्वाचा केलेला पुरस्कार ही त्यात विशेषत्वाची हानी होती.

७४. राज्यपाल आणि महाप्रशासक यांना विशेष मत ठेवले गेले होते. हा त्या सुधारणांवरील आणखी आक्षेप होता. तरी पण, एक तर्क सुसंगत म्हणून मानावा लागेल, की जी स्वायत्ततेची श्रेणी आज एक तृतीयांश भूभाग घालविल्यानंतर आपणांस उपभोगण्यास मिळत आहे ती कितीतरी आधी मिळाली असती. गांधीजींच्या मार्गदर्शनाने त्या सुधारणांवर बहिष्कार घातला गेला नसता तर !

७५. काँग्रेसपेक्षा अलगपणे अस्तित्वात असलेल्या क्रांतिकारी पक्षाचा उल्लेख मी पूर्वी केलेलाच आहे. पुष्कळ क्रियाशील काँग्रेस कार्यकर्ते या पक्षाशी सहानुभूत असत. हे कार्यकर्ते ब्रिटिशांच्या जोखडाशी कधीच नमून नसत. वर्ष १९१४ ते १९१९ या पहिल्या जागतिक युद्धाच्या वेळी काँग्रेस उग्र (डाव्या) विचाराकडे झुकत होती. तर बाहेरून क्रांतिकारी पक्ष या डाव्यांच्या समांतर कार्य करीत होता. गदर पक्ष युरोप नि अमेरिका येथे एकाच वेळी कार्यरत होता. ब्रिटिशविरोधी

शक्तींशी संगनमत करून हिंदुस्थानातून ब्रिटिश सत्ता उखडून टाकण्याच्या तो प्रयत्नात होता. कोमागाटा मारू प्रकरण सर्वप्रसिद्ध आहे. हिंदुस्थान अशांततेने अस्वस्थ असल्याचे ज्ञान जर्मन नौसेनानीला असल्याचे निदर्शन म्हणजे मद्रास तीरावर एम्डेनने केलेला आघात. हे म्हणण्याला स्वच्छ पुरावा उपलब्ध नसला तरीही ती वस्तुस्थिती आहे; पण वर्ष १९२० पासून पुढे गांधीजींनी शस्त्रशक्तीच्या वापरावर दडपण आणले आणि क्रांतिकारी प्रणालीचा तेजोभंग केला. विरांगती म्हणजे ब्रिटिशांना सैनिक मिळावेत म्हणून काही वर्षांपूर्वीच गांधीजींनी क्रियाशील प्रचार केला होता. रौलट प्रतिवृत्तात क्रांतिकारकांच्या बळाचे विस्तारपूर्वक वर्णन केलेले आहे. वर्ष १९०६ ते १९१८ पर्यंतच्या काळात एका पाठोपाठ एक ब्रिटिश लोक आणि त्यांचे देशी पित्ये क्रांतिकारी राष्ट्रवाद्यांच्या गोळीचे बळी होत होते. त्यामुळे आपले अस्तित्वच अस्थिर असल्याचे ब्रिटिश अधिकाऱ्यांना जाणवत होते. त्यानंतर कुठे हिंदुस्थानचा परराष्ट्रीय सचिव (Secretary of state for India) या नात्याने मॉंटेग्यु हिंदुस्थानात आला आणि त्याने हिंदुस्थानला उत्तरदायी सत्ताप्रवेशाचे आश्वासन दिले. तरीही क्रांतिकारी उत्थानाची लाट काही प्रमाणातच त्याला थोपविता आली. रौलट विधीच्या निषेधाची सभा अमृतसरला जालियनवाला बागेमध्ये भरली होती. तोच अपराध मानून जनरल डायरने त्या सभेवर गोळीबार केला आणि शतकांनी माणसे मारली. त्या जालियनवाला बाग प्रकरणाने १९१९ च्या भारत शासनविधीवर काळी सावली पसरली. रौलट विधीचा निषेध करणाऱांवर मुक्तहस्त, विवेकहीन प्रहार करणारा म्हणून सर मायकेल ओडवायर कुप्रसिद्ध झाला. वीस वर्षांनंतर त्याला त्या दुर्व्यवहाराचे फळ भोगावे लागले. उधमसिंगाने त्याला लंडनमध्ये ठार मारले. मदनलाल धिंगरा, भगतसिंग, बटुकेश्वर दत्त, कान्हेरे, चंद्रशेखर आझाद, सुखदेव हे परकीय सत्तेविरुद्ध मूर्तिमंत आणि जिवंत निषेध होते. त्यांनी स्वातंत्र्याची पताका फडकवून ती उंच धरली होती. गांधीजींचे नावही ऐकू आले नव्हते, त्या वेळेपासून किंवा गांधीजींना काँग्रेसच्या घटनात्मक चळवळीचे नेतृत्व दिले गेल्यावरही काही क्रांतिकारकांनी ती ध्वजा उंच धरली होती.

७६. बंगाल आणि महाराष्ट्र येथून उगम पावलेल्या या क्रांतिसरितेने पंजाबही गाठले हे मी मागे सांगितलेच आहे. जे तरुण यात सहभागी होत ते समाजाच्या निकृष्ट थरातील नसत. ते सुविद्य होते, सुसंस्कृत होते, मोठ्या कुलशालीन घराण्यात ते वाढलेले होते. त्या घराण्यांना त्यांच्या व्यक्तिगत जीवनात प्रतिष्ठा असे, मानसन्मान असे. मातृभूमीच्या स्वातंत्र्ययज्ञात त्या तरुणांनी आपल्या सुखासीन ऐश्वर्ययुक्त जीवितांची समिधा दिली. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यमंदिराला युजलेप किंवा वज्रलेप (cement) झाला तो या हुतात्म्यांच्या रुधिराचा. लो. टिळकांनी त्या आधाराने रचना केली आणि या महात्म्याने त्या एकत्रित झालेल्या

गतीचा लाभ घेतला. १९०९ ते १९३५ या काळात जी जी सांविधानिक प्रगती वेळोवेळी करता आली ती पडद्यामागे कार्य करीत असलेल्या क्रांतिकारी चळवळीतून शक्य झाली हा माझा दृढ विश्वास आहे.

७७. क्रांतिकारी शस्त्राचाराचा नम्र मतधारकांनी निषेध केला. गांधीजींनी त्याची दिवसेंदिवस प्रत्येक व्यासपीठावरून आणि वृत्तपत्रातून भर समुदायात मानखंडना केली, निंदा केली. मात्र जनमानसाने क्रांतीच्या सशस्त्र प्रतिरोधक स्वातंत्र्येच्छु विभूतींना आपली अबोल पण पूर्ण हार्दिक अनुमती दिली यात शंकेला स्थानच नाही. आपल्या जेत्याविरुद्ध युद्ध उभे ठेवण्याला जित राष्ट्र सदा प्रयत्नशील असते. ते क्रांतिप्रणालीचे सूत्र आहे. जेत्यांशी एकनिष्ठा ते मानीत नाहीत. जेत्यांचे जेतेपण यातच जेत्यांना एक सूचना अनुस्यूत असते की, ते जितांकडून कोणत्याही क्षणी उखडून फेकले जातील. स्वामी परकीय असला तरी त्याच्याशी स्वामिनिष्ठा ठेवणे हे जितांचे कर्तव्य आहे या सूत्राने क्रांतिकारकांच्या सशस्त्र अभियानाचे मूल्यमापन होणे हे तर्कविरुद्ध आहे आणि स्वराज्याच्या संग्रामात शस्त्रबळाचा जेवढा म्हणून गांधीजी निषेध करीत तेवढीच ती प्रणाली लोकप्रिय होत राहिली. १९३१ च्या मार्चमध्ये भगतसिंगानी विधिमंडळात स्फोटगोल फेकला होता. त्या कृतीमागील साहस आणि त्यागभावना यांचा गौरव करणारा ठराव गांधीजींच्या विरोधाला न जुमानता तेथे केला होता. हा आपला पराभव गांधीजी कधीच विसरु शकले नाहीत. काही महिने उलटले होते. मुंबईचे राज्यपाल श्री. हॉटसन त्यांच्यावर श्री. गोगटे यांनी गोळ्या झाडल्या होत्या. अखिल भारतीय काँग्रेस कार्यकारिणीच्या बैठकीत गांधीजींनी ते निमित्त करून आपल्या पराभवाचा वचपा काढला. कराची काँग्रेस अधिवेशनात भगतसिंगांच्या गौरवाचा जो ठराव केला त्यामुळे गोगटे यांना हॉटसनवर गोळ्या झाडण्यास उत्तेजन मिळाले असा सरळ आरोप गांधीजींनी तेथे केला. हे विलक्षण विधान सिद्ध करण्यावे सुभाषचंद्र बोस यांनी गांधीजींना आव्हान दिले. त्याचा परिणाम असा झाला की, सुभाषबाबू लगेच गांधीजींच्या कृपेतून उतरले ! तात्पर्य, स्वातंत्र्ययुद्धात क्रांतिकारी तरुणांचा भाग कोणत्याही प्रकारे उपेक्षणीय नाही. गांधीजींमुळे हिंदुस्थानाला स्वराज्य मिळाले असे जे म्हणतात ते नुसते कृतघ्नच नव्हेत तर ते खोटा इतिहास लिहिण्याचा प्रयत्न करीत आहेत. गांधीगटाच्या हाती जोवर हिंदुस्थानची राज्यसूत्रे आहेत, तोवर १८९५ पासूनच्या स्वातंत्र्याच्या प्रयत्नांचा खरा इतिहास म्हणून लिहिला जाणे शक्य नाही. क्रांतिकारी तरुणांचा आलक्षणीय वाटा झाकून ठेवला जाईल. इतके असूनही त्या तरुणांनी फार उदात्त आणि गौरवपूर्ण काम केले आहे ही सत्यस्थिती आहे.

७८. स्वराज्यासाठी शस्त्रबळाचा वापर करा असे प्रतिपादन करणारांनाच

तेवढे गांधीजी आडवे जात असे नव्हे. गांधीजींच्या राजकीय विचारधारेपेक्षा ज्यांची विचारधारा वेगळी असे, अशा लोकांवर आणि गांधीजींची लाडकी प्रणाली जे अंगीकारीत नसत अशा लोकांवर गांधीजींनी आपल्या अवकृपेचा नेम धरला. आपल्याशी सहमत नसलेल्या लोकांचे यश सहन न करण्याचे ठळक उदाहरण सुभाष प्रकरणाने दिले आहे. सुभाषबाबूंना सहा वर्षे निष्कासित केले होते. त्याविरुद्ध गांधीजींनी कधी निषेध नोंदविल्याचे माझ्या तरी पाहण्यात नाही. मात्र हरिपुरा काँग्रेसचे अध्यक्षपद सुभाषबाबू तेव्हाच ग्रहण करू शकले जेव्हा त्यांनी शस्त्राचाराविषयीची आपली सहानुभूती काढून घेतल्याचे प्रकट केले. प्रत्यक्षात मात्र आपल्या अध्यक्षीय कालखंडात सुभाषबाबूंनी गांधीजींची री कधीच ओढली नाही. इतके असूनही सुभाषबाबूंची लोकप्रियता फार होती. गांधीजींनी सुभाषबाबूंविरुद्ध पट्टाभींच्या पारड्यात आपला प्रभाव टाकला होता. तरी पुन्हा एकदा सुभाषबाबू काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून प्रचंड बहुमताने निवडले गेले. पट्टाभींच्या स्वत:च्या आंध्र प्रदेशातूनही सुभाषबाबूंनाच बहुमत मिळाले होते. गांधीजींची शांती मात्र त्याने हादरली. त्यांनी आपला क्रोध महात्मीय पद्धतीने व्यक्त केला. सुभाषबाबूंचा विजय हा पट्टाभींचा पराभव नसून माझा स्वत:चाच पराभव आहे असे विषारी उद्‌गार त्यांनी काढले होते; पण इतक्या विषवमनाने तरी त्यांचा राग थंडावला का ? नाही ! केवळ दुष्टाव्याने सुभाष यांच्या अध्यक्षतेखालील त्रिपुरा काँग्रेसला ते अनुपस्थित राहिले. राजकोट येथे त्यांनी एक प्रतिस्पर्धी देखावा केला. एका खोडसाळ उपवासाचे त्यांनी प्रतिष्ठान मांडले. सुभाषचंद्र बोस यांना काँग्रेसच्या अध्यक्षीय आसनावरून फेकून दिले गेल्यावर गांधीजींचे द्वेषविष पूर्णपणे उतरले.

७९. सुभाषबाबूंची काँग्रेसच्या अध्यक्षपदावर फेरनिवड आणि त्यांचे खाली खेचले जाणे या घटनेतच गांधीजी आपल्या दांभिक वर्तनाने काँग्रेसला आपल्या इच्छेप्रमाणे कसे वाकवीत असत याचा संकेत मिळतो. आपण काँग्रेसचे चार आणे सभासदही नाही आणि आपणास त्या संघटनेशी काही कर्तव्य नाही अशा शब्दांत काँग्रेसपासून आपण विभक्त असल्याचा मोठा देखावा गांधीजींनी १९३४ नंतर वारंवार केला होता; पण जेव्हा का सुभाष दुसऱ्यांदा निवडून आले तेव्हा गांधीजींचा सर्व तोलच सुटला आणि निवडणुकीच्या मुळापासूनच त्यांनी पट्टाभींच्या समर्थनासाठी ढवळाढवळ केली असल्याचा प्रत्यय आला. आपण काँग्रेसचे सभासदही नाही असा उद्‌घोष करीत असतानाच काँग्रेसमधील आपापसातील कलहभावात गांधीजी प्रत्येक वेळी लक्ष घालीत आणि त्यात ते बुडलेलेही असत याचे वरील उदाहरणात स्पष्ट प्रमाण मिळते.

८०. दिनांक ८ ऑगस्ट १९४२ ला गांधीजींच्या नेतृत्वाखाली काँग्रेसने

'भारत छोडो' आंदोलन आरंभिले. लगेच काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांना, त्यांनी चळवळीला आरंभ करण्यापूर्वीच शासनाने अडकवून ठेवले. अहिंसक स्वरूपाची चळवळ तर गर्भातच जिरविली गेली. काँग्रेसमध्ये एक वेगळा गट होता तो भूमिगत झाला. या दुसऱ्या गटाला गांधीजींच्या तंत्राचे अनुकरण करून बंदिगृहात जाऊन बसण्यात स्वारस्य नव्हते. उलट बंदिगृहात जाणे शक्य तेवढे टाळण्याचीच त्यांची प्रवृत्ती होती. मधल्या काळात दळणवळण तोडणे, लुटालूट करणे, जाळपोळ करणे, हत्येसकटही शस्त्राचार करणे आणि त्यायोगे शासनाच्या घडीची अधिकात अधिक नासधूस करणे हे त्यांचे धोरण होते. करा किंवा मरा हा गांधीजींचा लोकांना आदेश म्हणजे सर्व प्रकारचे अडथळे निर्माण करण्याची, घातपाती कृत्ये करण्याची आपल्याला मोकळीकच असल्याचा अर्थ त्यांनी घेतला. खरे म्हणजे शासनाच्या युद्ध-प्रयत्नांना विकलावस्था आणण्यासाठी त्यांनी सर्व काही केले. आरक्षी चौक्या जाळल्या गेल्या, प्रेषणालयाचे दळणवळण आडदांडपणे खंडित केले गेले. उत्तर बिहारमध्ये आणि आणखी काही ठिकाणी जवळजवळ ९०० रांयान स्थानके (Railway Stations) जाळली गेली किंवा उखडली गेली. अनुशासन काही काळ थंडावण्याची स्थिती आली.

८१. ही कृत्ये काँग्रेसच्या अहिंसा या तत्त्वाशी सरळ सरळ विरोधी होती. सत्याग्रह या तंत्राशीही त्यांचा मेळ बसत नव्हता. गांधीजी त्या कृत्याचे समर्थनही करू शकत नव्हते आणि निषेधही करू शकत नव्हते. त्यांनी समर्थन केले तर त्यांचा अहिंसेतील दंभ उघडा पडला असता आणि त्या कृत्याचा त्यांनी प्रकटपणे निषेध केला तर जनतेतील त्यांची लोकप्रियता धुळीला मिळाली असती. कारण ब्रिटिशांची हिंदुस्थानातून हकालपटी हिंसेने होते की अहिंसेने, याला जनतेच्या मनात कवडीचेही मोल नव्हते. 'भारत छोडो' आंदोलन हेच मुळात आणखी कशासाठी प्रसिद्ध असण्यापेक्षा काँग्रेसच्या हिंसाचारामुळेच प्रसिद्ध होते. 'छोडो भारत' आंदोलनाच्या आरंभीच्या काही आठवड्यातच गांधीजींची अहिंसा मरून पडली होती आणि त्या नावाने चालू असलेल्या हिंसाचाराला गांधीजींपाशी स्थान नव्हते. गांधीजींचा दृष्टिकोन काँग्रेसपक्षाच्या आणि त्यांच्या सहाय्यकांच्या ८ ऑगस्ट ४२ नंतरच्या कृत्यात थोड्याच आठवड्यात लोप पावला होता. अहिंसा कोठे शिकविलीही जात नव्हती आणि आचरलीही जात नव्हती. कारण त्या चळवळीचे कार्यकर्ते गांधीजींच्याच शब्दात 'करा अथवा मरा' अशी शपथ घेतलेले होते. वर्ष १९४३ मध्ये लॉर्ड लिनलिथगो यांनी गांधीजींना आव्हान दिले. 'छोडो भारत' आंदोलनाच्या सहायकांच्या या घातपाताचे दायित्व स्वीकारा तरी किंवा धिक्कारा तरी ! तेव्हा कोठे गांधीजींना त्या घातपाताचा धिक्कार करणे भाग पडले. युद्धप्रयत्नात जो काही अडथळा झाला असेल, जी काही कुचंबणा झाली असेल, जी काही नासधूस झाली असेल, जी काही हानी

झाली असेल ती सर्व काँग्रेसच्या सहायकांच्या घातपाती कृत्यामुळे झाली आहे. महात्म्याच्या अहिंसाचारामुळे नव्हे. अहिंसा पूर्णतया कोलमडली. हिंसाचार काही अंशी प्रभावी होत आहे असे दिसू लागले होते; पण गांधीजींना बंदिगृहातूनच त्याचा निषेध करावा लागला होता. अशा प्रकारे स्वातंत्र्यासाठी चाललेल्या क्रांतिकारी प्रणालीचा गांधीजींनी तेजोभंग केला. वास्तविक ८ ऑगस्टनंतर त्यांची स्वत:ची युद्धनीतीच पूर्णपणे बारगळली होती.

८२. या वेळपर्यंत म्हणजे १९४१ च्या जानेवारीच्या आरंभी सुभाषचंद्र बोस हिंदुस्थानातून गुप्तपणे अदृश्य झाले. ते अफगाणिस्तानमार्गे बर्लिनला जाऊन तेथून जपानला जाऊन पोहोचले होते. श्री. उत्तमचंद यांनी एक पुस्तक लिहिले आहे, त्याचे नाव आहे 'बोस जेव्हा झियाउद्दीन होते.' (When Bose was Jhiauddin). सुभाषचंद्र जानेवारी १९४१ मध्ये हिंदुस्थानातून कसे निसटले आणि हिंदुस्थानच्याच सीमेतून काबूल आणि तेथून बर्लिन या प्रवासात त्यांना कोणत्या प्रकारच्या आपत्ती आल्या, काय यातना सोसाव्या लागल्या, त्याचे विस्तृत वर्णन श्री. उत्तमचंद यांनी त्या पुस्तकात लिहिले आहे. श्री. बोस यांनी अज्ञातवास कसा काढला, अडचणी निवारून सर्व संकटांवर कशी मात केली आणि ते बर्लिनला कसे पोहचले ते सर्व वर्णन अतिशय रोमांचकारी आणि चित्तथरारक आहे. १९४२ मध्ये क्रिप्स मंडळ हिंदुस्थानात आले त्यावेळेपर्यन्त सुभाष जपानला पोहोचलेही होते आणि ते हिंदुस्थानवर स्वारी करण्याचे व्यूह रचीत होते. हिटलरने सुभाषबाबूंना त्यांनी जर्मनी सोडण्यापूर्वी His Excellency हा बहुमान दिला होता आणि ते जपानला पोहोचताच जपान त्यांना ब्रिटिशांविरुद्ध हिंदुस्थानच्या मुक्तिसंग्रामात साहाय्य करण्यास सिद्ध असल्याचे आढळले. अमेरिकेच्या पर्ल पट्टणावर धावा (हल्ला) चढवून जपानने आधीच ब्रिटिशांविरुद्ध युद्धप्रवेश केला होता. जर्मनीने रशियाविरुद्ध युद्ध उद्घोषिले होते. ब्रिटन आणि फ्रान्सने इटली आणि जर्मनी आणि जपान या विरुद्ध युद्ध उद्घोषिले होते. जपान, मलाया, संयुक्त राज्ये, ब्रह्मदेश, अतिपूर्वेतील आणि इतर भाग येथे सुभाषबाबूंचे उत्साहाने स्वागत झाले आणि तेथे असलेल्या भारतीयांकडून त्यांना फार मोठे पाठबळ मिळाले.

८३. जपानने आपले युद्धप्रयत्न वेगावले होते. त्यांनी ब्रह्मदेश, डच, ईस्ट इंडीज आणि संकीर्ण मलाया राज्ये, तसेच अंदमान बेटासहित पूर्व-अतिपूर्व व्यापली होती. त्यामुळे हिंदुस्थानच्या भूमीवरच सुभाष यांना हिंदुस्थानचे लोकसत्ताक शासन उद्घोषित करणे शक्य झाले. १९४४ मध्ये जपानच्या साहाय्याने हिंदुस्थानवर चाल करण्याइतपत सामग्री त्यांना मिळाली. सुभाषबाबू जर जपान्यांच्या साहाय्याने हिंदुस्थानवर चाल करून आले तर मी सुभाषबाबूंशी लढेन असे पंडित नेहरू

यांनी घोषित केले होते. १९४४ च्या आरंभी आरंभी सुभाषबाबूंनी संघटित केलेली भारतीय राष्ट्रीय सेना किंवा इंडियन नॅशनल आर्मी किंवा आझाद हिंद फौज आणि जपानी सेना यांनी हिंदुस्थानच्या सीमेवर धडका देऊन मणिपूर राज्य आणि आसामच्या सीमेलगतचा काही भाग हस्तगत केला. I. N. A. संघटनेत अतिपूर्वेत वसलेले भारतीय होते. तसेच जपानच्या कारागृहात युद्धबंदी म्हणून कोंडलेले आणि ब्रिटिशांच्या सैन्यातून फुटलेले आणि निसटलेले सैनिक होते. त्या उपक्रमाला अपयश आले यात सुभाषबाबूंचा दोष नव्हता. त्यांचे सैनिक अभिमन्यूप्रमाणे लढले (His men fought like the Trojans); पण सुभाषबाबूंच्या अडचणीच विलक्षण होत्या. त्यांचे सैन्य आधुनिक उपकरणांनी सुसज्ज नव्हते. भारतीय राष्ट्रसेनेजवळ विमाने नव्हती, पुरवठापद्धती त्रुटित होती. पुष्कळजण भूकमारीने मेले. पुष्कळजण आजारीपणाने मेले. कारण त्यांना औषधोपचार पुरे पडू शकले नाहीत; पण सुभाषबाबूंनी त्या सैनिकांत जे चैतन्य ओतले होते ते आश्चर्यकारक होते. लोकांनी सुभाषबाबूंना नेताजी हे अभिधान दिले होते. जयहिंद ही रणघोषणा त्यांनी सुभाषबाबूंच्या नेतृत्वाने स्वीकारली होती.

८४. गांधीजी सुभाषबाबूंच्या हिंदुस्थानवरील स्वारीचे विरोधक होते. नेहरूंचा विरोध का तर सुभाषबाबूंनी जपानचे साहाय्य घेतले. सुभाषचंद्र आणि दुसरे भारतीय नेते यांच्यात जे काही विरोध असतील ते असोत. ब्रिटिश सत्ता नाहीशी करण्यासाठी सुभाषबाबूंनी केलेल्या एकहाती प्रयत्नांसाठी त्यांच्यावर लोकांचे अधिकात अधिक प्रेम होते यात शंका नाही. सुभाषबाबू जिवंत असते आणि १९४५ मध्ये जपानच्या पराभवानंतर ते हिंदुस्थानात परतले असते तर हिंदुस्थानची सर्व जनता एका राष्ट्रपुरुषाप्रमाणे एक विचाराने त्यांच्या मागे उभी राहिली असती आणि त्यांचे प्रेमभराने स्वागत केले असते. १९२० मध्ये लोकमान्य टिळक निवर्तले आणि गांधीजी निर्विरोध नेते झाले. सुभाषबाबूंच्या या विजयाने गांधीजी निष्प्रभ झाले असते; पण दैव गांधीजींना अनुकूल होते. कारण सुभाष हिंदुस्थानाबाहेर निधन पावले. मग सुभाष आणि I. N. A. यांच्यावर प्रेमवर्षाव करणे काँग्रेस पक्षाला सोपे झाले. तसेच I. N. A. मधील अधिकारी नि सैनिक यांच्यावरील राष्ट्रविख्यात अभियोगात त्यांच्या बचावासाठीही उभे राहणे सोपे झाले. तो अभियोग १९४६ मध्ये याच लाल किल्ल्यात चालला होता. सुभाषबाबूंनी अतिपूर्वेतील आपल्या सैन्यात प्रसृत केलेली 'जयहिंद' ही घोषणाही काँग्रेसने दत्तक घेतली.

सुभाष आणि त्यांची सेना यांच्या नावावर काँग्रेसजनांनी व्यापार केला. १९४५-४६ च्या निवडणुकीत काँग्रेसला विजय मिळविण्यास कारणीभूत झालेले

घटक म्हणजे त्यांचे I. N. A. वरील दिखाऊ प्रेम आणि सुभाषबाबूंचे दांभिक गुणगान. या व्यतिरिक्त आम्ही पाकिस्ताननिर्मितीस विरोध करू आणि सर्व शक्तीनिशी प्रतिकार करू असेही त्यांनी आश्वासन दिले होते. या दोन अभिवचनांमुळे त्यांनी I. N. A. सुभाष सेनेला क्वचितच आदर दाखविला आणि अर्थातच शेवटी पाकिस्तानपुढे शरणागती पत्करली आणि वचनभंग केला.

८५. हा सर्व काळ मुस्लिम लीग राष्ट्रघातक कृत्ये करीत होती. तसेच हिंदुस्थानची सामाजिक शांतता नि सुव्यवस्था उद्ध्वस्त करीत होती. त्यांचे हिंदूंविरुद्ध हत्याकारी सत्र चालू असे. लॉर्ड वेव्हेल नि लॉर्ड माऊंटबॅटन हे अलिप्तपणे बघत राहिले. ह्या घाऊक हत्याकांडाचा निषेध करण्यास किंवा ते थांबविण्यास काँग्रेस धजत नसे. कारण त्यायोगे कोणत्याही मूल्याने मुस्लिम तुष्टीकरण करणे या तिच्या धोरणाला बट्टा लागावयाचा ! आपल्या सार्वजनिक कार्याच्या साच्यात जे जे बसत नसे ते ते गांधीजी दाबून टाकीत. म्हणून गांधीजींनी स्वराज्य मिळविले असा पुन्हा पुन्हा जेव्हा कानीकपाळी ओरडा केला जातो तेव्हा मी स्तिमित होतो. मुस्लिम लीगपुढे सदानूकदा लांगूलचालन हा खरोखरच स्वराज्य मिळविण्याचा मार्ग नव्हता हे माझे स्वत:चे मत आहे; त्याने एक आग्यावेताळ मात्र निर्माण झाला. त्या वेताळाने आपल्या निर्मात्यालाच गिळून टाकले आणि हिंदुस्थानच्या भूमीचा १/३ भाग खाल्ला. एक मित्रताहीन आक्रमक शत्रुवत् राष्ट्र शेजारी सदाचे उभे ठेवले. स्वराज्य मिळविण्याविषयी बोलायचे तर गांधीजींचा वाटा त्यात फारच थोडा होता हे माझे मत आहे; पण तरीही ते एक कळकळीचे देशभक्त होते हे स्थान त्यांना देण्यास मी सिद्ध आहे. त्यांच्या शिकवणुकीचे परिणाम मात्र विपरीत झाले. त्यांच्या नेतृत्वाने देशाची फसगत झाली. माझ्या मते अभिनव हिंदुस्थानचे सर्वश्रेष्ठ नेते आणि हुतात्मा सुभाषचंद्र बोस हे होत. त्यांनी जनतेची क्रान्तिकारी प्रवृत्ती जागी ठेवली, वाढविली आणि हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यासाठी वेळ पडली तेथे सशस्त्र उत्थानासकट सर्व मान्यवर मार्ग अवलंबिले. गांधीजी आणि त्यांचे संधिसाधू गण यांनी सुभाषबाबूंना नष्ट करण्याचा प्रयत्न केला. यासाठी भारतीय स्वातंत्र्याचे शिल्पकार म्हणून गांधीजींचे नाव पुढे करणे सर्वथैव अयोग्य आहे.

८६. ब्रिटिशांनी हिंदुस्थान सोडले त्याची मुख्यत: तीन कारणे आहेत. त्यात गांधीजींच्या प्रणालीचा समावेश नाही. त्या तीन कारणांची विभागणी अशी -

(१) भारतीय क्रांतिकारकांच्या १८५७ ते १९३२ पर्यंतच्या चळवळी म्हणजे चंद्रशेखर आझाद यांच्या अलाहाबाद येथील हौतात्म्यापर्यंत. १९४२ ची भारतभर पसरलेली क्रांतिपूर्व चळवळ. गांधीजींची अहिंसाप्रणीत चळवळ नव्हे; आणि सुभाषचंद्र बोस यांनी दिलेला सशस्त्र संघर्ष की ज्या योगे क्रांतिकारी उत्थान सैनिकांपर्यंत

पसरले आणि ज्यायोगे हिंदुस्थानातील ब्रिटिश सत्तेचा पायाच खिळखिळा झाला. गांधीजींनी या सर्व परिणामकारक प्रयत्नांचा निषेध केला होता.

(२) देशभक्तीने प्रेरित होऊन ज्यांनी विधिमंडळातून पूर्ण सांविधानिक पद्धतीने ब्रिटिशांशी लढा दिला; त्यांनाही तसेच चांगले श्रेय द्यावे लागेल. त्यांनी भारताच्या राजकारणात भरीव प्रगती केली. जे जे मिळेल ते पदरात पाडून घ्यावे आणि पुढच्यासाठी भांडत राहावे असे या गटाचे धोरण होते. लो. टिळक, न. चिं. केळकर, सी. आर. दास, विठ्ठलभाई पटेल (मा. सरदार पटेल यांचे बंधू), पंडित मालवीय, भाई परमानंद आणि अलीकडील दहा वर्षांत हिंदुमहासभेचे नेते हे या गटाचे प्रतिनिधित्व करीत होते; पण या विचारप्रणालीच्या त्यागी आणि बुद्धिमंत लोकांचा गांधीजींनी स्वतःही उपहास केला आणि त्यांच्या अनुयायांनीही अवहेलना केली. त्यांना ते आरामसाधू, सत्तासाधू म्हणू लागले. त्यांनी मात्र शेवटी तोच मार्ग चोखाळला होता.

(३) ब्रिटिशांना सत्तांतर करावे लागले त्याचे आणखी एक; पण तितकेच महत्त्वाचे कारण आहे. दुसऱ्या महायुद्धामुळे ब्रिटन जणू दिवाळखोर बनले होते. त्यांची आर्थिक स्थिती भयप्रद होती. त्यावेळी श्रमिक पक्षाचे अधिकारपदावर येणे आणि चर्चिलचे उच्चाटन होणे हे ते कारण आहे.

८७. गांधीय प्रणाली जोवर उघीत होती तोवर वंचना हाच त्याचा अपरिहार्य परिणाम होता. कोणाही देशभक्त क्रांतिकारकाचा त्यांनी सदा विरोधच केला. वस्तुनिष्ठ, व्यवहारी, विचारी गटाचा किंवा व्यक्तीचा त्यांनी विरोध केला, आणि आपला चरखा, अहिंसा नि सत्य यांचा उदो उदो चालविला. चरख्याच्या ३४ वर्षे चाललेल्या अट्टहासाचा परिणाम काय ? तर येथील वस्त्रव्यवसायात यंत्रचलित वस्त्रनिर्मितीची २०० टक्क्यांनी वाढ ! एक टक्का लोकांना आच्छादण्यास सुद्धा आज चरखा असमर्थ आहे. आता अहिंसेचे म्हणाल तर चाळीस कोटी लोकांनी आपले जीवन त्या उंच पातळीवर न्यावे अशी अपेक्षा ठेवणेच तर्कविसंगत होते आणि १९४२ मध्ये त्यांच्या अहिंसेचे ढळढळीतपणे तीन तेरा वाजले. आणि सत्य ? सर्वसामान्य काँग्रेसजनांचे सत्यवादित्व जनसाधारणाच्या सत्यवादित्वाच्या स्तरावर नाही इतकेच नव्हे तर काँग्रेसजनांचे असत्यवादित्वच असते. पण त्याला दांभिक सत्यतेचे झिरझिरीत आवरण असते असा वारंवार प्रत्यय येतो एवढे तरी मला म्हणता येईल.

● ●

१. नथुराम गोडसे
२. नाना आपटे
३. विष्णु करकरे
४. शंकर किस्तैया
५. मदनलाल पाहवा
६. वीर सावरकर
७. गोपाळ गोडसे



(दि. २७/५/१९४८ चे न्यायालयातील चित्र)

निवेदन भाग ४

ध्येयभंजन
(Frustration of Ideal)

८८. खरे बोलायचे म्हणजे गांधीजींनी आपल्या हिंदुस्थानातील आगमनासहच पुरस्कारिलेली हिंदु-मुस्लिम एकतेची कल्पना पाकिस्तानच्या निर्मितीसहच संपुष्टात आलेली होती. कारण हिंदुस्थान हे एक अविभाज्य राष्ट्र असल्याच्या वस्तुस्थितीचा मुस्लिम लीग विरोध करीत आलेली होती आणि आम्ही भारतीय नव्हे असे त्यांनी पुन्हा पुन्हा म्हटले होते. गांधीजींनी स्वतःच पुरस्कारलेली हिंदु मुस्लिम एकता ही या प्रकारची नव्हती. स्वातंत्र्याच्या संग्रामात हिंदु आणि मुसलमान यांनी बंधुभावाने भाग घ्यावा हे त्यांना हवे होते आणि हिंदु-मुस्लिम एकतेची तीच त्यांची कल्पना होती. हिंदूंनी गांधीजींचा उपदेश मानला. मुस्लिमांनी प्रत्येक प्रसंगी तो धुडकावला आणि हिंदूंना अपमानास्पद होईल असे वर्तन ठेवले. त्याचा परिणाम म्हणजे हिंदुस्थानचे शेवटी भंजन झाले.

८९. गांधीजी आणि जिना यांचे परस्पर संबंधही बघण्याजोगे आहेत. एक राष्ट्रीय म्हणून १९२० पर्यंत वावरत असलेले जिना त्यानंतर हेकट जातीयवादी झाले. त्यानंतर त्यांनी एक स्पष्ट धोरण पुढे मांडले की, मुस्लिम जातीचे हित बघणे हे माझे उद्दिष्ट आहे आणि मुसलमानांनी काँग्रेस नेत्यांवर विश्वास ठेवू नये, मुसलमानांनी काँग्रेसशी सहकार्य करू नये आणि स्वातंत्र्याच्या लढ्यात भाग घेऊ नये. जिनांनी ही सूत्रे अगदी उघडपणे प्रचारिली. पाकिस्तानची मागणीही त्यांनी मोकळेपणाने मांडली. तत्त्वतः म्हणाल तर त्यांनी कोणाची फसवणूक केली नाही. उघड उघड शत्रुपक्ष म्हणूनच ते वागत होते. हिंदुस्थानच्या फाळणीविषयी ते सहज आणि न अडखळता बोलत असत.

९०. गांधीजी जिनांना पुष्कळ वेळा भेटले आणि ते त्यांच्याकडेही पुष्कळदा गेले. प्रत्येक वेळी ते जिनांना भाई जिना म्हणून संबोधीत. जिनांना हिंदुस्थानचे महामंत्रिपदही देऊ केले; पण जिनांनी कोणत्याही वेळी सहकार्याचा कलही दाखविला नाही.

९१. ज्याचे आपण एवढे स्तोम ऐकतो तो गांधीजींचा आतला आदेश (Inner Voice), त्यांचे दैवी बळ आणि त्यांचे अहिंसेचे पुराण हे सर्व जिनांच्या घट्ट मनापुढे लुळे पडले आणि सामर्थ्यहीन ठरले.

९२. आपल्या दैवी सामर्थ्याचा जिनावर काही प्रभाव पडत नाही हे कळताच गांधीजींनी आपले धोरण तरी बदलावयास हवे होते किंवा आपला

पराभव तरी मान्य करावयास हवा होता. तसेच भिन्न मते असलेल्या दुसऱ्या राजकीय पक्षांच्या नेत्यांना त्यांनी जिनांच्या आणि लीगच्या समाचाराला वाट मोकळी करून द्यावयास हवी होती; पण ते करण्याइतके गांधीजी प्रामाणिक नव्हते. राष्ट्रीय हितासाठीसुद्धा ते आपला अहंगंड अथवा मीपणा विसरण्यास सिद्ध नव्हते. अशा प्रकारे व्यवहारी राजकारणाला कोठे वाव नव्हता आणि गांधीजींचे मोठाले प्रमाद, हिमालयाएवढे अपराध, सारखे चालूच होते.

९३. नौआखालीच्या भयानक हत्याकांडानंतर जवळ जवळ वर्षभर सतत आपला देश जणू रक्ताच्या समुद्रात नाहात होता. मुसलमानांनी मानवतेचीच भयंकर चिरफाड चालविली. हिंदूंची काही ठिकाणी प्रतिक्रिया उमटली. पूर्व पंजाब, बिहार किंवा दिल्ली येथील हिंदूंचे मुसलमानांवरील आघात म्हणजे केवळ प्रतिक्रिया होती. मुस्लिम बहुसंख्य प्रांतांत हिंदूंवर मुसलमानांनी जे अनन्वित अत्याचार केले तेच या प्रतिसादांचे मूळ कारण होते. गांधीजींना ही गोष्ट ठाउक नव्हती असे थोडेच होते ? पण ते ठाउक असूनही गांधीजी हिंदूंच्याच अशा प्रतिकाराचा कडाडून निषेध करीत सुटले. नौआखाली आणि इतर भागात मुसलमानांनी केलेल्या हत्याकांडाची प्रतिक्रिया म्हणूनच मुख्यत: बिहारमध्ये असंतोष भडकला आणि प्रतिक्रिया झाली; पण ती नियंत्रणात आणण्यासाठी मात्र काँग्रेस शासनाने आम्ही तुमच्यावर विस्फोटक वर्षाव करू (Bombarding) अशी हिंदूंना धमकावणी देण्यापर्यंत प्रगती केली ! आपल्या प्रार्थनातून गांधीजींचा उपदेश असे. पाकिस्तानात असलेले हिंदू आणि शीख यांची सरसकट आणि संपूर्ण कत्तल झाली तरी हिंदुस्थानातील हिंदूंनी मात्र मुसलमानांना आदराने आणि उदारतेनेच वागविले पाहिजे. तसेच सुऱ्हावर्दी हा गुंडांचा दादा असला तरी त्याला दिल्लीतून मोकळेपणे आणि सुरक्षितपणे हिंडता आले पाहिजे. प्रार्थना प्रवचनातील खाली दिलेल्या उदाहरणावरून हे प्रमाणित होईल.

(अ) आपण वाहवले जात असताना आपण थंड मनाने विचार केला पाहिजे. मुसलमानांनी हिंदूंचा निर्वंश करण्याचे जरी ठरविले तरीसुद्धा हिंदूंनी मुसलमानांवर रागावता कामा नये. आपल्या सर्वांच्या गळ्यावर जरी त्यांनी सुरी फिरविली तरीही आपण धैर्याने मृत्यूला भेटले पाहिजे. ते जगावर राज्य का करीनात आपण जग व्यापून टाकू, जगाशी एकरूप होऊन जाऊ. निदान मृत्यूला तरी आपण भिता कामा नये. आपले जीवन आणि मरण याने तर नियती चालते. मग त्यासाठी दु:ख का ? आपण हसतमुखाने मेलो तर आपण पुन्हा नव्या जीवनात प्रवेश करू. आपण एक नवीन हिंदुस्थान निर्माण करू. (६-४-४७)

(ब) रावळपिंडीहून आलेले जे थोडे लोक आज मला भेटले ते खरोखरच

शूर होते. व्यापार हा त्यांचा जीवनक्रम होता, मी त्यांना सांगितले थंड राहा. शेवटी परमेश्वर मोठा आहे. देव नाही असे स्थानच नाही. देवाचे नाव घ्या. त्याचे ध्यान करा. सर्व काही सुरळीत होईल. पाकिस्तानात जे अद्याप राहिले आहेत, त्या हिंदूंचे काय ? असे त्यांनी मला विचारले. मी त्यांना विचारले, मुळात आधी तुम्हीच इथे का आलात ? तुम्ही तिथेच का मेला नाहीत ? आपण जेथे वाढलो ते स्थान आपण सोडू नये. आपल्यांला क्रूरपणे वागविले तरीही सोडू नये किंवा आपण ठार मारले जात असलो तरीही सोडू नये अशी माझी अद्यापि श्रद्धा आहे. लोक आपणाला ठार मारणार असतील तर आपण सुखाने मरू या; पण देवाचे नाव ओठावर ठेवून आपण शूरासारखे मरू या. आपले नातेवाईक जरी मारले गेले, आपली माणसे जरी मारली गेली, तरी कोणावर आपण क्रोध का करावा ? ते मारले गेले तरी त्यांचा योग्य असाच अंत झाला. त्यांना सद्गती मिळाली हे आपण जाणले पाहिजे. आपल्या सर्वांनाच परमेश्वर तसे घडवू दे. देवाने आपल्याला तसेच मरण द्यावे, देवाजवळ काही मागणे असेल तर ते हेच असावे. मी त्या रावळपिंडीच्या रहिवाशांना सांगितले आणि तेच मी तुम्हालाही सांगेन की, तुम्ही त्या शीख आणि हिंदू निर्वासितांना जाऊन भेटा आणि त्यांना नम्रपणे सांगा की, सैन्य किंवा शिपाई (आरक्षी) यांचे सहाय्य न घेताच तुम्ही पाकिस्तानात आपल्या स्थानी परत जा. (२३-९-४७)

(क) पंजाबमध्ये जो म्हणून मेला आहे तो काही परत येत नाही. आपल्या सर्वांची अंतिम गती तीच आहे. त्या सर्वांचे 'हत्याकांड' झाले आहे हे खरे आहे; पण मग काही जण महामारीने मरतात तर काही आणखी काही प्रकारांनी ! जन्माला आला त्याला मरण आहेच. जे मेले ते शौर्याने मेले असतील तर त्यांची हानीच काहीच झाली नाही. उलट त्यांनी काहीतरी मिळविले आहे; पण ज्यांनी लोकांचे शिरच्छेदन केले आहे त्यांचे काय करायचे हा प्रश्न आहे. मनुष्य चुकतो आणि हा सिद्धांत आपण मानला पाहिजे. चुकांचा जुडगा म्हणजे मनुष्य. पंजाबात आपल्याला संरक्षण आहे ते ब्रिटिशांच्या सैन्याचे; पण ते संरक्षण आहे काय ? अगदी मूठभर लोक असले तरी त्यांनीही स्वत:चे संरक्षण करावे हे मला हवे आहे. त्यांनी मरणाला भिता कामा नये. शेवटी मारणारे कोण असणार ? तर आपले मुसलमान बंधू. आणखी कोणी नव्हेत; धर्म बदलला म्हणून का ते बंधुत्वाचे नाते तुटेल ? मग ते तसे वागणार नाहीत काय ? बिहारच्या स्त्रियांशी आम्ही काय करायचे बाकी ठेवले आहे ?

९४. केवळ नैसर्गिक प्रतिक्रिया म्हणून हिंदूंमध्ये प्रतिशोधाची भावना उत्पन्न झाली हे गांधीजींनी लक्षात घेण्यास हवे होते. हिंदू असणे हाच केवळ अपराध असल्याने मुस्लिम प्रांतातून सहस्रावधी हिंदूंची कापणी चालली होती. या दुर्दैवी

जीवांना सहाय्य पोचविणे किंवा त्यांना संरक्षण देणे याला आपले शासन अगदीच असमर्थ ठरले होते. त्या प्रांतांतील हिंदूंच्या वेदनांच्या लाटांचे प्रतिसाद दुसऱ्या प्रांतातील हिंदूंच्या मनात घुमू लागावेत हे अनैसर्गिक ठरावे काय ? ते अनैसर्गिक नव्हतेच. कारण त्या प्रतिक्रिया म्हणजेच मनुष्यत्वाची किंवा मानवतेची चिन्हे होती. त्या त्या प्रांतातील आपल्या बांधवांवरील अत्याचारांचे आणि त्यांच्या दुःखाचे काही प्रमाणात निवारण व्हावे आणि त्यांना संरक्षण मिळावे याच हेतूने मुसलमानांवर प्रतिशोध घेतला गेला. मुसलमानांनी केलेल्या छळांना पायबंद बसविण्यास तोच एक उपाय आहे ही हिंदूंची भावना होती. पाकिस्तानमधील हिंदूंना संरक्षण देण्यास भारत शासन असमर्थ असल्याचे हिंदूंनी जेव्हा पाहिले तेव्हाच त्यांनी विधी स्वतःच्या हाती घेण्याचा विचार केला. बिहार व अन्य प्रांतांत हिंदूंनी घेतलेला प्रतिशोध म्हणजे अपरिहार्य हिंदूमध्ये जी सहज प्रतिकारप्रवृत्ती उत्पन्न झाली त्याचे ते प्रतीक होते. ती भावना वेळी दैवीही असते आणि दयेच्या भावनेइतकीच नैसर्गिकही असते.

९५. राज्यकर्त्यांच्या दुष्कृत्यांविरुद्ध तीव्र असंतोषाची अशा प्रकारची भावना मनात साठवल्यावरच त्याचा स्फोट होऊन अनेक मोठ्या राज्यक्रांत्या यशस्वी झाल्या आहेत. दुष्ट अहंवाद्यांविरुद्ध (Dictator) अशी असंतोषाची, प्रतिकाराची आणि प्रतिशोधाची भावना कधी जागीच झाली नाही तर क्रूर शासकाच्या रक्तेला कधी आळा घालणेच शक्य होणार नाही. रामायण, महाभारत यांसारख्या प्राचीन ग्रंथांत वर्णन केलेले प्रसंग किंवा इंग्लंड-अमेरिकेचे जर्मनी-जपानविरुद्धचे अलिकडचे युद्ध यात याच प्रकारच्या क्रिया आणि प्रतिक्रियांचे दर्शन होते. त्याला चांगले म्हणा किंवा वाईट, मनुष्य-स्वभाव शेवटी असा आहे.

९६. हिंदुस्थानच्या राजकारणाच्या दृष्टीने विचार करता स्वातंत्र्यासाठी झालेल्या कित्येक लढ्यांना गांधीजी विरोधी कसे होते याचे विवेचन मी दुसऱ्या ठिकाणी दिलेच आहे. स्वतःच्या राजकीय धोरणात त्यांचे वर्तन सुसंबद्ध नव्हते. शेवटच्या युद्धाविषयी तर त्यांच्या वर्तनाची संगती लक्षातच येत नव्हती.

९७. इंग्लंड आणि जर्मनी यांच्यात चाललेल्या युद्धात आपण काही साहाय्य द्यावयाचे नाही हे त्यांनी घोषित केले. युद्ध म्हणजे हिंसा नि त्याला मी कसे सहाय्य देऊ ? असे ते म्हणत; पण गांधीजींचा धनाढ्य मित्रपरिवार आणि गांधीजींचे अनुयायी यांनी युद्धसाहित्य पुरविण्याचे ठेके घेतले आणि आपली संपत्ती फुगविली ! नावे काय सांगायची ? बिर्ला, डालमिया, वालचंद हिराचंद, नानजीभाई, कालीदास इत्यादी धनिकांची नावे कोणाला ठाऊक नाहीत ? त्यातील प्रत्येकाने गांधीजी आणि त्यांचे काँग्रेसजन यांना भरपूर साहाय्य केले आहे. या रक्तरंजित युद्धातूनच त्यांनी धनसंचय केलेला असूनही गांधीजींनी ते धन

कधी नाकारले नाही. सेनासाहित्य पुरविण्याचे ठेके घेऊ नका असे गांधीजींनी त्यांना कधी सांगितले नाही. इतकेच नव्हे तर काँग्रेस खादी भांडारातील कांबळी सैन्याला पुरविण्याच्या अनुबंधाला (Contract) गांधीजींनी संमती दिली होती.

९८. वर्ष १९४४ मध्ये गांधीजी बंदिवासातून सुटले. पाठोपाठ काँग्रेसचे दुसरे नेतेही सुटले; पण त्या आधी, आम्ही जपानविरोधी युद्धात शासनाला सहकार्य देऊ असे आश्वासन त्यांना द्यावे लागले होते. गांधीजींनी या आश्वासनाला विरोध तर केला नाहीच; पण शासनाच्या या अटीला पाठिंबा दिला.

९९. मनोधारणा आणि तर्क यांच्या सुसंगतीला गांधीजींच्या राजकारणात स्थानच नव्हते. ते ज्याची सत्य अशी व्याख्या करतील तेच सत्य. त्यांच्या राजनीतीचा पाया काय तर आत्म्याची शक्ती, अंतरीचा आदेश, उपवास, प्रार्थना मनाची शुद्धता यासारख्या भाबड्या समजुती !

१००. हिंसेने मिळणाऱ्या आजच्या स्वराज्यापेक्षा अहिंसेने एक सहस्र वर्ष उशिरा मिळणारे स्वराज्य अधिक स्वीकारार्ह व श्रेष्ठ राहील असे गांधीजी एकदा म्हणाले. ते म्हणाले तसे वागले की त्यांचे वर्तन त्यांच्या शब्दांना काटून गेले याचा थोडासा तर्क वर दिलेल्या उदाहरणांनी करता येईल.

१०१. गांधीजींचे त्यांच्या अहिंसा तत्त्वाशी विसंगत असलेले अगदी अलिकडील उदाहरण विशेषत्वाने बघण्यासारखे आहे. पाकिस्तानच्या पाठीवर लगेच काश्मीरचा प्रश्न जन्मला. काश्मीर जिंकून घशात घालण्यासाठी पाकिस्तानने काश्मीरवर हल्ला चढविला. काश्मीरच्या महाराजांनी नेहरू शासनाचे साहाय्य मागितले. नेहरू शासनाने साहाय्य देऊ केले; पण ते शेख अब्दुल्लाला मुख्य प्रशासक नेमावे या अटीवर. पं. नेहरू प्रत्येक महत्त्वाच्या प्रश्नावर गांधीजींचा विचार घेत असत. काश्मीर ही पं. नेहरूंची जन्मभूमी म्हणून आपण सैनिक साहाय्य दिले तर आपल्यावर पक्षपाताचा आक्षेप येण्याची शक्यता आहे, या धारणेने नेहरूंनी स्वत:चा बचाव म्हणून काश्मीरात सैन्य धाडण्याविषयी गांधीजींचा विचार घेतला. गांधींनी तशी अनुमती दिल्यानंतरच नेहरूंनी काश्मीरच्या प्रतिरक्षणाला सैन्य धाडले. नेहरूंनीच एकदा आपल्या भाषणात ही वस्तुस्थिती सांगितली.

१०२. टोळीवाल्यांचे काश्मीरवर आक्रमण झाले. याला पाकिस्तानचे पाठबळ हा कणा होता. हे आपल्या राजकीय नेत्यांना आरंभीपासूनच ठाऊक होते. त्यामुळे काश्मीरच्या साहाय्याला सैन्य धाडणे म्हणजेच शस्त्रशक्तीच्या बळावर युद्धाचा उद्घोष करणे होते. गांधीजींनी सर्व जगाला तसे वारंवार सांगितले होते; पण त्यांनी काश्मीरसाठी सैन्य धाडण्यास नेहरूंना मात्र संमती दिली. काश्मीरमध्ये आज जे काही चालले आहे त्यावरून एकच निष्कर्ष काढता येतो. फाडलेल्या हिंदुस्थानाला स्वराज्य मिळाल्यानंतर आपल्या शासनाने लढाईचा

मार्ग अवलंबिला, की ज्या लढाईत माणसे मारण्याची यंत्रसामुग्री वापरली जाते आणि अशा रक्ताने डबडबलेल्या लढाईला अहिंसावादी गांधीजींचे आशीर्वाद होते !!!

१०३. गांधीजींचा आपल्या अहिंसेवर विश्वास होता ना ? मग त्यांनी काश्मीरसाठी सशस्त्र सेना धाडू नका, सत्याग्रही पथके पाठवा अशी सूचना द्यायची होती. तो प्रयोग तरी करून बघायचा होता. बंदुका नकोत तर टकळ्या पुरवा आणि तोफांच्या ऐवजी चरखे धाडा असा आदेश द्यायचा होता. अनायसे त्यांना सुवर्णसंधी मिळाली होती. स्वराज्याचा नुकताच उदय होत होता. अशा उष:कालात एक प्रयोग म्हणून आपल्या सत्याग्रहात काय चमत्कारपूर्ण शक्ती असते ते त्यांनी दाखवायचे होते !

१०४. पण गांधीजींनी तसले काही केले नाही. स्वतंत्र हिंदुस्थानचा जन्म झाला आणि लगोलग गांधीजींनी आपल्या मनाच्या इच्छेने नवे युद्ध चालू केले. या विसंतीचा अर्थ काय ? अहिंसा अहिंसा म्हणून ज्या तत्त्वाला मिठी मारून ते बसले होते त्या अहिंसेला इतक्या क्रूरपणे त्यांनी कसे तुडविले ? मला विचाराल तर या त्यांच्या विसंगत वर्तनाचे कारण उघड आहे. ते कारण म्हणजे शेख अब्दुल्लासाठी हे युद्ध खेळले जात आहे ! काश्मीरची प्रशासन सत्ता मुसलमानांकडे जात होती आणि एवढ्याच कारणासाठी केवळ गांधीजींनी शस्त्रबळाने टोळीवाल्यांचा नि:पात करण्यास अनुमती दिली. गांधीजी काश्मीरमधील रक्तपाती युद्धाच्या वार्ता वाचीत होते. आणि त्याच वेळी मुसलमान दिल्लीत सुरक्षित नाहीत म्हणून आमरण उपवास करीत होते ! पण काश्मीरवरील हल्लेखोरांसमोर जाऊन उपोषणाचे ठाण मांडण्याचे त्यांच्यात धाडसच नव्हते ! टोळीवाल्यांविरुद्ध सत्याग्रहाचे अनुष्ठान आचरण्याचेही त्यांना मनोबळ नव्हते ! त्यांचे उपवास हिंदूंना वाकविण्यासाठीच असत.

१०५. सध्याच्या या विसाव्या शतकात अराला एखादा दांभिक पुरुष अखिल हिंदुस्थानच्या राजकारणाचा नेता मानला जावा ही वस्तुस्थितीच मला दुर्दैवी वाटली. हैद्राबाद राज्यात चाललेल्या हिंदुंवरील अत्याचाराने या महात्म्याचे हृदय द्रवले नाही आणि त्याने निजामाला आपली गादी सोडून जाण्यास कधी सांगितले नाही. गांधीजींच्या तत्त्वाच्या प्रभावाने अशा प्रकाराने जर हिंदुस्थानचे राजकारण चालावयाचे असेल तर आपले स्वातंत्र्य, ते विभाजित भूमीचे का असेना टिकवणेच अशक्य होईल. हे विचार माझ्या मनात वारंवार येऊ लागले. माझे मन त्याच विचारात बुडून असे. वर वर्णिलेल्या घटना घडत होत्या आणि त्याच वेळी १३ जानेवारी १९४८ ला गांधीजींच्या हिंदु-मुस्लिम एकतेचा उपवास उद्घोषिला गेला. आणि मग मात्र माझ्या भावनांवरील नियंत्रण उडून

गेले.

१०६. गेली चार वर्षे मी एका दैनिक वृत्तपत्राचा संपादक म्हणून काम करीत आहे. त्याआधी सुद्धा माझा बहुतेक वेळ लोकसेवेत गेला आहे. असे असल्याने हिंदुस्थानातील राजकीय वाटचालीकडे लक्ष ठेवण्याचा माझा व्यासंग होता.

१०७. मुस्लिम लीग, काँग्रेस आणि हिंदुमहासभा या तीन संस्थातील आपआपसातील संबंधाची मला कल्पना होती. मुस्लिम लीगने काँग्रेसला नेहमीच हिंदुसंस्था म्हणून संबोधले तर हिंदुसंस्था या संबोधनाने काँगेसनेत्यांना लाज वाटली. 'जातीय' हे विशेषण काँगेसला शिवीप्रमाणे झोंबत असे.

१०८. एखादी संस्था एका विशिष्ट गटाचे हितसंबंध राष्ट्रीय विचारधारेला बाधा न आणता बघत असेल तर वस्तुतः तिला जातीय म्हणून का हिणवले जावे ? एखादी संस्था राष्ट्रीय भावनेचा हेतूच चुरगळून एखाद्या गटविशेषाचे हित बघू लागले तर मात्र तिला स्वार्थलोलुप किंवा 'जातीय' धारणेची म्हणणे योग्य होईल; पण काँग्रेसजवळ असा तरतमभावच नाही. काँग्रेस ही मुस्लिम लीग आणि हिंदुमहासभा यांना जातीय संस्था म्हणून संबोधते. जातीय हा शब्द अवहेलनादर्शक म्हणून ती वापरते; पण काँग्रेसने मात्र मुस्लिम लीगच्या प्रत्येक मागणीपुढे नमते घेतले आणि पूर्णपणे राष्ट्रीय असलेल्या महासभेच्या ध्येयधोरणाची नोंदही घेतली नाही ही गोष्ट विशेष लक्षात घेण्याजोगी आहे. हिंदुसभा हिंदुसभेचे नेते यांच्या विरुद्ध काँग्रेसने विपर्यस्त, खोडसाळ प्रचार केला हीही लक्षात घेण्याजोगी गोष्ट आहे.

१०९. मुस्लिम लीग मुसलमानांचे प्रतिनिधित्व करते हे काँगेसने मान्य केले याच तर्काने किंवा त्याच नात्याने हिंदुसभा हिंदूंचे प्रतिनिधित्व करते हे काँग्रेसने मान्य करावयास हवे होते. निदानपक्षी आम्ही हिंदूंचे हित बघू असे काँगेसने प्रकटपणे सांगावयास हवे होते; पण ते काँग्रेसने केले नाही. काँग्रेसच्या या सर्व वर्तनाचा परिणाम म्हणजे मुस्लिम लीगसारखी शक्तिमान संस्था मुसलमानांचे हित बघण्यासाठी अस्तित्वात होतीच. या उप्पर जे थोडे मुसलमान काँग्रेसचे सदस्य होते तेही मुसलमानांचेच हित बघू लागले. हिंदूंचे हित बघण्यास मात्र कोणीच नव्हते. हिंदूसभेला जातीय म्हणून अवमानित करणाऱ्या काँग्रेसने, लॉर्ड वेव्हेलने सिमल्यास जी परिषद बोलविली त्या परिषदेत मुसलमानांचे पन्नास टक्के प्रतिनिधित्व मान्य केले. इतकेच नव्हे तर गांधीजींच्या संमतीने काँग्रेसचे नेते आपण त्रैवर्णिक हिंदूंचे प्रतिनिधी म्हणवून घेण्यास सिद्ध झाले. काँग्रेसने घेतलेली ही भूमिका म्हणजे अतिशय खालच्या थरावीच जातीयता होती आणि तिने जी मुस्लिम तुष्टीकरणाची नीती अवलंबिली तिचे हे फळ होते.

११०. काँग्रेस या संस्थेच्या पायाभरणीतच आपल्या राष्ट्रीय वृत्तीच्या नेत्यांनी संपूर्ण हिंदुस्थानचे संपूर्ण लोकसत्ताक पद्धतीचे स्वातंत्र्य मिळविणे हे लक्ष्य ठेवून त्यासाठी त्याग केला, अनेकांनी प्राणार्पण केले; या विशाल देशातील बहुसंख्य आणि अल्पसंख्य जातिविशेषात परस्पर सहकार्याची भावना निर्माण व्हावी म्हणून निरंतर प्रयत्न केले; स्वातंत्र्याच्या लढ्यात आज पाकिस्तान म्हणून तुटलेल्या पंजाब, बंगाल, सिंध, वायव्य सीमाप्रांत या भागांचा वाटा देशातील इतर भागांच्या वाट्यापेक्षा कमी महत्त्वाचा नव्हता. अशा नेत्यापुढे, त्या प्रांतांपुढे, त्यांच्या त्यागापुढे, त्यांच्या कार्यापुढे आजचे खंडित हिंदुस्थान हेच ध्येय होते काय ? अखंड हिंदुस्थानचे स्वराज्य हे ध्येय ठेवणारे जे देशभक्त ते काँग्रेसबाहेर अराले तरीही क्रांतिकारकांच्या आघाडीवर होते. जे हसत हसत फासावर चढले किंवा जे हिंदुस्थानाबाहेर फेकून दिले गेले किंवा अंदमानच्या क्रूर एकलकोंडीत देह झिजवीत ज्यांनी दिवस काढले त्यांच्या डोळ्यापुढे आजचे हे फाडलेल्या हिंदुस्थानचे स्वराज्य हेच स्वप्न होते काय ? अंधळ्या, द्वेषांध व धार्मिक श्रद्धांवर देशाच्या एका भागात उभे केलेले राज्य हेच त्या त्यागमूर्तींच्या अतुलनीय कार्याचे फळ म्हणून त्यांच्या पदरी बांधले जावे काय ?

१११. पण काँग्रेसने गांधीजींच्या हेक्यामुळे जिनांच्या चौदा मागण्या मान्य करण्यापासून ते पाकिस्तान स्थापण्यापर्यंत मुसलमानांपुढे लोटांगण घालण्याचा क्रम ठेवला. काँग्रेसने स्वराज्याचा उत्सव साजरा केला, त्याच वेळी देशाचे पूर्व आणि पश्चिम भाग पाकिस्तानमुळे रक्ताने लडबडले होते. हैद्राबाद हा हिंदुस्थानच्या हृदयातच बोचणारा काटा होता. हे दृश्यही लोकांना दुःख वाटावे असे नव्हते काय ? गांधीजींच्या अहंभावाने निमंत्रित असलेल्या या घसरगुंडीने आठवण होते ती भर्तृहरीच्या या श्लोकाची-

शिरः शार्वं स्वर्गात् पतति शिरसस्तत् क्षितिधरम् ।
महीध्रादुत्तुंगादवनिमवनेश्चापि जलधिम् ॥
अधोऽधो गंगेयं पदमुपगता स्तोकमधुना ।
विवेकभ्रष्टानां भवति विनिपातः शतमुखः ॥

(स्वर्गातून गंगानदी जी कोसळली ती शिवाच्या मस्तकावर. तेथून खाली आली ती हिमालयावर, मग ती पृथ्वीवर आली आणि तेथून खाली गेली. अशा प्रकारे ती सारखी खालीच जात राहिली आणि मग शेवटी निम्न पातळीवर गेली. खरोखरच असे म्हटले आहे की ज्यांची मती भ्रष्ट झाली आहे असे लोक (गंगेचे शेकडो मार्गांनी अधःपतन झाले तसे) शेकडो मार्गांनी अधोगतीला जातात.)

● ●

निवेदन भाग ५

राष्ट्रविरोधी तुष्टीकरणाचा कळस

११२. मी गांधीजींना राजकीय मंचावरून दूर करण्याचे ठरविले त्याच दिवशी हेही स्पष्ट झाले की, माझे म्हणून जे काही असेल ते मी गमावणार आहे. मी धनवान् नाही; पण मध्यमवर्ग म्हणून मानला जातो, त्या समाजात मला आदराचे, मानाचे स्थान होतेच होते. माझ्या प्रांतात मी सार्वजनिक जीवनात समरस असे. आतापर्यंत मी जी काही सेवा केली असेल त्यामुळे मला लोकात मानाचे, आदराचे स्थान मिळाले आहे. सभ्यता, सुसंस्कृतता या कल्पना मला नवख्या नाहीत. माझ्या दृष्टीपुढे भावी काळातील काही रचनात्मक कार्यांच्या योजना होत्या. ती कार्ये मी हाताळीतही होतो. ती हातात घेण्याचे मला सामर्थ्य होते. पार पाडण्याची क्षमता होती, मनाची तशी उभारी होती. माझी प्रकृती धडधाकट आहे. मला काही शारीरीक व्यंग नाही की कसला रोग नाही. मला कोणते दुर्व्यसनही नाही. मी स्वत: काही विद्वान नव्हे; पण विद्वांनाविषयी मात्र मला नितान्त आदर आहे, त्यांच्या कार्याविषयी कौतुक आहे.

११३. वर्ष १९२९-३० पासून म्हणजे काँग्रेसने जेव्हा शांतिपूर्ण विधिभंगाची (सविनय कायदेभंग किंवा सिव्हिल डिसओबिडियन्स) चळवळ आरंभिली तेव्हापासून मी सार्वजनिक कार्यात प्रवेश केला. तेव्हा मी एक विद्यार्थीच होतो; पण त्या आंदोलनाविषयीची व्याख्याने, तसेच वृत्तपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या वार्ता यांनी माझ्या मनाला खेचून घेतले. ते इतके की, सार्वजनिक कार्य हेच आपले जीवितकार्य करण्याचे मी ठरविले. ती चळवळ संपत आली होती, त्याच वेळी मुसलमानांचा प्रश्न तीव्रपणे पुढे येत होता. हिंदूंचे संघटन करण्याचे कार्य डॉ. मुंजे, भाई परमानंद, पं. मदनमोहन मालवीय यांसारख्या हिंदुसभेच्या नेत्यांनी आणि आर्य समाजाच्या अग्रणींनी तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यकर्त्यांनी मोठ्या उत्साहाने आणि जोमाने हाती घेतले. तेव्हा जातितत्त्वावरील निर्बंधाची (कम्युनल ॲवार्डची) चर्चा राजकीय संस्थात तापत होती. येथे हे सांगणे अगत्याचे आहे की, पुण्याला १९३५ मध्ये हिंदुमहासभेचे अधिवेशन झाले होते. काँग्रेसचे एक नेते दिवंगत पं. मदनमोहन मालवीय त्या अधिवेशनाचे अध्यक्ष होते. त्यावेळी प्रथमच हिंदुसभेने काँग्रेसविरुद्ध निवडणुकीत उभे राहण्याचे ठरविले. कारण काँग्रेसचे धोरण मुसलमानांकडे झुकले होते आणि हिंदूंना हानिकारक होते. पं. मालवीय यांच्या नेतृत्वाखालीच हिंदुसभेने निवडणूक लढविण्याचे ठरविले होते.

११४. वर्ष १९३२ च्या आसपास नागपूर येथील स्वर्गीय डॉ. हेगडेवार

यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची महाराष्ट्रातही स्थापना केली. त्यांच्या वक्तृत्वाने मी फार प्रभावित झालो. स्वयंसेवक म्हणून मी संघात सामीलित झालो. संघाच्या प्राथमिक अवस्थेतच महाराष्ट्रात जे संघाचे घटक झाले त्यातला मी एक आहे. महाराष्ट्र प्रांतात मी संघाच्या बौद्धिक विभागातही काही वर्षे काम केले. हिंदूंच्या न्याय्य अधिकाराच्या रक्षणासाठी राजकीय क्षेत्रातही सहभागी होणे मला अत्यावश्यक वाटले म्हणून मी संघाचे काम सोडून हिंदुसभेचे काम करू लागलो.

११५. वर्ष १९३८ मध्ये हैद्राबाद संस्थानाविरूद्ध चालून जाणाऱ्या पहिल्या पथकाचे नेतृत्व मी केले होते. उत्तरदायी शासन (Responsible Government) मिळावे म्हणून त्या संस्थानाविरूद्ध नि:शस्त्र प्रतिकाराचे आंदोलन चालू केले होते. मला एक वर्षाची शिक्षा झाली होती. हैद्राबादच्या असंस्कृत, नव्हे तर क्रूर राजवटीचा पण मी प्रत्यक्ष अनुभव घेतला आहे. प्रार्थनेच्या वेळी वंदे मातरम् म्हटले म्हणून द्वादशकांनी (डझनांनी) फटके खाल्ले आहेत.

११६. वर्ष १९४३ मध्ये बिहार प्रांतिक शासनाने तेथे हिंदुसभेचे अधिवेशन भरविण्यास प्रतिबंध केला होता. हा प्रतिबंध तोडण्याचे महासभेने ठरविले. ती आज्ञाच अन्याय्य आणि अवैध आहे असे महासभेचे मत होते. शासकीय आज्ञा न जुमानता तेथे अधिवेशन भरविले गेले. त्या अधिवेशनाच्या योजनेत मी प्रमुख भाग घेतला होता. मी त्यावेळी जवळ जवळ महिनाभर भूमिगत राहिलो होतो. त्या काळात मी वृत्तपत्रे वाचीत असे. त्यात माझ्या कार्याचा कौतुक करणारा वृत्तांत असे. माझ्या सार्वजनिक कामाचा गौरव लोक करताना मी ऐकत असे. वृत्तीने मी क्रोधी किंवा हिंसाचारी नाही. क्षमेचा साक्षीदार बडगे याने साक्षीत (पान २२५ वर) म्हटले आहे की, मी श्री. भोपटकर यांच्यावर सुरा घेऊन धावलो होतो, हे विधान पूर्णपणे खोटे आहे. श्री. भोपटकर न्यायालयात आहेतच. मी तसा हल्ला केला असता तर ते आमच्या साहाय्याला पुढे तरी आले असते का ? निदान मी तरी भोपटकरांचे साहाय्य घेण्याचे मनातही आणले नसते.

११७. मला जे ओळखतात त्यांना मी शांत स्वभावाचा आहे हे ठाऊक आहे. मात्र जेव्हा काँग्रेसच्या श्रेष्ठ नेत्यांनी गांधीजींच्या संमतीने हिंदुस्थान विभागला आणि फाडला तेव्हा माझ्या मनात संतापाचे भयंकर वादळ माजून राहिले. अखंड हिंदुस्थानालाच आम्ही देवता मानतो. आम्ही त्याची पूजा बांधतो. मी काँग्रेसचा शत्रू नाही हे मी येथे स्पष्ट करू इच्छितो. लोकांच्या उद्धारासाठी झटलेली ती प्रधान संस्था आहे ही माझी काँग्रेसविषयीची भावना आहे. त्या संस्थेच्या नेत्यांशी मात्र माझे मतभेद होते नि आहेत. स्वा. सावरकर यांना मी २८ फेब्रुवारी १९३८ ला पत्र धाडले होते. ते बचाव प्रमाण क्र. जी ३०

म्हणून प्रस्तुत झालेले आहे. ते माझ्याच हस्ताक्षरातील आहे. स्वाक्षरी माझी आहे. त्यातील आशय खरा असल्याचे मी मान्य करतो. त्या पत्रावरून माझे काँग्रेस नेत्यांशी असलेले मतभेद स्पष्ट होतील.

११८. व्यक्तिश: म्हणाल तर गांधीजी आणि मी यात शत्रुत्व ते काय असणार ? पाकिस्ताननिर्मितीला पाठबळ देण्यामागे गांधीजींचा हेतू शुद्ध होता असे जे सांगतात त्यांना मी एवढेच म्हणेन की, गांधी या व्यक्तीविरुद्ध अंतिम उपाय योजण्यामागे माझ्या हृदयातही आपल्या देशाचे हित हाच शुद्ध हेतू होता, आणखी कोणताही नव्हता. कारण ज्या भयंकर घटनांचे पर्यवसान पाकिस्तानच्या स्थापनेत झाले, त्यास अधिकात अधिक उत्तरदायी गांधीजी होते. गांधीजींवरील माझ्या या आघाताचे माझ्यावर जे परिणाम होणार आहेत त्याची मला आधीच जाणीव होती, मला यातीही चांगली कल्पना होती की, ज्या क्षणी लोकांना हे कृत्य कळेल त्या क्षणीच ते माझ्याविषयीचा ग्रह बदलतील. परिस्थिती काय होती इकडे डोळेझाक करून किंवा परिस्थितीची उपेक्षा करूनही ! माझे समाजातील स्थान, जो काही असेल तो माझा मान आणि माझ्याविषयी समाजाने जी सहानुभूती बागविली असेल ती सहानुभूती सर्व लयाला जाईल. समाजातील मी एक अत्यंत गर्हणीय, अत्यंत निंदनीय मनुष्य आहे असे माझ्याविषयी मत होईल यातीही मला पूर्ण कल्पना होती.

११९. वृत्तपत्रे माझ्यावर किती भयानक आगपाखड करतील याची मला चांगली कल्पना होती; पण या वृत्तपत्रीय आगीच्या लोळाने मी नमेन असेही मला कधी वाटले नाही. याचे कारण आहे. भारतीय वृत्तपत्रांनी गांधीजींनी अवलंबिलेल्या राष्ट्रघातकी धोरणावर नि:पक्ष टीका केली असती आणि एका व्यक्तीच्या लहरीपेक्षा, ती व्यक्ती कितीही मोठी असेना का, राष्ट्राचे हित फार श्रेष्ठ असते हे लोकांना त्यांनी पटविले असते, तर गांधी आणि गांधीगट यांना मुसलमानांच्या पाकिस्तानच्या मागणीपुढे मान तुकविण्याची निदान आज तुकविली तितक्या सहजपणे तरी छाती झाली नसती. वृत्तपत्रे काँग्रेस वरिष्ठांपुढे बुळबुळीत आणि दुबळी राहिली. त्यामुळे त्या नेत्यांच्या चुका त्यांनी सहज निसटू दिल्या आणि त्यांच्या धोरणाने पाकिस्ताननिर्मिती सुलभ केली म्हणून अशा बुळबुळीत आणि लुळ्या ठरलेल्या वृत्तपत्रांच्या माझ्या विरुद्धच्या आगपाखडीतही मला माझ्या निश्चयापासून चळविण्याचे सामर्थ्य नव्हते.

१२०. पाकिस्तानला मान्यता दिल्यावाचून हिंदुस्थानला स्वराज्य मिळाले नसते असे काही गोटातून बोलले जाते; पण हा दृष्टिकोणच सर्वस्वी असमर्थनीय व खोटा आहे असे माझे मत आहे. नेत्यांनी आपल्या आग्रहाचे समर्थन करण्याचे ते एक दुबळे निमित्त आहे. गांधीय विचारांच्या नेत्यांचा आग्रह असा की,

त्यांच्या शक्तीचे फळ म्हणजे स्वराज्य त्यांनी जिंकले, हे जर खरे म्हणावयाचे तर जे ब्रिटिश हरले त्यांनीच स्वराज्य जिंकले जाण्यापूर्वी पाकिस्तानची अट या जेत्यांवर लादावी हे हास्यापदच आहे ! गांधी आणि त्यांचे गण यांनी पाकिस्ताननिर्मितीला मान्यता दिली, त्याचे माझ्या मते कारण म्हणजे प्रथम आरंभशूराचा आव आणून प्रतिकाराचा देखावा करावयाचा, मग पुढे-मागे सरावयाचे आणि शेवटी मुस्लिम मागणीला शरण जायचे हा त्यांचा व्यवहार.

१२१. दि. १५ ऑगस्ट १९४७ ला पाकिस्तानला मान्यता दिली गेली. ती कशी पण ? पंजाब, बंगाल, वायव्य सीमाप्रांत, सिंध, इत्यादी प्रांतांतील लोकांच्या भावनांचा विचार न करता आणि जनतेची फसवणूक करून विभागणी न करता येणारा भारत दोन तुकड्यांत वाटला गेला आणि एका तुकड्यात केवळ धर्माधिष्ठित राज्य स्थापले गेले. मुसलमानांना आपल्या राष्ट्रद्रोही कृत्यांचे फळ पाकिस्तानच्या रूपाने मिळाले. गांधीगणांनी पाकिस्तानच्या विरोधकांचीच देशद्रोही, जातीयवादी म्हणून अवहेलना केली; पण त्यांनी स्वत: मात्र जिनांच्या मागण्यांपुढे मान लववून हिंदुस्थानच्या भूमीवरच मुस्लिम राज्य उभे करण्यास पाठबळ दिले. पाकिस्ताननिर्मितीच्या या घटनेने माझ्या मनाची स्वस्थताच नाहीशी झाली. पाकिस्ताननिर्मितीत लोकांच्या केलेल्या क्रूर फसवणुकीने माझे मन भयंकर हादरले होते. मनावरील तोल जात होता. पाकिस्तान निर्माण केल्यावर तरी जरी या गांधीय शासनाने पाकिस्तानातील हिंदूंच्या संरक्षणासाठी काही उपाययोजना केली असती तरीही माझे मन मी आवरू शकलो असतो; पण कोट्यवधी हिंदूंना पाकिस्तानी मुसलमानांच्या दयेवर सोडून गांधी आणि त्यांचे गण त्यांना उपदेश करीत राहिले, पाकिस्तान सोडू नका, तुम्ही तेथेच राहा. अशा प्रकारे मुसलमानांच्या अत्याचारांच्या पंजात हिंदू असावधपणे अडकले आणि अशा परिस्थितीत त्यांच्यावर एका पाठोपाठ एक अशा संकटांची माळ लागली. त्या घटना जेव्हा मनात उभ्या राहतात तेव्हा आजही माझे शरीर जणू आगीत उभे केल्याप्रमाणे होरपळून जाते.

१२२. दिवस उगवावा आणि वार्ता यावी, सहस्रा-सहस्रांनी हिंदूंचे शिरच्छेद झाले. पंधरा सहस्र शिखांना गोळ्या घालून ठार केले. स्त्रियांची वस्त्रे फाडून, त्यांना नग्न करुन शेकड्यांनी त्यांची धिंड काढली. त्यांची गुरांप्रमाणे बाजारात विक्री केली. हिंदू लोकांचे लोंढे आपले सर्व काही मागे टाकून सहस्रासहस्रांनी पळून येत होते. चाळीस मैल लांबीचा निर्वासितांचा लोंढा हिंदुस्थानच्या दिशेने वाटचाल करीत होता. या भयानक प्रकाराचे हिंदुस्थान शासनाकडून निवारण कसे होत होते ? तर त्या निर्वासितांना विमानातून भाकऱ्या फेकून ! आम्ही स्वराज्य जिकले !!!

१२३. या रक्तरंजित अत्याचारांना काही प्रमाणात आळा बसणे शक्य होते, जर हिंदुस्थान शासनाने पाकिस्तानाच्या या नीतीविषयी निषेध नोंदविला असता किंवा हिंदुस्थानातील मुसलमानही त्याच प्रकारे वागविले जातील अशी नुसती धमकी दिली असती तर ! पण गांधीजींच्या दबावात असलेल्या शासनाने वेगळेच मार्ग अवलंबिले. पाकिस्तानातील अल्पसंख्याकांच्या दु:स्थितीला, दयनीय स्थितीला वृत्तपत्रांत वाचा फोडली तर त्या वृत्तपत्रांवर जातीजातीत वैमनस्य पसरविल्याचा आरोप यावयाचा. तो अपराध ठरावयाचा. प्रांताप्रांतातील काँग्रेस शासनाने मुद्रण नियंत्रण विशेष अधिकारविधीने म्हणजे प्रेस इमर्जन्सी पॉवर्स ॲक्टने अशा वृत्तपत्रांकडून एका पाठोपाठ एक प्रतिभू किंवा जामीन मागण्याचा सपाटा चालविला. माझ्याकडून एकूण सोळा सहस्र रुपयांचा प्रतिभू मागितला गेला आणि नुसत्या मुंबई प्रांतातच अशी जवळजवळ नऊशे प्रकरणे झाली. गृहमंत्री श्री. मोरारजी देसाई यांनीच हे आपल्या साक्षीत या न्यायालयाला सांगितले आहे. मंत्र्यांकडे शिष्टमंडळे नेऊनसुद्धा वृत्तपत्रांवरील अन्यायाचे निवारण मात्र कोणीच केले नाही. अशा प्रकारे गांधीय प्रणालीने नियंत्रित काँग्रेस शासनावर शांततेच्या मार्गाने दडपण आणण्याच्या माझ्या प्रयत्नांना निराशाच बघावी लागली.

१२४. पाकिस्तानात हे सर्व घडत होते तरीही गांधीजींनी पाकिस्तानच्या निषेधाचा किंवा संबंधित मुसलमानांच्या कानउघडणीचा एक शब्दही कधी उच्चारला नाही. पाकिस्तानात हिंदु-संस्कृती उद्ध्वस्त करण्यासाठी, हिंदुसमाज नष्ट करण्यासाठी हे जे मुसलमानी अत्याचार झाले, त्या सर्वांचे कारण म्हणजे गांधीजींची शिकवण आणि त्यांचे वर्तन. हिंदुस्थानची राजनीती जर व्यवहारी पद्धतीने हाताळली गेली असती, तर हा भयानक मानवसंहार झाला नसता. या संहाराला इतिहासात दुसरी तुलनाच नाही.

१२५. मुसलमानांचा जेथे प्रश्न असेल तेथे गांधीजींनी जनतेच्या भाव-भावना कधी विचारात घेतल्या नाहीत ही गोष्ट विशेषत्वाने आणि महत्त्वाने लक्षात येते. त्यांचे अहिंसेचे सूत्र आता मानवी रक्तात पुरेपूर भिजून निथळत आहे. पाकिस्तान या कल्पनेचा विचार वागविणे लोकांना केवळ असह्य होते. एक धर्माधिष्ठित राष्ट्र जोवर हिंदुस्थानला खेटून उभे आहे, तोवर हिंदुस्थानचे सामाजिक स्वास्थ्य आणि आपल्या देशाची शांतता यांना सदाच धोका आहे; पण या वस्तुस्थितीला न जुमानता गांधीजींनी प्रचाराचे एक काम आपल्या हाती घेतले. मुस्लीम लीगच्या एखाद्या कडव्या नेत्यालाही करणे अशक्य झाले असते अशा प्रकारचा तो प्रचार होता. लोकांच्या मनात पाकिस्तानविषयी जे अप्रिय मत पसरत होते ते धुऊन काढण्याचा आणि थांबविण्याचा गांधीजींचा प्रयत्न होता.

१२६. याच वेळेच्या जवळपास गांधीजींनी आपला शेवटचा आमरण उपवास

हाती घेतला. उपवास सोडण्यासाठी त्यांनी लादलेली प्रत्येक अट ही हिंदूंविरुद्ध आहे आणि मुसलमानांच्या पक्षाची आहे.

१२७. त्या सात अटींतील एक अट निर्वासितांनी दिल्लीतील मशिदीतून वस्ती केली त्याविषयी होती. त्या मशिदी निर्वासितांनी मोकळ्या करून द्याव्यात किंवा शासनाने त्या मोकळ्या करून घ्याव्यात आणि मुसलमानांच्या स्वाधीन कराव्यात अशी ती अट होती. ही अट गांधीजींनी शासनाकडून मान्य करून घेतली आणि अनेक नेत्यांकडूनही त्याला अनुमती मिळविली. त्यांच्या उपोषणाने त्यांनी त्यांच्यावर दाब आणला होता. त्या दिवशी मी दिल्लीला होतो. गांधीजींच्या या इच्छेचे पूर्ण कार्यवहन करण्याचे काही प्रकार मी समक्ष पाहिले. कडक झोंबऱ्या थंडीचे ते दिवस होते. गांधीजींनी उपवास सोडला त्या दिवशी पाऊसही पडत होता. त्या विलक्षण वायुमानामुळे बंदिस्त घरात राहणारे लोकही थंडीने कुडकुडत. अशा या थंडीत कुटुंबामागून कुटुंबे मशिदीतून हुसकली जाऊ लागली. त्यांच्या निवाऱ्याची किंवा राहण्याची पर्यायी सोय काहीच केली गेली नाही. स्त्रिया आणि मुले यांचा परिवार असलेली एक दोन कुटुंबे आपले किरकोळ सामान पाठुंगळीला घेऊन बिर्ला भवनापाशी आली. गांधीजींना भेटावे, आमचा निवारा तुम्ही पुन्हा उखडलात. आम्हाला आता निवारा तरी द्या असे त्यांना सांगावे अशी त्यांची इच्छा होती; पण राजविलासी बिर्लाभवनात राहणाऱ्या गांधीजींच्या कानापर्यंत त्या दीन हिंदूंचा शब्द जाणे शक्य तरी होते काय ? हे दृश्य मी स्वत: बघितले. कठीण हृदय असलेल्या मनुष्याचेही हृदय त्याने विरघळले असते; पण यापेक्षाही गहन विचार माझ्या मनात जमू लागले. या निर्वासितांनी मशिदीत आश्रय घेतला तो गंमत म्हणून की ज्या मूळच्या निवाऱ्यापासून ते उखडले गेले होते त्यापेक्षा त्यांना या मशिदी अधिक सुखसोयींनी युक्त वाटल्या म्हणून घेतला होता ? ज्या परिस्थितीत त्यांना असल्या मशिदीतून राहावे लागले होते, त्या परिस्थितीचे गांधीजींना ज्ञान नव्हते काय ? पाकिस्तान म्हणून म्हटल्या जाणाऱ्या आपल्या भूमीत गुरुद्वारा किंवा मंदिर याचे नावही उरले नाही. मंदिरे आणि गुरुद्वारे यांचा संडास म्हणून उपयोग केलेला आणि तो का तर हिंदु-शिखांना अवमानित आणि लज्जित करण्यासाठी म्हणून, हे या निर्वासितांनी आपल्या डोळ्यांसमोर पाहिले होते. आपले सर्व काही मागे टाकून या लोकांना निर्वासित होऊन दिल्लीकडे यावे लागले होते. दिल्लीत त्यांना उभा निवारा कुठला मिळणार ? एखाद्या झाडाखाली, एखाद्या गटाराशेजारी, रस्त्याच्या कडेला अंग टेकताना या पंजाबच्या किंवा सीमाप्रांताच्या निर्वासितांच्या मनात आपली स्वत:ची घरेदारे पुन्हा पुन्हा उभी राहिली असतील तर त्यात नवल ते काय ? अशा उद्ध्वस्त अवस्थेत त्या निर्वासितांनी मोकळ्या मशिदीतून आश्रय घेतला होता. ती माणसे होती आणि त्यांना निदान तेथे छप्पर मिळत

होते. त्या मशिदींचा उपयोग मानवतेच्या रक्षणासाठी होत नव्हता काय ? मशिदी मोकळ्या करवून घ्या असा हेका गांधीजींनी शासनाशी धरला त्याच वेळी शासनाला आणि संबंधित लोकांना त्यांनी सांगितले असते की, त्यांच्यासाठी दुसरा निवारा आधी उभा करा तर गांधीजींच्या अटीत कोठेतरी माणुसकीचा ओलावा आहे हे तरी दिसले असते. निर्वासितांनी मशिदी मोकळ्या कराव्यात अशी अट घालतेवेळी त्यांनी पाकिस्तानातील देवळे हिंदूंच्या स्वाधीन करावीत अशी अट घातली असती किंवा तशा प्रकारचा आणखी काही हट्ट धरला असता तर गांधीजींची अहिंसेची शिकवण, त्यांची हिंदू-मुस्लिम एकतेची तळमळ, त्यांचा आत्मिक बळावरील विश्वास हे सर्व निःपक्ष आहेत, सजीव आहेत, जाति-निरपेक्ष आहेत असे मानले गेले असते; पण आमरण उपवास चालू केला तो सोडण्यासाठी गांधीजींनी पाकिस्तानमधील मुसलमानांवर अशी एखादी अट लादली असती तर आणि त्या उपवासात त्यांचा खरोखरीच अंत झाला असता तर क्वचितच कोण्या मुसलमानाने दुःख केले असते, हे कळण्याइतके गांधीजी धूर्त होते. याच कारणासाठी ते जाणूनबुजून मुसलमानांवर एखादी अट लादण्याच्या भानगडीत पडले नाहीत. त्यांचा पूर्वीचा अनुभव होता की, त्यांच्या उपवासाने जिना कधी व्याकूळ झाले नाहीत की हालले नाहीत आणि मुस्लिम लीगनेही कधी गांधीजींच्या अंतरीच्या आदेशाला भीक घातली नाही.

१२८. गांधीजींच्या रक्षेचे वितरण हिंदुस्थानातील प्रमुख नगरातून झाले आणि हिंदुस्थानातील आणि परदेशातील अनेक नद्यांतून त्यांची रक्षा प्रवाहितही केली गेली; पण ती रक्षा पवित्र सिंधू नदीतून प्रवाहित होऊ शकली नाही. कारण ती नदी आता पाकिस्तानातून वाहत होती. आपले तेथील राजदूत श्री. श्रीप्रकाश यांची त्यासंबंधीची विनंती धुत्कारली गेली. त्यांच्या प्रयत्नांना यश आले नाही हे या ओघात सांगितले तर ते अस्थानी होणार नाही.

१२९. आता आपण ५५ कोटींच्या प्रकरणाकडे वळू. (येथे नथुरामने उपमहामंत्र्यांचे वक्तव्य, जे परिशिष्ट म्हणून जोडले होते ते वाचून दाखविले.) या ५५ कोटींविषयी गांधीजी स्वतःच म्हणाले आहेत की, कोण्या शासनाला आपला निर्णय फिरविण्यास लावणे मोठे अवघड असते; पण पैसे अडवून ठेवण्याचा आपला मूळचा निश्चय शासनाने बदलला आणि तो निर्णय फिरविण्यामागील कारण होते गांधींजींचा हा प्राणान्तिक उपवास ! (दि. २१ जानेवारी १९४८ किंवा त्या जवळच्या दिवशी केलेले गांधीजींचे प्रार्थनेतील भाषण). ५५ कोटी अडविण्याचा निर्णय शासनाने घेतला होता. आपले शासन लोकतांत्रिक शासन आहे असे आग्रहाने प्रतिपादिले जाते; पण या लोकशासनाचा निर्णय गांधीजींच्या उपवासाच्या तारेत सूर मिळविण्यासाठी फिरविला गेला.

लोकमताची शक्ती गांधीजींच्या पाकिस्तान धार्जिणेपणापुढे क:पदार्थ आहे हे मला स्पष्टपणे कळून चुकले.

(न्या. कपूर यांनी आपल्या प्रतिवृत्ताच्या पहिल्या खंडातील पान १४३ वर त्या वेळच्या वृत्तपत्रांच्या या संबंधातील प्रतिक्रियेचे एक उदाहरण दिले आहे. छेदक १२ ए ४५ असा आहे —

मुंबईच्या नॅशनल गार्डियन या साप्ताहिकाने आपल्या दिनांक १७ जानेवारी १९४८ च्या अंकात, 'नेहरू शासनाकडून हिंदुस्थानची घोर फसवणूक. पाकिस्तान दमदाटीने जे साधू शकले नाही ते गांधीजींच्या हट्टाग्रहाने साधले,' अशा शीर्षकाखाली दिले होते. 'आपल्या राष्ट्रीय जनांची ज्याने कत्तल होईल ते पैसे देण्याचे कृत्य आम्ही करणार नाही अशा गर्जना चालू होत्या आणि सरदार वल्लभभाईंचे 'दमदाटीला आणि दादागिरीला भीक घालणार नाही' असे वीरत्वाचे शब्द कानांवर येत होते. तोच गांधींनी उपवास करून पाकिस्तानला कोट्यवधी रुपये देण्यास नेहरू शासनाला भाग पाडले. पंचावन्न कोटींच्या प्रदानाने लोक कसे प्रक्षुब्ध झाले होते त्याचे हे निदर्शक होते — लेखक)

१३०. हिंदुस्थानातील राष्ट्रीय उत्थानाला मुस्लिमांनी केलेल्या विरोधातून पाकिस्तानचा जन्म झाला आहे. पाकिस्तानशी निष्ठा दाखविणाऱ्या कितीतरी लोकांना आज शासनाने पंचमस्तंभी म्हणून बंदिगृहात कोंडले आहे; पण माझ्या मते गांधीजी हेच पाकिस्तानचे सर्वात मोठे प्रचारक आणि साहाय्यक होते. त्यांच्या या वर्तनाला बांध घालील अशी शक्तीच आस्तित्वात नव्हती.

१३१. अशा परिस्थितीत, हिंदूंना मुसलमानांच्या कचाट्यातून सोडविण्याचा एकमेव परिणामकारक उपचार म्हणजे गांधीजींना भूतलावरून नाहीसे करणे हा होता हे माझ्या मनाने घेतले.

१३२. गांधीजींचा उल्लेख राष्ट्रपिता म्हणून करतात. ही एक अतिशय बहुमानाची संज्ञा आहे; पण ते राष्ट्रपिता हे जर खरे तर त्यांनी आपले पैतृक कर्तव्य केलेले नाही. देशाचे विभाजन करण्यात त्यांनी मुलांचा घात केला आहे, गळा कापला आहे. पाकिस्तान निर्मितीला गांधीजी खरोखरच विरोधी म्हणून उभे राहिले असते तर मुस्लिमलीगला पाकिस्तानचा आग्रह धरण्याचे बळच राहिले नसते आणि ब्रिटिशांनाही ते घडविणे अशक्य झाले असते त्यांची ते निर्माण करण्याची कितीही तळमळ असली तरीही याचे कारण शोधायला दूर कशाला जायला हवे ? या देशातील लोक पाकिस्तानचे कडवे विरोधी होते; पण गांधीजी खोटा खेळ खेळले. त्यांनी लोकांना बनविले आणि पाकिस्तानच्या स्थापनेसाठी देशाचे तुकडे मुसलमानांना चारले. मी पुन्हा मनापासून सांगतो

की, राष्ट्रपिता या नात्याने गांधीजींवर जर उत्तरदायित्व पडत होते ते या कारणाने गांधीजींनी डावलून टाकले. ते पाकिस्तानपिता असल्याचे तेवढे सिद्ध झाले. या कारणांमुळेच आपल्या मातृभूमीचा एक निष्ठावंत कर्तव्यदक्ष पुत्र म्हणून, ज्याने आपली मातृभूमी खंडित करण्यात मोठा वाटा उचलला त्या तथाकथित राष्ट्रपित्याचा अंत करणे मला कर्तव्य वाटले.

१३३. हैद्राबादच्या प्रकरणालाही तसाच इतिहास आहे. निझामचे मंत्री नि रझाकार यांनी हिंदूंवर केलेल्या अनन्वित अत्याचारांचा पाढा वाचण्याचे मुळीच कारण नाही. जानेवारी १९४८ च्या शेवटच्या आठवड्यात हैद्राबादचा मुख्यमंत्री लायकअल्ली याने गांधीजींची भेट घेतली. गांधीजींनी हैद्राबादच्या प्रश्नांकडे ज्या दृष्टीने पाहिले, त्यावरून असे दिसले की, गांधीजी आता आपले प्रयोग हैद्राबादमध्ये करणार आणि सुहावर्दीप्रमाणे कासीम रझवीलाही आपल्या मांडीवर घेणार. हैद्राबादसारख्या मुस्लिम संस्थानिकांच्या राज्यात आपल्या शासनात शक्ती असूनसुद्धा काही उपाययोजना करणे गांधीजींच्या अस्तित्वात तरी शक्य नव्हते. हा तर्क करणे मुळीच अवघड नाही. सैनिकी किंवा आरक्षीय उपाय हैद्राबादविरुद्ध योजण्याचे आपल्या शासनाने ठरविले असते तर गांधीजी आडवे पडले असते आणि हिंदुमुस्लिम एकतेच्या नावाने ५५ कोटींच्या प्रकरणात जसा आपल्या शासनाला त्यांनी निर्णय बदलावयास लावला तसाच तोही निर्णय बदलावयास लावला असता. कारण गांधीजींनी प्राणांतिक उपोषणाचा धाक घातला असता आणि गांधीजींचे प्राण वाचावेत म्हणून शासनाचे हात बांधले गेले असते.

१३४. अहिंसेचा प्रयोग म्हणजे काय ? तर आक्रमकांचे तडाखे सहन करणे आणि ते करताना शस्त्राने किंवा हातानेही प्रतिकार न करणे ही गांधीजींची विचारप्रणाली. आपल्या या प्रणालीचे विवरण देताना गांधीजींनी एक उदाहरण दिले होते. वाघ अहिंसक कसा होईल ? असा तो दृष्टांत होता. गायींनी वाघासमोर जाऊन स्वत:स खावून घेण्याचा क्रम ठेवला आणि तो इतका की, गायी खाता खाता शेवटी वाघ कंटाळला आणि त्याने गांधीजींनी उपदेशिलेल्या अहिंसाधर्माचा स्वीकार केला. कानपूर येथे गणेश शंकर विद्यार्थी याला मुसलमानांनी ठार मारले होते. मुसलमानांच्या प्रहाराने आलेले हे मरण अहिंसेच्या तत्त्वासाठी आदर्श मरण होय असे गांधीजींनी उदाहरण म्हणून नेहमी सांगितले आहे. या प्रकाराचे अहिंसेचे थोतांड देशाची वाट लावील, पाकिस्तान्यांना उरलेल्या हिंदुस्थानात प्रवेश करण्यास सोपे जाईल हा माझा विश्वास होता नि आहे.

१३५. साराशाने सांगायचे म्हणजे मी गांधीजींना मारणार आहे या माझ्या निश्चयामागोमाग माझेही भवितव्य मला दिसले. मी सर्वस्वी नष्ट होईन. जनतेकडून मला काही मिळणार असेल तर ती घृणा किंवा द्वेष. माझ्या जीवितापेक्षाही

मला मोलाची वाटणारी प्रतिष्ठा मी गमावून बसेन; पण त्याचवेळी मला वाटले की, गांधीजींच्या अनस्तित्वात राजकारण व्यवहारी बनेल. आघाताला प्रत्याघात देण्यास ते समर्थ बनेल आणि शस्त्रसिद्ध सेनेने देश बलवान होईल. माझे भवितव्य धुळीला मिळेल यात शंका नाही, पण पाकिस्तानच्या आक्रमक पवित्र्यापासून देश वाचेल. लोक मला म्हणतील हा अविवेकी होता; मूर्ख होता; पण आपले राष्ट्र तर्कशुद्ध भूमिकेचा मार्ग अनुसरू शकेल. राष्ट्राच्या बळकट उभारणीसाठी त्यायी आवश्यकता आहे असे माझे मत आहे. मी या प्रश्नातील गुणदोषांचा, लाभहानीचा पूर्ण विचार केला. मग मी हा अंतिम निर्णय घेतला. मी याविषयी कोणाशी बोललो नाही. मी दोन्ही हातात धैर्य एकवटले आणि ३० जानेवारी १९४८ ला बिर्लाभवनातील प्रार्थनास्थळावर गांधीजींवर गोळ्या झाडल्या.

१३६. आता मला आणखी बोलावयाचे असे काही फारसे उरलेच नाही. स्वत:च्या देशाशी भक्तीभाव हे पाप ठरत असेल तर ते पाप मी केले आहे हे मी मान्य करतो; तो पुण्यप्रद असेल तर तज्जन्य पुण्यावर माझा नम्र अधिकार आहे. मर्त्यांनी स्थापलेल्या न्यायासनापलीकडं कोणते दुसरे न्यायासन असेल तर माझे कृत्य अन्याय्य समजले जाणार नाही असा मला पूर्ण आणि दृढ विश्वास आहे. असे पोहोचण्याजोगे किंवा जाण्याजोगे कोणते स्थान मृत्यूनंतर नसेल तर काही बोलणे उरत नाही. निर्भेळपणे मानवतेच्या हितासाठी मी या कृत्याचा मार्ग अनुसरला. ज्याच्या धोरणाने आणि कृतीने लक्षावधी हिंदूंना उच्छाद आणला, उद्ध्वस्तता आणली त्या व्यक्तीवर माझ्या गोळ्यांचा रोख होता हे मी ठामपणे म्हणतो.

१३७. वस्तुत: गांधीजींवर मी गोळ्या झाडल्या त्याच गोळ्यांतून माझेही आयुष्य त्याच वेळी संपले. त्यानंतरचे माझे दिवस हे समाधीतील अवस्थेप्रमाणे आहेत. या काळात मी जे काही बघितले, ज्याचे निरीक्षण केले त्याने मला पूर्ण समाधान मिळाले आहे.

१३८. हैद्राबाद राज्याचा प्रश्न उगीचच लोंबकळत ठेवला गेला होता. त्याची चालढकल चालली होती. गांधीजींच्या मृत्यूनंतर आपल्या शासनाने तो प्रश्न शस्त्रप्रयोगाने नीटपणे सोडविला. सध्याचे शासन वस्तुनिष्ठ भूमिकेवर येत असल्याचे दिसत आहे. आपल्या राष्ट्राजवळ आधुनिक उपकरणांनी आणि यांत्रिक शस्त्रांनी सज्ज अशी सेना पाहिजे असे आपले गृहमंत्री म्हणाले आहेत. हे विचार बोलतानाच ते हेही म्हणतात की, ही सज्जता गांधीजींच्या तत्त्वाला अनुसरूनच आहे. स्वत:च्या समाधानासाठी ते म्हणोत तसे बापडे; पण तशी वस्तुस्थिती असती तर हिटलर, मुसोलिनी, चर्चिल, रुझवेल्ट यांनी आपआपले देश सुरक्षित ठेवण्यासाठी अवलंबिलेली साधने आणि गांधीजींनी प्रचारलेली अहिंसेची प्रणाली

यात अंतरच नाही हे विसरू नये. अहिंसा या तत्त्वात गांधीजींची काही नवीन आणि विशेष प्रणाली होती हे म्हणणेच अशक्य होईल.

१३९. देशासाठी गांधीजींनी कष्ट झेलले हे मी केव्हाही मान्य करीन. लोकात त्यांनी जागृती उत्पन्न केली हे निश्चित. स्वत:च्या लाभासाठी असे त्यांनी काही केले नाही हेही तितकेच खरे आहे; पण अहिंसा प्रणालीत सर्व आघाड्यांवर आपले पराभव झाले, आपल्याला अपयश आले हे मान्य करण्याइतके गांधीजी प्रामाणिक नव्हते असे खेदाने म्हणादे लागते. गांधीजींपेक्षा कितीतरी मोठा त्याग केलेल्या दुसऱ्या काही बुद्धिमंत आणि समर्थ नेत्यांची चरित्रे मी वाचली आहेत. त्यातील काहींना मी स्वत: पाहिलेले आहे; पण ते काही असो. गांधीजींनी जी काही देशसेवा केली त्या देशसेवेपुढे आणि त्यासाठी गांधीजींपुढेही मी नतमस्तक होईन आणि मी त्यांना गोळ्या घातल्या त्यापूर्वी खरोखरीच आदराने त्यांना मी नमस्कार केला, नमस्ते म्हटले; पण देशाच्या या सेवकालाही देश विभागण्याचा, आमचे परमदैवत भग्न करण्याचा आणि तेही लोकांना फसवून, त्यांना धोका देऊन, मुळीच अधिकार नव्हता हे मी पुन्हा सांगतो; पण त्यांनी ते केले खरे. अशा अपराध्याला कोणी शासन करील असे न्याययंत्र अस्तित्वातच नव्हते. आणि या कारणासाठी गांधीजींवर गोळ्या चालविण्याचा मी निश्चय केला. कारण माझ्या मते तेच योग्य होते.

१४०. हे कृत्य माझ्या हातून झाले नसते तर अर्थातच माझ्यासाठी ते चांगले झाले असते; पण परिस्थिती माझ्या आटोक्याबाहेर होती; माझ्या मनाचा आवेग नि वेगच एवढा विलक्षण नि बलवान झाला होता की, या मनुष्याला नैसर्गिक मरण येऊ देता कामा नये असे मला वाटले. कारण, मला वाटले, आता तरी जगाला समजू दे की, देशातील एक द्वेषांध समूहाशी त्याने केलेल्या असमर्थनीय, राष्ट्रघातक आणि भयंकर तुष्टीकरणसत्रासाठी त्याला शेवटी आपल्या प्राणाचे मोल मोजादे लागले. या प्रकरणाचा अंतच करून टाकावा आणि कोणताही अपराध नसताना लक्षावधी हिंदूंचा संहार चालला होता त्यासही विराम देण्यास साहाय्य करावे असा मी निश्चय केला. या पुण्यभूमीच्या प्रिय पुत्रांना मारक ठरणाऱ्या अहंकारी स्वभावाची देव आता त्याला क्षमा करो !

१४१. कोणा व्यक्तीविरुद्ध माझे वैमनस्य नाही किंवा शत्रुत्व नाही. व्यक्तिश: माझ्याविरुद्ध कोणी शत्रुत्व बाळगीत असेल असेही मला वाटत नाही. या शासनाच्या मुस्लिमतुष्टीकरणाच्या असमर्थनीय नीतीमुळे मला या शासनाविषयी आदर वाटला नाही हे मी निश्चितपणे म्हणतो; पण ती नीती केवळ गांधींच्या अस्तित्वामुळे अवलंबिली गेली होती हे मला दिसत होते; पण आता ते दडपण उरलेले नाही. आता खऱ्या अर्थाने धर्मातीत (Secular) राज्य घडविण्यास वाट मोकळी

आहे. आपले प्रधानमंत्री जेव्हा तेव्हा उठल्या बसल्या धर्मातीततत्वाविषयी बोलतात. नेहरू यांची उक्ती आणि कृती ही एकमेकांना पुष्कळदा छेदून जाते आणि हे ते विसरतात असे मोठ्या खेदाने म्हणावे लागते. कारण पाकिस्तान हे धर्माधिष्ठित राज्य स्थापन करण्यात या नेहरूंनीही स्वत: पुढाकार घेतला होता. हिंदुस्थानच्या संघराज्याला आपल्या शेजारी एक अंध-धर्मश्रद्धेवर आणि द्वेषावर आधारलेले राज्य उभे ठेवून हिंदुस्थानच्या संघराज्याला केव्हाही भरभराट येणार नाही हे नेहरूंना समजावयास हवे होते. सर्व घटकांचा स्वत:शी विचार केल्यावर माझ्या मनाने मला गांधीजींविरुद्ध कृती करण्यास प्रवृत्त केले. या कृतीसाठी माझ्यावर कोणी दडपण आणले नाही किंवा तसे कोणी आणूही शकला नसता.

१४२. माझ्या मनातील या तीव्र आवेगाविषयी आणि त्यामुळे मी केलेल्या कृतीविषयी मान्यवर न्यायमूर्तींनी काहीही मत बनवावे. त्यांना न्यायोचित वाटेल त्या शिक्षेची आज्ञा द्यावी. त्याविषयी काही बोलण्यावी माझी इच्छा नाही. मला काही दया दाखवावी अशीही माझी इच्छा नाही. आणखी कोणी माझ्यासाठी दयायाचना करावी हीही अभिलाषा मी ठेवीत नाही.

१४३. या अभियोगात माझ्यासह आणखी दुसरे लोक सहाभियुक्त किंवा षड्यंत्री म्हणून अडकविले गेले आहेत. माझ्या कृतीत कोणी सहकारी नव्हता आणि मी स्वत:च केवळ त्या कृतीला उत्तरदायी आहे हे मी मागे म्हटलेच आहे. दुसरे लोक जर याच दोषाच्या छायेखाली उभे केले गेले नसते तर मी माझ्यासाठी बचावही दिला नसता. ३० जाने. १९४८ च्या घटनेच्या संबंधातील साक्षीदारांची उलट तपासणी करु नये अशी इच्छा होती आणि माझ्या विधिज्ञांनाही माझे तसे आग्रहाचे सांगणे होते हे न्यायालयाला ठाऊक आहे. त्यावरून मी माझ्यासाठी बचाव दिला नसता हे स्पष्ट होईल.

१४४. परिणामकारक प्रचारासाठी म्हणून शांततामय निदर्शनाचा मार्ग व्यक्तिश: मला २० जानेवारी १९४८ ला सुद्धा मान्य नव्हता हे मी म्हटलेच आहे. तरीही स्वत:चे मन मोडून मी प्रार्थनास्थळावरील निदर्शनात सहभागी होण्याचे ठरविले; पण दुर्दैवाने मला त्यात भाग घेता आला नाही. असे निदर्शनही नीटपणे आयोजित होऊ शकत नाही, हे मी जेव्हा पाहिले तेव्हा मी निराशही झालो नि उतावीळही. श्री. आपटे आणि दुसऱ्या लोकांना ग्वाल्हेर, मुंबई, पुणे येथून स्वयंसेवक मिळविण्याच्या कामात यश आले नाही. नंतर या अंतिम मार्गावाचून दुसरा मार्ग मला दिसला नाही.

१४५. हे विचार मनात घोळत असताना मी दिल्लीतील निर्वासितांच्या शिबिरांतून भटकत राहिलो. एक छायाचित्रकार मला दिसला. त्याच्या पाठीवर छायायंत्र (कॅमेरा-छायायंत्र) होते. छायाचित्र काढून घ्या असे तो म्हणाला.

तो निर्वासित असल्याचे दिसतच होते. मी हो म्हटले नि माझे चित्र काढून घेतले. मी दिल्ली स्थानकावर परतलो. श्री. आपटे यांना दोन पत्रे लिहिली. माझ्या मन:स्थितीची पुसट कल्पना मी त्यांना त्यात दिली. कारण माझ्या मुद्रण व्यवसायात ते माझे निकटचे सहकारी होते. छायाचित्राची एकेक प्रत मी त्या पत्रात घातली. एक पत्र व्यक्तिश: त्यांच्या नावावर त्यांच्या घरच्या ठिकाणावर धाडले आणि दुसरे हिंदुराष्ट्र दैनिकांच्या ठिकाणावर.

१४६. या वक्तव्यातील माझी सर्व विधाने पूर्णपणे खरी आहेत आणि बरोबर आहेत. प्रत्येक विधानाला अधिकृत संदर्भ ग्रंथांचा मी आधार घेतलेला आहे. हिंदुस्थान शासनाचे अधिकृत मुखपत्र इंडियन इन्फर्मेशन, इंडियन इयर बुक, हिस्टरी ऑफ दि काँग्रेस, गांधीजींचे आत्मचरित्र, काँग्रेसने वेळोवेळी प्रसिद्ध केलेली परिपत्रके, हरिजनच्या नस्त्या (files), यंग इंडियाच्या नस्त्या, गांधीजींची प्रार्थनोत्तर प्रवचने या सर्वांचा मी उपयोग केला आहे. हे वक्तव्य मी काहीसे विस्तृत केले आहे. लोकांनी माझ्या कृत्याचा गौरव करावा हा त्यातला हेतू नव्हे, तर माझ्या विचाराविषयी लोकांच्या मनात मोघमपणा असू नये, तरोच माझ्याविषयी अपसमजाला थोडाही वाव राहू नये हा त्यामागे माझा उद्देश आहे.

१४७. हिंदुस्थान म्हणून यथार्थपणे ओळखला जाणारा हा देश पुन्हा एकसंध होवो आणि एक होवो आणि आक्रमकांपुढे शरणागती पत्करण्यास प्रवृत्त करणाऱ्या पराभव गंडाचा त्याग करण्याचे धडे लोकांना मिळोत. सर्वशक्तिमंताजवळ माझी ही अंतिम इच्छा आणि प्रार्थना आहे.

१४८. माझे वक्तव्य संपले आहे. खाली बसण्यापूर्वी, मान्यवर न्यायमूर्ती, मला आपले ऋण व्यक्त करावयाचे आहे. फार शांतपणे माझे म्हणणे ऐकलेत, फार उदारता दाखविलीत, मला सुविधा दिल्यात. माझ्या विधिज्ञांविषयीही मला कृतज्ञता व्यक्त करावयाची आहे. त्यांनी दिलेले वैध साहाय्य अमोल आहे. या अभियोगाशी संबंधित असलेल्या आरक्षी अधिकाऱ्यांविषयी मला द्वेषभाव नाही. त्यांनी जी चांगली वागणूक दिली, ममता दाखविली, त्यासाठी मी त्यांचा आभारी आहे. तीच गोष्ट बंदिगृहाच्या अधिकाऱ्यांची. त्यांनी मला चांगली वागणूक दिली, मी त्यांचा आभारी आहे.

१४९. त्या दिवशी गांधीजींच्या प्रार्थनेला जवळ जवळ ३०० ते ४०० लोक होते. त्यांच्या समक्ष दिवसाच्या प्रकाशात मी गांधीजींवर गोळ्या झाडल्या. मी पळून जाण्याचा प्रयत्न केला नाही. खरे म्हणजे माझ्या मनातही तसे आले नाही. स्वत:वर गोळी घाडून घेण्याचाही मी प्रयत्न केला नाही. माझी तशी इच्छा नव्हती, कारण माझ्या विचारांना मुक्त न्यायालयात वाट देण्याची

माझी तीव्र इच्छा होती.

माझ्या कृतीच्या नैतिक अंगाचा - ती सर्वांगाने टीकेचे लक्ष्य झालेली असली तरीही - माझा विश्वास ढळलेला नाही. भविष्यातील कोण्या दिवशी इतिहासाचे प्रामाणिक लेखक माझी कृती तोलतील आणि तिचे मूल्य पडताळून पाहतील यात मला शंका वाटत नाही.

अखंड भारत अमर रहे ।
वंदे मातरम् ।

● ●

दिल्ली
८ नोव्हेंबर १९४८

नथुराम विनायक गोडसे
आरोपी क्र. १

निवेदन भाग ६

परिशिष्ट

पाकिस्तानला शेष राशी देण्याविषयी उपमहामंत्र्यांचे वक्तव्य

माननीय सरदार वल्लभभाई पटेल उपमहामंत्री यांनी नवी दिल्ली येथे पत्रकार परिषदेपुढे दि. १२ जानेवारी १९४८ ला वक्तव्य दिले ते असे —

मित्रहो ! पाकिस्तानचे अर्थमंत्री श्री. गुलाम महमद यांचे पाकिस्तानला शेष राशी देण्याविषयीचे वक्तव्य आपल्या वाचनात असेलच. या अर्थमंत्र्यांनी एक सिव्हिल सर्व्हंट म्हणून विविध क्षेत्रात उंच पदावरून कामे केली आहेत. ते हैद्राबाद संस्थानचे अर्थमंत्री होते. मोठ्या व्यापारातही (Big Business) त्यांचा भाग होता. अशा अधिकारी व्यक्तीच्या वक्तव्यात असत्य कथन किंवा सत्याचा विपर्यास करणारी विधाने सर्वसामान्यपणे कोणी अपेक्षिणार नाही; पण त्यांचे वक्तव्य अशा विधानांनी ओतप्रोत भरलेले आहे. इतकेच नव्हे तर काश्मीर प्रश्नामुळे त्यांच्याच शासनाने पैशांची अपेक्षा कुंठित केली असल्यामुळे तो प्रश्न न्यायाने सुटणे कठीण आहे हे त्यांनी ओळखले आणि म्हणून त्यांनी आपली विवेक बुद्धी आणि न्यायान्याय विचारबुद्धी वाऱ्यावर सोडली आहे. दादागिरीने आणि उद्दंडपणे पैसे उकळणाऱ्या गुंडांच्या पातळीवर ते आले आहेत.

खऱ्या घटनांना स्थानच नाही.

मी हे शब्दप्रयोग हेतुपुरस्सरच करीत आहे. कारण त्यांचे वक्तव्य समतोलपणे वाचणाऱ्यांच्या असे लक्षात येईल की, रिझर्व्ह बँकेवर धमक्यांचा वर्षाव करून आणि तिच्यावर खोडसाळ आरोप करुन तिला नमवावे असा त्यांचा प्रयत्न आहे. हिंदुस्थान शासनाचा हेतू शुद्ध किंवा प्रामाणिक नसल्याचा त्यांनी आरोप केला आहे, यायोगे आपले अडकलेले पैसे मिळतील अशी त्यांना आशा आहे. जगातील दुसऱ्या राष्ट्रांच्या मताचे साहाय्य आपल्याकडे वळविण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. आपण देत असलेली धमकी उघडी पडू नये आणि त्या राष्ट्रांनी हिंदुस्थान शासनाला आपले धोरण बदलण्यास लावावे हा त्यामागील डाव आहे. ते ज्या विलक्षण स्थितीत उभे आहेत त्यातून सुटका करून घेण्यासाठी ते असे हात-पाय आपटीत आहेत हे माझ्या लक्षात येऊ शकते; पण या प्रश्नावर त्यांनी असल्या दादागिरीच्या डावापेक्षा समतोल विचार करावा एवढी अपेक्षा करण्याचा माझाही अधिकार आहे. त्यांच्या अकांड तांडवाला आणि दमदाटीला अपयश येणार हे सूर्यप्रकाशाइतके स्वच्छ आहे. आपले साध्य गाठण्यासाठी

केलेल्या अशा सर्व असभ्य वर्तनाच्या आणि साधनांच्या प्रयोगाच्या धुंदीत पाकिस्तानच्या अर्थमंत्र्यांनी सत्यस्थितीकडे पाहिलेच नाही, तसेच ज्या सत्य घटना आहेत त्यांनाही त्यांनी मूल्य दिले नाही. कसे ते पाहा-

काश्मीर प्रश्न या वाटाघाटीत खेचला जाईल याची आम्हाला थोडीही कल्पना नव्हती असे जे विधान आहे, त्याचा आपण प्रथम विचार करू. त्याचप्रमाणे हिंदुस्थान शासनावर अप्रामाणिकपणाचा त्यांनी आरोप केला, त्याचा आणि तशाच स्वरूपाच्या दुसऱ्या आरोपांचाही आपण प्रथम विचार करू. या वाटाघाटी कशाकशा चालत गेल्या याचा मी आपणास थोडक्यात आढावा देतो. गेल्या नोव्हेंबरच्या शेवटच्या आठवड्यात पाकिस्तान शासन आणि हिंदुस्थान शासन यांच्या प्रतिनिधींमध्ये अनेक बैठकी झाल्या. त्यांचा हेतू आपले सर्व वाद निपटून काढणे हा होता आणि त्यात काश्मीरचा प्रश्नही समाविष्ट होता. जी बोलणी झाली ती फाळणीमुळेच निर्माण झालेल्या प्रश्नांपुरती मर्यादित नव्हती. काश्मीरचा प्रश्नही चर्चिला गेला तसेच निर्वासितांचा प्रश्न आणि पुनर्वसनाच्या महत्त्वाच्या गोष्टीही त्यात बोलल्या गेल्या. दि. २६ ला काश्मीरवर जी चर्चा झाली ती आशेच्या, सद्भावनेच्या आणि सौजन्याच्या वातावरणात. ती चर्चा पुढे चालू राहिली आणि आर्थिक आणि दुसरे प्रश्नही पुढील दिवशी चर्चिले गेले. दि. २७ नोव्हेंबरला शेष राशींच्या वितरणाचा आणि चर्चा न झालेल्या ऋणाचा एक तात्पुरता करार झाला. या करारांच्या लगेच घोषणा कराव्यात अशी पाकिस्तानच्या प्रतिनिधींना घाई झाली आणि आम्हाला तशी निकड लावण्याचा त्यांनी प्रयत्न केला. आम्ही त्याला विरोध केला. २७ नोव्हेंबरच्या संध्याकाळी मी वृत्तपत्रांना एक वक्तव्य दिले. आमच्या बोलण्यावर वृत्तपत्रांनी काही तर्क लढवू नये, तर आमची बोलणी संपून आम्ही अधिकृत माहिती देईपर्यंत धीर धरावा असे त्यांना सांगितले. ते माझे शब्द आहेत, 'सर्व विलंबित प्रश्नांवर उपाय शोधण्याचे आमचे कसून प्रयत्न चालू आहेत; पण या चर्चेवर तर्कवितर्क प्रकट केले तर त्याने हित होण्यापेक्षा अनहितच होईल. सध्या मला एवढेच सांगता येईल की आमची बोलणी ही मित्रत्वाच्या आणि सौजन्याच्या वातावरणात चालू आहेत आणि पाकिस्तानचे पंतप्रधान आणि अर्थमंत्री शनिवारपर्यंत राहणार आहेत.

'बोलणी संपताच विस्तृत निवेदन दिले जाईल. तोपर्यंत काही प्रतिवृत्त प्रसिद्ध झाले किंवा एखाद्या प्रश्नावर अनुबंध झाल्याचे प्रसिद्ध झाले तर त्या प्रतिवृत्तांना शासकीय दुजोरा नाही आणि ती अवधिपूर्व आहेत असे मानले जाईल.'

ही तडजोड अंतिम नव्हे

दुसऱ्या दिवशी सकाळी मी माझ्या वक्तव्यात एक स्पष्टीकरण दिले ते शासकीय भवनात (Government House) वाचले गेले. पाकिस्तानचे पंतप्रधान आणि अर्थमंत्री उपस्थित होते. सर्व भिजत पडलेल्या प्रकरणांवर तडजोड झाल्यावाचून ती तडजोड अंतिम आहे असे आम्ही मानणार नाही हे माझे स्पष्टीकरण होते. काश्मीर प्रश्न निर्णयात निघाल्यावाचून आम्ही कोणाचेही पैसे देण्यास मान्यता देणार नाही हेही मी स्वच्छपणे सांगितले होते. त्या माझ्या विधानाला अनुसरून तडजोडीचे प्रकटीकरण केले गेले नव्हते. मध्यंतरीच्या वेळात पाकिस्तानच्या प्रतिनिधींनी आपले जाणे लांबविले आणि काश्मीर प्रश्न आणि दुसरे प्रश्न यांच्यावर बोलणी होत राहिली. त्या वेगवेगळ्या प्रश्नांवर एकमत होत नव्हते. तरीही या काहीशा सुधारलेल्या वातावरणात चर्चा होता होता विभाजनामुळे उत्पन्न झालेल्या दुसऱ्या विलंबित प्रश्नांवर आमची तडजोड झाली. ही तडजोड विभाजन मंडळापुढे त्यांच्या एक डिसेंबरच्या बैठकीत ठेवण्यात आली. मात्र त्या तडजोडी नंतर लिपिबद्ध करावयाच्या होत्या. दोन डिसेंबरला ते काम झाले. तेव्हा असेही ठरले की, काश्मीर आणि दुसऱ्या प्रश्नांवर लाहोर येथे बैठक होऊन सर्व प्रश्न समाधानकारकपणे सुटल्यानंतर या तडजोडीची वाच्यता करावयाची. ते प्रश्न समाधानकारक सुटतील अशी तेव्हा आशा होती.

वक्तव्य प्रसिद्ध न करण्याचे हे धोरण दोन्ही पक्षांनी मध्यस्थ आयोगापुढे (Arbitral Tribunal) आपले म्हणणे मांडताना मान्य केले होते. जे प्रश्न बोलले जात होते त्यावर उपाय निघण्याची पुष्कळच अनुकूलता दिसत होती, आणि दि. ८ आणि दि. ९ डिसेंबरला लाहोरला बैठक भरली होती. त्या बैठकीत स्थिती अधिक स्पष्ट होणार होती. दि. ८ आणि ९ ला लाहोर येथे बोलणी चालू झाली; पण ५५ कोटी रुपये पाकिस्तानला देण्याचे जे ठरले होते ते पैसे झटपट काढून घेण्याचे तीव्र प्रयत्न पाकिस्तान शासनाकडून मध्यंतरीच्या काळातच होत असल्याचे दिसून आले. या प्रयत्नांना मी विरोध केला. आर्थिक देवघेवीचा प्रश्न वेगळा काढावा म्हणून आणि आमचे हात बांधले जावेत म्हणून पाकिस्तान उच्च आयुक्ताने ७ डिसेंबरला वृत्तपत्रांना सांगितले की, आर्थिक प्रश्नांवर आमची तडजाड झाली. आम्ही मात्र आमच्या पूर्वीच्या विधानांना चिकटून राहिलो. लाहोरच्या चर्चेतही आम्ही तो आग्रह धरला, आणि पाकिस्तानशी काहीसे सहमत होऊन ९ डिसेंबरला दिल्ली येथे भरत असलेल्या संसदेत एक वक्तव्य देण्याचे आम्ही ठरविले. पाकिस्तानच्या अर्थमंत्र्यांनीही वृत्तपत्रांकडे धाव घेण्याची इतकी घिसाडघाई केली की, ७ डिसेंबरलाच त्यांनी वृत्तपत्रांना निवेदनही देऊन टाकले. पाकिस्ताचे कपट तेव्हा स्पष्ट झाले.

अर्थिक प्रश्नांवरील तडजोड आम्ही प्रकट करीत आहोत या स्थितीचा एक अस्त्र म्हणून वापर करून पाकिस्तानची काश्मीरसंबंधीची वर्तणूक पुन्हा आडमुठेपणाची झाली. आणि दिल्लीला जी नुकतीच सर्व प्रश्नांवरील तडजोडीची आशा वाटत होती ती लुप्त झाली. ९ डिसेंबरच्या संसदेमधील माझ्या वक्तव्यात एक भूमिका स्पष्ट करणे मला आवश्यक वाटले. ती भूमिका म्हणजे या आर्थिक तडजोडीचे कार्यवहन शक्यतो तेव्हाच केले जाईल की, जेव्हा काश्मीर प्रश्नावर तडजोड होईल. या माझ्या विधानावर पाकिस्तान शासनाने तेव्हा काहीही आक्षेप घेतला नाही. पाकिस्तान उच्च आयुक्ताच्या उपस्थितीत दि. १२ डिसेंबरला मी जे विवेचन केले त्यातही मी असे सांगितले की, त्या तडजोडीचे यशस्वी कार्यवहन दुसऱ्या महत्त्वाच्या प्रश्नांच्या सोडवणुकीवर अवलंबून राहील. काश्मीर हा त्या प्रश्नातलाच एक होता हे स्पष्ट होते. पाकिस्तानने याही वेळी काही विरोध दर्शविला नाही. ५५ कोटी रुपये मिळविण्याच्या पाकिस्तानच्या प्रत्येक प्रयत्नाला आम्ही नकार दिला होता. मग २२ डिसेंबरला काश्मीरवर अंतिम चर्चा निघाली त्या वेळी पाकिस्तानच्या पंतप्रधानांनी आमचा आर्थिक प्रश्न आणि काश्मीर प्रश्न एकमेकांवर अवलंबून आहेत या म्हणण्याला विरोध केला आणि ५५ कोटी रुपये त्वरित देण्यासाठी आग्रह केला. आम्ही त्याही वेळी त्यांना बजावले आणि नंतर ३० डिसेंबरला त्यांना धाडलेल्या तारेतही स्पष्ट केले की, तडजोडीतील अटी पाळण्यास आम्ही बांधलेले आहोत; पण काश्मीर प्रश्नात पाकिस्तानने जी शत्रुत्वाची भूमिका घेतली आहे त्यामुळे ते पैसे देणे पुढे ढकलावे लागेल. कारण सर्व चर्चाभर आमची तीच भूमिका होती.

अशा प्रकारे आम्ही पाकिस्तानशी मुळीच अयोग्य वागलेलो नाही. आम्ही कोणताही वचनभंग केलेला नाही तर पाकिस्तानच्या प्रतिनिधींनीच आम्ही काश्मीरचा प्रश्न सोडविण्यास उत्सुक आहोत असे ढोंग करून आमच्याकडून आर्थिक प्रश्नांवर आणि दुसऱ्या प्रश्नांवर अधिकाधिक सुविधा मिळविण्याचा प्रयत्न केला. आर्थिक वाटाघाटींचा प्रश्न हा इतर महत्त्वाच्या प्रश्नांपेक्षा वेगळा आहे, अशा प्रकारची घोषणा आमच्याकडून करवून घेण्याचा त्यांचा डाव होता. पाकिस्तान उच्च आयुक्त आणि अर्थमंत्री यांनी आमचे हात बांधण्याचा फार प्रयत्न केला; पण आम्ही सततपणे आणि यशस्वीपणे त्याला विरोध केला. आम्ही कधी अप्रामाणिक झालो नाही. उलट सर्व प्रश्नांवरील सोडवणुकीचा हा एक भाग आहे असे आम्ही मन:पूर्वक आणि खरेपणाने मानीत होतो. या दोन शेजारी राज्यात मित्रत्वाचे आणि शांततेचे संबंध राहावेत म्हणून हा आमचा निर्णय होता.

या आर्थिक तडजोडीला मान्यता देण्यामागे आमच्या मनात

पाकिस्तानविषयीच्या उदार भावना होत्या हेही आमचे म्हणणे आहे. मी विभाजनमंडळापुढे असे बोललो होतो की, पाकिस्तान एक भरभराट झालेला शेजारी उभा राहावा अशी आमची इच्छा आहे. दुसऱ्या प्रश्नावरील वादात पाकिस्तान आमच्याविषयी तशीच भावना ठेवील अशी आमची आशा होती. कारण त्या वादामुळे आम्ही दूर आहोत. पाकिस्तान उच्च आयुक्त आणि सर आर्चिबाल्ड रोलॅन्डस् यांनी प्रसिद्ध केलेल्या वक्तव्यावरून हे स्पष्टच दिसते की, ही आर्थिक तडजोड पाकिस्तानला अत्यंत आकर्षक वाटली आणि पाकिस्तानला ती एक मोठा आधार होणार होती. म्हणून आपली आर्थिक स्थिरता नीट ठेवण्यासाठी पाकिस्तानने हे वचन मिळवले. त्याचबरोबर हिंदुस्थानच्या भावनांना मात्र प्रतिसाद देण्याचे नाकारले.

पाकिस्तानने हिंदुस्थानला देणे असलेले द्रव्य

नुसती न्याय्य आणि शांततेची तडजोड करण्यापलीकडे हिंदुस्थानचा दृष्टिकोन अधिक विशाल होता हेही मला लक्षात आणून द्यावयाचे आहे. जे काही वाद आहेत त्या वादांकडे समंजसपणाने, सहानुभूतीने, सहनशीलतेने आणि कल्याणबुद्धीने पाहिले तरच आम्ही आणि पाकिस्तान यांच्यात शेजाऱ्याचे आणि सौहार्दाचे संबंध राहणे शक्य होईल याची आम्हाला सर्व वेळ जाणीव होती. पाकिस्तानने मात्र आमच्या या उदारतेच्या वर्तनाचा अनुचित लाभ घेतला आणि आमच्या भावनांचा लाभ अतिशय उथळ, संकुचित आणि स्वार्थी उद्देशांसाठी घेतला. सर्वव्यापक उदारतेच्या दृष्टिकोनाची फार आवश्यकता होती आणि आहे हे स्पष्टच आहे. दुसरे घटक दूर सोडा. हिंदुस्थानने अविभक्त हिंदुस्थानचे सर्व ऋण आपल्या डोक्यावर घेतले आणि पाकिस्तानच्या विश्वासूपणावर आणि सद्भावनेवर आम्ही विसंबून राहिलो. पाकिस्तानने हिंदुस्थानला सहज शक्य होणाऱ्या आणि दीर्घ कालावधी असणाऱ्या हप्त्यांनी ती ऋणफेड करावी असे आम्ही ठरविले. म्हणून आमच्या सुरक्षेवर गदा आणील किंवा आमची पत नष्ट करील अशा प्रकारचे प्रश्न या पैशाच्या देवाण-घेवाणीत बुडवून ठेवणे आम्हाला परवडणार नाही. जे ताणाताणाचे संबध आहेत ते अधिक तीव्र होऊ नयेत याची आम्हाला दक्षता घेतली पाहिजे. मी १२ डिसेंबरला केलेल्या वक्तव्यात म्हटलेच आहे की, आमच्या सद्भावनेतून उभे केलेले कार्य आता धोक्यात आले आहे. म्हणजेच आमच्या सद्भावनेलाच आता धोका आहे.

काश्मीरवरील आक्रमणाचा प्रतिरोध करण्याचा उपचार म्हणून आम्ही या संधीचे (आर्थिक व्यवहाराच्या कराराचे) कार्यवहन विलंबिले यात आम्ही न्यायोचित व्यवहारच केला आहे. आम्ही आमच्या संधीने बांधलेले आहोत असे आम्ही पाकिस्तान शासनाला एकदा नव्हे अनेकदा सांगितले आहे. पैसे देण्यासाठी

नियत अवधीचे बंधन त्या संधीत आम्हावर नाही. सध्या पाकिस्तानने आपल्या सैन्यानिशी आमच्याशी सशस्त्र संघर्ष चालविला आहे; त्याची व्याप्ती अधिक भयानक होईल अशी चिन्हे दिसत आहेत; त्यायोगे आर्थिक संधीचा पायाच उद्ध्वस्त होण्याची शक्यता आहे. संधीत समाविष्ट असलेल्या ऋणांचे उत्तरदायित्व स्वीकारणे, साहित्याची विभागणी करणे इत्यादि भागावरही त्याचा अनिष्ट परिणाम होईल. अशा स्थितीत उरलेले पैसे द्यावेत असा वाद आमच्याशी पाकिस्तानला कोणत्याही न्यायाने घालता येणार नाही.

आरोपांना आधार नाही

सज्जनहो ! पाकिस्तानच्या अर्थमंत्र्यांनी हिंदुस्थान शासनाविरुद्ध जे आरोप केले ते किती निराधार आणि फुसके आहेत ते दाखविण्यासाठी मी पुरेसे विवरण केले आहे असे मला वाटते. आर्थिक प्रश्न दुसऱ्या महत्त्वाच्या प्रश्नांपासून वेगळे काढता येणार नाहीत आणि त्यांच्या तडजोडीचे कार्यवहन एकाच वेळी होऊ शकेल हे धोरण आम्ही सातत्याने मांडले आहे हेही मी दाखविले आहे. जी तडजोड झाली आहे, त्यातील अटींपासून आम्ही मागे जाण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. इच्छा एवढीच आहे की, तडजोडीचे कार्यवहन करण्यासाठी अनुकूल आणि योग्य वातावरण निर्माण झाले पाहिजे. पाकिस्तानने पैसे आगाऊ मागण्याचा आग्रह धरला तर जी तडजोड झाली आहे, त्यामागील भावनांच्या घटकांना सुरुंग लावण्याचा त्यांचा हेतू आहे हे स्पष्टच आहे. म्हणून त्याच्या आग्रहाला विरोध करण्यात आम्ही न्यायानेच वागत आहोत. जर पाकिस्तानला त्यांच्या दांडगाईत यश मिळाले तर तडजोडींचा पायाच उघडला जाईल आणि हिंदुस्थानवरील त्यांच्या चढाईच्या पवित्र्याला सुलभता मिळेल. तडजोडीच्या इतर प्रश्नांवरही त्याचा विपरीत परिणाम होणार हेही स्पष्ट आहे.

● ●

अर्थमंत्र्यांच्या प्रतिवृत्तातील उतारा

नंतर ज्या घटना घडल्या त्यावरून आमचे औदार्य चुकीच्या ठिकाणी ओतले गेले असे दिसून येईल. श्री. गुलाम महंमद यांनी आपल्यावर राजकीय दरोडेखोरीचा आरोप केला आहे. तो कदाचित स्वस्तपणे पाकिस्तानकडे सहानुभूती खेचून घेण्याचा मार्ग अरोल. चीड आणणाऱ्या या वर्तनानंतरही आमची भूमिका अतिशय स्पष्ट आहे. या दोन राष्ट्रांत जो संधी झाला, त्यातील अटींपासून

आम्ही मागे जाण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. आम्ही पहिल्यानेच स्पष्ट केले आहे की या सर्व तडजोडी, सर्वव्यापक तडजोडींचा एक भाग आहे आणि त्यातील अटींचे कार्यवहन इतर प्रश्नांच्या सोडवणुकीबरोबरच होईल. मध्यंतरी कुठल्या दादागिरीच्या, गुंडगिरीच्या किंवा पाय खेचण्याच्या आमच्या शेजारी राष्ट्राच्या उत्तरदायी मंत्र्याच्या प्रचाराने आम्ही अवलंबिलेल्या योग्य धोरणापासून ढळणार नाही.

हिंदुस्थानच्या उत्स्फूर्त सद्‌भावनेचे प्रत्यंतर हिंदुस्थान-पाकिस्तान यांच्यातील आर्थिक तडजोडीचे त्वरित कार्यवहन

हिंदुस्थानच्या पंतप्रधानांच्या सचिवालयाने दिनांक १५ जानेवारी १९४८ या दिवशी वृत्तपत्रांसाठी एक निवेदन प्रसिद्ध केले आहे. त्यात असे म्हटले आहे की, हिंदुस्थान शासनाने हिंदुस्थान आणि पाकिस्तान यांच्यात झालेल्या अर्थविषयक तडजोडीसंबंधी आपली भूमिका स्पष्ट केलेलीच आहे. हिंदुस्थान आणि पाकिस्तान यांच्यात जे सर्वव्यापक वादाचे प्रश्न आहेत त्या सर्वांच्या सोडवणुकीसह या आर्थिक तडजोडीचे कार्यवहन केले जाईल असेही आम्ही प्रकट केले आहे. त्याचबरोबर त्या तडजोडीतील अटींना आम्ही धरून आहोत असेही म्हटले आहे.

पाकिस्तानच्या अर्थमंत्र्यांनी जो निराधार वाद घातला आणि आकांडतांडव केले याचा आम्हांला खेद वाटतो. तो आम्ही कधीच मानणार नाही. भारताचे उपपंतप्रधान आणि अर्थमंत्री यांनी जी निवेदने दिली आहेत त्यात वस्तुस्थितीचे आणि सत्य घटनांचे विवरणही केले आहे. त्यात मांडलेली विधाने आणि केलेला युक्तिवाद हिंदुस्थानच्या मंत्रिमंडळाच्या एकमताचे निदर्शक आहेत. पाकिस्तानच्या अर्थमंत्र्यांनी त्या सत्य घटनांना पुन्हा आव्हान द्यावे याचा आम्हाला विषाद वाटतो. त्या सत्य घटना अविरोधात्मक आहेत. हिंदुस्थान शासनाने न्यायाच्या भूमिकेवरून आणि दुसऱ्या भूमिकेवरून स्वीकारलेल्या धोरणाचा त्या पाठपुरावाच करतात.

महात्मा गांधींचा उपवास

गांधीजींनी म्हणजे राष्ट्रपित्याने जो उपवास चालू केला आहे त्यावर जगभर चिंता पसरली आहे. त्या चिंतेत हिंदुस्थान शासन सहभागी आहे. हिंदुस्थान आणि पाकिस्तान यांच्या संबंधात जे संशयाचे, मत्सराचे आणि द्वेषाचे विष भिनले आहे त्यावर उपचार करण्याचे मार्ग अवलंबिण्याच्या प्रयत्नांत आम्ही गांधीजींशी एकरूप आहोत.

या हेतूच्या पूर्तीसाठी हिंदुस्थान शासनाने एक समन्वयाची आणि लक्ष वेधून घेईल अशी देणगी दिली आहे. त्यायोगे राष्ट्राच्या आत्म्याच्या शारीरिक यातनांना विश्राम मिळेल. तसेच राष्ट्राचे मन सध्या कटुतेत, संशयात आणि क्रोधात गुरफटले आहे त्यातूनही ते बाहेर येईल. हा एक रचनात्मक मार्ग ठरेल. गांधीजींच्या तर ते अंत:करणाचेच ब्रीद आहे. हिंदुस्थान आणि पाकिस्तान यांच्यात संघर्ष निर्माण करणाऱ्या गोष्टी शक्यतो दूर करण्याला हिंदुस्थान शासन उत्सुक आहे. आणि तेही राष्ट्रहिताची हानी होऊ न देता.

गांधीजींनी राष्ट्राला जे आवाहन केले आहे त्यास अनुसरून संशयाच्या आणि संघर्षाच्या वातावरणातील एका घटकाचे निराकरण करण्याचे हिंदुस्थान शासनाने ठरविले आहे. ते निराकरण आमच्या देशाच्या सन्मानाशी आणि हिताशी सुसंगत आहे आणि ते करण्याचे आमच्या हातात आहे.

ज्या शुद्ध हेतूने आणि सद्भावनेने आम्ही हे उत्स्फूर्त प्रत्यंतर देत आहोत त्याला त्याच प्रमाणात आणि त्याच भावनेने प्रतिसाद मिळेल अशी आम्हाला कळकळीची आशा आहे. एकमेकात सौहार्द निर्माण होण्यास त्याने साहाय्य होईल. राष्ट्राचे एक महान सेवक गांधीजी यज्ञवेदीवर उभे आहेत आणि ते जे आत्मक्लेश सहन करीत आहेत ते थांबतील, ते उपवास सोडतील आणि यापुढेही ते देशाची अतुलनीय सेवा करतील.

रोख पैसे पाकिस्तानला देण्याच्या तडजोडीचे तत्काल कार्यवहन करण्याचा हिंदुस्थानने निर्णय घेतला आहे. या कराराप्रमाणे पाकिस्तानला देण्याची राशी म्हणजे ५५ कोटी रुपये उणे पंधरा ऑगस्टपासून पाकिस्तानच्या नावे हिंदुस्थानने व्यय केलेले पैसे पाकिस्तानला हिंदुस्थान शासन देईल.

हा निर्णय म्हणजे या देशाच्या देदीप्यमान परंपरेला अनुसरून शांतता आणि सदिच्छा टिकविण्याकरिता गांधीजींच्या अहिंसक आणि उदात्त प्रयत्नाला हिंदुस्थान शासनाची मन:पूर्वक देणगी आहे.

हिंदुस्थानच्या पंतप्रधानांच्या निवेदनातील उतारा

हिंदुस्थान शासनाचा हे पैसे पाकिस्तानला देण्याचा निर्णय पूर्ण विचारानंतर आणि गांधीजींशी विचारविनिमय केल्यानंतर घेतला गेला आहे. माझे मान्यवर सहकारी यांनी वेळोवेळी केलेल्या निवेदनात हिंदुस्थानचे म्हणणे मांडलेलेच आहे. ते म्हणणे शासनाचे एकमताचे म्हणणे आहे. त्यानागील शक्ती आणि त्याची वैधता यात या आमच्या सद्भावनेच्या प्रत्यंतराने काही अंतर पडले आहे असा त्याचा अर्थ काढू नये. पाकिस्तानच्या अर्थमंत्र्यांनी अगदी शेवटी जे पत्रक काढले आहे त्यात मांडलेले वाद आम्ही मानीत नाही हेही आम्ही स्पष्ट

करतो.

हिंदुसभेचा लोकतंत्रविषयक ठराव

अखिल भारतीय हिंदुमहासभेच्या बिलासपूर येथेल डिसेंबर १९४४ मध्ये झालेल्या २६ व्या अधिवेशनात संमत झालेल्या ठरावातील उतारे पुढे दिले आहेत. (या ठरावांना श्री. नथूराम विनायक गोडसे यांनी अनुमोदन दिले होते.)

संविधानाची मूलभूत तत्त्वे

(१) सार्वभौम सत्तेचे घटक हिंदुस्थानातील लोक आहेत. जगातील इतर देशांतील लोकांप्रमाणे हिंदुस्थानच्या लोकांनाही पूर्ण स्वतंत्र होण्याचा सर्व अधिकार आहे. म्हणून हिंदुस्थान हे एक स्वतंत्र राष्ट्र राहील आणि त्याच्या संविधानाचे नाव राहील 'स्वतंत्र हिंदुस्थान राष्ट्राचे संविधान.

(२) ऐतिहासिक परंपरेने राजकीय दृष्ट्या आणि वांशिक आधारावर तसेच सांस्कृतिक भूमिकेवरूनही हिंदुस्थान एक आहे, संपूर्ण आहे, अविभाज्य आहे आणि तो तसाच राहिला पाहिजे.

(३) हिंदुस्थानच्या स्वतंत्र राष्ट्राच्या शासनाचे स्वरूप लोकतंत्रप्रधान आणि गणतंत्र पद्धतीचे राहील.

(४) गणतंत्राची विधिमंडळ पद्धती दुहेरी प्रकारची असेल.

(५) विधिमंडळाच्या निवडणुकी, त्या केंद्रीय असोत किंवा प्रान्तीय असोत सज्ञान मतदारसंघाकडून आणि एक डोई एक मत या तत्त्वावर होतील. मतदारसंघ संयुक्त राहतील. अल्पसंख्याकांना त्यांच्या संख्येच्या प्रमाणात राखीव स्थान राहील.

मूलभूत अधिकार

(१) सर्व नागरिकांना विधिविषयक समानता राहील आणि सर्वांना समान अधिकार असतील. नागरी अथवा दंडविषयक मूलभूत किंवा कार्यवहनात्मक असा कोणताच विधी भेदभाव करणारा असणार नाही.

(६) सार्वजनिक स्वरूपाची सेवावृत्ती, अधिकारांची पदे, मानसन्मानांची स्थाने किंवा व्यवसाय करण्याचा अधिकार यांच्यात वर्ण, जात किंवा पंथ यांचा अडथळा येणार नाही.

(१०) सार्वजनिक सुव्यवस्था आणि नीतिमत्ता यांना बाध न आणता सर्व नागरिकांना विचाराचे स्वातंत्र्य, तसेच आचारांचे स्वातंत्र्य राहील. त्यांच्या त्यांच्या धर्माचे पालन, त्यांच्या संस्कृतीचे आणि भाषेचे संरक्षण करण्यास मिळेल

आणि धर्मद्वेषावर आधारलेला किंवा धर्मामुळे प्रतिबंध आणणारा कोणताही विधी प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे केला जाणार नाही. तसेच धर्मविशेषांमुळे किंवा धार्मिक श्रेणीमुळे कोणालाही विशेष अधिकार मिळणार नाहीत किंवा अधिकार हिरावून घेतले जाणार नाहीत.

● ●

९. श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांना लिहिलेले पत्र

कामे तर फार आहेत आणि वेळ अपुरा आहे याची जाणीव नथुरामला सारखी होत होती. श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांची 'एका निर्वासिताची कहाणी' त्याने वाचली होती. लेखकास अभिप्राय कळविण्याची नथुरामची इच्छा तीव्र होती.

नवीन कागद घ्यायचा, पत्ररूपाने अभिप्राय लिहायचा, यासाठीही नथुरामजवळ वेळ नव्हता. त्या पुस्तकावरच असलेल्या कोऱ्या आणि अर्धवट कोऱ्या पानावर त्याने आपले मनोगत लिहिले.

दि. १४/११/४९ ला म्हणजे फाशीच्या आदल्या दिवशी त्याने लिहिलेले ते पत्र आहे. फाशीनंतर वस्तू, पुस्तके परत देताना अधिकाऱ्यांनी त्या त्या विभागाकडून सर्व तपासणी करून मग ती परत दिली.

माझे बंधू श्री. दत्तात्रेय यांनी ते मूळ पुस्तक आणि त्या अभिप्राय पत्राची एक प्रत श्री. माडखोलकर यांच्याकडे आठ-दहा दिवसांनी पोहोचविली.

'सोबत' साप्ताहिकाने (श्री. ग. वा. बेहेरे यांनी) हे पत्र दिवाळी अंक १९७० मध्ये प्रसिद्ध केले आहे. पत्राच्या साहित्यिक किंवा वाङ्मयीन अंगासहच लेखी निवेदनाच्या प्रकाशित भावनात्मक अंगाचे रसग्रहण वाचकांना करता यावे म्हणून या पुस्तकात ते पत्र दिले आहे.

अंबाला, दि. १४/११/४९

प्रिय लेखक महाशय,

निर्वासिताची कथा वाचली. विचारपूर्वक वाचली. आपली लेखणी महाराष्ट्रात मुळातच लोकप्रिय आहे आणि या कहाणीचे कथानक तर सत्य घटनाच आहे आणि म्हणूनच या कहाणीत प्रेम, गहिवर, आदर, संताप, तिरस्कार, दुःख इत्यादि नानाविध भाव अत्यंत प्रकर्षाने प्रकटले आहेत. आपल्या मनोव्यथा आणि आपले विविध विचारतरंग वास्तवतेच्या पार्श्वभूमीवर आपण शब्दांत उमटविले आहेत आणि म्हणून आपल्या आजवरच्या अनेक 'डाक बंगल्या'पेक्षाही आपले भग्नघर साहित्यसृष्टीत अधिक काळ टिकून राहील.

श्रीमान् लेखक महाशय, आपल्या काही एका चळवळीचा आणि आपल्या सर्वसाधारण सौजन्याचा मी एक चाहता रसज्ञ आहे. आपला काही काळ सुखकर सहवासही मला मिळाला आहे. मला ज्या प्रमाणात आपल्याविषयी पूर्वी प्रेम वाटले, त्याच प्रमाणात आजही ते पुस्तक वाचल्यानंतरही कायम आहे आणि

मला हेही माहीत आहे की, माझ्याविषयी आत्यंतिक तिरस्काराव्यतिरिक्त आता कोणतीही भावना आपल्या अंत:करणात उरलेली नसणार.

आणि तरीही आपल्यासाठी मी हे लिहीत आहे. माझी निश्चिती आहे की, आपण हे वाचाल आणि विचार कराल. मीही आज हे शब्द स्वर्गारोहणाच्या सिद्धतेत असताना लिहीत आहे. माझी चित्तवृत्ती शांत आहे. मन उल्हसित आहे. मला वाटते, आपल्या या कहाणीच्या मागे जशी वास्तवतेची भूमी आहे तशीच माझ्या या पत्रामागेही एक अननुभूत व क्वचित् पाहावयास सापडणारी पार्श्वभूमी विस्तारलेली आहे. मी पत्रकार होतो; पण मी साहित्यिक नाही. तथापि, साहित्य हा माझा आवडीचा विषय होता आणि साहित्याचा थोडाफार आस्वाद घेण्याइतकी रसज्ञता माझ्यात आहे असे मी समजतो; आणि त्यामुळेच मला वाटते की, ज्या परिस्थितीत मी हे पत्र लिहीतं आहे ती परिस्थिती साहित्यिकाचे हृदय वेधल्याशिवाय राहणार नाही. असो, आपल्या एका निर्वासिताच्या कहाणीस आपल्या या प्रसंगातील इतरही अनेक निर्वासितांची व विध्वंसनाची वर्णने आहेत, एका अंगाला हे विध्वंसन आणि त्याच्या मुळाशी गांधीवधाचे कारण. आपल्या अंत:करणावर गांधीवधाने आघात झाला. आपल्यातीलच एकाने हा वध केला म्हणून लज्जा आणि संताप आपणाला अनिवार झाला आणि विध्वंसनामुळे आपल्या या भावनेत उद्वेग, हळहळ आणि अनेक विकारांच्या कल्लोळाची भर पडली.

वरील घटना मलाही जसजशा समजत गेल्या, तसतशा माझ्याही भावना काही प्रमाणात आपणाप्रमाणेच झाल्या. आपण माना किंवा मानू नका; पण मी मुळात निर्दय वृत्तीचा मनुष्य नव्हे. सहृदयता आणि सर्वसाधारण सौजन्य याच धाग्यांनी माझा स्वभाव बनला आहे. माझे मित्रच नव्हे, तर अनेक आरक्षी अधिकारी आणि बंदीरक्षकही, आपण जर तपास केलात तर वरील माझे विधान आपणाला साक्षीपुराव्याने पटवितील.

आणि मग मी हे भयंकर कृत्य का केले ? लेखक महाशय ! येथेच आपणाला विनंती आहे की, कवीच्या दिव्य दृष्टीने किंवा मनोवैज्ञानिकाच्या सूक्ष्मदर्शिकेने माझी पुढील विधाने पाहा आणि मग पाहिजे तर फेकून द्या.

माझ्या क्रूर कृत्याचा उगम सहृदयता आणि दया आणि स्त्रीदाक्षिण्य यांच्या आत्यंतिक भावनात आहे. जननिंदा आणि मृत्युदंड हे दोन्हीही परिणाम मला माहीत असूनही वरील भावनांपुढे ते मला क:पदार्थ वाटले.

माझ्या न्यायालयातील वक्तव्याचा बराचसा भाग सत्य इतिहास आहे आणि काही भाग अंत:करणाने लिहिलेले साहित्य आहे; पण लोकांच्या दृष्टीसमोर

ते जाऊ देण्यास शास्त्र्यांना धोका वाटतो. याच गोष्टीने त्याचा प्रभाव मला प्रतीत होत आहे आणि ते वक्तव्य आपल्याला साग्र विदित झाले, तर माझ्या कृत्याचा उगम आपल्या चांगला ध्यानी येईल. माझ्या कृत्याची निंदा आपण कितीही करा; पण माझ्या भावनांची निंदा आपणाला प्रामाणिकपणे करता येणार नाही.

देशविच्छेदन लोकांना काळोखात ठेवून किंवा पुढाऱ्यांनी काळोखात जाऊन केले. गांधी सत्यवचनी असते तर विच्छेदनाला त्यांनी जग आडवे आले असते तरी विरोध केला असता किंवा परिस्थिती लोकांना समजावून देऊन त्यांच्या विचाराने त्यांनी त्याला मान्यता दिली असती; पण विच्छेदनानंतरही, जरी आमची पूजामूर्ती अखंड भारतमाता भग्न झाली तरीही, आजच्या राष्ट्रीय पुढाऱ्यांना असा अत्याचारी विरोध करण्याची कल्पना माझ्या मनात शिरली नाही. विच्छेदनानंतर आणि दि. २० जानेवारी १९४८ पूर्वी दोन प्रसंगी मी दिल्ली, पंजाबात जाऊन आलो आणि मी प्रत्यक्ष काय पाहिले ? मला वाटते, ते हृदयद्रावक, करुण, अमानुष, अघटित आणि हिडीस प्रसंग माझ्यापेक्षा आपली लेखणीच अधिक समरसतेने रंगवू शकेल. कारण आपली लेखणी साहित्यिकाची आहे. त्यानंतर दिल्लीला माझा येण्याचा शेवटचा प्रसंग दि. १७ जानेवारी १९४८. मनात काही कल्पना होत्या; पण त्या अर्धवट होत्या आणि त्या या माझ्या या दिल्लीतील वास्तव्यात पूर्ण पक्क्या झाल्या. पराकोटीला पोहोचलेल्या मानवी क्रूरतेला आळा घालण्यासाठी दु:साहसाचा मार्ग पत्करणे अनिवार्य आहे हे मला दिसून आले.

गांधींचा शेवटचा उपवास मुसलमानांच्या समाधानासाठी होता आणि हिंदूंच्यावर मुळात झालेल्या क्रूरतेवर दयेच्या नावाने भयंकर क्रूर आघात केला गेला. झाडाखाली राहणे अशक्य झाले म्हणून ते निर्वासित मशिदी व मंदिरे यांच्या छपराखाली राहिले; पण मशिदीच्या छपरांचा उपयोग मानवी जीवरक्षणाकडे करून देण्याचे गांधींनी प्राणपणाने नाकारले आणि निर्वासितांच्या निवाऱ्याची काहीही सोय न करता गांधीवादी शासनसत्तेने सहस्रावधी निर्वासित स्त्री-पुरुष बालकांना गटारे आणि रस्त्याच्या किनाऱ्यावर त्या कडक थंडीच्या दिवसात दिवस काढणे भाग पाडले आणि ५५ कोटी रुपये पाकिस्तानला दिले.

लेखक महाशय, क्षणभर विचार करा ! त्या सहस्रावधी, सुशील पण विटंबित पंजाबी महिलांच्यामध्ये आपलीही धर्मपत्नी आहे - छे ! ही कल्पना क्षणार्धापेक्षा मनात अधिक ठेवू नका; पण या प्रकारचे अत्याचार करणारांना दयेच्या नावावर दान करणाऱ्या मनुष्यविषयी आपण काय भावनांनी भारले जाल ?

वरील कथा भावनामय कल्पना नव्हे, सत्यस्थिती आहे.

दयेच्या नावाखाली प्रचंड क्रौर्याला उत्तेजन, पाकिस्तानात घडलेल्या

अत्याचाराला आणि हिंदू प्रांतात काही ठिकाणी घडलेल्या प्रतिक्रियेमुळे मुसलमानांच्यावर झालेल्या क्रूरतेला गांधींचे हट्टी आणि अतिरेकी धोरणच कारण आहे. कितीही करामत केली आणि ब्रिटिशांचे नाव मधून मधून शिव्या देण्यासाठी घेतले तरीही वरील सत्य लपविता येणार नाही.

आपल्या राष्ट्रावर आपल्या विचारशक्तीच्या आणि सद्विवेकतेच्या सर्वस्वी विरुद्ध अशा गोष्टी गांधीवाद आणि गांधींचे महात्मेपण या नावाखाली लादल्या जात होत्या. हैद्राबादचा प्रश्न सोडवावयाचा होता आणि राष्ट्रभाषेसारखा महत्त्वाचा प्रश्न गांधींच्या हट्टामुळे उर्दूचे रानटी व मागासलेले लफडे हिंदीच्या गळ्यात अडकवून सुटण्याच्या सीमेवर उभा होता. भावी विटंबना आणि भयानक क्रूरता थांबविण्यासाठी मी सापेक्षत: एका लहान क्रूर कृत्याला प्रवृत्त झालो. हिरोशिमावर अणुअस्त्र फेकून एका क्षणात दीड लाख लोक मारणाऱ्या राष्ट्राची प्रशंसा करण्यात आज आपले अहिंसक राष्ट्र गढले आहे आणि असे म्हटले जाते की दीड लाख लोक मेले; पण आणखी लक्षावधी वाचले आणि मग मीही तेच म्हणतो की, गांधीजी मारले गेले, आम्ही काही लोक फाशी जात आहोत. बरेच निर्वासितही झाले, ज्यातील एक आपण आहात; पण दयेच्या आणि सत्याच्या नावाने होणारा भयंकर मानवी संहार तत्काळ आटोक्यात आला आहे.

गांधीजींच्या राष्ट्रसेवेसाठी त्यांना शतश: प्रणाम; पण राष्ट्रसेवकालाही राष्ट्र विच्छेदनाचा आणि राष्ट्रशत्रूला साहाय्य करण्याचा अधिकार नाही. हे प्रश्न ज्या जनतेचे राष्ट्र आहे, त्यांना समजावून आणि त्यांच्या विचाराने सोडविले जावे लागतात. काही पुढाऱ्यांनी अंधारात ठरवून किंवा महात्म्याने उपोषणाचे भय दाखवून असले भलतेच धोरण लोकांच्यावर लादले तर त्याचा परिणाम अशा प्रकारच्या विस्फोटाविना दुसरा काय होणार ? ही बाजूही दृष्टिआड करू नका.

या देशातील अभागी लक्षावधी निर्वासितांचे आणि विटंबित महिलांच्या साठीही एक चित्तवेधक कथानक आपण अवश्य लिहावे अशी माझी विनंती आहे. आणि त्या भयानक अमानुषतेच्या पाठीशी गांधीवाद उभा आहे ही गोष्ट सत्यपणे आणि स्पष्टपणे जगास सांगा. गांधींना वंदन करा हवे तेवढे; पण गांधीवादाच्या भोवऱ्यात राष्ट्र पुन्हा सापडू देऊ नका. आज गांधीवाद मृत होत आहे. माझी मृत्युदंडाची शिक्षा, गांधीवादी अहिंसेचे, न्याय आणि राजव्यवस्था या विषयांतील वैयर्थ्य सिद्ध करीत आहे.

दयेच्या भिक्षेने मला जीवदान दिले असते तर तो माझा मृत्यू ठरला असता; पण माझे स्वर्गारोहण हा गांधीवादाचा मृत्यू आहे. मला कोठल्याही प्रकारे, मी माझ्या या कृत्यात पाप केले आहे असे वाटत नाही. आणि म्हणून या प्रकरणासाठी पापक्षालनाच्या प्रार्थनेची कल्पनाही माझ्या मनाला शिवली

नाही. जरी आपण पंचमहापातकांची माळ माझ्यासाठी निर्मिली आहे, तरीही मला आपल्या भावनांच्यावर आघात करावयाचा नाही; पण आपल्या विचारांना खाद्य द्यावयाचे आहे. वाचा, विचार करा आणि नको असेल तर आपण फेकण्याला मोकळे आहात; पण तरीही हे म्हणादेसे वाटते की, निदान आपल्यापेक्षा ज्याचे अंत:करण कमी सहृदय नाही आणि आपणाइतकाच जो सुसंस्कृत आहे त्याने गांधीवध केला आहे. या गोष्टीचे विश्लेषण आपणाला करावे लागेल.

गांधीजी अमर आहेत; पण गांदीवाद मृत्युशय्येवर पडला आहे. थोतांड आणि भ्रामक मनधरणीच्या तंत्राला बळी पडण्याचे दिवस शेवटाला आले आहेत. बुद्धिवादाचा प्रभातकाळ झाला आहे.

आपला
नथुराम वि. गोडसे
१४/११/४९

प्रिय माडखोलकरजी ! माझे अंतिम नमस्कार स्वीकारणे किंवा फेकणे आपला प्रश्न आहे. माझी विनंती आहे. स्वीकार करा. आपल्या या कथानक प्रकाशनाला साहाय्य देणाऱ्यांना माझे धन्यवाद कळवा. गुरुवर्य आण्णाराव कर्वे यांना माझे अंतिम विनम्र प्रणाम अवश्य कळवा. अधिक काय लिहू ? एक क्रूर कृत्य करण्याची प्रेरणा परिस्थितीने मला दिली. याविषयीच खेद वाटतो. स्वर्गारोहणाच्या प्रसंगी मी शांत आहे.

आपला शुभेच्छू
नथुराम वि. गोडसे
अंबाला बंदिगृह १४/११/४९

लक्षावधी निर्वासितांच्यासाठी ही कहाणी अवश्य लिहा. आपली लेखणी शैलीदार आहे. हळुवार अंत:करण आहे.

नथुराम

● ●

काश्मीर - १९९०

१. पायाखाली काय जळत आहे ?
२. धर्मांतर हे राष्ट्रांतर : पाकिस्तान नंतर काश्मीर.
३. हिंदूंच्या संहाराचा शासकीय सापळा.
४. काश्मीरचा राष्ट्रीय उत्सव ईद.
५. निष्ठा विकत घेणारे शासन.
६. मुफ्तींना 'अनंतनागचा' द्वेष.
७. अनंतनागचा मुस्लिम दंगा
८. नरसंहार करणाऱ्यांना शिक्षा होणार नाहीत.
९. ४३ वर्षांपूर्वीच्या इतिहासाचे स्मरण.
१०. धर्मनिष्ठेला छेदून जात नसेल तर देशनिष्ठा.
११. स्वराज्याची परिभाषा.
१२. स्वदेशातून उखडले गेलेले पारशी.
१३. महमदबिन कासिमने इस्लामचा संदेश आणला : राजीव.
१४. हिंदू आणि मुसलमान हाच प्रश्न आहे; दुसरा नाही.
१५. एक धूळफेक.
१६. मुसलमानाना इराण जवळचा,
काश्मीरचे हिंदू निर्वासित नव्हे !
१७. कॉंडीचे स्वरूप : शासन निष्प्रभ.
१८. लंडन टाईम्स वृत्त : काश्मीरवर.
१९. अहमद बुखारीचा प्रधानमंत्र्याना दम.
२०. फर्मानाचा सन्मान.
२१. सेक्युलरवाद म्हणजे हिंदूद्वेष.
२२. खोटा विरोधाभास.
२३. फारुक ! आम्हाला काश्मीरच्या भोवऱ्यातून बाहेर काढ !
(वेळी काश्मीरातून बाहेर काढ !) आम्ही पाया पडतो !
२४. अरब देशांना सहाय्याचे पावारण.
२५. बेनझीरही भटकली आहे.
२६. हिंदू सभेकडून निर्वासितांची नोंदणी.
२७. मुफ्ती, अतिरेकी मिळालेले आहेत- राजीव.
२८. वल्गना विरल्या आहेत.

२९. आक्रमण झालेले आहे.
३०. अंतर्गत तोडफोड हे पाकिस्तानी आक्रमण.
३१. पाकिस्तानी सुरुंग हिंदुस्थानभर विखुरला आहे.
३२. जामा मशिद विघटनाचे प्रमुख केंद्र
३३. दुसऱ्या मुस्लिम संस्था आणि व्यक्ती काश्मीरविषयी काय म्हणतात.
३४. काश्मीर आमचा आहे : भाजपचा प्रस्ताव.
३५. इस्लामी आक्रमण झाले नसते तर ?
३६. इस्लामचे अधिष्ठान उध्वस्तीकरण.
३७. देश ठेवायचा तर प्रजाजन देशनिष्ठ हवे.
३८. सैनिकात असंतोष.
३९. जगण्यासाठी योजना लागतात : आत्मनाशासाठी नव्हे !
४०. हिंदुत्ववाद मानवतावादेच दुसरे नाव.
४१. हिंदुराष्ट्राच्या नागरिकत्वाच्या संहितेची स्थूल परिधी.
४२. महाराष्ट्र देशाचा खड्गहस्त आहे.
४३. समारोपापूर्वी.
४४. जगायचे आहे ना ? मग राज्याचे स्वराज्य करा.
४५. ऐक भविष्याला.

काश्मीर १९९०

१) पायाखाली काय जळत आहे ?

काश्मीरमधील आजच्या स्थितीचे एक समांतर उदाहरण पाहा.

सध्या म्हणजे १९९० च्या जुलैच्या मध्यात श्रीलंकेत तामिळ आणि सिंहली यांच्यात अस्तित्वासाठी गेल्या तीन वर्षांपासून युद्ध चालू आहे. तामिळ लोक हजारोंच्या संख्येने हिंदुस्थानात निर्वासित या स्वरूपात येत आहेत.

हिंदुस्थान शासनाने श्रीलंका शासनाला उपदेश केला आहे की, श्रीलंकेत अशी स्थिती निर्माण करा की, ज्यायोगे तेथील निवासी तामिळ लोकांना प्रचंड संख्येने हिंदुस्थानात येणे भाग पडू नये.
(दूरदर्शन समाचार १७-७-९०)

उपदेश ही वस्तू दुसऱ्यांना करण्याची असते. स्वत: त्या तत्त्वाचा अवलंब करण्यासाठी नव्हे.

काश्मीर घाटीतून लाखोंच्या संख्येने हिंदू हिंदुस्थानच्या अन्य भागात निर्वासित या स्वरूपात गेले आहेत. काश्मीरमध्ये अशी स्थिती निर्माण करणे आवश्यक आहे की ज्या योगे तेथील निवासी हिंदूंना निष्कासित म्हणून घरदार सोडण्याचा प्रसंग येऊ नये आणि त्यांचे स्वगृही पुनर्वसन व्हावे.

आपल्या शासनाच्या भ्रष्ट आणि हिंदुद्वेषी नीतीमुळे त्यांना ही स्थिती आणणे शक्य होणार नाही. दुसऱ्यांना त्यांनी उपदेश करत राहावा !

२) धर्मांतर हे राष्ट्रांतर : पाकिस्ताननंतर काश्मीर ?

जम्मू-काश्मीरमधील काश्मीर घाटीचे इस्लामीकरण जवळजवळ पूर्ण झाले आहे. जम्मू भागातील पूँछ, राजौरी आणि संलग्न जनपद यात इस्लामी संख्या वाढली असल्याने तेथेही इस्लामीकरणाची प्रक्रिया पूर्ण करण्यास मार्ग सुलभ झाला आहे. गोळीबाराचे, स्फोटकांचे आणि नरसंहाराचे लोण जम्मूपर्यंत पोहोचले आहे. लदाखमध्ये इस्लामीकरणाची प्रक्रिया चालू आहे. (२०-७-९० ची वृत्ते)

या इस्लामीकरणाला शेख अब्दुल्ला ते फारुख अब्दुल्ला यांनी केंद्राच्या सेक्युलर शासकांच्या छत्रात राहून गती दिली तसेच हिंदुस्थान शासनाचे सध्याचे गृहमंत्री मुफ्ती महमंद सैद यांचाही या इस्लामीकरणाच्या प्रक्रियेत फार मोठा हातभार लागलेला आहे.

मुफ्ती यांची कन्या डॉ. रुबिया हिच्या अपहरणाच्या निमित्ताने पाच उग्रवाद्यांना पाकिस्तानच्या सीमेवर सोडले कारण त्यांना विना रुकावट पाकिस्तानात प्रवेश

करता यावा आणि नव्या आवेगाने काश्मीर घाटीतील हिंदूंना मारण्यासाठी आणि हुसकावून लावण्यासाठी योजना करता याव्यात.

मुफ्ती यांची कन्या आणि अन्य परिवार जन यांना हिंदुस्थानात अन्यत्र सुव्यवस्थित सेवावृत्ती दिल्या गेल्या आहेत. त्यांच्या परिवाराला काश्मीरात जाण्याचे नाही. त्यांना तथाकथित भय आहे. पण मुख्य गोष्ट हिंदूंच्या भ्रष्ट धर्मनिरपेक्षतेमुळे अशा लोकांना सर्वत्र कुरण मोकळे आहे. जो लाभ घेणार नाही तो मूर्ख !

३) हिंदूच्या संहाराचा शासकीय सापळा

मुफ्ती यांनी आदेश काढला की काश्मीरमध्ये सेवावृत्तीत असलेले हिंदू आपल्या सेवास्थानावर जूनच्या मध्यापर्यंत परतले नाहीत तर त्यांची सेवावृत्ती समाप्त होईल. मुफ्तींना हे ठाऊक आहे की हिंदूंना तेथे सुरक्षा नाही. ते मारले जातात. त्यामुळेच, अशी स्थिती निर्माण झाल्यामुळेच त्या हिंदूंना आपल्या सेवावृत्तीच नव्हे तर सर्व घरदार नि चल-अचल संपत्ती सोडून पळून यावे लागले. म्हणून मुफ्तीने टाकलेला हा संहाराचा सापळा आहे हे त्या हिंदूंच्या लक्षात आलेले आहे म्हणून त्यांच्या पुनर्वसनाचा प्रश्न न हाताळता मुफ्तींनी त्यांचा नाश करण्याचा व्यूह रचला आहे.

हिंदू कामावर गेले नाहीत तर ओघानेच स्थानिक लोक आणि ज्यांना भय नाही असे लोक या नावाने मुसलमानांची भरती योग्यतेचा कस न लावताच हिंदुस्थानच्या पैशातून करायची हा मुफ्तीचा उद्देश स्पष्ट होता.

दि. २५-६-९० चा दिल्लीचा जनसत्ता पाहा - 'दरबार'बरोबर श्रीनगरला गेलेले जम्मू क्षेत्रातील काही कर्मचारी परत येत आहेत. त्यात काही महिलाही आहेत.

मंगळवारी (१९-६-९०) ला केंद्रीय आरक्षी दलाच्या एका हॉटेलात असलेल्या शिबिरावर रॉकेटनी आक्रमण झाले. तेव्हापासून दीर्घ अवकाश मागून निघून जाण्याचे प्रमाण वाढले आहे.

१८ जूनला रेसिडेन्सी रोडवर राज्य मोटर गॅरजमध्ये भयंकर स्फोट झाला. कर्मचाऱ्यांच्या निवासाची व्यवस्था शिबिरातून केली आहे. आरक्षी दलाचा पहारा आहे. पण आरक्षी दलाच्या शिबिरावरच रॉकेट सोडली गेली. त्यामुळे कर्मचाऱ्यांत भय उत्पन्न झाले आहे.

५ जूनपर्यंत कामावर जा हा आदेश होता ती अवधि १५ पर्यंत केली. कर्मचाऱ्यांत काही महिला होत्या.

दि. ८ जुलै ९० चा टाईम्स ऑफ इंडिया (कर्णावती आवृत्ती) पाहा -

केंद्रीय शासनाच्या काश्मीरमधील रिक्त स्थानांची पूर्ती नव्या भरतीने करण्याचा निर्णय गृहमंत्री मुफ्ती महमंद सैद यांनी श्रीनगरमध्ये ७ जुलैला घोषित केला. ही रिक्त स्थाने सेवकांच्या बलात् स्थानांतराने (मायग्रेशन) निर्माण झाली आहेत.

अगुरिलिमी आणि अकाश्मीरी सेवकांच्या पळून जाण्याने विमा निगम, डाक तार विभाग, बँक, एच.एम.टी. आदी कार्यालयांवर परिणाम झाला आहे.

स्थानिक लोकांना रिक्त स्थानांवर भरती केले जाईल तसेच गॅझेटेड आणि अन्य स्थानांवर स्थिर स्वरूपात (पर्मनंट) घेतले जातील आणि भरतीची प्रक्रिया महिन्यामरात होईल असे त्यांनी सांगितले.

राजनीतीचे इस्लामीकरण मुफ्तींनी सेक्युलर हिंदुस्थानच्या पैशातून घडवून आणले आहे.

४) काश्मीरचा राष्ट्रीय उत्सव ईद !

फारुक अब्दुल्लांनी गतवर्षी ईदचे निमित्त करून २२ उग्रवाद्यांना सोडले, 'ईद' हा काश्मीरचा राष्ट्रीय उत्सव केला.

जुलै १९९० च्या प्रारंभी मुफ्ती यांनी ईदच्या निमित्ताने १८ उग्रवाद्यांना सोडले. त्याचा उग्रवाद्यांशी संबंध नव्हता असे लोकांना सांगितले.

ईदच्या निमित्ताने का सोडले ? ईद हा काश्मीरचा राष्ट्रीय उत्सव केव्हा झाला ? हा प्रश्न त्यांना कोणी विचारणार नाही !

रिक्त झालेल्या स्थानात या लोकांची कोणत्याही विभागात भरती केली जाईल हे ओघानेच आले.

५) निष्ठा विकत घेणारे शासन !

स्थानिक लोकांना साहाय्य दिले गेले पाहिजे ही काश्मीरविषयक भूमिका घेऊन शासनाने संपत्ती वाटण्याचा उपक्रम चालू केला आहे. त्याने म्हणे ते देशनिष्ठा विकत घेणार आहेत !

दि. २१-७-९० च्या दूरदर्शनवर वेद मरवा यांनी सांगितले की ५० कोटी रु. वाटण्याची व्यवस्था ठेवली आहे. कारण यात्री येणे बंद झाल्याने स्थानीक लोकांची फार हानी झाली आहे. ५ कोटी रु. विणकाम करणाऱ्यांना उद्योग चालविण्यास त्यांच्या संस्थांना दिले गेले.

या वाटपाचे स्वरूप कोणाच्याही लक्षात येईल. संस्था उभ्या करायच्या आणि संस्थांना पैसे दिले अशी कागदपत्रे करायची !

सतत चाललेल्या लोडशेडींच्या, बाँब वर्षावाच्या अन् गोळीबाराच्या कृत्यांमुळे

निरंतर कर्फ्यू, कर्फ्यूमुळे कार्यालयाचे कार्य ठप्प. कर्फ्यू नसेल तेव्हाही, कर्मचारी भयाने निघून गेल्याने आणि नवीन भरती न झाल्याने कार्यालयातील उपस्थिती शून्यवत. अशा स्थितीत मरवांना अशी कोणती सक्षम यंत्रणा मिळाली की जिने व्यवस्थित नोंदी करून हे वाटप योग्य व्यक्तींना केले ?

कर्फ्यूच्या दिवसांत कोणत्या व्यक्ती किंवा संस्था शासकीय कार्यालयांत आल्या ? की शासन थैल्या घेऊन घरोघर पोहोचले ?

इकडे रेल्वेमंत्री जॉर्ज फर्नांडीस यांनी काश्मीरातील सफरचंद उत्पादकांच्यावतीने त्यांनी रेल्वेला रस पुरवावा असा व्यवहार केला आहे. ज्या काश्मीरमध्ये पुढच्या तासाला वाहतूक मार्ग सुरक्षित राहील की नाही याची शासनालाही शाश्वती नाही, अशा परिस्थितीत हा व्यवहार झाला आहे. अर्थ स्पष्ट आहे; पैशाचे मुक्त हस्ताने वाटप करायचे.

दोन-चार वर्षे सफरचंदे सडली तरी चालतील, रेशमावे किडे मेले तरी चालेल, आम्ही स्वतंत्र झाल्यावर सर्व भरपाई करू शकू, ही उग्रवाद्यांची भूमिका फर्नांडिसना ठाऊक नाही काय ? उग्रवादी हिंदुस्थान शासनाचे पैसे घेऊ देतील पण वाहतूक सफल होऊ देणार नाहीत, निदान सद्यस्थितीत !

प्रज्वलंत २० जुलैमध्ये मिलिंद गाडगीळ यांचा लेख 'काश्मीरवरील अन्यायाची ओरड अवाजवी' सकाळवरून पुनर्मुद्रित केला आहे. गेल्या चाळीस वर्षात केन्द्राने काश्मीरला सत्तर हजार कोटीहून अधिक अनुदान दिलेले आहे. काश्मीरचे प्रतिव्यक्ति उत्पन्न राष्ट्रीय सरासरीपेक्षा अधिक आहे. ही सर्व आकडेवारी गाडगीळ यांनी त्या लेखांत विस्ताराने दिली आहे.

काश्मीरहून दिल्लीत पोहोचलेल्या हिंदू निर्वासितांनी प्रत्यक्ष स्थिती सांगितली की प्रारंभीच्या काळात ओढत्या वस्त्रानिशी दिनचर्या करणाऱ्या नावाडी, विणकर, फळे उत्पन्न करणारे, फळे वेचणारे, हॉटेलमध्ये काम करणारे, यांच्याकडे सुखवस्तु कुटुंबाइतक्या सुखसोयी झालेल्या आहेत.

हिंदुस्थान शासन तेथील मुसलमान मंत्रीमंडळाच्या माध्यमातून पैशाचे निर्गणन वितरण करीत राहिले आहे.

हिंदू सर्व नागविले गेले तरी मुसलमान पांघरले गेले नाहीत हा पूर्वीचा इतिहास आहे !

६) मुफ्तींना 'अनंतनागचा' द्वेष

जम्मूमधील शिबिरात अत्यंत अव्यवस्थेत आणि दीनवाण्या स्थितीत ठेवल्या गेलेल्या काश्मीरमधील हिंदू निर्वासितांना सांत्वन देण्यास मुफ्ती गेले होते.

लवकरच तुम्हाला इस्लामाबादला पाठविण्यात येईल, व्यवस्था होत आहे, असे त्यांनी निर्वासितांना आश्वासन दिले.

पाकिस्तान नावाच्या, हिंदूंची वधशाळा असलेल्या देशाच्या राजधानीत आम्हाला तुम्ही का पाठवणार आहात असे निर्वासितांनी संतापून विचारले. मुफ्तींनी स्पष्ट केले की इस्लामाबाद ते नव्हे; अनंतनाग म्हणजे इस्लामबाद !

हिंदूंचे इस्लामीकरण, मंदिरांचे मशिदीकरण तरोच हिंदू स्थानांचेही इस्लामीकरण करण्याची प्रक्रिया सतत चालत आहे. मुफ्ती यांना संस्कृतचा, ज्ञानाचा, हिंदीचा, हिंदू नावाचा द्वेष असणे त्यांचे धर्मजात कर्तव्य आहे. तर त्याच गुणवत्तेवर त्यांना मारून मुटकून सेक्युलर करुन हिंदुस्थानच्या छातीवर गृहमंत्री म्हणून बसविणे हा सेक्युलर सुलतानांचा जन्मजात अधिकार आहे.

मुफ्तींनी अधिकारपदाची शपथ इंग्रजीत घेतली होती. हिंदीत नव्हे. हे दूरदर्शनच्या प्रेक्षकांनी पाहिले आहेच.

७) अनंतनागचा मुस्लिम दंगा

काश्मीर प्रकरण लिहिता लिहिता मुफ्तींचे चरित्र सांगण्यातच पुष्कळ ओळी व्यय होत आहेत. परंतु तेथील कोणाही मुस्लिम नेत्याचे वेगळे चरित्र सांगावे लागू नये म्हणून एवढे उदाहरण विस्ताराने दिले जात आहे.

१९८६ च्या फेब्रुवारी-मार्चमध्ये अनंतनागला मुसलमानांनी हिंदूंची घरे लुटली. २२ मंदिरे फोडली. घराघरातून हिंदू स्त्रियांना ते घेऊन गेले आणि तीनचार दिवसांनी त्यांना सोडून दिले. विकल अवस्थेतील त्या स्त्रिया आपापल्या घरी परतल्या.

सेना आली होती पण हिंदूंना ते संरक्षण अपुरे होते. सेना तात्कालिक असते, मुसलमान नित्य असतात, हे त्यांचे म्हणणे होते. घरे सोडून अन्य सुरक्षित स्थानी हिंदूंनी मोठ्या संख्येने स्थानांतर केले.

मुफ्ती तेव्हा काँग्रेसचे काश्मीरचे अध्यक्ष होते. ते लोकांची स्थिती बघण्यास गेले होते. स्त्रियांनी संतापाने त्यांना घेरले आणि सांगितले की, तुझ्याच शिकवणुकीने तुझ्या गुंडांनी आणि हस्तकांनी आमच्यावर अत्याचार केले आहेत ! तू चालता हो.

न्यायालयाने रामजन्मभूमीच्या क्षेत्रावर अवैधपणे लावला गेलेला टाळा काढून टाकण्याचा आदेश दिला होता. त्याच्या निषेधासाठी हा अत्याचारी इस्लामी दंगा घडवून आणला होता.

८) नरसंहार करणाऱ्यांना शिक्षा होणार नाहीत.

तीस तीस हिंदूंना ठार मारलेले मुस्लिम उग्रवादी दूरदर्शनवर दि. १६-७ ला दाखविले. अशा लोकांशी आपल्या राज्याची वागणूक सहानुभूतीची राहील असे राज्यपाल सक्सेना यांनी पाठोपाठ सांगितले.

नरसंहाराच्या कृत्यासाठी, वास्तू, पूल, रेल्वे, मार्ग उद्ध्वस्त करण्याच्या कृत्यासाठी जे उग्रवादी पकडले गेले आहेत, त्या कोणालाही शिक्षा होणार नाहीत. ते मुसलमान आहेत ! ही त्यांची एक गुणवत्ता तर ते सेक्युलर आहेत ही दुसरी. कारण अनेक हिंदूना ठार मारण्याच्या प्रक्रियेत त्यांनी एखाद दुसरा मुसलमानही ठार मारला आहे !

सेक्युलॅरिझमचे आदर्श म्हणजे काश्मीर असे आजही बडबडले जाते. उग्रवाद्यांना सेक्युलरवादाचे आदर्श म्हणून राष्ट्रपतिपदक देण्याची योजना झाली तर या टिपूच्या प्रशंसकांच्या गुलामांच्या राज्यातील प्रजेला आश्चर्य वाटण्याचे कारण नाही !

९) ४३ वर्षांपूर्वीच्या इतिहासाचे स्मरण

आपल्या शासनाकडून, जनतेला कंटाळा येईपर्यंत सांगितले गेले आहे की पाकिस्तान काश्मीरमधील उग्रवाद्यांना प्रशिक्षण, पैसा नि शस्त्रे पुरवीत राहिले आहे, काश्मीरमध्ये धर्म या भावनेला आवाहन करून पाकिस्तान काश्मीरमधील म्हणजेच हिंदुस्थानातील सेक्युलर बैठकीला हादरा देत आहे.

अलिकडच्या काळात राजीव गांधींच्या कार्यकालापासून सध्याच्या विश्वनाथ-प्रताप सिंग यांच्या कालापर्यंत ही ध्वनिपट्टी लावली जात आहे.

धर्मनिरपेक्षतावादी नेत्यांनी ४३ वर्षांपूर्वीचा इतिहास म्हणजेच काश्मीर हा प्रश्न होऊ घातला त्या प्रारंभापासूनचा इतिहास बघावा म्हणजे त्यांचा ढोंगी मुखवटा त्यांना त्यात दिसून येईल.

दि. २२ जुलै ९० च्या विवेकमध्ये वसंत मोहरीर यांनी काश्मीर समस्या पापाचे धनी या लेखात प्रारंभीच इतिहासाचे सार दिले आहे. ते म्हणतात —

काँग्रेसचे दोन महान नेते महात्मा गांधी आणि जवाहरलाल नेहरू यांनी या देशाला काय दिले, असा प्रश्न विचारला तर त्याला माझे उत्तर आहे की गांधींनी पाकिस्तानसारखा कायमची डोकेदुखी देणारा शेजारी दिला तर नेहरूंनी जम्मू-काश्मीरचा लवकर न सुटण्याची शक्यता असलेला प्रश्न दिला.

आम्ही द्विराष्ट्रवाद कधीच मानला नाही हे त्यावेळचे थोतांड होते. धर्माधिष्ठित राष्ट्र हिंदुस्थानच्या भूमीवर हिंदू आणि मुसलमान ह्या भूमिकेवर उभे राहून

निर्माण करावयाचे आणि आम्ही द्विराष्ट्रवाद मानला नाही ही बडबड करायची ही जशी उक्ती आणि कृती यातील विसंगती होती, तशीच काश्मीर म्हणजे मुसलमान, मुसलमान म्हणजे शेख अब्दुल्ला हे समीकरण दृष्टीपुढे ठेवून गांधींनी आपल्या अहिंसेसकट ज्या गिरक्या घेतल्या तेही अत्यधिक विसंगत होते.

काश्मीरमध्ये सैन्य धाडण्यास गांधींनी संमती दिली असे, पं. नेहरूंनी स्वत:च्या बचावासाठी सांगितले होते. त्याचा उल्लेख नथुरामच्या निवेदनात परिच्छेद १०१ मध्ये आला आहे.

गांधींनी चर्चिल, रुझवेल्ट, हिटलर यांना संदेश धाडले होते की, त्यांनी युद्ध करू नये ! कारण अहिंसा हे प्रभावी अस्त्र आहे. हे त्यांचे मत त्यांना ठरविण्याचे होते. त्या युद्ध प्रवणांनी ते ऐकले नव्हते.

काश्मीरमध्ये अहिंसक लढाई कशी असावी असे पत्रकारांनी विचारल्यावर गांधींनी एक शब्दचित्र उभे केले होते. ते चित्र काश्मीर प्रकरणात पृष्ठ ३८ वर अंकित आहे

मग ते तत्त्व प्रत्यक्षात का उतरवले नाही ? अनायासे संधी आली होती. त्या प्रश्नाचे उत्तर गांधीनी दिले, मी असमर्थ आहे !

नथुरामने आपल्या न्यायालयीन निवेदनात परिच्छेद १०४ मध्ये गांधींच्या या सेना धाडण्याच्या निर्णयाला संमती देण्यामागील कारण दिले आहे.

काश्मीरचा राजा गांधींना सलत होता. कारण तो हिंदू होता. प्रजा मुसलमान होती. कार्यभार शेख अब्दुल्लाला सोपवावा, महाराजांनी काशीला जावे ! हा त्यांचा आग्रह होता.

पाकिस्तानच्या निर्मितीने तृप्त न होऊन पुढील मुस्लिम तुष्टिकरणासाठी गांधींनी अहिंसेशी विसंगती स्वीकारली. निवेदनाच्या १४१ व्या परिच्छेदात नथूरामने म्हटले आहे –

"आता खऱ्या अर्थाने Secular राज्य घडविण्यास वाट मोकळी आहे. आपले प्रधानमंत्री उठल्या बसल्या धर्मातितत्वाविषयी बोलतात. नेहरू यांची उक्ती आणि कृती एकमेकांना छेदून जाते आणि ते हे विसरतात असे मोठ्या खेदाने म्हणावे लागते. कारण पाकिस्तान हे धर्माधिष्ठित राज्य स्थापन करण्यात या नेहरूंनीही स्वत: पुढाकार घेतला होता.

हिंदुस्थानच्या संघराज्याला आपल्या शेजारी एक अंधश्रद्धेवर आणि द्वेषावर आधारलेले राज्य उभे ठेवून केव्हाही भरभराट येणार नाही हे नेहरूंना समजायला हवे होते."

पाकिस्तानने आपला उद्देश कधीही झाकून ठेवला नव्हता. आम्ही इस्लामी राष्ट्र आहोत आणि इस्लामी राष्ट्र म्हणून राहणार आहोत हे त्यांनी जन्मत:च म्हटले होते. त्यांच्या म्हणण्याशी ते इतके एकरूप होते की, प्रत्यक्ष पाकिस्तानच्या जन्मदात्या गांधींची रक्षा सिंधुनदीत विसर्जित करण्याच्या विनंतीवर त्यांनी खडसावले की एक काफर की राख से हमें 'पाक' नदी नापाक नहीं करनी है ।

बांगलादेश हा पाकिस्तानचाच भाग. तो पाकिस्तानपासून बांगलादेश या नावाने अलग झाल्यावर मुजिबूर रहिमानाला एक सणक आली आणि त्याने बांगलादेश सेक्युलर राहील अशी घोषणा केली.

इस्लामचे माथे ठणकले. दुसऱ्या इस्लामियांनी नुसत्या मुजिबुरला नव्हे तर त्याच्या सर्व परिवारजनांना गोळ्या घालून ठार मारले.

ठार मारणाऱ्या या लोकांवर खटले भरले नाहीत. ते राज्यकर्ते बनले !

हिंदुस्थानातील नेत्यांनी सेक्युलरपणाचा जो मूर्खपणा केला आहे तो पाकिस्तानने कधी केला नाही. इस्लाम पसरवणे हे त्यांचे धर्मजात कर्तव्य आहे आणि तो त्यांचा जन्मजात अधिकार आहे.

शेष हिंदुस्थानात जे मुसलमान राहिले आहेत, ते कशासाठी ? तर इस्लाम विस्तारवादाच्या पूर्तीसाठी. हसके लिया पाकिस्तान, लडके लेंगे हिंदुस्थान ही पाकिस्ताननिर्मितीनंतरची पाकिस्तानी मुसलमानांची घोषणा स्वत:च्या बळावर नव्हती. हिंदुस्थानातील मुसलमानांच्या बळावर होती.

ज्या हाज यात्रेला पाकिस्तानी मुसलमान जातात त्याच हाज यात्रेला हिंदुस्थानातील मुसलमान जातात. काश्मीरचे नवे राज्यपाल सक्सेना यांनी राज्यसूत्रे हाती घेतल्यावर काश्मीरमधील मुसलमानांना, त्यात विघटनवादी मुसलमानच मुख्यत्वे होते, त्यांच्या पवित्र हाज यात्रेसाठी शुभेच्छा दिल्याचे दर्शन दूरदर्शनने घडविले.

तीच मक्का किंवा मदिना मुफ्ती महमद, फारुक अब्दुल्ला, अब्दुल्ला बुखारी आदि आपले पुण्यस्थान मानतात.

धर्म या आधारावर पाकिस्तानने उग्रवाद्यांना आणि हिंदुस्थानात हिंदू-हिंदूत तोडफोड करण्यासाठी पंजाबातील उग्रवाद्यांना सहाय्य केले तर ते आश्चर्य नाही.

१०) धर्मनिष्ठेला छेदून जात नसेल तर देशनिष्ठा

मुसलमानांपुरते बोलायचे तर त्यांनी धर्मनिष्ठेला छेदणारी देशनिष्ठा कधीच स्वीकारलेली नाही, हे त्यांनी सिद्ध केले आहे. काश्मीर अध्यायात पृ. २५

वर व्ही. पी. मेनन यांनी त्यांच्या पुस्तकांच्या पृष्ठ ३९६ वर उद्धृत केलेले उदाहरण दिले आहे. मुसलमान धर्मनिष्ठ असतात, देशनिष्ठ नव्हे, त्याचे ते ठळक उदाहरण आहे. हाताखालील मुस्लिम सैन्याचा विश्वास असणाऱ्या लेफ्टनंट कर्नल नारायणसिंगला मुस्लिम सैनिकांनी ठार मारले आणि ते टोळीवाल्यांना जाऊन मिळाले.

ठोकरी खाऊनही कधी शहाणा होत नाही तो हिंदू ही हिंदूंची व्याख्या प्रमाणित व्हावी अशी घटना पहा —

जगमोहन यांना राज्यपाल नियुक्त केले गेल्यावर त्यांनी उग्रवाद्यांच्या आक्रमक अत्याचारी अनियंत्रित अभियानाला नियंत्रित करण्याचा उपक्रम हाती घेतला. उग्रवादी हिंदुस्थानद्वेष्टे मुसलमान होते. ते मारले जात होते. त्यामुळे इस्लाम संरक्षक दलांनी वेगवेगळ्या नावाने आघाड्या उघडून जगमोहन यांना स्थान रिक्त करण्यास भाग पाडले.

या कारस्थानात फारुक अब्दुल्लाप्रमाणेच मुफ्तीचाही हात होता.

जनता दलाच्या ५० सदस्यांनी मे १९९० च्या शेवटी पत्रक काढले की, मुफ्ती यांनी काश्मीरमध्ये फार घोळ घातला त्यामुळे परिस्थिती अधिक बिघडली. (केसरी २-६-९० पुणे)

जगमोहन यांना राज्यसभेचे सदस्यत्व दिले गेल्यावर त्यांनी पत्रकारांना काही गोष्टी सांगितल्या.

मौलवी मिरवाइज फारुख याला ठार मारल्यावर त्याचे प्रेत रुग्णालयातून अतिरेक्यांनी पळवून नेले. ज्या पोलीस अधिकाऱ्यांची नियुक्ती तेथील संरक्षणासाठी होती त्यांनीच पळ काढला !

जगमोहन यांनी त्यांच्या कार्यकालात १३७ अधिकाऱ्यांना, कर्मचाऱ्यांना निलंबित केले.

त्या सर्वांनी उग्रवाद्यांना सर्वतोपरी सहाय्य केले होते. आक्रमकांवर गोळीबार न करणे, उग्रवाद्यांना स्थानांतरित करण्यासाठी नियुक्त केलेल्या दलाने त्या उग्रवाद्यांसह पाकिस्तानात पळून जाणे. हिंदूंना मारण्यासाठी शस्त्रास्त्रे देणे, शासकीय अधिकाऱ्यांच्या हालचाली उग्रवाद्यांना सांगणे आणि त्या अधिकाऱ्याला मारल्यावर उग्रवाद्यांना पळून जाण्याची व्यवस्था करणे हे सर्व या कर्मचाऱ्यांनी त्यांच्या इस्लामनिष्ठेसाठी केले. देशनिष्ठेशी त्यांचा संबंध एवढाच की वेतन ते हिंदुस्थान शासनाकडून घेत असतात.

या सर्व निलंबित कर्मचाऱ्यांनी जगमोहन विरुद्ध जागतिक न्यायपीठाकडे

प्रतिवाद केला आहे ! हिंदुस्थान शासनाकडे नव्हे ! इस्लामच्या व्याख्येत हा देशद्रोह नव्हे ! म्हणून मुफ्तीचा आणि म्हणून विश्वनाथप्रताप सिंग यांच्या व्याख्येतही तो देशद्रोह नव्हे !

त्या १३७ लोकांना पुन्हा कामावर घेतले जाईल ! मुफ्ती त्या खटपटीत आहेत ! जगमोहनचा काटा निघाला आहे.

जोपर्यंत हिंदू आणि मुसलमान असा प्रश्न नसतो तोवर हे लोक 'देशनिष्ठ' असतात. कुलाबा जिल्ह्याचे नामांतर रायगड जिल्हा करणे सोपे होते. ज्या औरंगजेबाने हिंदवी स्वराज्य उखडून टाकण्यासाठी छत्रपती संभाजीला डोळे फोडून, जीभ खेचून, अवयव तोडून सावकाशपणे ठार मारले आणि ज्याने खडकीचे औरंगाबाद बनविले त्या औरंगाबादचे संभाजीनगर किंवा आंबेडकरनगर नामकरण करण्याचे, करंदीकर मातृ-कुल सांगणारे बाडगे, अंतुले विचार तरी करतील काय ? ते हरेश्वराला जातात ही कसोटी नव्हे. टिपूनेसुद्धा काही मंदिरांना देणग्या देऊन हिंदूंना उल्लू बनविले होते. राष्ट्र या परिधीत अंतुले सारख्यांची अस्मिता औरंगजेबात अडकलेली राहील.

धर्मनिष्ठा छेदून जात नसेल तर 'देशनिष्ठा' ठेवणारा तो मुसलमान.

ठोकरी खाऊन शाहणे न होणारे शासन ते सेक्युलर शासन.

हे शासन काश्मीरचा प्रश्न सोडवणार आहे !

११) स्वराज्याची परिभाषा

देश याचा राष्ट्र या अर्थी जेव्हा आपण शब्दप्रयोग करतो तेव्हा आपली परिकल्पना अत्यंत भौगळ आणि म्हणून आक्रमकांना प्रवेश करण्यास सुलभकारी ठरली आहे. स्वराज्य म्हणजे भौगोलिक स्वयंशासन एवढाच अर्थ आपण घेतला.

हिंदूंचे राजनैतिक स्वयंशासन म्हणजेच स्वराज्य ही परिभाषाच आपल्या मनापर्यंत आपण पोहोचू दिली नाही. हिंदूंना त्यांचा ज्ञानविकास, कलाविकास, निर्वेधपणे करता येईल ते त्यांचे स्वराज्य.

भौगोलिक परिसीमेतील स्वयंशासन मग ते हिंदुस्थानातील कोणीही करावे हीच परिभाषा स्वराज्याची असेल तर औरंगजेबाच्या वेळी स्वराज्य होतेच ! तो कुठे बाहेरून आला होता ? पण ते हिंदूंना स्वराज्य नव्हते, तो हिंदुत्वाचा मृत्युलेख होता. म्हणून संग आणि प्रताप, गुरुगोविंदसिंग आणि वीरबंदा, शिवाजी आणि बाजीराव यांना युद्धे करावी लागली. त्यात अनेकदा त्यांनी हार खाल्ली. त्यांचे खड्ग मोडले पण पुन्हा पुन्हा सावरून ते उभे राहिले आणि कधी गुरख्यांनी तर कधी शिखांनी कधी राजपुतांनी तर कधी मराठ्यांनी आक्रमणकारी,

अडाणी, अंधश्रद्ध, कलाशत्रू, ज्ञानविध्वसंक, इस्लामी सत्तेला उखडून फेकून दिले आणि हिंदुस्थानात हिंदूंचे स्वराज्य स्थापन केले.

१२) स्वदेशातून उखडले गेलेले पारशी

पारशांना इराणात म्हणजे त्यांच्या मायभूमीत राहण्यास काय प्रत्यवाय होता ? अरबांनी आक्रमण केले होते. करीनात ! इतर नागरिक नाही का अरबांच्या इच्छेप्रमाणे सुन्नत करून घेऊन मोकळे झाले ? अग्यारीचा, अग्नीचा आग्रह कशाला धरायचा ? आग्यारीत देव असेल तर मशिदीतही आहे. आग्यारीची मशीद केली म्हणून काय बिघडले ?

पारशांना नुसते जगायचे नव्हते, त्यांच्या संस्कृतीसह जगायचे होते, यज्ञोपवित, अग्नी या चिन्हांसह, या श्रद्धास्थानांसह त्यांना भौतिकाच्या जोडीला आध्यात्मिक उंची साधायची होती, इराण देश त्यांचा होता. पण त्यांचे स्वराज्य संपले होते. स्वचे संरक्षण करता येईल, स्वचा विकास करता येईल ते स्वराज्य.

ज्यांना आपले संस्कृतियुक्त स्वत्व टिकविण्याचे होते ते पारशी नौका भरभरून हिंदुस्थानच्या तटावर पोहोचले. नुसत्या भौगोलिक भूभागाला नव्हे तर अशा स्वत्वाला श्रेष्ठ मानणाऱ्या पारशातील एक होते फिरोज गांधींचे, म्हणजे पूर्वीचे प्रधानमंत्री राजीव गांधींच्या पित्याचे पूर्वज. जो भूभाग त्यांना संरक्षण देऊ करत नव्हता, तो त्यांनी सोडून दिला.

म्हणजेच नुसते भौगोलिक राजकीय शासन हे स्वराज्य नसते.

१३) महमद बीन कासिमने इस्लामचा संदेश आणला — राजीव

याच संदर्भात राजीव गांधींचे एक मूर्खपणाचे, अज्ञानाचे विधान लक्षात घ्यावे. स्वराज्य या परिकल्पनेची व्याख्याच भोंगळ असली तर अज्ञानाचा आनंदच आनंद असतो.

४ जून १९८८ ला राजीव सिरियाला होते. त्या देशातील लोकांची स्तुती करण्याचा त्यांना अती मोह झाला. ते बरळले —

सिरियाचा आणि हिंदुस्थानचा घनिष्ट सांस्कृतिक संबंध आहे. ८ व्या शतकाच्या प्रारंभीच्या वर्षात महमद बीन कासिमने समुद्रमार्गाने येऊन इस्लामचा संदेश हिंदुस्थानला पोहचविला.

राजीवना कुणी सांगितले नाही की इस्लामचा संदेश पहिल्याने महमद पैगंबराच्या मरणाच्या दहा-बारा वर्षांतच राजीवच्या बापाच्या मातृभूमीला पोहोचला, पुरुषांच्या सुनता केल्या, आग्यारींच्या मशिदी केल्या. स्त्रिया लुटल्या. इस्लामच्या आदेशाप्रमाणे उपभोगल्या, तो संदेश सहन न होऊन राजीवच्या बापाचे पूर्वज

आपल्या अग्निपात्रासह हिंदुस्थानच्या आश्रयास आले होते.

आपल्या मातृभूमीवरील अत्याचाराच्या प्रतिशोधाची, मातृभूमीत पुनर्वसन करण्याची, शत्रूंना खदेडून काढण्याची भावना मारून टाकली की वंशज राजीव बनतात.

राजीव ज्या दिवशी बोलत होते त्या दिवशी, जेथे कासिम पोहचला होता तो भाग हिंदुस्थान राहिला नव्हता ! त्याचे वाटोळे ४० वर्षांपूर्वीच होऊन गेले होते. सिंध म्हणजे आजच्या राष्ट्र या परिभाषेत हिंदुस्थान नव्हे, भारत नव्हे, India नव्हे !

महमद बीन कासिमने इस्लामच्या आदेशाप्रमाणेच दाहिरच्या राज्यातील अनेक स्त्रिया लुटल्या, पुरुषांच्या सुन्ता केल्या, मंदिरांच्या मशिदी केल्या आणि दोन राजकन्यांना त्याच्या खलिफाकडे उपभोगण्यासाठी धाडले हा तो संदेश होता !

बेअंतने खालिस्तानचा संदेश आणला

असला संदेश पोहचविण्याचा छोटासा उपक्रम राजीवच्या घरातच त्यापूर्वी चार एक वर्षे घडला होता.

काश्मीर उग्रवाद्यांचा नेता मकबूल बट याला फाशी दिले गेले त्या प्रतिशोधाच्या षड्यंत्रात सम्मीलित होऊन कोण्या बेअंतने पाकिस्तानच्या माध्यमातून खलिस्तानचा संदेश प्रधानमंत्र्याच्या घरावर दि. ३१ ऑक्टोबर १९८४ या दिवशी सूर्याच्या साक्षीने पोहचवला.

१३) काश्मीरात प्रतिदिनी इस्लामचा संदेशच संदेश

इस्लामचा संदेश हिंदुस्थानात काश्मीरमध्ये आज प्रत्येक दिवशी पोहोचविला जात आहे ! त्यासाठी बाहेरचे लोक येत नाहीत. भट्टचे बट झाले कौलचे इकबाल झाले, करचे करीमखान झाले. तेच हा उद्ध्वस्तीकरणाचा, अज्ञानप्रसाराचा, इस्लामविस्तारवादाचा संदेश उमटवत आहेत.

प्रमादामागोमाग प्रमाद नेते करीत राहिले. हिंदूंचे स्वराज्य संपले.

स्वराज्याची परिभाषा या प्रकरणाचा प्रारंभ पुन्हा बघावा—

"देश याचा राष्ट्र याअर्थी जेव्हा आपण शब्द प्रयोग करतो तेव्हा आपली परिकल्पना अत्यंत भोंगळ म्हणून आक्रमकांना प्रवेश करण्यास सुलभकारी ठरली आहे."

दुर्बलांचे देव दुर्बल असतात. तसे भोंगळांचे नेतेही भोंगळ असतात. स्वराज्य याची परिभाषाच न समजणारे लोक अशा देशात प्रधानमंत्री होतात आणि

आपल्या निर्बुद्धतेचे जगभर प्रदर्शन करतात !

१४) हिंदू आणि मुसलमान हाच प्रश्न आहे, दुसरा नाही

हिंदूंवरील अत्याचाराच्या घटना वृत्तपत्रात फार क्वचित येतात, कारण आपले सेक्युलर कातडे सरकू नये, आपला दंभ उघडा होऊ नये, ही प्रत्येकाला दक्षता घेण्याची असते.

काश्मीर प्रश्न हा हिंदू-मुसलमान असा प्रश्न नाही हेही तुणतुणे इस्लामच्या वेतनधारी भाटांना वाजवायचे असते आणि वरून समाजकार्यकर्ते म्हणून मिरवायचे असते !

उग्रवादी पाकिस्तानी झेंडे घेऊन मोठ्या संख्येने मिरवणुकीने हिंदुस्थान विरुद्ध घोषणा देत बीभत्स तांडवाने मार्गावरून फिरत आरक्षी दलावर आक्रमण करणे, त्यांच्या बंदुकी पळविणे, घरे लुटणे, शाळा, शासकीय कार्यालये, स्फोटकांनी उद्ध्वस्त करणे हे नित्याचे प्रकार होते.

जगमोहन यांनी अशा एका मिरवणुकीला आक्रमणापासून थांबविले. ते अनिवार होताच गोळीबार केला.

उग्रवाद्यांनी दुसऱ्या दिवशी पुन्हा मिरवणूक काढली त्यात त्यांनी तेथेच राहिलेल्या हिंदू घरातून हिंदूंना मिरवणुकीत घेतले; त्यांच्या हाती झेंडे दिले घोषणा करण्यास सांगितले. त्या बलप्रयोगाने ते हिंदू सहभागी झाले. गोळीबारात मेलेल्यात त्यातील दोघे-तिघे होते.

बलप्रयोगानंतरही अशा मिरवणुकीत सहभागी न झालेल्या दोन परिवारातील लोकांना शिक्षा म्हणून त्यापुढील मिरवणुकीत त्यांच्या घरातील स्त्रियांना उग्रवाद्यांनी बाहेर खेचले, त्यांना नग्न केले आणि आपल्या मिरवणुकीत त्यांना सुरे टोचत टोचत अग्रभागी ठेवले. हातांनी तोंड झाकलेल्या, ओक्साबोक्शी आक्रंदणाऱ्या त्या स्त्रियांना शासकीय अधिकारी हताशपणे पाहात राहिले होते.

नवभारत टाईम्स दिल्लीच्या मार्चच्या प्रारंभीच्या अंकात हे वृत्त आले आहे.

उग्रवादी गोळीबार करून पळून जातात त्यांना आश्रय आसपासच्या भागातच मिळतो. जगमोहन यांनी घरोघर झडत्यांचे सत्र चालू केले. त्यात असे अनेक उग्रवादी हाताला लागले.

जगमोहन यांच्या या उपायाविरुद्ध मुसलमानांचे म्हणजे अन्य हिंदुस्थानातील विभाजनप्रेमी मुसलमानांचे आक्रंदन चालू झाले. पोलिस किंवा अर्धसैनिक घरात शिरून स्त्रियांवर अत्याचार करतात येथपर्यंतही त्या आरडाओरडीचा स्तर पोहचला

होता.

घर हिंदूंचे आहे आणि हिंदू तेथे राहात आहे परिवारासहित, पण जीव मुठीत धरून रहात आहे, अशा घरात आरक्षी दल शिरत नव्हते. या स्थितीचा लाभ उग्रवाद्यांनी घेतला.

दोन उग्रवादी बळाने एका हिंदूच्या घरात घुसले. आम्हाला आश्रय द्या. रात्रभर आम्ही राहू. तुमच्या दोन मुली आहेत त्यांच्या अंथरुणात आम्ही रात्र काढू. आमच्या मागावर पुलीस आहे. या घरात ते झडतीसाठी घुसले तर हे आमचे जावई आहेत असे तुम्ही सांगितले पाहिजे. असे शस्त्राच्या बळाने घरातील कर्त्या पुरुषाला आणि त्याच्या पत्नीला तसेच त्या मुलींना त्यांनी बजावले. संरक्षणविहीन, विवश, विकल आणि हताश अवस्थेत त्या हिंदूने त्या उग्रवाद्यांना रात्रभर आपल्या मुलींच्या अंथरुणात 'आश्रय' दिला !

इंदूरच्या वृत्तपत्रातही वरील वृत्त आलेले आहे.

दैनिक नई दुनिया, इंदौर. ३१ मे १९९० "जब पुलिस उग्रवादियों की तलाश में छापे मारती है तो उग्रवादी काश्मीरी पंडितों के घर में घुसकर उनकी लडकियों के साथ सो जाते है और परिवार-जनोंको बंदूक की नोकपर ये कहने को विवश कर देते है कि ये हमारे दामाद है ।"

जम्मूच्या शिबिरातील शरणार्थी गुलाबबाग आंध्र बळ, श्रीनगरचे पंचेचाळीस वर्षाचे श्री. कन्हैय्यालाल यांचेकडून काश्मीरला जाऊन आलेले श्री. शैलेंद्र वर्मा यांनी 'घाटी में घबराहटने पलायन बढ़ाया' या शिर्षकातील लेखात वरील भाग अंकित आहे.

उग्रवादी रात के समय आसपास की बस्तियों में जुलुस निकालते है इस जुलुसमें अल्पसंख्यों को (हिंदुओं को) जबरन शामिल किया जाता है । जो लोग इन जुलुसोमें शामिल नहीं होते है उन्हें धमकी भरे पत्र मिलने लगते है । उनकी संपत्ति को आग के हवाले कर दिया जाता है । यहाँतक कि ऐसे परिवार की महिलाओं को नंगाकर आगली रात जुलुस में सम्मिलित किया जाता है ।

नोअेडा (दिल्लीजवळ) मध्ये आश्रय घेतलेल्या काश्मीरी विस्थापितांचे कथन नवभारत टाईम्सने प्रकाशित केले ते दैनिक राष्ट्रदूत (हिंदी) नागपूर ने ६ जून ९० च्या अंकात और महिलाएँ तक बॉटली है' या शीर्षकाखाली पुन: प्रकाशित केले आहे. वरील भाग त्या लेखातून आला आहे.

श्रीमती मृणाल गोरे यांचे एक पत्रक संभवत: जूनमध्ये वाचण्यात आले

होते. काश्मीरचा प्रश्न हिंदू-मुसलमानांचा प्रश्न नाही असे त्यांनी मत व्यक्त केले होते.

मुस्लिम बहुसंख्य असलेले हिंदुस्थानचे प्रदेश पाकिस्तान या नावाने इस्लामी देश करण्यास तोडून दिले गेले त्या पराभवातच सर्वधर्म समभाव या आत्मघातकी प्रवृत्तीचा पराभव झाला होता. पण सर्वधर्म समभाव अशासारख्या अंधश्रद्धेत सतत लडबडल्याने श्रीमती मृणाल गोरे आणि सहपंथी यांचे हिंदूंच्यावरील अत्याचारांची प्रामाणिकता ग्रहण करण्याचे अवयव निकामी झाले आहेत.

हिंदुस्थानात असे हिंदूच हिंदूंना सदा मूर्ख बनवून इस्लामप्रसार मुसलमानांपेक्षा चांगल्या प्रकारे करतात असा अनुभव अरब देशांना असल्याने ते पेट्रोडॉलरचा उपयोग हिंदूंचे अवयव बधिर करणाऱ्या संस्थांसाठी करत असले तर त्यात आश्चर्य वाटण्याचे कारण नाही.

१५) एक धूळफेक

दि. १९-७-९० ला दिल्लीत मुसलमानांच्या संस्थांनी निवेदन दिले आहे की, काश्मीर हिंदुस्थानचा अविभाज्य भाग आहे त्यामुळे तेथे लोकमत घेण्याचा आणि त्या आधारे विलीनीकरण ठरविण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

ही धूळफेक हेतुपुरस्सर केली जाते.

१६) मुसलमानांना इराण जवळचा, काश्मीरचे हिंदू निर्वासित नव्हे !

काश्मीरमधून निष्कासित केलेल्या हिंदूंना आम्ही सर्वतोपरी सहाय्य करू, त्यांना आश्रय देऊ, त्यांच्यासाठी भव्य मशिदी निवासासाठी गोकळ्या करून देऊ, कारण त्यांचा काहीही अपराध नसताना त्या हिंदूंना त्यांच्या घरातून बाहेर पडण्यास तेथील मुसलमानांनी भाग पाडले आहे असे आवाहन आणि अशी कृती आपला सेक्युलरपणा सिद्ध करण्यासाठी कोणाही मुस्लिम संस्थेने केलेली नाही.

इराणमधील भूकंपग्रस्तांना सहाय्य म्हणून शासनाने एक कोटी रु. औषधे इत्यादी पुरविले ते वेगळे. मुस्लिम संस्थांनी काही मुसलमानांकडून आणि अधिकतर हिंदूंकडून मानवतेच्या आवाहनाने छत्तीस लाख रु. गोळा केले. विश्वनाथप्रताप सिंग यांनी ते इराणच्या राजदूताला दिले हे दृश्य जुलै १९९० च्या पंधरा-वीस दिवसात दूरदर्शनवरील वार्तात दाखविले गेले.

मुस्लिम संस्थांचे काश्मिरातून आलेल्या निर्वासितांना सहाय्य का नाही ? तर ते निर्वासित मुश्रिक म्हणजे मूर्तिपूजक किंवा काफर म्हणजे इस्लामला न मानणारे आहेत म्हणून याउलट इराण त्यांना असा पवित्र देश आहे की

ज्याच्या धार्मिक प्रमुखाने, खोमेनीने, सलमान रश्दीला ठार मारण्याचा फतवा काढला. हिंदुस्थानातील मुसलमान आणि इराण यांचे असे नाते असल्याने त्यांचे छत्तीस लाख रुपये इराणच्या सहाय्याला गेले. इस्लाम संरक्षक म्हणजे डिफेंडर ऑफ इस्लाम सेक्युलर प्रधानमंत्री विश्वनाथप्रताप सिंग यांना त्या दानात स्वत:चा गौरव वाटला.

१७) कॉंडीचे स्वरूप : शासन निष्प्रभ

विपणींचे सर्व फलक हिरव्या रंगाची पार्श्वभूमी आणि पांढऱ्या उर्दू अक्षरात पाहिजेत. ते अमुक दिवसांत झाले पाहिजेत. उग्रवादी फतवा काढतात. सर्व फलक तसे रंगवले जातात.

उर्दू सिर्फ मुसलमानोंकी जबान नहीं है । बडबडणारे हिंदू अनेक आहेत. हिन्दी केवल हिंदुओंकी भाषा नहीं है म्हणणारे उग्रवादी निघत नाहीत. इस्लामीकरणाचे एक माध्यम उर्दू आहे. ती विभाजनाची भाषा प्रमाणित झाली आहे. काश्मिरातील विघटनवाद्यांना ते साधन ठाऊक आहे, जसे अलिगढ मुस्लिम विद्यालयाच्या प्रवर्तकांना ते ठाऊक आहे.

दूरदर्शनवर काश्मीरपुरते कार्यक्रम उर्दू प्रधान झाले पाहिजेत, इस्लामचा गौरव दाखविला पाहिजे, उग्रवादी आदेश देतात.

शासन त्या दिशेने पावले टाकते.

दूरदर्शनच्या अनेक अधिकाऱ्यांना उग्रवाद्यांनी ठार मारल्याने स्थानिक केंद्र कार्यविहीन आहे.

आकाशवाणीवर म्हटले जाते सलामालेकुम प्रधानमंत्र्यांना म्हटले जाते वझीरे आझम.

वेळ अर्धा तास मागे म्हणजे येथे दहा असेल तर साडेनऊ ठेवली पाहिजे. कारण पाकिस्तानची प्रमाणवेळ तशी आहे. उग्रवाद्यांचा आदेश होतो, लोक साथ देतात.

शासकीय कर्फ्यू संपल्यावर उग्रवाद्यांचा आदेश होतो. आज कर्फ्यू आहे, बाहेर पडू नका. गोळ्या घालू !

शासकीय कार्यालये, बँक, शाळा, सर्व सर्व सुनसान राहते.

स्थानिक लोकांचे बल - म्हणजे फोर्स आम्ही उभे करीत आहोत. भरती व्हा. शासनाचे आवाहन होते.

'भरती झालात तर गोळ्या घालू' उग्रवादी आदेश काढतात. कोणी भरती

होत नाही.

हे आदेश मशिदी-मशिदीच्या ध्वनिक्षेपकावरून दिले जातात. (अर्थात, दिल्ली, मुरादाबाद, मेरठ, बुलन्दशहर, संभळ आदि ठिकाणच्या मुस्लिम वस्त्यातही मशिदीच्या ध्वनिक्षेपनांतून मुसलमानांना हिंदूंवर कोठून आक्रमण करा, पोलीसच्या गाड्या जाळा हे आदेश दिले जातात. ते त्या त्या वेळी असतात. काश्मीरांत निरंतर असतात.) हिंदुस्थानच्या अन्य भागात हे इस्लामी उद्घोष करणे अधिक सुलभ जावे म्हणून विप्रसिंह यांनी इसाम बुखारीला जामा मसजिदच्या डागडुजीच्या निमित्ताने शासकीय कोशांतून पन्नास लाख रुपये दिले आहेत.

भारत, हिंदुस्थान, इंडिया, हिंद ही नावे त्या त्या व्यापारिक फलकावरून पुसून टाकण्यास सांगितली जातात. न पुसल्यास ती पुसली जातात.

पाठशाळा, मंदिरे, शासकीय कार्यालये, बँक कार्यालये, आर्यसमाज संस्थागृहे, स्फोटकांनी उद्ध्वस्त केली जातात. उद्ध्वस्त केल्या गेलेल्या वास्तूंचे पुनर्निर्माण करणे शक्य होत नाही.

'शाळेत जाणाऱ्या मुलींनी बुरखा घातला पाहिजे !' उग्रवाद्यांचा आदेश निघतो. मुली अनवधानाने किंवा आपण सुरक्षित आहोत या धारणेने आदेश ऐकत नाहीत. त्यांच्या तोंडावर ॲसिड फेकले जाते. (लंडन टाईम्सने शाई म्हटले आहे. शाई नव्हे प्रत्यक्षांत ॲसिड)

हिंदू मुलींने कुंकू लावावे म्हणजे त्यांच्यावर ॲसिड पडणार नाही ! उग्रवाद्यांचा फतवा निघतो.

सर्वच मुली बुरख्यातून जातात. हिंदू मुलगी हिंदुत्व प्रकट करण्याचे धाडस करू शकत नाही. पुरुषांनाही तिलक लावता येत नाही. स्त्रियांची काय कथा !

ऑगस्टच्या १४ दिनांकाला अनेक शासकीय वास्तूंवर पाकिस्तानी झेंडे लावले जातात. हिंदुस्थान मुर्दाबादच्या गर्जना होतात. मिरवणुका निघतात. पोलिसांना आदेश असतात, परिस्थिती कितीही बिघडली तरी गोळीबार करू नका !

अशा पेचात उग्रवाद्यांना साहाय्य करणे पोलिसांना अधिक सुरक्षित वाटते. ते तसे करतात.

महाभारत मालिका बघू नका असे उग्रवादी बजावतात. त्या वेळी घराघरात जाऊन दूरदर्शन यंत्रे फोडून टाकतात. नेमकी त्या वेळी वीज बंद असेल अशी व्यवस्था करतात.

जानेवारी १९९० च्या मध्यात पाहिलेल्या स्थितीचे वर्णन लंडन टाइम्सच्या १७-१-९० च्या अंकात आले आहे. ते जशेच्या तसे उधृत केले आहे. तीही

एक छटा आहे. परिपूर्ण वर्णन नव्हे. पण कल्पना येण्यास पुरेसे आहे. काश्मीर हा हिंदू-मुस्लिम प्रश्न नाही असे म्हणणारे शासन मुसलमानांपुढे कसे गुढगे टेकत गेले आहे तेही त्या इंग्लंडमध्ये प्रसिद्ध झालेल्या छटेत दिसेल.

१८) लंडन टाईम्स वृत्त : काश्मीरवर

THE TIMES, LONDON 17 Jan. 1990 (p-8)

Kashmir in fear as fundamentalists tighten grip

From Christopher Thomas, Srinagar

The freezing, rain-soaked streets of Srinagar told their own story yesterday of what is happening to the Kashmir Valley.

Nearly every woman was shrouded in a 'burqa'. Video shops sold only Pakistani films. Shopkeepers hurriedly erected new Urdu-script signs above their stores. Cinemas, condemned as decadent, were shuttered. Barkeepers, branded as un-Islamic, served tea instead.

These are the signs of a new kind of Kashmir-one that is in the unfamiliar grip of Islamic fundamentalism, imposed ruthlessly by extremist organizations that now virtually control day-to-day life in the valley.

The immensely popular cause of Kashmiri nationalism has become inextricably linked with religious fanaticism, a development patently designed to emphasize the cultural alienation of India's only Muslim majority state.

By January 30, every woman and girl over the age of 10 will have to be veiled. Any who fail to heed the warning are liable to have ink thrown in their faces. Hindus will be compelled to wear the 'tika' mark on their forehead to distinguish them.

In the muddy, traffic-choked alleyways, shopkeepers were busy yesterday painting their signs green the colour of prosperity-under orders from a particularly hardline

fundamentalist group called Allah's Tigers.

A torrent of instructions pours forth endlessly from extremist organizations. Newsreaders on local broadcasts of Indian state-run radio and television have been told to stop mixing Hindi words with the Urdu language - an instruction heeded immediately. Camera shops have been told not to display photographs of scantily clad people. Hindi and English - language films have been banned because they represent "cultural domination" Coffee shops have been ordered not to sell tickets for lotteries, which are "un-Islamic."

Everybody seems to be afraid. Politicians from the National Conference, the longest-established political party in Kashmir, have virtually been driven underground. Every day, dozens of people place advertisements in Urdu-language newspapers declaring that they bear no allegiance to the party. Any link can be tantamount to death sentence.

Journalists, too, are scared. Extremists tend to bomb the offices of newspapers that upset them. They have also let it be known that they want to be called "rebels" or "insurgents" but not "militants"

In the past week, governmnet security forces looking for "subversive material" have reaided an Urdu-language weekley magazine, 'Chattan', and English-language weekly, Greater Kashmir. But a plan to impose draconian censorship has been abandoned after fierce protests from within India and internationally.

१९) अहमद बुखारीचा प्रधानमंत्र्यांना दम

दिल्लीचा इमाम बुखारी याचा मुलगा अहमद बुखारी याने काश्मीर प्रश्नावर विश्वनाथप्रताप सिंग यांना चेतावणी दिली आहे.

त्या पत्रकाचा आरंभच असा आहे —

"श्रेष्ठांनो आणि नवयुवक साथींनो ! इस्लाम विश्वाच्या उन्नतीचा महजब आहे. आमचा संबंध अशा अनुयायांशी आहे की ज्यांना मानणाऱ्यांनी इस्लामचा संदेश रक्तात नाहून दुसऱ्यांना पोहोचवला आहे.

(एक आधुनिक बाडगा बोलत आहे ! बाराव्या शतकातील नव्हे ! अज्ञानी राजीव आणि अंधश्रद्ध सर्वधर्मसमभाववादी यांनी "इस्लामचा संदेश"ची नोंद घ्यावी. तस्करांच्या वेतन पटावर असतील त्यांनी नव्हे.)

इस्लामचा इतिहास साक्षी आहे की इस्लाम अन्यायकर्त्यांचा (जालिम) पक्का शत्रू आहे.

उर्दू शब्द असे आहेत.

बुजर्गों और नौजवान साथियों ! इस्लाम संसार की उन्नति का मजहब है । हमारा ताल्लुक उन उम्मत (अनुयायियों) से है जिसके मानने वालोने इस्लाम का पैगाम खून मे नहाकर दूसरो तक पहूँचाया ।

इस्लाम की तारीख गवाह है कि इस्लाम जालिम का शदूद (कट्टर मुखालिक) है ।

पत्रक पुढे म्हणते —

काश्मीरची स्थिती इतकी भयानक होत आहे की, आम्हाला एक होऊन उपाय केला पाहिजे. आमचे मजहबी कर्तव्य आम्हाला आवाहन करीत आहे. या देशातील जनता विशेषत: मजलूम (दलित) व सर्व अकलियत (अल्पसंख्याक) यांची सुरक्षा करण्याला शक्ती उभी करा आणि अत्याचाराच्या छळाविरुद्ध आक्रोश करा. शक्ती अशी पाहिजे की, अत्याचाऱ्यांचे ऊर धडकले पाहिजे. सांप्रदायिकता आणि अत्याचारांना उखडून टाकण्यास आम्हाला मैदानात आले पाहिजे.

जगमोहन यांना विशेषणे आहेत — तंगनजर, फिरकायस्त, शैतानशिकता (राक्षसी हृदयाचा). मुफ्तीला चेतावनी आहे — रुबैयाला सोडविण्यास "काश्मीर के इन नौजवानोंसे सौदा कर सकते है ।" तर मग आता त्यांच्याशी वाटाघाटी का केल्या जात नाहीत ?

तेव्हा गोळ्या कोठे होत्या ? प्रतिशोध भावनेने काश्मिरी मुसलमानांच्या छातीच्या चाळणी केल्या ! तुम्हाला काश्मीर वाचविण्याचे असेल तर काश्मिरी नौजवानांशी बोलणी केली पाहिजेत (तुम्हाला ! म्हणजे यांचा या देशाशी आणि काश्मीर वाचविण्याशी काही संबंध नाही).

मुसलमान कधी गोळ्याला भ्याला नाही (इथे दलित विसरले गेले !) त्याने ताठपणे आपल्या छातीची चाळण करून घेतली, हक्काचा, अधिकाराचा

स्वर उंच उठवण्यास भ्याला नाही.

अत्याचारी राजवट त्याने कधी सहन केली नाही, सहन करणार नाही.

वि. प्र. सिंहना आठवण दिली आहे. निवडणुकांपूर्वी दिलेली वचने आठवा. त्या अधिष्ठानावर शाही इमामने हिंदुस्थानच्या नुसत्या मुसलमानांनाच नव्हे तर अखिल दलितांना आवाहन केले की जनता दलाला विजयी करा, काँग्रेसला हटवा ! (म्हणजे इस्लाम - दलिताचा हा स्वयंभू खलिफा झाला ! आंबेडकर गेले कोपऱ्यात !)

(काश्मीरमधील युद्धात महार पलटणीने केलेला पराक्रम, अहमदसारख्या विघटनवाद्यांच्या केलेल्या चिंधड्या अहमद बुखारीला कोणी सांगितलेल्या दिसत नाहीत !)

पुढे म्हटले आहे —

काश्मीरच्या मुसलमानांचा निर्वंश करण्यासाठी तुम्हाला आम्ही मते दिली काय ?

हरियाणातील मदिना गावातील चार लोकांच्या हत्येने तुम्ही अस्वस्थ होता. मुख्यमंत्र्याला अपदस्थ करता. मग मुसलमानांचे रक्त वाहवणाऱ्या जगमोहनला हटविण्यात अडचण कोणती आहे ?

गेल्या चार महिन्यांपासून शाही इमाम दाताच्या कण्या करीत आहे की संहारक जगमोहनला दूर करा ! आता तर विरोधी आणि सत्ताधारी सदस्यही ती मागणी करीत आहेत.

मीरवाईज मौलवी फारुखच्या प्रेतयात्रेवर जगमोहनने गोळ्या झाडल्या. शंभर काश्मिरी शहीद केले. (काश्मीरी म्हणजे मुसलमान या अर्थाने) (प्रेतत्रेयातील लोकांनी हातगोळ्यांचा वर्षाव पोलिसांवर केला ते अहमद कसे देणार) म्हणून जगमोहनला हटवा !

वि. प्र. सिंगना दम भरला आहे. अगर हुकूमतने हमारी बातपर तवज्जो (ध्यान) न दी तो कोई तरीका तय किया जाएगा कि हुकूमात को हटाया जा सके ।

पत्रक मोठे आहे. पांचजन्य १० जून ९० पृष्ठ १४ वर ते पाऊण पानभर नागरीत मुद्रित झाले आहे.

२०) फर्मानाचा सन्मान

वि. प्र. सिंह यांनी आपल्या खलिफाचे फर्मान सन्मानित केले. जगमोहनला

दूर केले. उग्रवाद्यांशी बोलणी करण्याच्या सिद्धतेची भाषाही त्यांच्या तोंडी येऊ लागली. अवगुंठन एकच होते, त्यांनी म्हणजे उग्रवाद्यांनी अर्थात विभाजनवाद्यांनी संविधानाच्या चौकटीत राहून बोलले पाहिजे ! मासा पाण्याबाहेर येऊन माणसाशी मिळते घेणार की माणूस पाण्यात बुडून माशाशी मिळते घेणार ?

२१) सेक्युलरवाद म्हणजे हिंदू द्वेष

काश्मीर विघटनाचे आधारस्तंभ अन्य हिंदुस्थानातील मुसलमान आहेत. अशा मुसलमानांचे संरक्षक सेक्युलरवादी आहेत. एक उदाहरण पाहा.

वरुणराज भिडे यांनी विधानसभेचे समालोचन घेतले (सकाळ २३/७/९०)

ग गणपतीचा, भ भटजीचा, ज्ञ यज्ञाचा याचा सेक्युलर धर्मीयांना द्वेष उत्पन्न झाला.

उर्दू सिर्फ मुसलमानोंकी जबान नाही है हे बडबडणाऱ्या सेक्युलर धर्मीयांनी उर्दू बालभारतीत अजान (अल्लाच्या प्रार्थनेला आवाहन देणारा स्वर) वजू (अल्लाच्या प्रार्थनेपूर्वी इंद्रिय धुण्याची क्रिया) घुसविले, पुस्तकांच्या निर्मात्यांना शासकीय कोषातून द्रव्य दिले.

महाराष्ट्रांत उर्दू कुणासाठी ? कोणत्याही प्रदेशात उर्दू कुणासाठी ? उर्दू कोणत्याच प्रदेशाची प्रादेशिक भाषा नाही.

उर्दू अकाडमी म्हणजे इस्लाम धर्म प्रसाराला सेक्युलर हिंदुस्थानच्या कोशांतून केले जाणारे पैशाचे वाटप !

जगमोहन यांनी जम्मू-काश्मीरमधील १५७ शाळांना बंदी घातली असे वृत्त १३/५/९० च्या टाईम्सच्या मुंबई आवृत्तीत पृष्ठ ६ वर दिले आहे. जमायते इस्लामी यांनी त्या शाळा चालविल्या होत्या. या शाळातून विघटनवादी आणि राष्ट्रविरोधी शिक्षण दिले जात असे. फलान ए आम ट्रस्ट ही संस्था अवैध घोषित केली गेली.

सेक्युलरीझमचा लाभ घेऊन उर्दू शाळांनी जी तोडफोड शिकविली त्या पापाचे उत्तरदायित्व सेक्युलर सरकारवर आहे.

सेक्युलर शासनाने संस्कृत मारून, संस्कृती मारून, उर्दूला दिलेले प्रोत्साहन विघटनवाद्यांना अनुकूल ठरले. शासन इतिहास विसरले.

कलकत्ता विश्वविद्यालयाच्या वास्तूवर आणि बोधचिन्हावर श्री हे अक्षर होते. विभाजनापूर्वी मुसलमानांनी त्या श्रीविरुद्ध फार मोठे आंदोलन केले होते.

संस्कृतिद्वेष हा त्यांचा पाया होता. सेक्युलरवाद्यांनी स्वत:साठी तोच पाया

ठेवला आहे.

काश्मीरच्या मुसलमानांनी उर्दू लादली. आकाशवाणीच्या आणि दूरदर्शनच्या कार्यक्रमातून संस्कृत नष्ट करून अरबी, फारसी भरपूर प्रमाणात मिसळण्याचा उपक्रम सतत चालू आहे. उग्रवाद्यांना दोष देण्यास या शासनाला तोंड नाही.

२२) खोटा विरोधाभास

मुसलमान आहे पण संस्कृतचे श्लोक म्हणतो. एक दुसऱ्याला कौतुकाने सांगतो.

राहणार कुठला ? तर रत्नागिरीचा, किंवा नाशिकचा, किंवा पुण्याचा. सर्व पिढ्या याच क्षेत्रात गेलेल्या. आसपास मराठी वाचून अन्य भाषेचा गंधही नाही. संस्कृत स्तोत्रे सदा कानावर जात असलेली.

मग हे कौतुक कशासाठी ?

संस्कृत म्हणजे ज्ञान आणि ज्ञानद्वेष्टा तो मुसलमान हे आपल्या अंतर्गत मनातील भाव त्या कौतुकात असतात.

गाय आहे तरी पण गवत खाते, असे आपण म्हणत नाही. गवत खाणे हा गायीचा धर्म आहे.

मुस्लिम आक्रमकांनी ज्ञानस्थळे ध्वस्त केली. ग्रंथालये जाळली. संस्कृत जाणणाऱ्यांच्या मुंडक्यांचे डोंगर रचले आणि संस्कृतशी निगडित जी संस्कृती ती उद्ध्वस्त करण्याचा सदा प्रयत्न केला.

अशा प्रयत्नाचा परिणाम म्हणून कोणी परिवारभयाने, किंवा जिझिया देणे परवडत नाही म्हणून किंवा मुसलमान झाल्याने चांगली नोकरी मिळत आहे म्हणून, मुसलमान होतो आणि त्याच्या संततीला हिंदू संस्कृतीचा द्वेष, संस्कृतचा द्वेष, मूर्तीचा द्वेष, मूर्तीपूजकांचा द्वेष शिकविला जातो. तो मशिदीतून शिकविला जातो. आजही शिकविला जातो. कुराण पारा १०/९/५. ५/४/५६, २८/६६/९, २४/४१/२७ इत्यादि पाहा. तो द्वेष आत्मसात करून कोणी मुसलमान गणपतीच्या मंडपात मुततो तर कोणी गणपतीवर विष्टा टाकतो आणि आपल्या इस्लाम धर्मप्रवणतेचे प्रतीक मिरवतो.

ही अंधश्रद्धा आहे आणि ती उपद्रवकारी आहे, हे ज्ञान त्याला कोणी देत नाही. अज्ञानात राहणे हा त्याचा धर्म आहे असे सर्वधर्म समभाववादी मानतात.

मुसलमान संस्कृत बोलत आहे हे धर्मविसंगत वाटल्याने त्याचे कौतुक

वाटते.

तो आहे खोटा विरोधीभास ! मुसालमानांचे अज्ञान दूर करा. तो माणूस बनेल.

२३) फारुक ! आम्हाला काश्मीरच्या भोवऱ्यातून बाहेर काढ (वेळेला काश्मीर मधून बाहेर काढ) आम्ही पाया पडतो !

सकाळ दि. २३/७/९० चे वृत्त आहे. रेल्वे मंत्री जॉर्ज फर्नांडिस यांनी औरंगाबादला सांगितले की, फारूक अब्दुल्ला यांच्यावर काश्मीरची जबाबदारी सोपविल्यास खऱ्या अपराध्यांना पाठीशी घातल्यासारखे होईल. त्या वृत्तात हेही लिहिले आहे की दिल्लीत फारूकशी बोलणी चालू आहेत.

फर्नांडिस राज्ययंत्रणेचे एक प्रमुख घटक आहेत. शासन नीती म्हणून जे करते त्याचा त्यांनी प्रकट निषेध केला आहे ! हे शासन म्हणे पाच वर्षे टिकणार आहे.

हा भाग वेगळा.

जॉर्ज ! तुमचाच प्रस्ताव होता की फारुकला जम्मू काश्मीरला अंतरिम मुख्यमंत्री बनवावे, नॅशनल कॉन्फरन्स, काँग्रेस-जनता, भाजपा, मुस्लीम युनायटेड फ्रंट, कम्युनिस्टदल, भारतीय कम्युनिस्टदल यांना संयुक्तपणे काश्मीरच्या राजनैतिक शासनाचे नेतृत्व द्यावे ! (जालंधर आवृत्ति, पंजाब केसरी २२-६-९०)

तुम्ही निवड करणार होतात तेव्हा फारूक 'अपराधी' नव्हता ! आता आहे !

तेही जाऊ दे ! राजधुरीणांच्या कोलांट्याउड्यांना राजनीती म्हणतात. वारांगनेव नृपनीतिरनेक रूपा !

एकट्या मुफ्तीकडून काश्मीर समस्या, अपेक्षाकृत बिकट होईना म्हणून विश्वनाथप्रताप सिंग यांनी जॉर्ज फर्नांडिस यांना मुफ्तीच्या साह्याला दिले होते. समस्या अधिक बिकट होताच फर्नांडिस बाहेर पडले.

फारूक अब्दुल्ला यांची गुणवत्ता फर्नांडिस यांनी सांगितली. त्यांच्या मते फारूकला काश्मीरचे उत्तरदायित्व दिले जाऊ नये. पण त्याचवेळी, उत्तरदायित्व कुणाला दिले जावे हे ते बोलले नाहीत.

आपल्या शासनाच्या दृष्टीने अशा व्यक्तीसाठी काही गुणवत्ता आवश्यक आहेत.

ती व्यक्ती मुसलमान पाहिजे.

ती व्यक्ती काश्मीरी पाहिजे.

काश्मीरच्या 'सेक्युलर' जनतेला ते नेतृत्व अनुकूल वाटले पाहिजे (अर्थात विभाजनवादी मुसलमानांना, हिंदूंना विचारायचे कारणच नाही).

धारा ३७० प्रमाणे काश्मीरला विशिष्ट स्थान आहे, तसेच काश्मीरच्या सेक्युलरझिमचेही विशिष्ट अलगपण आहे. शेष हिंदुस्थानातील प्रदेशात मुख्यमंत्री मुसलमान असू शकतो. काश्मीरात कधी हिंदू मुख्यमंत्री असू शकत नाही. कारण काश्मीर हा हिंदुस्थानातील आदर्श सेक्युलर प्रदेश आहे.

अशा स्थितीत उरले कोण ?

अब्दुल रहमान अंतुले महाराष्ट्रावर मुख्यमंत्री म्हणून लादले गेल्यावर त्यांनी लंडन येथून शिवाजीची तलवार घेऊन येतो असे लोकांना सांगून जी भरारी मारली त्यात ते हाज यात्रेचे पुण्य घेऊन आले, तलवार नव्हे !

गृहमंत्री मुफ्ती महमद सैद चार मुस्लिम देशांना काश्मीर प्रश्नावर हिंदुस्थानला अनुकूल करण्याच्या निमित्ताने बाहेर पडले. फारुक अब्दुल्ला इंग्लंडमध्ये होते त्यांना भेटणे हा त्यांचा मुख्य उद्देश होता. दि. २४/६/९० च्या दिल्लीच्या वीर अर्जुनमध्ये ते प्रसिद्ध झाले आहे.

वीर अर्जुनचे शीर्षक होते. मुफ्ती लंदनमें फारुकसे मिलेंगे । फारुकची अट होती की जगमोहन राज्यपाल असेपर्यंत केंद्राशी ते बोलणी करणार नाहीत. वृत्तात म्हटले आहे की रेल्वेमंत्री जॉर्ज फर्नांडिस तत्पूर्वी वॉशिंग्टनला गेले होते. परत येताना इंग्लंडमध्ये ते फारुकला भेटले होते. तसेच तेथील हिंदुस्थानचे उच्चायुक्त कुलदीप नय्यर यांनीही त्यापूर्वी अब्दुल्लाच्या लंडनमधील निवासाचे उंबरे झिजवले होते.

आणि मुफ्ती अन्य यात्रा करत करत लंडनला पोहोचले. वृत्तपत्रात वृत्तवार्ता प्रसिद्ध झाली की मुफ्ती फारुकला भेटले नाहीत. हे इतके ठासून सांगितले गेले की ओळींच्या अंतराळातील अलिखित शब्द वाचकांना स्पष्टपणे वाचता यावे.

फारुकचा भाव आणखी वाढविण्यासाठी ही भेट योजनापूर्वक घेतली गेली नाही. तरी अब्दुल्ला आणि मुफ्ती हे एकाच स्पर्धेतील स्पर्धक आहेत. १९८६ मध्ये काँग्रेसच्या मंत्रिमंडळात समाविष्ट केले गेल्यावर ८ मे १९८६ या दिवशी मुफ्तींनी इच्छा व्यक्त केली होती की काश्मीर ते काय ! दिल्लीहून तासाभराचा प्रवास ! मला मुख्यमंत्रिपद सहज सांभाळता येईल.

काश्मीरचे अधिकाधिक वाटोळे कोण करू शकेल, यासाठी या दोघा

स्पर्धकांची चढाओढ होती.

फारुक अब्दुल्लाने आपला पूर्ण भाव घेतल्याने आणि वि. प्र. शासनाने फारुकच्या पायावर अनेकदा लोटांगणे घेतल्यावर फारुक प्रसन्न झाला आहे आणि काश्मीर समस्येत नेमके काय करावे याचे कुशल मार्गदर्शन विप्रसिंहना करण्यास तो पुढे आला आहे.

दिनांक ६-८-९० ला बेनझीरला पाकिस्तानच्या प्रधानमंत्री पदावरून पदच्युत केले आहे. हिंदुस्थानसाठी काहीही अंतर नाही. हिंदु द्वेष, इस्लामविस्तारवाद हा पाया पाकिस्तानला दिलेला आहे तो स्थिर आहे. हिंदुस्थानांतील मुसलमान त्या नीतीला अनुकूल आहेत. सेक्युलर शासन त्यांना प्रोत्साहन देत आहे. हिंदुस्थानच्या सेक्युलर शासनाच्या तुष्टीकरण नीतीच्या अधिष्ठानांत अंतर नाही. तसेच पाकिस्तानच्या हिंदु विद्वेषी अधिष्ठानांतही अंतर नाही. बेनझीरची पदच्युति कोण्या रामप्रसादला किंवा हरीसिंहला प्रधानमंत्री करण्यासाठी नाही. म्हणून हिंदुस्थानसाठी पानिस्तानांतील उलथापाथीने काही अंतर नाही.

नेमके तसेच हिंदुस्थानांत राजीव प्रधानमंत्री राहिले काय किंवा वि. प्र. सिंह राहिले काय, राजीव पदच्युत झाले काय किंवा वि. प्र. सिंह पदच्युत झाले काय, धर्मनिरपेक्षतेच्या म्हणजेच तुष्टीकरण नीतींच्या अधिष्ठानांत अंतर नाही. त्यामुळे, येथील मुसलमानांना म्हणून पाकिस्तानला त्यामुळे काही अंतर पडत नाही. त्यांना भुसभुशीत भूमी सदा मिळत राहिली आहे.

अंदर की बात ही आहे की, विघटन वाद्यांनी फारुकला हिरवा दिवा दाखविला आहे. कारण बेनझीरने विघटनवाद्यांना हिरवा झोत पोहोचविला आहे. हिरवा झेंडा असलेल्या जनता दलाच्या विप्रसिंह शासनाची या हिरव्या प्रकाशात गुफ्तगू होणार आहे !

सेक्युलर चौकटीत राहून विघटनाच्या सर्व गुणवत्ता फारुक पुरी करू शकत असल्याने फर्नांडीसच्या सख्याच्या आक्षेपाला काही मूल्य नाही !

२४) अरब देशांना साह्याचे पाचारण

अरब आणि इराण विघटनवाद्यांचे सहाय्यक आहेत, असे अमेरिकेचे मत आहे.

अमेरिकी काँग्रेसचा प्रतोद ॲलन क्रॅस्टन याने दि. १३ जुलैला वाशिंग्टन येथे सांगितले की सौदी अरेबिया आणि इराण यांचा हात काश्मीरमधील तोडफोडीत आहे. (इंडियन एक्सप्रेस १४/७/९०) तर लोकसत्ता २३/७/९० ने दुबईचे दि. २२ चे वृत्त दिले आहे की इस्लामी परिषद संघटनेचे अध्यक्ष कुवेतचे अमीर शेख जावेर यांचे ऊर्जामंत्री अरिफ महमद यांनी पाय धरले आहेत

की हुजूर, काश्मीरप्रकरणी आपण मध्यस्थी करावी. पाकिस्तानला समजावावे की भारताशी चर्चा करून शांततेने हा प्रश्न सोडवा.

इस्लामी देशाला आवाहन करण्यास विश्वनाथप्रताप सिंग अरिफखानच्या सेवयुलरत्वाची सुन्ता करून त्यांना मुसलमान करतात आणि अरब देशाला पाठवतात !

काश्मीर ही हिंदू-मुस्लिम समस्या नाही असे घोकणारे शासन मध्यस्थी अशा देशांची मागतात की, इस्लाम या नात्याने त्या देशांचे काश्मिरी विघटनवाद्यांना आतून समर्थन आणि सहाय्य असावे.

ज्याने स्वतंत्र काश्मीर राज्याची घोषणा केली आणि यूनोमध्ये पत्रकार परिषद घेतली, जो तोडफोड आणि हत्या प्रकरणी हिंदुस्थानला आरोपी म्हणून हवा आहे, त्या अमानुल्लाला, आणि त्याही पलिकडे, ज्या देशाशी काश्मीरविषयक वाद आहे असे आपले राज्यकर्ते मानीत आले आहेत त्या देशाच्या प्रधान मंत्र्याला म्हणजे सध्याच्या स्थितीत बेनझीरला समस्या सोडविण्यास बोलावले जाणे, त्या पुण्यकृत्यासाठी काश्मीर देऊ करणे, हिंदूंची चलअचल संपत्ती त्यांना अर्पण करणे, अशी परिणती प्रचलित राज्यकर्त्यांच्या नीतीच्या परिधीत तितकीच सुसंगत ठरेल.

अशा भयंकर घातक स्थितीत आपले शासन हिंदुस्थानला नेऊन सोडत आहे.

२५) बेनझीरही भटकली आहे.

इस्लामी देशांच्या सहानुभूतीवरच जर या घरच्या प्रश्नाचे समाधान अवलंबून असेल तर हिंदुस्थानपेक्षा बेनझीरला त्या देशांत महत्त्व अधिक राहील. विश्वनाथप्रताप सिंह यांची गुणवत्ता काय ? तर हिंदूंचे रक्त शोषून त्यांनी केलेली इस्लामची सेवा ! इस्लामचे संरक्षक, Defender of Islam ही घेतलेली भूमिका !

बेनझीरजवळ एकच भूमिका आहे. इस्लामची प्रसारक. Expander of Islam !

तिने १४ इस्लामी देशांना भेट दिली ! तिच्यासमवेत विदेश सचिव तनवीर अहमदखानही सर्व प्रवासात होता. ओ आयसी म्हणजे Organization of Islamic Conutries घटक देशांच्या परराष्ट्र मंत्र्याच्या आगामी बैठकीत पाकिस्तानच्या भूमिकेचा अनुकूल प्रस्ताव करील अशी पाकिस्तानची अपेक्षा आहे. टाईम्सचे इस्लामाबादचे प्रतिनिधी व्ही. के. देठे यांनी २२/६/९० चे

समालोचन धाडले आहे ते बघावे.

जी भेटीगाठीची शस्त्रे आपल्या जवळ आहेत, ती पाकिस्तानजवळ आहेतच आहेत ! त्यावर विसंबून आपण काश्मीर प्रश्न सोडवू शकणार नाही.

२६) हिंदुसभेकडून निर्वासितांची नोंदणी

काश्मीरातून पळून आलेल्या विस्थापितांच्या पुनर्वसनाला भूमिका निर्माण करावी म्हणून अखिल भारत हिंदू महासभेच्या दिल्लीच्या केंद्र कार्यालयात परिवारांची नोंद करण्यास आरंभ केला. हिंदुस्थान टाईम्स आणि अन्य वृत्तपत्रांनी दि. २४ फेब्रुवारी आणि १ मार्च या दिवशी त्याला प्रसिद्धी दिली.

मार्चच्या महिन्यातच दिल्लीत आलेल्या २॥ हजार परिवारांची नोंद झाली. प्रत्येक परिवारात स्थूलत: पाच ते सहा सदस्य होते. म्हणजे स्थूलपणे १४/१५ हजार लोक दिल्लीपर्यंत पोहोचले होते. जम्मूमध्ये यापेक्षा फार मोठ्या संख्येने लोक पोहोचले. उत्तर प्रदेश, हिमाचल प्रदेश या भागात आपापल्या मित्रांच्या संबंधिताच्या आधाराने अनेक कुटुंबे स्थानांतरित झाली.

दिनरात जालंधर दि. ९/२/९० ने या पलायनाचे आणि पाकिस्तानवादी मुजाहिदांच्या योजनांचे विस्तृत वर्णन दिले आहे. समाचाराचे शीर्षक आहे — श्रीनगरसे चालीस हजार हिंदू व सिखोंका पलायन' हिंदू आणि शीख अलग अलग म्हणण्याची पद्धत विभाजनवादी काँग्रेसने शिकविली. हिंदु-मुस्लिम शीख इसाई आपस में है भाई भाई अशा अर्थहीन घोषणा स्वत:च्या हाताने हिंदुदेश मुसलमानासाठी तोडून दिल्यावर त्या पापावर पांघरून घालण्यासाठी आणि पुढचे पाप करण्यासाठी चालू केला. यातूनच हिंदू आणि शीख हे वेगळे आहेत हा बुद्धिभ्रंश शिखांनी आपल्या मनात स्थिर केला. पण मुख्य विषय हा नव्हे ! मुस्लिमानांना शीखही तितकेच शत्रुस्थानी आहेत, जितके अन्य हिंदू, हे लक्षात येईल.

ज्या परिवारांनी नावे नोंदविली त्यात अनेक उच्चस्तरीय शासकीय सेवक होते. तसेच उग्रवाद्यांनी ठार केलेल्या हिंदूंचे नातेवाईकही होते. सीमामार्ग संचालक (बॉर्डर रोड डायरेक्टर), स्त्री रोग चिकित्सक महिला डॉक्टर, महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक असे लोक तसेच अनेक मोठे व्यवसाय असणारे लोक होते. प्रतिष्ठेमुळे त्यांना भीकही मागता येईना आणि जगताही येईना.

मुस्लिम तुष्टीकरणवादी शासनाने हिंदूंवर लादलेली हे दुसरे मोठे निष्कासन त्याच दिल्लीत मी पाहत होतो.

ज्या लोकांना घाटीतून अन्यत्र स्थानांतर करणे शक्य झाले, वाहनाचा

व्यय परवडला तेच लोक येऊ शकले. न आलेले लोक या घटकेपर्यंत उग्रवाद्यांच्या गोळ्यांचे बळी होत आहेत.

हिंदुसभेने आपल्या शक्तीप्रमाणे तीस हजारांपर्यंत गोळा करून वाटप केले. काही परिवारांना आश्रय देण्यास काही उदार लोक पुढे आले. त्यांच्या साहाय्याने थोड्या लोकांना निवारा दिला गेला. काम निरंतर चालू आहे.

विस्थापितांचा अन्यत्र पुनर्वास हे समस्येचे समाधान नव्हे.

२७) मुफ्ती, अतिरेकी मिळालेले आहेत – राजीव

राजीव यांचे म्हणणे असे की सरकारने हेतुत: काश्मीरप्रश्न निर्माण केला. घाटीतून काँग्रेस आणि कॉन्फरन्स यांना बाहेर काढण्याचा राष्ट्रीय आघाडी शासनाचा डाव आहे. जे. के. एल. एफ. शी राष्ट्रीय शासनाचा संबंध आहे. जे. के. एल. एफ. च्या सहकार्याने काश्मीरमध्ये शासन बनविण्याची शक्यता जगमोहन बघत होते. मुफ्ती आणि काश्मिरातील अतिरेकी यांचा घनिष्ट संबंध आहे. (काँग्रेस महारागिती बैठक, दिल्ली, सकाळ २४/७/९०)

मुफ्ती राजीव यांच्या शासनात मंत्री होते. तेव्हा त्यांचा संबंध अतिरेक्याशी नव्हता ? नॅशनल कॉन्फरन्सचे फारुक आज राजीवच्या सहकार्यात आहेत. फारुकचा उग्रवाद्यांचा संबंध नाही काय ?

काश्मीरप्रश्न राजीवच्या वेळी नव्हता ? की पाळीपाळीने दोषारोपण करीत राहायचे ? सध्याचे शासन काँग्रेस शासनापेक्षा वेगळे आहे काय ? मुफ्ती आणि अब्दुल्ला यात अंतर नाही. तसेच विप्रसिंह, त्यांचे समर्थक आणि राजीव यांच्यातही अंतर नाही ! तुष्टीकरणनीतीचे अपत्य आहे काश्मीर प्रश्न.

सेवकांची देशनिष्ठा

काश्मीरचा सेवकवर्ग तीन दिवस हरताळ करीत आहे. (दि. २४/७/९० पासून) १३७ कर्मचाऱ्यांत चार आय. ए. एस. अधिकारी आहेत की ज्यांनी आंतरराष्ट्रीय न्यायपीठाकडे हिंदुस्थानविरुद्ध प्रतिवाद केला आहे. त्यांना निलंबित केले नाही. स्थानांतरित केले आहे. ते स्थगित करण्याची सेवेतील कर्मचाऱ्यांची मागणी आहे ! निलंबितांना कामावर घ्यावे हीही मागणी आहे. (टाईम्स, मुंबई २३/७/९०)

म्हणजे विभाजनवादी सेवकवर्गाला वेतन देत राहून हिंदुस्थान शासन काश्मीरवर राज्य करणार आहे !

याच अेघांत, उग्रवाद्यांची देशनिष्ठा खालील वृत्तावरून अनुमानिली जावी.

दि. ४-८-९० च्या दूरदर्शन वार्तांत प्रस्तारित केले गेले की उग्रवाद्यांना सहानुभूति दाखविली जाईल; त्यांचे पुनर्वसन केले जाईल. एक उग्रवादी पोलीसांच्या अधीन झाला हा संदर्भ होता.

राज्यकर्त्यांनी ध्यानांत द्यावे की निरपराध हिंदू निष्कासितांना पुनर्वसन हवे आहे. उग्रवादी तुमच्या सहानुभूतीच्या तुकड्यावर संतुष्ट नाहीत. त्यांची राष्ट्रीयता ते वेगळी मानतात. तो तुकडा ते घेतीलच आणि आक्रमणही थांबविणार नाहीत. पंचावन्न कोटी पदरांत पाडून घेतल्यावर पाकिस्तानने आपल्या सेना काश्मीरमधून काढून घेतल्या नाहीत.

गांधीच्या मृत्यूमुळेही त्यांना हिंदुस्थानविषयी सहानुभूति नव्हती. गांधींची रक्षा सिंधु नदीत विसर्जित करण्यास त्यांनी नकार दिला. कारण काफराच्या राखेने पाक नदी त्यांना नापाक करायची नव्हती. ही पाकिस्तानची प्रवृत्ती होती.

अशा सहानुभूतीच्या नीतीत पोसलेले भूत राज्यकर्त्यांचा गळा घोटणार आहे. अनेक वरिष्ठ पदाधिकारी ठार मारले गेले आहेत. अनेक शासकीय कार्य केंद्रे शून्य झाली आहेत. शक्य झाले तर काश्मिरात (नुसत्या श्रीनगरमध्ये नव्हे) हिंडून पहा. शासन यंत्रणेचा राकट सर्दांचा संहार करून घेण्याची वाट बघत आहे काय ? कोणत्या आनंदा प्रीत्यर्थ ?

उग्रवाद्यांचे राष्ट्र त्यांच्यामागे उभे आहे, तर त्यांचे समराष्ट्रीय हिंदुस्थानांत त्याच्यामागे उभे आहेत हे विसरू नये.

देशनिष्ठा विकत घेण्याचा प्रयोग स्वातंत्र्य प्राप्ती पूर्वी पासूनच विफल झाला आहे. कारण ती अस्वाभाविक आणि अनैसर्गिक अपेक्षा अट्टाहासाने केली गेली होती, त्यातूनच पाकिस्तान निर्माण झाले. हा इतिहासही विसरू नये.

लुटल्या गेलेल्या संपत्तिप्रमाणेच एकेकाळी लुटले गेलेले लोक, विकृत केला गेलेला समाज संस्कृत करून घेणे हा उपाय आहे. निष्ठा विकत घेता येत नसतात. संस्कृतिसह निष्ठा येतात. हा उपाय शासनाने करण्याचा असतो, देश वाचविण्याचा असला तर.

२८) वल्गना विरल्या आहेत

हजार वर्षे युद्ध चालू ठेवू या बेनझीर भुट्टोच्या वल्गनेला विप्रसिंहानी प्रतिवल्गना दिली, हजार तास तरी टिकाव लागेल का ?

ते वाग्युद्ध विरले आहे.

पाकिस्तान दु:साहस करेल तर त्याला फार मोठे मूल्य द्यावे लागेल

या वल्गना संपल्या आहेत.

अमेरिकेने डोळे वटारताच सीमेवरील तुकड्या मागे घेतल्या गेल्या आहेत.

२९) आक्रमण झालेले आहे

आक्रमण केव्हाच केले गेले आहे. पण आक्रमण म्हणजे काय याची परिभाषा हिंदुस्थानच्या जनतेला दिली जात नाही.

३०) अंतर्गत तोडफोड हे पाकिस्तानी आक्रमण

पाकिस्तान आक्रमण करील तर ..... ! पुन्हा पुन्हा म्हटले जात आहे.

पाकिस्तानने आक्रमण केव्हाच चालू केले आहे. काश्मीर हा एक दृष्यमान टप्पा आहे.

सेक्युलरवादाचा पुरेपुर लाभ घेऊन हिंदूंच्यात युद्धसदृश दुही निर्माण करण्याचा पाकिस्तानचा डाव सफल झाला आहे. पंजाबात शीखेतर हिंदूंच्या हत्या तर इंदिरा गांधींच्या हत्येनंतर अन्यत्र शीख हिंदूंच्या हत्या यात पाकिस्तानला फार मोठे यश मिळाले, सर्वाधिक आनंद झाला. शीखेतर हिंदू आणि शीख हिंदू यांना पाकिस्तान शत्रुस्थानी मानत आले आहे. एवढ्या संख्येने शत्रूचा संहार करण्यासाठी पाकिस्तानला आपले फार मोठे सैन्य योजावे लागले असते. अनेक सैनिक बळी द्यावे लागले असते. युद्धप्रवणतेचा दोष आला असता तो वेगळाच ! ते काही न करता त्यांची तोडफोडीची नीती यशस्वी झाली आहे.

हिंदुस्थानातील मुसलमानही तितकेच आनंदी होते. कारण त्यांचे शत्रू मारले जात होते. त्याच वेळी सेक्युलरवाद्यांच्या राज्यात मुसलमानांना, पाकिस्तानच्या अभिकर्त्यांना, संपूर्ण संरक्षण होते.

युद्धे झाली तेव्हा पंजाबातील घराघरातून सैनिकांना भाकऱ्या दिला गेल्या आणि अरौनिकी नागरिकांनी युद्धातील आपला पुण्यप्रद कार्यभार उचलला. युद्ध देशाच्या संरक्षणासाठी म्हणजेच त्याही नागरिकांच्या संरक्षणासाठी होते ही त्यांची भावना प्रबळ होती.

आज युद्ध झाले तर त्याच घराघरातून अन्नपुरवठा पाकिस्तानी आक्रमकांना केला जाईल, कारण पाकिस्तान शिखांना खालिस्तान मिळवून देणार आहे, हा बुद्धिभ्रंश त्यांच्या मनावर बिंबविला गेला आहे. पाकिस्तान खलिस्तान देईल, ते हिंदुस्थानला फोडण्यासाठी आणि नंतर पूर्वापार शत्रू जे शीख, त्यांचा संहार करण्यास सुलभ जावे म्हणून !

काश्मीरात प्रारंभीच्या आक्रमणात टोळीवाल्यानी मुस्लिम नागरिकांवरही

तेच अत्याचार केले होते, जे ते हिंदू नागरिकांवर करतात. त्या असुरक्षिततेच्या भयाने मुसलमान हिंदुस्थानच्या सैनिकी कार्यवहनाला विरोध करीत नव्हते.

आजची स्थिती वेगळी आहे.

आज पाकिस्तानला प्रत्यक्ष सैनिक घुसवून आक्रमण करण्याची आवश्यकता राहिलेली नाही. अंतर्गत आक्रमणाची त्याची योजना कार्यान्वित झाली आहे. ते आक्रमण केव्हाच चालू झाले आहे.

काश्मीरात मुसलमान बहुसंख्य ठेवल्याने, इतकेच नव्हे तर शेख अब्दुल्ला पासून सर्वांनी योजनापूर्वक जम्मू भागातही ठिकठिकाणी मुस्लिम बहुसंख्य करण्यासाठी शत्रुव्याप्त काश्मीरमधील मुसलमानांना बोलावून त्यांची वसाहत केल्याने आज युद्ध झाले तर सर्व नागरिक आक्रमकांचे स्वागत करतील, हिंदुस्थान शासनाची सत्ताकेंद्रस्थाने त्यांना दाखवितील आणि ती उद्ध्वस्त करण्यास सर्वतोपरि सहाय्य करतील.

३१) पाकिस्तानी सुरुंग हिंदुस्थानभर विखुरला आहे

हिंदुस्थानात हज मंजिलातून, मशिदीतून, उर्दू शाळातून, आकाशवाणीच्या उर्दू विभागातून, उर्दू अकादमीतून, मसलिशितून, तबलीकमधून आणि शासनात प्रवेश मिळालेल्या अनेक अनुकूल संसद सदस्यांतून, राज्यसभासदस्यांतून विधानसभासदस्यांतून, पाकिस्तानने मोर्चेबंदी पूर्ण केली आहे. तस्करांकडे हिंदुस्थानची आर्थिक स्थिती कोलगडून टाकण्याचे कार्य दिले आहे. अरबांना हिंदुस्थानात पैसे गुंतविण्यास प्रवृत केले आहे. मुसलमानांनाच भरती करणारे उद्योग उभे करण्यास सांगितले आहे.

समुद्रतीरावर मुसलमानांचे आधिक्य अशासाठी केले जात आहे. की तस्करांचा उद्योग सुरक्षित असावा.

सेक्युलरिझमचा वेगाने प्रचार करण्यासाठी अनेक संस्थांना उद्युक्त केले आहे.

आकाशवाणी, दूरदर्शन, बोलपट म्हणजे सिनेमा यातील भाषेतून हिंदीचे उच्चाटन करून अरबी, फारसी शब्दांची भरमार करविण्यासाठी आणि संस्कृत नष्ट करण्यासाठी, संस्कृतचा द्वेष शिकविण्यासाठी, हिंदूंतूनही अनेक अभिकर्ता पाकिस्तानने येथील मुस्लिमाकरवी बांधले आहेत.

३२) जामा मशीद विघटनाचे प्रमुख केंद्र.

काश्मीरचा लढा, काश्मीर मुस्लिम-बहुल म्हणून तेथे मुस्लिम शासन स्थापण्याचा लढा, वि.प्र. सिंहच्या खलिफासकट, अब्दुल्ला बुखारीसकट, सर्व

मुसलमान लढवीत आहेत. हिंदुस्थानची सीमा काश्मीर कातरून हिमाचल प्रदेश आणि हरयाणापर्यंत सीमित केली की दिल्लीत, उत्तर प्रदेशात, बिहारमध्ये मुस्लिम स्वातंत्र्यासाठी लढा देण्याचा मार्ग आणखी सुलभ होईल.

वि. प्र. सिंहानी भूमिका बांधून दिली आहे. पन्नास लाख रुपये त्या मशिदीच्या डागडुजीच्या नावाने शासकीय कोषातून दिले आहेत की जी मशीद ब्रह्माविष्णु महेशाचे भव्य सुंदर मंदिर होते; मागील दिशेच्या पायऱ्या फोडल्या, मागे वेगळ्या दगडांनी भिंत बांधली. मूर्ती उद्ध्वस्त केल्या.

मंदिरांचे कळस अस्तित्वात आहेत. चार दिशांच्या भव्य दीपमाळा अस्तित्वात आहेत.

ती आज मशीद म्हणून ओळखली जाते. हे आपले स्वराज्य आहे !

बुखारी इराणला जाऊन आला खोमेनीच्या वर्षश्राद्धासाठी !

जामा मसजिद हिंदुस्थानातील विघटनवाद्यांचे एक प्रमुख सजीव केन्द्र आहे. वि. प्र. सिंहची त्या केन्द्रवर्धनासाठी कृपा आहे.

आणि त्याच केन्द्रातून वि. प्र. सिंहना उग्र चेतावणी आली. अहमद बुखारीचा प्रधानमंत्र्यांना दग या शीर्षकाने ती याआधी आली आहे.

३३) दुसऱ्या मुस्लिमसंस्था आणि व्यक्ती काश्मीरविषयी काय म्हणतात

अहमद बुखारीच्या पत्रकात विभाजनवाद स्पष्ट झालाच आहे. अन्य मुस्लिम संस्था काश्मीरविषयी काय म्हणतात ते पाहा म्हणजे धूळफेक स्पष्ट होईल.

दिल्लीत २२/२३ जून १९९० ला मुस्लिम लीगचे 'राष्ट्रीय' संमेलन मावळणकर हॉल मध्ये झाले. सुलेमानसेठ अध्यक्ष होते. त्यांच्या शब्दात, काश्मीर प्रश्न सोडविण्यात राष्ट्रीय आघाडी शासन अयशस्वी झाले आहे. जगमोहन (पूर्वीचे राज्यपाल) चंगेजखान किंवा हिटलर आहेत. आजादीके बाद काश्मीरी भाइयोंके साथ कभी इन्साफ नहीं किया गया । काश्मीर की जमीनपर तो सरकार कब्जा चाहती है पर वहाँ रहनेवाले लोगों को अपनानेको तैयार नही हैं ।

(अन्य विषय - बाबरी मसजिद टूटी तो देशसे धर्मनिरपेक्षताका जनाजा निकल जायेगा । शंकराचार्य की गिरब्दारी के लिए मुलायमसिंहको बधाई । हरिजन अगर अपनी मर्जी से इस्लाम कबूल करे तो उसे मिलनेवाली विशेष सुविधाएँ बंद हो जाती है । यह मुसलमानो के साथ देशमें भेदभाव हो रहा है । अल्पसंख्यांक आयोग को फौरन कानूनी अधिकार दिये जाय, इस आयोग का अध्यक्ष केवल कोई मुसलमानही हो । सरकारी नौकरिओंमे मुसलमानोंको उनकी आबादी के अनुपातमें आरक्षण दिया जाय !)(जनसत्ता - २५/६/९०)

फारुक अब्दुल्लाचे निकटवर्ती मित्र आणि भंग केलेल्या काश्मीर विधान सभेचे सदस्य अब्दुल रशीद दर यांनी एका सार्वजनिक सभेत आवाहन केले की नॅशनल फ्रंटने काश्मीर लिबरेशन फ्रंटला सर्व सहयोग द्यावा. त्यांनी फारुक अब्दुललाला आवाहन केले की फ्रंटची शक्ती वाढवा आणि काश्मीरच्या स्वातंत्र्यासाठी एकत्र या.

फारुकचे दुसरे मित्र मुबारक गुलन याने नॅशनल फ्रंटचे त्यागपत्र दिले आणि फ्रंटला बळ देण्याचे आवाहन केले.

काश्मीरचे भूतपूर्व सूचनामंत्री अली महमद सागर यांनी सांगितले की फारुकने केंद्राचा अहितकर प्रस्ताव मानला तर पक्षात विद्रोह होईल. (दै. प्रभात २८/६/९० मरेठ)

दर, सागर आणि गुलन एका वेळच्या हिंदू परिवारातून बाटलेले मुसलमान. धर्म बदलला आणि त्यांची राष्ट्रीयता बदलली. त्यांच्यात फुटीरता आली. हिंदू या संस्कृतीतून उत्पन्न झालेले कोणतेही गमक त्यांना तिरस्करणीय झाले आहे.

असे आहेत मुस्लिम संस्थांचे आणि मुस्लिम नेत्यांचे विचार. म्हणून दिल्लीत मुसलमानांच्या सभेने काश्मीर हिंदुस्थानचा अविभाज्य भाग आहे आणि तेथे सार्वमताचा प्रश्नच नाही, असे म्हटले, या बनावाला धूळफेक यापलिकडे कोणताही अर्थ नाही.

३४) काश्मीर आमचे आहे. भाजपचा प्रस्ताव.

भाजपने मद्रासला प्रस्ताव केला आहे. काश्मीर भारताचे अविभाज्य अंग आहे. (२३/७/९०)

तुम्हाला प्रस्ताव करण्याचे कारण काय ? तुम्ही आजही शासनाचे अविभाज्य अंग आहात. तुम्ही तुष्टीकरणवादी असा तुमच्यावर आक्षेप असला तरी मुस्लिम पक्ष आहात असा कोणावा तुमच्यावर आरोप नाही.

मुस्लिम दलांना तसे प्रस्ताव करू देत. त्यांना, आपण देशाशी एकरूप आहोत असे वरून दाखविण्याचे असते आणि शासनाकडून पैसे उकळण्याचे असतात.

तुम्हाला प्रस्तावच करायचा होता तर लाहोर आमचे आहे, पेशावर आमचे आहे. रावळपिंडी आमचे आहे. डाका आमचे आहे आणि ते आम्ही मिळवूच मिळवू. असा प्रस्ताव करायला हवा होतात. जे तुमचे आहे आणि तुमच्या हातांत आहे त्याचा प्रस्ताव कुणासाठी करता ?

राष्ट्रीय आघाडीच्या शासनाला पाठिंबा देतांना, धारा ३७० आहे तशीच

राहू द्यायची हे तुम्ही आघाडीला आश्वासन दिलेत, तर ३७० धारा हटवून घेऊ अले जनतेला आश्वासन दिलेत ! तेव्हा मते घ्यायची होती. आता आसन टिकवायचे आहे !

तरीही, काश्मीर आमचे आहे हा प्रस्ताव न करताही तुमचे आसन शासनांत आणि मत जनतेत तेच राहिले असते !

३५) इस्लामी आक्रमण झाले नसते तर ?

या देशावर इस्लामी आक्रमण झाले नसते तर ज्ञानविकासाचा मार्ग अक्षुण्ण राहिला असता. अंतराळातील उपग्रहांचा उपक्रम दोनशे तीनशे वर्षांपूर्वीच हिंदुराष्ट्राने संपन्न केला असता. आज विज्ञानाच्या क्षेत्रांत अग्रेसर असलेल्या देशांना आपल्या देशाने वैज्ञानिक आणि बौद्धिक साहाय्य केले असते. ज्ञानाचीही देवाण-घेवाण करण्याची क्षमता ठेवली असती. किंवा आक्रमण होऊनही आक्रमणकर्त्यांनी स्थानीय लोकांच्या ज्ञानवर्धनाच्या प्रयत्नांचे कौतुक केले असते, त्यास उत्तेजन दिले असते. ग्रंथालये जपली असती, सौंदर्य उध्वस्त केले नसते, कला नष्ट केल्या नसत्या, कलाकारांचा, ज्ञान्यांचा, शिल्पकारांचा संहार केला नसता तरीही हा ज्ञानविकास अविरत राहिला असता.

३६) इस्लामचे अधिष्ठान उद्ध्वस्तीकरण

पण इस्लाम या संकल्पनेचे अधिष्ठानच मुळी उद्ध्वस्तीकरणांत आहे आणि उद्ध्वस्तीकरणाचे अधिष्ठान उपद्रवी अंधश्रद्धेत आहे. आपण धर्मान्ध म्हणतो. धर्मान्ध नव्हे, अधर्मान्ध. धर्माने कोणी अंध होत नाही. अधिक डोळस होत जातो. अधर्माने माणूस अंध होतो. अज्ञानाने अंध राहतो. अज्ञानच ज्ञान म्हणून जोपासले तर तो डोळस होण्याची शक्यताच संपते.

हिंदुस्थानने तो अनुभव उणीपुरी एक हजार वर्षे घेतला आहे. ज्ञानविकासाच्या आश्रयाने संघर्ष करीत करीत हिंदू जाती टिकली आहे. तेच हिंदूराष्ट्र आहे ! अज्ञानाच्या नाशासाठी, अंधश्रद्धेच्या निर्मूलनासाठी संघर्ष अटळ आहे. काश्मीरच्या घटनांनी घंटा वाजविली आहे, डिंडिम बडविले आहेत. काश्मीरचा संघर्ष ज्ञान विरुद्ध अज्ञान, अंधश्रद्धा विरुद्ध ज्ञानप्रकाश अशा स्वरूपाचा आहे. अंधश्रद्धा सर्वदूर असल्याने तो संघर्ष काश्मीरपुरता सीमित नाही.

३७) देश ठेवायचा तर प्रजानन देशनिष्ठ हवेत

मुस्लिम लीगने स्पष्ट केलेली भूमिका खरी आहे.

काश्मीरच्या भूमीवर तर अधिकार पाहिजे पण तेथे राहणाऱ्या लोकांना सामावून घेण्यास शासन सिद्ध नाही हा लीगचा आरोप आहे.

सरळ अर्थ असा आहे की भूमीवर स्वामित्व हवे असेल तर लोकही असे पाहिजेत की ज्यांना आत्मसात करता येईल. १३७ कर्मचाऱ्यांनी आपले स्वरूप दाखविले ते त्यांना शासनाने आत्मसात केले नाही म्हणून नव्हे. त्यांची निष्ठा अन्यत्र होती म्हणून. म्हणजेच लोकांना निष्ठेसह आत्मसात केले पाहिजे.

हिंदुस्थानचा अविभाज्य भाग तेथील प्रजेसकट राहण्यास पाहिजे असेल तर सर्व प्रजा अशी पाहिजे की जिच्या राजकीय, सामाजिक किंवा सांस्कृतिक निष्ठा देशाच्या बाहेर नाहीत.

आपण हे करू शकलो तर काश्मीर आपले राहील. लीगने मार्ग दाखविला आहे.

काश्मीर आपणास ठेवले पाहिजे कारण अन्यथा शत्रूची सीमा नुसती हिमाचल प्रदेश आणि हरियाणा येथवरच नव्हे तर दिल्लीच्या जामामशिदीपर्यंतही पोहचण्यास वेळ लागणार नाही.

लढाई अंतर्गत आहे तोवरच आपल्याला हे शक्य आहे. सर्व प्रदेश हिंदू प्रदेश करणे आज शक्य आहे.

संघर्ष, तोही भयानक संघर्ष अटळ आहे, तो काश्मीरपुरता मर्यादित नाही. काश्मीरच्या फुटीरतावाद्यांना अन्य हिंदुस्थानातील ज्या ज्या केंद्रातून सहाय्य केले जात आहे, ती सर्व पाकिस्तानची मोर्चाबंदी आहे. ती सर्व स्थळे संघर्षबिंदू होणार आहेत.

आपणच आपले शत्रू झालो तर दुसरे येऊन आपला उद्धार करणार नाहीत. आपल्याला संरक्षण देणार नाहीत.

उद्धरेदात्मनाऽत्मानं नात्मानमवसादयेत् ॥
आत्मैव ह्यात्मनो बन्धुरात्मैव रिपुरात्मनः ॥ अध्याय ६ श्लोक ५

आपण स्वतःच स्वतःचे शत्रू बनलो. शत्रूंना घरात घेतले. आपल्या सावलीलाच भिऊ लागलो. आपल्याला आपला उद्धार स्वतःच केला पाहिजे.

३८) सैनिकांत असंतोष

काश्मीरमध्ये कामावर असलेल्या राखीव आरक्षी दलाला म्हणजे रिझर्व पुलीस फोर्स तसेच अर्धसैनिक बल म्हणजे प्यारा मिलिटरी युनिट आणि प्रत्यक्ष सैनिक यांच्यात शासकीय नीतीविषयी अत्यंत असमाधानच नव्हे तर असंतोष आहे. गोळ्या खा पण गोळ्या मारू नका अशा स्वरूपाच्या अलिखित आदेशाने तर ते विचारतात गोळ्या खाण्यासही आमच्या हातात बंदुका कशासाठी पाहिजेत. देवाला प्रसन्न करून घेण्याला कोंबड्या चढवतात तसे तुम्ही विभाजनवाद्यांना

प्रसन्न करून घेण्यासाठी आम्हाला चढवत आहात काय ? काश्मीरच्या संरक्षणासाठी म्हणून आम्हाला दोन दोन हजार मैलांवरून आणले आणि विघटनवाद्यांना संरक्षण देत आहात आणि आमचे मुडदे पाडीत आहात.

त्यात पुन्हा अल्पसंख्याकांना भरती केले पाहिजे म्हणजे विभाजनवाद्यांच्या प्रवृत्तीतील धार मंदावेल अशा शासनाच्या आत्मघातक नीतीने दहापंधरा जणांच्या तुकडीत तीनचार मुसलमान भरले जातात. सैनिकांचे काम आणखी अवघड होते. हे मुसलमान उग्रवाद्यांशी संधान बांधून त्यांच्या कामाच्या (ड्युटी)च्या वेळात आम्हाला मारून तर टाकणार नाहीत, हा आणखी एक संशय त्यांच्या मनावर तरंगत राहतो.

सर्व अधिकारी वर्ग आपल्या भावना इतक्या स्पष्ट बोलत नाहीत पण त्यांचे मौनच बोलके असते.

हे राज्यकर्ते सैनिकांचेही बळी देतील आणि काश्मीरचाही बळी देतील असे विचार त्यांच्या मनात घर करून असले पाहिजेत असे अनुमान करता येते. यावर उपाय योजण्याच्या विचारात त्यांचे मन व्यग्र असावे असेही वाटते.

आक्रमकांना खदेडण्यास सैनिकांना शस्त्रबळ वापरू दिले नाही तर सैनिक माघार घेतात आणि सुरक्षित स्थळी येतात. युद्धाचे हे शास्त्र आहे.

३९) जगण्यासाठी योजना लागतात. आत्मनाशासाठी नव्हेत

विनाश करून घेण्यास योजनांची आवश्यकता नसते. त्या योजना आखण्याचे काम आक्रमक करीत असतात.

सामूहिक संकटाची कल्पना आल्यावर जगण्यासाठी, सामूहिकपणे जगण्यासाठी, स्वत्वासकट जगण्यासाठी, योजना लागतात.

संघर्ष काश्मीरपुरता मर्यादित नाही. तो देशभर आहे.

स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी कर्णावती येथील हिंदुमहासभेच्या १९३७ मधील अध्यक्षीय भाषणात हिंदुस्थानात दोन राष्ट्रे आस्तित्वात असल्याच्या वस्तुस्थितीची जाणीव दिली होती. त्यांच्या त्या भाषणाचा अत्यधिक अपप्रचार केला गेला तो आपले मुस्लिम तुष्टीकरण लपविण्याच्या उद्देशाने. पण त्या अपप्रचाराचा एवढा प्रभाव राहिला की शेषाद्रीसुद्धा त्यातून सुटले नाहीत.

स्वातंत्र्यवीर सावरकरांनी जे म्हटले आहे ते मूळ इंग्रजीत उधृत केले आहे.

Two antagonistic Nations living in India side by side

As it is, there are two antagonistic nations living side by side in India, Several infantile politicians commit the serious mistake in supposing that India is already - welded into a harmonious nation, or that it could be welded thus for the mere wish to do so. These our well meaning but unthinking friends take their dreams for realities. That is way they are impatient of communal tangles and attribute them to communal organizations. But the solid fact is that the so-called communal questions are but a legacy handed - down to us by centuries of a cultural, religious and national antagonism between the Hindus and the Moslems. When time is ripe you can solve them; but you cannot suppress them by - merely refusing recognition of them. It is safer to diagnose and treat deep-seated disease than to ignore it. Let us - bravely face unpleasant facts as they are. India cannot be assumed today to be a unitarian and homogeneous nation, but on the contrary there are two nations in the main; the Hindus and the Moslems, in India. And as it has happerned in many a country under similar situation in the world the utmost that we can do under the circumstances is to form as Indian State in which none is allowed any special weightage or representation and none is paid an extra-price to buy his loyalty to the State. Mercenaries are paid and bought off, not sons of the Motherland to fight in her defence. The Hindus as a nation are willing to discharge their duty to a common Indian State on equal footing. But if our Moslem contrymen thrust on a communal strife on the Hindus and cherish anti-Indian and extra territorial designs of establishing a Mohammedan Rule or supremacy in India then let the Hindus look to them-selves and stand on their own legs and fight singlehanded as best as they can for the liberation of India from any non-Hindu yoke,

be it English or Moslem or otherwise.

Veer Savarkar

19th session, Akhil Bharat Hindu Maha Sabha, at Karnarati (Ahmedabad). Samagra Savarkar Vanmaya Vol. VI. pp. 296.

रोग आहे पण त्याची चिकित्सा करून घेण्याची भीती वाटते, कारण रोगाचे खरे कारण कळल्यास प्रतिष्ठेला धक्का लागेल, ही जशी तेव्हाची खोट्या प्रतिष्ठेची प्रतिष्ठा होती; तीच आजची स्थिती नाही काय ? काश्मीरची स्थिती हिंदू विद्वेषावर आधारित आहे हे लपविले गेले आहे.

आजची देशाची स्थिती त्या पलीकडची आहे. तुष्टीकरण नीतीमुळे हिंदुस्थानांत मुस्लिम राष्ट्राचे अस्तित्व आहे. ख्रिश्चन राष्ट्राचे अस्तित्व आहे. 'सेक्युलर' शासनाची त्याला मान्यता आहे.

शहाबानो प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाला महिलाहित श्रेष्ठ वाटले तर सेक्युलर शासनाला मुल्लाहित श्रेष्ठ वाटले. सेक्युलर शासनाने इस्लामी राष्ट्राला मान्यता दिली. सर्वोच्च न्यायालयाला धुळीला मिळविले. नागालॅंड, मिझोरामच्या निवडणुकीत, शासकीय शाळांतून ख्रिश्चन धर्माचा प्रचार करण्याचे आश्वासन दिले गेले, त्याप्रमाणे प्रत्यक्षात केले गेले आणि ईसाई राष्ट्राला सेक्युलर शासनाकडून मान्यता दिली गेली. आधिकात अधिक ईसाई प्रसार केला अशी ख्याती असलेल्या 'मानवतावादी' मदर टेरेसाला देशाच्या सर्वोच्च पुरस्काराने भूषविले.

संस्कृतच्या शिक्षकाने वर्गात अर्थर्वशीर्ष शिकविले म्हणून सेक्युलर शासन संतापले आणि त्याने शिक्षकाला काढून टाकले.

हिंदुराष्ट्र या संकल्पनेचे अस्तित्व मारले गेले आहे.

स्वत्वाच्या आणि भौगोलिक परिसीमेतील अखिल देशाच्या रक्षणासाठी हिंदुराष्ट्र ही संकल्पना स्वत:च्या मनात स्पष्ट असली पाहिजे.

हिंद्वेतरांना त्यांचे स्थान दाखविण्याची वेळ आली आहे. त्यांना एक राष्ट्र या संकल्पनेत समाविष्ट करणे म्हणजे काय याची रूपरेषा आपल्याजवळ पाहिजे. नागरिकांचे अधिकार आणि नागरिकांचे कर्तव्य यांची संहिता आपल्यापुढे पाहिजे.

४०) हिंदुत्ववाद – मानवतावादाचे दुसरे नाव

हिंदुत्ववाद बुरसटलेला विचार नाही. तो ज्ञानाचा मार्ग आहे. ज्ञानवर्धनाचा मार्ग आहे. रूढींनी आणि अज्ञानाने निर्माण झालेले दोष आपल्याला काढता

येतील.

ज्ञान जगांतून घ्यावे, अज्ञान नव्हे, अंधश्रद्धा नव्हे.

आपल्या ज्ञानविज्ञानायी काही ठळक उदाहरणे माझ्या ध्रुवस्तंभसंकुल किंवा कुतुब कॉंप्लेक्स या आगामी पुस्तकांत मी देत आहे.

सर्वधर्मसमभाव हा दास्यवृत्तीतून, भयगंडातून आणि अज्ञानातून निर्माण झालेला विचार आहे. धर्म अनेक आहेत हे मानण्याचा प्रमाद आपण त्यातून करतो. मानवता धर्म हा धर्म. मानवतेला उपकारक ते ग्राह्य, ते धर्मतत्त्व. मानवतेशी द्रोह करणारा तो अधर्म. त्या विशाल व्यापक दृष्टीतून हिंदुराष्ट्राच्या संहितेची उभारणी असावी.

४१) हिंदुराष्ट्राच्या नागरिकत्वाच्या संहितेची स्थूल परिधी

तुम्हाला शंकराची पूजा करावयाची आहे ? शंकराची करा. जैन मंदिरात जायचे आहे ? आनंदाने जा. गुरुग्रंथ महाराजांचे श्रवण करावयाचे आहे ? सुखाने करा. बौद्धाला दैवत मानून बुद्धीचा विकास करायचा आहे ? तो ही करा. आंबेडकरांच्या मूर्तीपुढे ध्यान करायचे आहे ? करीत राहा. नुसते हवन करायचे आहे ? करा. मूर्तिपूजा करायची नाही ? नका करू. निरीश्वरवादाचा पुरस्कार करायचा आहे ? तुम्ही करू शकता एकेश्वरवाद प्रचारायचा आहे ? अवश्य प्रचारा. या सर्व प्रकारांचे तुम्हाला स्वातंत्र्य आहे, दुसऱ्या पंथीयांशी संघर्ष न करता.

मूर्तिपूजक काफर आहेत, हरामचे महिने संपल्यावर मूर्तिपूजकांना पकडा त्यांना ठार मारा अशा प्रकारच्या प्रार्थना करण्याचे, अशा प्रार्थना व स्थळांना पवित्र मानण्याचे, अथवा सहजीवनद्रोही उन्माद करण्याचे येथे स्वातंत्र्य राहणार नाही.

अरबस्तानात वाहने उजव्या अंगाने चालवितात, मी मुसलमान आहे म्हणून मी माझे वाहन उजव्या अंगानेच चालविणार, असले वाहतुकविरोधी स्वातंत्र्य येथे चालणार नाही.

मी मुसलमान आहे म्हणून मी अनेक विवाह करणार, अनेक अपत्ये निर्माण करणार, गरीबी हटाव या घोषणेशी माझा काही संबंध नाही, असा समाजद्रोही, देशाच्या अर्थव्यवस्थेला धक्का लावणारा सूर आणि व्यवहार करण्याचे येथे स्वातंत्र्य असणार नाही.

परिवार नियोजनासारख्या मानवी व्यवस्थेच्या स्वीकृत मार्गाच्या वाहतुकीला व्यत्ययकारी स्वातंत्र्य येथे असणार नाही.

मी मुसलमान म्हणून मी माझ्या अपत्यासाठी नावांची आयात अरबस्थान मधून करणार हे स्वातंत्र्य, हा फुटीरपणा येथे चालणार नाही. येथील निसर्गावर प्रेम करता येत नसेल तर येथे नागरिकत्वही नाही आणि स्थानही नाही.

बाबर, अकबर, अल्लाउद्दीन, तैमूर, महमद, कासीम, तुघ्लक, नादीर, चर्चिल, जॉर्ज, झेवीयर ही नावे एकतर आयात केलेली आहेत. दुसरे ती नावे स्थानीय लोकांवर बळाने लादलेली आणि त्यांच्या संस्कृतीपासून त्यांना विकृतीकडे नेणारी आहेत, आणि तिसरे, ती नावे राष्ट्राला भूषण नव्हेत. मानवतेला लज्जास्पद कलंक असणारी ती नावे आहेत. यातील अनेक सुलतानांनी ज्ञान्यांच्या मुंडक्यांचे डोंगर रचून आपली उन्मादी उपद्रवकारी अंधश्रद्धा इतिहासात अंकित केली आहे.

तीर्थस्थान अमूक असे मानलेच पाहिजे हे बंधन नाही. तीर्थस्थान मानले पाहिजे हेही बंधन नाही पण तीर्थस्थान देशाच्या बाहेर ठेवण्याचे असेल तर येथे नागरिकत्वही नाही. स्थानही नाही.

मृत्यूनंतर भूमी अडवून ठेवण्याचे येथे स्वातंत्र्य राहणार नाही. प्रेताची विल्हेवाट जेथे उपलब्ध असेल तेथे आधुनिक साधनांनी होईल. एक देशात एक नियम.

स्त्रियांना जन्मभर अवगुंठित ठेवणे, त्यांना अडाणी ठेवणे हे मानवताद्रोही स्वातंत्र्य येथे असणार नाही.

वरील मानवतावादी सूत्रात जे राहतील ते राष्ट्राचे घटक.

४२) महाराष्ट्र देशाचा खडगहस्त आहे

हिंदूंचा विशेषत: महाराष्ट्राचा हा इतिहास आहे की सीमारक्षणासाठी ते स्वत:च्या घरादाराची चिंता न करता धाव घेत असतात. इतिहासाची पुनरावृत्ती हा निसर्ग नियम असेल तर हा महाराष्ट्र पुन्हा इतिहास घडवील आणि शत्रूला सीमापार करेल. हिंदुराष्ट्राची संकल्पना मानवतेच्या हितासाठी महाराष्ट्र प्रत्यक्षांत उतरवील. हा प्रदेशाभिनिवेश नव्हे, अहंकार नव्हे तर इतिहासाच्या पानांतून निथळवणारे सत्य आहे. त्याचवेळी, अन्य प्रदेशांच्या वेळोवेळींच्या शौर्याचा आदर आहे, अनादर कधीच अभिप्रेत नाही.

४३) संमारोपापूर्वी

काश्मीर १९९० या प्रदीर्घ लेखांत काही ठिकाणी द्विरुक्तीचा तर काही ठिकाणी विषयान्ताराचा प्रमाद मी केला आहे. नव्या पिढीला चिंतन करण्यास, विचारांचा विकास करण्यास अवसर मिळावा ही इच्छा होती. पुन्हा पुन्हा लिहिणे

होत नाही. म्हणून प्रमादासाठी क्षमाप्रार्थी.

४४) जगायचे आहे ना ? मग राज्याचे स्वराज्य करा.

आपण राज्य राबवीत आहोत, स्वराज्य नाही. स्वराज्यात रामजन्मभूमी मंदिर जीर्णोद्धार हा 'प्रश्न' राहात नाही. मंदिर मुक्ती आंदोलने स्वराज्यात करावी लागत नाहीत. काश्मीर ही स्वराज्यातील समस्या नसते.

पाकिस्तानने स्वराज्य मिळविले आहे. विशाल मंदिरांच्या शाळा करायच्या की घोडशाळा करायच्या हे त्यांना तेथील हिंदूंना विचारण्याचे कधी कारण पडले नाही.

राज्याचे स्वराज्य आपल्याला करायचे आहे. राज्य मिळविले तर स्वराज्यही मिळवा. असलेल्या राज्याचे स्वराज्यात रूपांतर करण्याचे आहे हे उद्दिष्ट मनात स्पष्ट पाहिजे.

स्वत्वासहित अस्तित्वासाठी भावी पिढ्यांना छातीवर वार झेलण्याचे आहेत आणि मस्तकावर प्रहार करण्याचे आहेत. त्यांना त्याची आवड आहे म्हणून नव्हे, तर संघर्ष त्यांच्यावर लादला जाणार आहे म्हणून.

स्वातंत्र्यवीर सावरकरांची सर्व अनुमाने त्या त्या काळाने सत्य ठरविली. काँग्रेस देशाचे विभाजन करील. पाकिस्तान निरंतरची डोकेदुखी राहील. एका पाकिस्तानने प्रश्न सुटणार नाही. प्रांतोप्रांती अल्पसंख्याक म्हणून पाकिस्तानवादी सांभाळल्याने पाकिस्ताने त्यातून निर्माण होतील. ही भयाची घंटाही त्यांनी १९४२ मध्ये वाजवली होती. (हिन्दू महासभा अधिवेशन कानपूर)

त्यांनी आणखीही एक अनुमान केले होते. भविष्यकाळ त्यांना १९३२ मध्ये वर्तमान काळाप्रमाणे डोळ्यासमोर दिसत होता.

जग जिंकण्यासाठी नव्हे तर जे कुणी पराधीनतेत आहेत त्यांना मुक्त करण्याला, जगा आणि जगू द्या या सहजीवनाच्या, प्रेमाच्या शिकवणुकीचा अवलंब करण्याला, समाजवादाचाच नव्हे तर साम्यवादाचा पुरस्कार करण्याला, सुजनांचे रक्षण करण्याला,

कोटी कोटी हिंदु जाति चालली रणाला —

हे ते अनुमान होते - ती वेळ अति निकट आलेली आहे.

४५) ऐक भविष्याला !

ऐक भविष्याला । भव्य भीषणाला ॥

विगता । भयहता । वर्तमानकाला ।
हिंदुजाति ज्यासाठी चालली रणाला । भव्य ।।धृ।।

अेक अेकला जो तो । होऊनि अजि अेकचि तो ।
कोटि कोटि हिंदुजाति । सज्ज ह्या क्षणाला ।। भव्य ।। १

सहनशीलता स्तंभ । तडकुनि विक्राळ जृंभ ।।
अंगि संचरे नृसिंह । हाणितचि घणाला ।। भव्य ।। २

आजवरी छळ करिसी । तो तो तू आजि हरसी ।।
दुःशासन कशिपु कंस । गणि न ती कुणाला ।। भव्य ।। ३

सिंहासनि स्थापु देव । प्राणांची देवघेव ।।
आपुलिया अस्तित्वा । लावुनी पणाला ।। भव्य ।। ४

होऊनिया मुक्त स्वतः । करिल मुक्त ती जगता ।।
ममतेच्या समतेच्या । सुजन रक्षणाला ।। भव्य ।। ५

रत्नागिरी, १९३२.

● ●

(१०/८/१९९० पर्यंत)

वेदीवर या राही मी स्थिर

देशभक्ति हे पाप असे जर । तर मी पापी घोर भयंकर ।
मात्र पुण्य असेल, माझा नम्र तरी अधिकार तयावर
वेदीवर या राही मी स्थिर ।।धृ।।

द्रौपदीस छळले दुष्टांनी । कुरुतीर्थी लढले भीमाजुर्न
न्हाली रुधिराने वसुंधरा । अन्यायाचे हो परिमार्जन
सीतेसाठी श्रीरामांनी । लंकेवर केले रणकंदन
मात्र आज या नव्या भारती । अबला हतबल सबलावाचुन
अबलांचा तो करुणार्तस्वर । सह्याद्रीच्या ये कानावर
वेदीवर या राही मी स्थिर ।।१।।

न्यायासाठी आप्तांशीही लढणे । मागे फिरणे नाही
होता संभ्रम धनुर्धराला । स्फूर्तिप्रद हरि गीता गाअी
ठाअी ठाअी खलां मारिले त्याने, जग कल्याणापायी
केले का हो पाप तयाने? आपण म्हणतो, नाही ! नाही !
समजा असले! कृष्णार्पण ते! कर्ता तो अन् निमित्त मी तर
वेदीवर या राहो मी स्थिर ।।२।।

भू विभाजने कष्टी झाले त्या व्रणितांचे करण्या सांत्वन
फास घेतला गळ्याभोवती । परि नाही विचलित माझे मन
दुष्टांना देणे सहायता । ठरते अत्याचारा अिंधन
काया जरी वंशोपार्जित । रक्षा कायेची माझे धन
धन ते टाका सिंधूमध्ये अखंडत्व देशा आल्यावर
वेदीवर या राही मी स्थिर ।।३।।

(नथूराम गोडसे यांच्या वक्तव्याचा, पत्रांचा, मृत्युपत्राचा सारांश)

गोपाळ गोडसे

नथुराम गोडसे
फाशी दि. १५.११.१९४९
अंबाला बंदीगृह

हौतात्म्य

नारायण आपटे
फाशी दि. १५.११.१९४९
अंबाला बंदीगृह

जये भडगिले भारता आणि केले द्विषद्राष्ट्र निर्माण सिंधूतटी
तटीं आणि वङ्गाब्धिच्या 'मी'पणाने जनां घालुनी तेथल्या संकटी ॥ १ ॥
जनांच्या मताला पदी निर्दळूनी दिली संमती अंधकारामधी
मधी घालुनी शुभ्र धेंडे कधी वा पदां चाटुनी अिंग्रजांच्या कधी ॥ २ ॥
दिला जन्म मुस्लीम - राष्ट्रासि त्याने जिथे हिंदु-हत्या नसे वाअुगी
अुगी पाहिजे मात्र हिंदू तदा वा पळावें तयाने पदांच्या युगी ॥ ३ ॥
किती हिंदु येती पदीं भारती त्या नसे अंत, त्याची तया ना क्षिती
क्षिती सर्व रक्ताळली, 'ही आहिंसा' तरी तो वदे, लोकही अैकिती ॥ ४ ॥
प्रतीकार होतां जरा भारती तो दुरात्मा धरी अुग्ररूपा, अणी
अणी दाब शास्त्र्यांवरी मारण्या त्यां छऱ्यांनी जनांना खुल्या रंगणी ॥ ५ ॥
रिपू आक्रमी राज्य काश्मीर जैं, तै अम्ही आडवीले रिपूच्या धना
धना देववीले रिपूच्या बळाने खळें घालण्या अग्निला अिंधना ॥ ६ ॥
विरोधी कुणी पक्ष वा पत्र राही तयाच्या दिला पाय मानेवरी
वरी 'लोकशाही' असा मंत्र राही गमे होअि सुल्तानशाही बरी ॥ ७ ॥
अशा राष्ट्रभंग्या दुरात्म्या वधाया धजेना कुणी पुण्यभूमींत या
तया कारणें घातला हात शस्त्रा स्वयें शासिण्याला प्रमाद्या तया ॥ ८ ॥
शते भोवती होति त्याच्या चरांची सदा सिद्ध शस्त्रांसवें अंगणी
गणीना म्हणोनी विरोधा मुळी तो फिरे वावरे निर्भये रंगणी ॥ ९ ॥
परी पाहुनी संधि गेलो बरी मी सशस्त्रें तयाच्या समज्यालया
लया ठाकलो सिद्ध, त्याच्या कृतीच्या फळा त्याचिया गांठि बांधावया ॥ १० ॥
अुभा मी पथीं, तो हळूं ये मुलींच्या यदा ठेवुनी स्कंधगात्री करां
करानें दुरी मी तयां सारिले अन् झणी सोडिला सज्ज शस्त्रें छरा ॥ ११ ॥
छरा जाय भेदून त्याच्या अुराते, नव्हे अेक तो ! तीन गेले पुरे
पुरे होअि आयुष्य त्याचे, पडे तो झणीं भूवरी, 'अः' मुखें अुद्गरे ॥ १२ ॥
कुणा सांगता 'राम' अंती वदे तो ! नसे तो फुका शास्त्रिचा वारही
रहीमासी रामासि वा आठवावें नुरे वेळ त्याते विचारासही ! ॥ १३ ॥
मुखें मीहि 'पोलीस' 'पोलीस' अैसे रवे अुच्च अुद्गारलो त्या क्षणीं,
क्षणीं दोन वा तीन पायीक येती, मला घेरती, नेति संरक्षणीं ॥ १४ ॥

नको भीक माते क्षमेची अिथे गा नसे साधु निष्पाप मंत्री कुणी
कुणीही न मागा क्षमेतें मदर्थी, सुखें काय जावो हरी कारणी ॥ १५ ॥
तया घातुका नाहि मीहि क्षमीले जयें कैतवें भारता छेदिले
दिले राज्य शत्रूसि फाडूनि भूते म्हणोनी स्वकायेसि मी अर्पिले ॥ १६ ॥
कुणाशी क्षमा याचिणे ! राज्ययंत्री असे मातृभूमिघ्न ती चौकडी
कडी घालुनी हाति फासा गळ्याते नका दौडु ही पौरुषाची घडी ! ॥ १७
जशा घातल्या पुष्पमाला सभांती तशा रज्जुमाला मला भासती
सतीचे करी वाण ना अंधतेने धरीले, तया साक्ष माझी कृती ॥ १८ ॥
मनीं तोषतो मी पडे देह कीं हा जगद्वंद्य या भारता कारणे
रणे माजवूनी अखंडा करा भू महापुण्य भूमीसि या तारणे ॥ १९ ॥
खुळी कल्पना ! मारणे हिंदुवृत्ती असे घालुनी फास कंठांवरी
'वरी मी अखंडा स्वभूम्यर्थ मृत्यू' दणाणेल हा घोष तै अंबरी ॥ २० ॥
कुणा सांगता चक्रवर्ती करी ती अमान्या क्षमा याचना शेवटी
वटी मी वरी, ठोकरीतो क्षमा मी लपेटा परी त्या 'अहिंसा पटीं' ॥ २१ ॥
महावीर संभाजि त्या मोंगलांची क्षमा थुंकण्या भारती जन्मला
मला मान संभाजिचा या पिढीचा, नवा 'बादशा' 'चक्रवर्ती' भला ! ॥ २२ ॥
अहो भाग्य माझे तिथे मृत्यु मातें भगत्सिंग घेती समाधी जिथे
जिथे जन्म 'गोविंद' 'वैरागि' घेती, तया स्वामिची कर्मभूमी जिथे ॥ २३ ॥
जिथे आर्य तैं निर्मिती वेदवाणी गुरुग्रंथजा हीच भू सुंदरा
दरारा गमे मोगलां पह्लुनां जैं हरीसिंग तो भूषवी ही धरा ॥ २४ ॥

नमस्ते सदा वत्सले मातृभूमे
त्वया हिन्दुभूमे सुखं वर्धितोऽहम्
महन्मङ्गले, पुण्यभूमे त्वदर्थे
ददाम्येष कायो नमस्ते नमस्ते ।

नको तो कुणाचाहि आधार माते, वधस्तंभ मी आक्रमीतो पदीं
पदी रज्जु बांधा करी शृंखलाही, धरा दोर मापून कंठामधी ॥ २५ ॥
लयश्वासि ''वन्दे अहं मातरं त्वाम्'' मला गर्जु दे नम्रवूनी शिरा
''चिरायू ठरो मातृभू ही अखंडा'' ! सुखाने अतां मेघ माझा करा ॥ २६ ॥

गोपाळ गोडसे
(२८.७.१९५० ते १.८.१९५०) नाशिक कारागृह

हिंदुस्थान स्वतंत्र झाला, हिंदुस्थानच्या भूमीवर मुसलमान, मुसलमान म्हणून स्वतंत्र झाला आणि त्याने पाकिस्तान हे नाव घेतले. शेष हिंदुस्थानातही हिंदू स्वतंत्र झाला नाही.

इस्लाम हे एक राजनैतिक आक्रमणकारी, असहिष्णु, विस्तारवादी अंदोलन आहे. अल्ला ही परिकल्पना न मानणाऱ्या, कुराणावर विश्वास न ठेवणाऱ्या किंवा उपासनेचे साधन म्हणून मूर्तिपूजा करणाऱ्या जनसमूहांच्या देशावर आक्रमण करणे, त्यांना पराभूत करणे, त्यांना बाटवून मुसलमान करणे, त्यांची संपत्ती लुटणे, त्यांच्या स्त्रिया लूट म्हणून सैनिकांकरवी त्यांच्यावर बलात्कार करणे आणि न बाटलेल्या समूहावर अशा नवीन मुसलमान उत्पत्तीकरवी अत्याचार करण्याची शृंखला अविरत ठेवणे ही कुराणाची शिकवण मशिदी-मशिदीतून हिंदुस्थानात इस्लामी आक्रमणाचा प्रादुर्भाव झाला तेव्हापासून दिली गेली. आजही खंडीत हिंदुस्तानातील मशिदी-मशिदीतून तीच शिकवण स्वत:ला मुसलमान म्हणविणारे मुल्ला देत आहेत. धर्मनिरपेक्ष म्हणविणाऱ्या शासनाने मुसलमानांच्या अलगतेला-सतत प्रोत्साहन दिले आणि राष्ट्रीय एकात्मतेसारखे जल्लोष हिंदूच्याच कानावर आदळले. आता या मुल्लांना शासन वेतन देईल अशी घोषणा प्रधानमंत्री श्री. नरसिंह राव यांनी केली आहे. या सर्व कल्लोळात हिंदुत्व हेच राष्ट्रीयत्व या सिद्धांताचा पुरस्कार करणाऱ्या संस्थेच्या कार्यात जीवन व्यतीत करणारे कोणीतरी हवेत. गोपाळ गोडसे हे काम करीत आहेत. बुद्धीभ्रष्ट स्वजनांकडूनही तिरस्कृत होत राहिले तरीही.

साहित्य काही संस्कार घडविते. सध्या इतिहास विकृत करण्याचा शासनाचा प्रयत्न चालू आहे. तो निष्प्रभ करण्यासाठी पंचावन्न कोटींचे बळी, गांधीहत्या आणि मी, अशी पुस्तके अल्पसे कार्य करू शकतील.